संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामी-विरचित

परमरहस्य



श्रीकाशीजगद्गुरु विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ

संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामी-विरचित

परमरहस्य

प्रकाशक

श्रीकाशीजगद्गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ

जंगमवाडी मठ, वाराणसी (उत्तरप्रदेश)

संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामी–विरचित परमरहस्य (मराठी)

Sant Shiromani Shree Manmath Swami-Virachit PARAMRAHASYA (Marathi)

पाठ्यपुस्तक समिती

शांतितीर्थ संगय्या स्वामी, एम्.ए., बी.एड्., औरंगाबाद. चरभाष : 9850178576

पं. शिवाप्पा नागनाथअप्पा खके, बी.एस्सी., बी.एड्., चारठाणा, जि. परभणी. चरभाष : 9421086848

डॉ. शेषनारायण देवाप्पा पसारकर, एम्.ए., पीएच्.डी., सोलापूर. चरभाष : 9420780570 / 8087559904

डॉ. श्यामा घोणसे, एम्.ए., पीएच्.डी., पुणे. चरभाष : 9890615861

डॉ. अनिल काशीनाथ सर्जे, एम्.ए., पीएच्.डी., सोलापूर. चरभाष : 9823919591

प्रकाशक : शिवशरण कंबाळेमठ, सचिव, श्रीकाशीजगद्गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ, ३ शिवयोगी नगर, बंथनाळ मठाजवळ, जुळे सोलापूर ४१३ ००४. स्थिरभाष : 0217 - 2301621 / चरभाष : 9764027581

अक्षरसंयोजन : सौ. उषा पसारकर, १२६ ब, मार्कंडेय नगर, सोलापूर. स्थिरभाष : 0217 - 2602301

मुद्रक : बा. धों. कोरे, शिव ऑफसेट प्रिंटर्स, 'शिवसदन', माधवनगर रोड, सांगली. स्थिरभाष : 0233 - 2644127

प्रथमावृत्ती : जानेवारी २०१४ । प्रती ५,००० । मूल्य : १०० रुपये

प्रकाशकीय निवेदन

संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामींनी महाराष्ट्रीय वीरशैवांची सांप्रदायिक अस्मिता जागृत केली. आपल्या ओजस्वी वाणीने स्वधर्मपालनाचा आदेश दिला आणि जे स्वधर्मापासून दूर गेले होते अशांना कठोर शब्दांत फटकारून परत स्वधर्मात आणले. त्यांचा परमरहस्य ग्रंथ आणि अभंगवाणी याची साक्ष देतात. परमरहस्य हा मन्मथस्वामींचा अद्वितीय ग्रंथराज आहे. यामध्ये वीरशैव तत्त्वज्ञान आहे, आचारधर्म आहे. षट्स्थल, अष्टावरण, पंचाचार यांचे विवेचन आहे. वीरशैव पुरुष व जंगम यांचे आदर्श त्यांनी वाचकांसमोर ठसठशीतपणे उभे केलेले आहेत. तीर्थसेवन, भजनभक्ती, स्थावरपूजा यांच्याविषयीही त्यांनी स्पष्ट विचार व्यक्त केले आहेत. या ग्रंथात विचारसौंदर्य आहे, तसाच तो वाङ्मयीन सौंदर्यानेही विनटलेला आहे. हा ग्रंथ वीरशैवांचा आचरणकोश असल्यामुळे याचे वीरशैवांनी पुन:पुन्हा पठण-पारायण केले पाहिजे. मनन-निदिध्यास केला पाहिजे. यासाठीच श्रीकाशीजगद्गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठाच्या वतीने या पारायणग्रंथाचे पुन्हा प्रकाशन करण्याचे ठरविले आहे.

प.पू. श्रीकाशीजगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य नेतृत्वाखाली श्रीकाशीजगद्गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठातर्फे वीरशैव सिद्धान्त-साहित्यावर प्रबोध, प्रवीण व पंडित अशा तीन परीक्षा गेल्या अनेक वर्षांपासून घेण्यात येतात. पहिल्या दोन परीक्षांसाठी पाठ्यपुस्तक समितीने पाठ्यपुस्तके तयार केली आहेत, ती अशी-

वीरशैव सिद्धान्त प्रबोध- १. वीरशैव धर्माचा स्थूल इतिहास (लेखक- डॉ. चंद्रशेखर कपाळे)
२. अष्टावरण (लेखक- डॉ. शे. दे. पसारकर)
३. वीरशैव संतवाणी (संपादक- रे. रा. मगाई, ल. सि. हनगंडी, शे. दे. पसारकर)

वीरशैव सिद्धान्त प्रवीण- १. वीरशैव पंचपीठे (लेखक- डॉ. चंद्रशेखर कपाळे)

२. पंचाचार (लेखक- पं. शिवाप्पा खके)

३. वीरशैवांची स्फुट कविता (संपादक- श्री. शांतितीर्थ स्वामी)

तिसऱ्या वीरशैव सिद्धान्त पंडित परीक्षेसाठी शैवभारती शोधप्रतिष्ठानतर्फे प्रकाशित करण्यात आलेले वीरशैव वाङ्मयावरील शोधप्रबंध नेमलेले आहेत. याच परीक्षेसाठी परमरहस्य हा ग्रंथ नेमण्यात यावा, असे ठरल्यामुळे हा ग्रंथ प्रकाशित करीत आहोत. परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना व सर्व भाविकांना अल्प मूल्यात हा ग्रंथ उपलब्ध करून देण्यात येत आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा, ही विनंती.

इ. स. १८८७ मध्ये पारलिंग प्रभुअय्यांनी बार्शी येथे हा ग्रंथ सर्वप्रथम प्रकाशित केला. त्याचेच पुनर्मुद्रण इ.स. १९३१ मध्ये लातूर येथे धर्मवीर देशिकेंद्र महाराजांनी केले. त्यानंतर ष. ब्र. डॉ. शिवलिंग शिवाचार्य अहमदपूरकर यांनी इ. स. १९६१ पासून अत्यंत निष्ठेने व सातत्याने या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित करून महाराष्ट्रात याचा खूप प्रसार-प्रचार केला. ष.ब्र. माजलगावकर, ष.ब्र. शिंगणापूरकर, ष.ब्र. धारेश्वरकर, ष.ब्र. साखरखेर्डेकर या शिवाचार्यांनी व वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर यांनीही हा ग्रंथ प्रकाशित केला. शैवभारती शोधप्रतिष्ठान, वाराणसी यांनी या ग्रंथाची शे. दे. पसारकरसंपादित संशोधित प्रत प्रकाशित केली.

या ग्रंथाची संहिता शुद्धलेखनाच्या जुन्या नियमानुसार (शब्दांची ऱ्हस्वान्त रूपे, अनुच्चारित अनुस्वार इ.) रे. रा. मगाई व शे. दे. पसारकर यांनी चार महिने परिश्रम करून सिद्ध केली. त्यामुळे हा ग्रंथ व्याकरणशुद्ध झाला आहे. त्यांच्याविषयी मी कृतज्ञता व्यक्त करतो. संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामींच्या या प्रासादिक ग्रंथाचा सर्वांनी लाभ घ्यावा, ही प्रार्थना.

शिवशरण कंबाळेमठ
सचिव,
श्रीकाशीजगद्गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ, वाराणसी

सोलापूर
२६ जानेवारी २०१४

॥ अथ परमरहस्यग्रंथः प्रारभ्यते ॥

अनुक्रमणिका

अध्याय पहिला

॥ श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः ॥

ज़यजयाजी सदाशिवा। परब्रह्मा अद्वयानंदवैभवा। नमो तुज देवाधिदेवा। परमेश्वरा जगद्‌गुरु ॥१॥ आतां नमूं चिच्छक्ति। जी जगन्माता पार्वती। अज्ञ जनां उत्तम गति। जयेचिया अनुग्रहें ॥२॥ वेदां परशिवा परब्रह्मा। नेणवे तुझा महिमा। साकार होवोनिया आम्हां। पुरविसी हेतु इच्छित ॥३॥ श्रीसद्‌गुरुकृपेंकरून। आधी नमूं शिवगण। जे कां अमर सर्वांहून। तयास प्रेमें शरण मी ॥४॥ रुद्रगणां तयेपरी। शरण रिघो ये अवसरी। शिवगणांची असे थोरी। ग्रंथांतरीं न वर्णवे ॥५॥ असंख्यात शिवगण। आदि अनादि ते जाण। नित्यानंदीं विराजमान। भक्तां पावन करीत असे ॥६॥ सातशें त्रेसष्ट गण। अवतीर्ण जे पुरातन। नुरोंदय्यादि शरण। महाविख्यात जे ॥७॥ सदाशिव परशिव। सच्चिदानंद गुरुदेव। आचाराग्रणीं स्वयमेव। सदा वैभव शिवाचे ॥८॥ तीर्थ प्रसाद नेमेंसीं। जे सेविती अहर्निशीं। आलस्य त्यजोनि प्रेमेंशीं। भक्तिभावें त्या शरण ॥९॥ ऐसें नमूनि शिवगण। पंचाचार्य ते मुख्य जाण। जे वीरशैवकुलोत्पन्न। गण सृष्टिकर्ते जे ॥१०॥ परि याचे अवतार। चतुर्युगांत साचार। कोणकोणते नामधार।

ईश्वरमुखीं उद्भवलें ।।११।। तया आचार्यां करूं नमन। रेवणसिद्ध मरूळसिद्ध जाण। तिसरा एकोराम ज्ञानिया पूर्ण। चौथा तो पंडिताराध्य ।।१२।। हे चहुयुगीं आचार्य चारी। मुख्य शिवाचारासीं पुढारी। पांचवा असे सहकारी। विश्वार्याप्रति वंदिलें ।।१३।। युगपरत्वें आचार्य पांच। धर्मरक्षणार्थ अवतार साच। हे तो शिवआज्ञेकरूनिच। प्रगट होती मृत्युलोकीं ।।१४।। तो नमूं श्रीगुरु कैवल्यदानी। अगम्य अगोचर अद्वैत निर्वाणी। अविनाश अनिर्वचनी। अनुपम्य स्वामी ।।१५।। अनाम तूं अपरंपारा। श्रीगुरुमूर्ति नागेश्वरा। नागेश हें आडनांव दातारा। एऱ्हवीं अनाम तूं।।१६।। तुज रूप ना रेखा नाम। आम्हीं भक्ति धरूनि ठेविलें नाम। एऱ्हवीं वेदशास्त्रांशीं अगम्य। अगोचर तूं।।१७।। परि भक्तीलागीं आकारलासी। गुरुरूप होऊन तारिसी भक्तांसी। म्हणोनि आज्ञापी परमरहस्यासी। टीका करावया ।।१८।। स्फूर्ति उन्मेष देवोनि। स्वयें वाचेची वाचा होऊनि। प्रेमरसें अक्षर घोळूनि। वाचेनें वदवी स्वामिया ।।१९।। मी तंव नेणें विवेकप्रबोधु। बोलो नेणें साहित्यसंगीतशब्दु। येथें कृपादृष्टीं पाहोनि प्रबंधु। चालवा स्वामी ।।२०।। ऐसें विनवूनि भूमि विन्यासी माथा। तंव कृपा आली श्रीगुरुनाथा। अशीरिणी वदे तत्त्वतां। वर असे तुज पैं ।।२१।। तुवां जो भाव प्रकटविला आतां। तोचि वर तुज दिधला तत्त्वतां। प्रेमभावें करी आतां। टीका परमरहस्याची ।।२२।। श्रीगुरुवाक्य ऐकोनि कानीं। करकमल जोडिलें दोन्हीं। तुमचिया वरदानें ग्रंथ

पूर्णपणीं। निर्मीन आतां।।२३।। वक्ता येथें विश्वनाथ। श्रोते शिवगण समस्त। यातें स्तवूं जोडोनि हात। सावध व्हावें निरूपणीं।।२४।। आतां श्रोतियां श्रीगणां प्रमथां। विनवूं चरणावरी ठेवूनि माथा। सावध होवोनि निरूपणीं आतां। ऐका टीका परमरहस्याची।।२५।। शिवगणां सावध होईजे ऐसें। बोलिलो मी अज्ञान पिसें। ते सर्वकाळ सावध असे। बोलिलो ते अन्यायें।।२६।। शिवगण कांहीं असती असावधान। म्यां तयासीं म्हणितलें व्हावें सावधान। ते सदा सावध म्हणोन। जगत्रय वर्ततसे।।२७।। तरी अन्याय क्षमा कीजें। पितयासारिखे साहूनि जाईजें। मज अपत्यातें कृपादृष्टीनें पाहिजें। शिवगणी तुम्ही।।२८।। तुम्ही शिवगण प्रमथु। गणंगळ सत्यवादी कृपावंतु। मी तुमचे अनाथु। म्हणोनि सलगीनें बोलिलो।।२९।। तुम्हां अवधान द्या म्हणितलें खोटें। तुमचें अवधान लाहून ईश तुष्टें। ऐसें बोल निपजती ओठें। याचा अभिमान तुम्हां।।३०।। मी परिहार कासया देऊं आतां। तुमचे तुम्ही बोलवा ग्रंथा। टीका करवाल आपुलिया स्वार्थां। मज कुंथाकुंथी कायसी।।३१।। ग्रंथ संवाद शिवगौरीचा। निजठेवा तुम्हां शिवगणांचा। यालागीं बोलवाल वाचा। आपुलिया सुखालागीं।।३२।। तुम्ही सुखरूप सदा असा आनंदें। परि जडजीव तरती तुमचिया प्रसादें। यालागीं टीका करवाल स्वानंदें। मज रंकाकडोनि पैं।।३३।। तंव श्रोते शिवगण बोलती। आतां परिहार देसी किती। शिव काय बोलिले पार्वतीप्रति। तें

निरोपी आतां ।।३४।। बरवे स्वामी म्हणोनि। मस्तक ठेविला चरणीं। पार्वतीस बोधी शूळपाणि। तेंचि निरोपुं आतां ।।३५।। आधी पुसेल गुरुमाहात्म्य। मग पुसेल परमरहस्य उत्तम। गौरीनें हृदयीं धरोनिया नेम। श्रवणीं तत्पर झाली ।।३६।। त्याच क्रमें हा परम ग्रंथ। आरंभी किंकर मन्मथ। श्रवणीं श्रोते वीरशैव समस्त। ग्रीवा आनंदें डोलविती ।।३७।।

कैलासशिखरे रम्ये भक्तिसंधाननायकम्। प्रणम्य पार्वती भक्त्या शंकरं परिपृच्छति ।।१।।

कैलासशिखरीं रम्य स्थळीं। भक्तिसाधन धरोनि हिमनगबाळी। प्रणाम करोनि ते वेळीं। पुसे शंकरासीं ।।३८।।

देव्युवाच-

भगवन् सर्वधर्मज्ञ ज्ञानविज्ञाननायक। ब्रूहि मे कृपया देव गुरुमाहात्म्यमुत्तमम् ।।२।।

सर्व धर्मासी कोण जो धनी। ज्ञान विज्ञान वर्तें जयापासोनि। तो तूं भगवंता कैवल्यदानी। वर्णी महिमा श्रीगुरूचा ।।३९।।

शिव उवाच-

यो गुरुः स शिवः प्रोक्तो यः शिवः स गुरुः स्मृतः। भुक्तिमुक्तिप्रदात्रे च तस्मै श्रीगुरवे नमः ।।३।।

जो परमात्मा परमेश्वरु। तोचि सदाशिव सर्वां गुरु। तोचि मुक्तीचा उदारु। निजभक्तांसीं।।४०।। तोचि ज्ञान-विज्ञानदायक। तोचि कर्मधर्मासीं सहाय्यक। तोचि तीर्थ-व्रतांसीं नायक। सद्गुरु तोचि जाणिजे।।४१।।

देव्युवाच-

रूपं भुक्तेश्च मुक्तेश्च ज्ञानविज्ञानयोस्तथा। कर्मधर्मस्य वा रूपं कथयस्व समासतः।।४।।

आतां भुक्ति मुक्ति कोण कैसी। ज्ञान विज्ञान म्हणावें कोणासीं। धर्म आणि कर्मनिर्णयासीं। निरोपा म्हणे पार्वती।।४२।।

शिव उवाच-

लौकिकं सुखमात्यंतं भुक्तिरित्यभिधीयते। निवृत्तिर्घोरसंसारसागरान्मुक्तिरुच्यते।।५।।

शंकर म्हणे वो गिरिजे। आतां प्रश्ननिर्णय ऐक वोजें। ऐकोनि हृदयीं धरिजे। फल पाविजें विश्वासें।।४३।। ऐक भुक्ति जे बोलिजे। अन्न धन संसारसुख जें जें। ते सद्युन् भुक्ति जाणिजे। देतां मी ईश्वरु।।४४।। मुक्ति द्विविधा असती। ऐक त्या सगुणा चाऱ्ही मुक्ति। काळाची कांबी होय गाजती। चहूंचिया माथां।।४५।। निर्गुण पांचवी सायुज्यता जाणिजे। तेणें स्वयें परब्रह्म होईजें। देह असतां जातां

अखंड असिजें। वस्तुचि आपण ।।४६।। तरंग क्षीरसागरीचा। भंगतां न भंगे सागरुचि साचा। तेविं देह भंगतां न भंगे ब्रह्मीचा। ब्रह्मपुतळाचि तो ।।४७।। स्वयें स्वस्वरूप होणें आपण। नाहीं क्रिया-कर्मबंधन। सोऽहं सिद्धि सदा सावधान। तेंचि मुक्तिपद पार्वती ।।४८।। पिंडब्रह्मांडीचा जाणोनि झाडा। सत्-चिदानंदाचा निवाडा। करोनि जाणिजें निजतत्त्व पुढा। त्या नांव विज्ञान ।।४९।। जाणोनि तेंचि होईजें। झालेपणाचा आठव आटिजे। जाणीव ज्ञानाची मग निमे सहजे। विज्ञान तेंचि जाण ।।५०।। धर्म तो कुळीचा जाणिजे। आपले धर्मीं निष्ठत्वें वर्तिजें। अधर्माची शीग निमे सहजे। तोचि धर्म वो देवी ।।५१।। कर्म तें क्रिया जाणिजे। आपुली क्रिया निपुण आचरिजे। निष्कामबुद्धि कीजे। तेंचि कर्म शुद्ध पैं ।।५२।। ऐसा जो भुक्ति-मुक्ति-ज्ञान-विज्ञानदाता। धर्म-कर्म-सर्वक्रियाभोक्ता। तो सदाशिव सद्गुरु कर्ताहर्ता। ऐसिया सद्गुरूसीं नमो नमो ।।५३।।

चैतन्यं शाश्वतं शांतं व्योमातीतं निरंजनम्। नादबिंदुकलातीतं तस्मै श्रीगुरवे नमः ।।६।।

पिंड ब्रह्मांड सृष्ट सर्वांगीं। व्यापक चैतन्य अंगसंगीं। जडातें चेतवी चैतन्य रूपांगीं। ऐसा सद्गुरु तो जाणिजे ।।५४।। शाश्वत म्हणिजे सदा असत। अक्षयी अजर अमर सदोदित। म्हणोनि नामें शाश्वत। श्रीगुरुपद तें ।।५५।। शांत म्हणिजे कांहीं कर्तृत्व नाहीं। षड्विकार षडूर्मि नुठती कांहीं। मनबुद्धि निमे

म्हणोनि शांत पाही। सदा सद्गुरुस्वरूप ।।५६।। व्योमातीत म्हणिजे आकाशरहित। निरंजन जनवन व्यापूनि अतीत। नादबिंदुकळाज्योतिरहित। ऐसिया सद्गुरूसीं नमो नमो ।।५७।।

स्थावरं जंगमाधारं निर्मलं स्थिरमेव च। जगद्वंदितपादाय तस्मै श्रीगुरवे नमः ।।७।।

पृथ्वी पर्वत वृक्ष स्थावर बोलिजें। चालतेबोलते जंगम म्हणिजें। या समस्तांसीं आधार जे जे। तें गुरुपद बोलिलें ।।५८।। जो निर्मल त्रिगुण मलासी। जो स्थिर गंभीर व्यापक सर्वांसीं। त्रिलोक वंदिती ज्या पदांसीं। तया सद्गुरूसीं नमो नमो ।।५९।।

स्थावरं निर्मलं शांतं जंगमं स्थिरमेव च। व्याप्तं येन जगत्सर्वं तस्मै श्रीगुरवे नमः ।।८।।

स्थावर निर्मल आणि शांत। जंगम स्थिर समस्त। या सर्व जगासीं जो व्याप्त। तया श्रीगुरूसीं नमो नमो ।।६०।।

ज्ञानशक्तिसमारूढस्तत्त्वमालाविभूषितः। अज्ञानांधतमस्सूर्यस्तस्मै श्रीगुरवे नमः ।।९।।

जो ज्ञानशक्तीं आरूढ होऊन। लेऊन तत्त्वमालांचें भूषण। जो अज्ञानांधकार छेदितभान। तया श्रीगुरूसीं नमो नमो ।।६१।।

अखंडमंडलाकारं व्याप्तं येन चराचरम्। तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ।।१०।।

जी वस्तु अखंड मंडळाकार। ती व्यापूनि असे चराचर। तें पद दाखवी जो निरंतर। तया सद्गुरूसीं नमो नमो ।।६२।।

ब्रह्माविष्णुश्च रुद्रश्च ईश्वरश्च सदाशिवः। एते गर्भगता यस्य तस्मै श्रीगुरवे नमः ।।११।।

ब्रह्मा विष्णु आणि ईश्वर। सदाशिवादि सर्व अवतार। सृष्टिकर्ते गण साचार। शिवापासूनि उद्भवले ।।६३।। हे सर्व गुरूचे सेवक। म्हणोनि सर्वां ज्ञानदायक। तेहि गुरुकृपेंस्तव देख। गर्भां येती श्रीगुरूच्या ।।६४।। ऐसा श्रीगुरु समर्थ। ज्याचे गर्भीं विश्वनाथ। सदा राहे आनंदांत। तया गुरूसीं नमो नमो ।।६५।।

गुरुदेवो महादेवो गुरुदेवः सदाशिवः। गुरुतत्त्वात्परं नास्ति तस्मै श्रीगुरवे नमः ।।१२।।

गुरु तोचि महादेव। गुरु तोचि सदाशिव। गुरुपरता नाहीं देव। म्हणोनि श्रीगुरूसीं भजिजें ।।६६।। ब्रह्मा विष्णु महेश। हेहि श्रीगुरूचेचि अंश। तेहि ध्याती श्रीगुरूस। यालागीं गुरूसीं नमो नमो ।।६७।।

अज्ञानतिमिरांधस्य ज्ञानांजनशलाकया। चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ।।१३।।

अज्ञान त्रिगुण अंधकार। ज्ञानांजन लावून केला दूर। ज्ञानचक्षु प्रकाशिला निरंतर। तया श्रीगुरूसीं नमो नमो ।।६८।।

भवारण्यप्रविष्टस्य मोहदिग्भ्रान्तचेतसः।येन मे दर्शितः पंथास्तस्मै श्रीगुरवे नमः ।।१४।।

संसाररूपी अरण्यवनीं। अहंभ्रांतिं भुलतां दिशा भुलोनि। तेथें काम-क्रोध सिंह-व्याघ्र वेढूनि। ग्रासूं आरंभिले ।।६९।। तेथें भेटले अदृष्ट कृपादानी। ज्याने दुष्ट श्वापदें टाकिली छेदूनि। सुपंथीं लाविले शुद्ध बोधूनि। तया श्रीगुरूसीं नमो नमो ।।७०।।

अनेकजन्मसंप्राप्तकर्मेन्धनविदाहिने। ज्ञानानलप्रभावेन तस्मै श्रीगुरवे नमः ।।१५।।

अनंत जन्म प्राप्त कां म्हणसी। कर्मधर्महीन वर्ततां जनांसीं। दुःख भोगणें प्राप्त तयासीं। म्हणोनि होती जन्मफेरे ।।७१।। यालागीं सद्गुरूसीं शरण जातां। उपदेशी तो शिवबोध तत्त्वतां। अष्टावरणाची महत्ता। क्रियेसहित सांगे तो ।।७२।। गुर्वाज्ञेनें स्वधर्मी वर्ततां। ज्ञानानळें कर्मकाष्ठां समस्तां। उभेचि दग्ध करी तत्त्वतां। तया श्रीगुरूसीं नमो नमो ।।७३।।

नमामि श्रीगुरुं शांतं प्रत्यक्षशिवरूपिणम्। शिरसा योगपीठस्थं शीघ्रं मोक्षप्रदायकम् ।।१६।।

जो श्रीगुरु परमशांत। ब्रह्मरंध्रीं योगपीठीं विराजित। जो कां प्रत्यक्ष उमानाथ। मोक्षदायक भक्तांसीं ।।७४।। हालवूनि नवचक्रमेळा। दाखवी महामायेच्या खेळा। दासां उद्धरी अवलीला। तया श्रीगुरूसीं नमूं ।।७५।।

देव्युवाच-

केन मार्गेण भो स्वामिन् जीवो ब्रह्ममयो भवेत्। कथमज्ञाननिवृत्तिस्तत्सर्वं कथयस्व मे ।।१७।।

पार्वती म्हणे जगदीश्वरा। जे प्राणी देहधारी अवधारा। ब्रह्म केविं होती चरेश्वरा। तें गुह्य सांगा मज ।।७६।। जेणें प्राप्त होय शिवयोग। जेणें समरसे लिंगीं अंग। ऐसें गूढ तत्त्व अव्यंग। निरोपा मजलागीं ।।७७।।

शिव उवाच-

यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ। तस्यैते कथिता: ह्यर्था: प्रकाशन्ते महात्मन: ।।१८।।

ईश्वर म्हणे वो पार्वती। गुरु तोचि देव जाणती। सद्भावें सदा अर्चिती। ते जाणती निजतत्त्वां ।।७८।।

प्रात: शिरसि शुक्लाब्जे द्विनेत्रं द्विभुजं गुरुम्। वराभयकरं शांतं स्मरेत्तन्नामपूर्वकम् ।।१९।।

प्रात:काळीं उठोन। आसनीं बैसावें सावचित्त होऊन। मग भावें करावें ध्यान। श्रीगुरूचें ।।७९।। जे कां शुभ्र सहस्रदळ कमळ। त्याची जी कलिका शुद्ध निर्मळ। तया ठायीं अविकळ। ध्यान करावें प्रेमभरें ।।८०।। आणिक सांगतो तुज एक। जो द्विभुज द्विनेत्र देख। वर द्यावया आवश्यक। एकमुख

शोभतसे ।।८१।। जरी अनेक वदनें असती । तरी वर न पावे निश्चिती । म्हणोनिया आत्ममूर्ति । जगामाजीं प्रवर्तली ।।८२।। गुरुपादोदकेंकरून । नित्य देहाचें होय क्षालन । तरी जन्मांतरीचीं पापें जळून । दिव्य शरीर होय पैं ।।८३।।

प्रसन्नवदनाक्षं च सर्वदेवस्वरूपिणम्। तत्पादोदकधाराश्च निपतन्ति स्वमूर्धनि ।।२०।।

श्रीगुरुमूर्ति शांत सगुण। अद्वितीय प्रसन्नवदन। सर्वदेवस्वरूप म्हणोन। पूर्ण ब्रह्मरूप तो ।।८४।। गुरुपादोदकाची धार। पडतसे स्वमस्तकीं वारंवार। ऐसी भावना सत्वर। करावी शिष्यवर्यें ।।८५।। तया अमृतधारेंकरून। होय गुरुबीजाक्षराचें संजीवन। नित्य नवे बोधांकुर जाण। प्रगट होय अंतरीं ।।८६।।

तीर्थानि दक्षिणे पादे वेदास्तन्मुखमाश्रिताः। पूजयेदर्चिततनुं तदभिधानपूर्वकम् ।।२१।।

तयाचे दक्षिण चरणीं। वसती सर्व तीर्थें जावोनि। वेदमुखाचा आश्रय करोनि। राहे तेथेंचि आनंदें ।।८७।। ऐसिया सद्गुरुनाथाचें। भावें पूजन करावें साचे। नाम स्मरतां जन्माचें। सार्थक होय तत्त्वतां ।।८८।।

काशीक्षेत्रनिवासोऽसौ जान्हवीचरणोदकम्। गुरुर्विश्वेश्वरः साक्षात् तारकं ब्रह्म निश्चितम् ।।२२।।

भूकैलास वाराणसी। पुरी विराजित काशी। सप्तपुरीयांत अविनाशी। महातीर्थ वंद्य जें।।८९।। तेथें असे विश्वेश्वर। तैसाच मानिला गुरु साचार। उभय चरण स्पर्शी नीर। तेंच तीर्थ मानिलेंसे।।९०।। गुरुचरणीचें जें तीर्थ। जान्हवी सारिखेचि निश्चित। त्यावेगळा भावार्थ। करूं नये गुरुभक्तें।।९१।। ज्या ज्या तीर्थी आहे पाणी। तीं तीं शिवाची पायधुणी। परि तेंचि उत्तम म्हणोनि। अभिषेकिती देवातें।।९२।। तैसेंचि गुरुचरणींचें उदक। परमपवित्र पावन देख। त्याचा करिता अभिषेक। संतोषित गौरी मी।।९३।। आतां सांगणें निश्चित एक। भावें जाणिल्या तीर्थ तारक। तैसें नोव्हे गुरुपादोदक। साक्षात् ब्रह्मदायक असे।।९४।। येथें संपवूनि गुरुमहिमा। पुढें रहस्या वदवी परमात्मा। तया श्रोतियां प्रत्यगात्मा। होवोनिया तुष्टवी।।९५।। जो असेल साच वीर। तया हा ग्रंथ भवपार। करोनि देईल मुक्ति थोर। सायुज्य ती निर्वाण।।९६।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। उमामहेश्वरसंवादीं वर्तत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृत्य मन्मथ।।९७।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे श्रीगुरुमाहात्म्यवर्णनं नाम प्रथमोऽध्यायः समाप्तः।।

श्लोक २२, ओव्या ९७.

❑

अध्याय दुसरा

॥ श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः ॥

प्रथम अध्यायीं गुरुस्तव । करोनि श्रोत्यां सावयव। प्राकृत भाषीं अभिनव । गुरुरूप वर्णिलें ॥१॥ जो साक्षात् शिवस्वरूप। जो तेजें प्रचंड प्रताप। जो वीरशैवधर्माधिप। मोक्षदायक जगतातें ॥२॥ आतां द्वितीय अध्यायीं साचार। तीर्थमहिमा वर्णिला फार। परिसोत श्रोते चतुर। सावध होवोनिया ॥३॥

देव्युवाच-

श्रीगुरुपादतीर्थस्य सेवने किं फलं प्रभो। महिमां श्रोतुमिच्छामि कथयस्व महेश्वर ॥१॥

पार्वती पुसे जी महेशा । गुरुपादतीर्थाचा महिमा कैसा । कोण फळ स्वयंप्रकाशा । निरोपा स्वामिया ॥४॥

शिव उवाच-

मत्तः प्रवृत्ता वै सर्वे वेदायज्ञास्तथा क्रियाः । मद्रूपो हि जगन्मान्यो जंगमः परमो गुरुः ॥२॥

शिव म्हणे वो गिरिजे। तुवां प्रश्न केला वोजे। तो आतां निरोपुं सहजें। तुझिये आवडी ॥५॥ क्रिया आणि वेदमंत्र । मजपासून सर्वत्र । उत्पन्न होती पवित्र । सप्तकोटी मुख्य जे ॥६॥ त्याची जी जीवनक्रिया ।

ती असे जंगम प्रिया। म्हणोनि गुरु आचार्यां। श्रेष्ठ जाणे मी देवी।।७।। क्रियाचार सतेज असतां। तेणें मंत्राची होय सिद्धता। लिंगनिष्ठें मोक्ष येई हातां। क्षण न लागतां साच पैं।।८।।

लिंगप्राणो गुरुर्देवि गुरोः प्राणं तु जंगमः। जंगमस्य प्रसादेन लिंगप्राणं तु शांकरि।।३।।

शिव सांगे अंबेप्रति। मम प्राण गुरुमूर्ति। गुरु प्राणाची स्फूर्ति। जंगमरूपें तिष्ठतसे।।९।। तया जंगमप्राणाची व्याप्ती। प्रगट होय त्रिजगतीं। सकल व्यापार चालती। मद्इच्छे-करूनिया।।१०।। ती राहावी अखंड स्थिति। म्हणोनि निष्ठा गुरुतीर्थी। षोडशोपचार पूजा करिती। अंतीं घेती शिवतीर्थ।।११।। एका गुरूचे पूजेंकरून। त्रयमूर्तींचें घडें अर्चन। तया श्रीगुरुलिंगां व्यापून। माझें रूप असें।।१२।। गुरुपूजा करिता जाण। आधी कीजें लिंगपूजन। सवेचि स्पर्शी द्वयचरण। वरी मस्तक ठेवोनिया।।१३।। लिंगरूपीं मी साक्षात्। ब्रह्मतत्त्वीं वास करीत। चरलिंग तोचि वर्तत। पवित्र पावन सत्य पैं।।१४।। यास्तव तीर्थ अविनाशी। श्रुतीनें वर्णिलें प्रेमेंशीं। चरणं पवित्रं विततं ऐसी। मंत्रे जाण तीर्थाचे।।१५।।

शोषणं पापपंकस्य दीपनं ज्ञानतेजसः। गुरुपादोदकं शुद्धं संसारद्रुमनाशनम्।।४।।

शंकर म्हणे वो गिरिजे। पापलक्षण चिखल जें। त्यातें शोषावया समर्थ जें। तें गुरुतीर्थ वो देवी।।१६।। तें गुरुतीर्थ विश्वासें सेविता। हृदयीं ज्ञानदीप प्रकाशे तत्त्वतां। संसारद्रुम उन्मळोनि सायुज्यता। ती

लाहे वो देवी ।।१७।।

देव्युवाच-

पादोदकविधिः कीदृक् कार्यं पादोदकं कथम्। तत्सर्वं कथ्यतां गुह्यं परमेश दयानिधे ।।५।।

पार्वती म्हणे हे महेश। गुरुतीर्थ जें अविनाश। तें कैसें करावें विधीस। सत्य सांगा मजलागीं ।।१८।।

शिव उवाच-

प्रणम्य दण्डवद्भूमौ निष्ठया परया मुदा। गुरोः संपूजयेत् पादौ गंधपुष्पाक्षतादिभिः ।।६।।

शिव म्हणे वो गिरिजे। तुवां तीर्थविधि पुसिला वोजे। तो सांगेन तुज सहजें। श्रवण करी आदरें ।।१९।। गुरु शिव एकाभावेन। तया उत्तम आसनीं बैसवून। साष्टांग प्रणिपात करून। आज्ञा घेईजे तीर्थासीं ।।२०।। भूमि प्रणाम दंडवत् घालूनि। चरण गुरूचें निष्ठें अर्चोनि। गंधाक्षता धूपदीपें पूजोनि। तीर्थ सेविजें विश्वासें ।।२१।। गुरु आज्ञा करी प्रेमें। लवलाही उठा नेमें। धूप दीप अनुपमे। पूजा कीजें त्रिविध ।।२२।। सद्योजात मंत्रेंकरून। तें भस्म लावावें आपण। क्षणामाजीं नम्र होऊन। इष्टलिंगा पुजिजें ।।२३।। दशांगुले चरणकमळीं। स्पर्शूनि शुद्धोदक मिळीं। भस्म लावून तये वेळी। सव्य भागीं ठेविजें ।।२४।। मग कीजें लिंगपूजा। निर्जराच्या निजबीजा। पत्र पुष्प धूप राजा। अर्पितां पुण्य पैं ।।२५।। महापूजा ती सर्वांगीं।

अर्चूनिया शिवयोगी। अंती कीर्ति होय जगीं। पुष्पांजळी अर्पिल्या ।।२६।। नैवेद्य तांबूल दक्षिणा। देईजे मौनें तत्क्षणां। पूजा सर्व उतरूनि जाणा। चरण धरिजें आवडीं ।।२७।। पात्रीं प्रणव लिहूनि। मूल मंत्र अंगुष्ठस्थानीं। ईशान वस्तु म्हणोनि। ऊर्ध्वकरीं दाविजें ।।२८।। पूर्वी उदकें उपपात्र। ठेविलें लावून सर्व सूत्र। तेंचि घेऊनि पवित्र। तीर्थ कीजें परवस्तु ।।२९।। मागे जे सांगितली श्रुति। येथें आदरें उच्चारिती। जयजयकारें गर्जती। मग सेविती तीर्थातें ।।३०।। गुरुतीर्थ पात्रीं असतां। लिंगीं लीन होय तत्त्वतां। मुखामाजीं प्राशन करितां। जंगम-तीर्थ साच तें ।।३१।। हेंचि जाणिजे त्रिविध। दुजें असे दश-विध। परि तें दश त्रिविध। होत असे अनुक्रमें ।।३२।। ही परसूत्राची मूर्त। याचे कैसें सेवावें तीर्थ। म्हणे तो नोव्हे शिवभक्त। लिंगधारी वा जंगम ।।३३।। तीर्थीं भेद धरितां घडे दोष। प्रसादा उच्छिष्ट पाप विशेष। जो जाणे तीर्थप्रसाद नेमास। तोचि वीरशैव जाणावा ।।३४।। जें तीर्थ परमपददायक। जें होय भवभयमोचक। तया धि:कारितां महापातक। भोगी जाण अभक्त तो ।।३५।। तीर्थ झालिया जाय उठून। किंवा धरून बैसे अभिमान। तो पंचमहापातकी जाण। जंगम अथवा भक्त ।।३६।। जो म्हणे आणा बैसल्या ठायीं। आचारविधि नेणेंचि कांहीं। तो वीरशैवमार्गीचा नाहीं। गणवंशज नोव्हे तो ।।३७।। तीर्थासी घे म्हणूं नये। कोणाहि पाचारूं नये। पाचारितां दोष होय। तो सांगता नये येथें ।।३८।। दादून म्हणे घे घे

तीर्थासी। अवलीलें पाचारितां अन्यांसीं। न घेतां घे म्हणणारा दोषासी। पावे जाण तो देवी ।।३९।। जो वीरशैवमार्गी पुरुष। घे म्हणणें न लगे तयास। ज्याचा तीर्थप्रसादीं विश्वास। कदाकाळीं न सोडी तो ।।४०।। तीर्थाचा वस्त्रास पुसूं नये हात। भूमीं पाडूं नये किंचित्। आदरें सेवी तो जंगम भक्त। येर तो सोंग बहुरूपियाचें ।।४१।। निगुरुया तीर्थ न दिजें। गुरुपुत्रासीं न वर्जिजें। लिंगभक्ति सोडून अन्य देवता पुजी जे। तीर्थ न दिजें तयासीं ।।४२।। ऐशिया भ्रष्टास तीर्थ देतां। तो जंगम नोव्हे सर्वथा। आशा अथवा भीड धरितां। तरी तो दोषी होय कीं ।।४३।। आचारमार्गाचे ठायीं। रावरंक सारखाचि पाही। मार्ग चुकतां अग्रेसरहि। येई नीचपदासी ।।४४।। मार्गें चाले तो पंचानन बोलिजे। अमार्गें वर्ते तोचि श्वान जाणिजे। वीरशैवमार्गें वर्ते तो सहजे। गुरु सर्वांसीं वो देवी ।।४५।। सप्तसागरीचें जल। सृष्टीचीं तीर्थें सकल। परि गुरुतीर्थथेंबाचें फल। सहस्रांशें अधिक ।।४६।। गुरुतीर्थबिंदूची सरी। काशी न पावे बरोबरी। मा इतराची काय थोरी। पादतीर्थापुढें वर्णावया ।।४७।। काशी मेलियां मुक्ति देत। सद्भावें सेवितां श्रीगुरुतीर्थ। तो सहज होय जीवन्मुक्त। तीर्थमाहात्म्य ऐसें हें ।।४८।। गंगातीर्थीं एक अवगुण। खोलीं जातां जाय बुडोन। गुरुतीर्थ न बुडवी म्हणोन। तरोनि जाती कैलासीं ।।४९।। द्वादशलिंगां करितां परिक्रमा। परि गुरुतीर्थाचा नये महिमा। जेणें पाविजें स्वयें परब्रह्मा। त्याची सरी कोण करी ।।५०।।

तीर्थावीण बांधितां लिंग। तरी तो पाषाणचि चांग। जया तीर्थाचें न लागे अंग। तरी तो लिंगचि नोव्हे ।।५१।। तीर्थाविणें लिंग तो पाषाण। तीर्थ असे लिंगाचें जीवन। त्याविना नसें लिंगासीं चैतन्य। लिंग प्रेतासमान तें ।।५२।। तीर्थाविण लिंग अकारण। तीर्थाविण भक्ति निष्कारण। तीर्थाविण मिरवी जंगमपण। कैकाडियाचें मर्कट तें ।।५३।। स्वधर्मीं निष्ठा नसे जाण। व्यर्थ मिरवी जंगमपण। तीर्थां सांडून करी कारण। जैसें भाषण अर्भकाचें ।।५४।। जयासीं तीर्थीं नाहीं आवडी। प्रसाद सेवावयाची काय ती गोडी। तयासीं सुटका नसे संसार बांधवडीं। कल्प कोटी गेलियां ।।५५।। विश्वासें जे सेविती तीर्थ। ते सरते होती शिवगणांत। तयापुढें भुक्ति मुक्ति राबत। कर जोडून सर्वदा ।।५६।। जो तीर्थप्रसादाचा भेद जाणें। वीरशैव तयासीच म्हणणें। येर ते हिंडती पोटाकारणें। भाटनागर जैसे ते ।।५७।। तीर्थ करावें जयाचें। शुद्ध सर्वांग असावें तयाचें। तीर्थ न करावें अंगहीनाचें। ऐसें शास्त्र वदतसें ।।५८।। हातीचें अथवा पायीचें। बोट गेलें असेल जयाचें। अंग असेल व्यापिले रोगें तयाचें। तीर्थ बोलिले नाहीं ।।५९।। नाक डोळा कान। गेला असेल छेदून। तयाचें तीर्थ सेवन। करूं नये वो देवी ।।६०।। जो क्रोधी द्वेषी तामसी। जो जंगमद्रोही करी हिंसेशीं। सेवूं नये तयाचें तीर्थासी। परि भोजन घालिजे ।।६१।। अंगीं कुष्ठ असतां। पादपूजा न कीजें सर्वथा। जो शिवगण सर्वांगीं पुरता। पादपूजा कीजें तयाची ।।६२।। पूज्य मूर्तीसीं द्वेषेंकरून। जरी लाविलें अन्य दूषण। तरी तो अपूज्य होय जाण। दोष मुक्त पावे तो ।।६३।।

यालागीं भूरुद्र देशिकांनी। सर्वदा अलगत्वें वर्तावें जनीं। अधिकार गुरुत्व पूर्णपणीं। संपादावें निर्दोष ।।६४।। जो शिवयोगी पाहतां। निर्दोष मूर्ति असे तत्त्वतां। तोचि पूजेयोग्य धर्मवक्ता। लिंगीं निष्ठा असे याची ।।६५।। सुशील शांत आणि भाविक। जंगमभक्ति नित्य साधक। धर्म-अधर्मीं करी विवेक। पादपूजा कीजे त्याची ।।६६।। सत्त्वगुणी भक्तजन। तो आवडे प्राणाहून। उभय ऐक्य झाल्याविण। पूजा नोव्हे सर्वथा ।।६७।। उभयतां शुद्धासनें। असावीं दुकूल परिधानें। पूजा तीर्थातें सेवनें। आसन स्वकरें काढी कां ।।६८।। ऐकोनि तीर्थमहिमा। परमसुख पावली उमा। म्हणे धन्य धन्य परमात्मा। सदाशिवा स्वामी ।।६९।। तुम्ही जो निरोपिला तीर्थमहिमा। तो न कळे निगमागमां। वीरशैवावांचोनि पुरुषोत्तमा। न कळे कोणासीं ।।७०।। वीरशैव कोण तें निरोपुं आतां। देह सांडी तो क्रिया चुकतां। मा वांचेल लिंग जातां। हें केविं घडें ।।७१।। ऐसे एकनिष्ठ वीरशैव। मज कळविलें उमाधव। परि धर्मशास्त्राचा प्रभाव। पुढें अर्थ रस बहु ।।७२।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। उमामहेश्वरसंवादीं वर्तत। त्याची टीका करूनि प्राकृत। कृतकृत्य मन्मथ ।।७३।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे श्रीगुरुमाहात्म्यवर्णनं नाम द्वितीयोऽध्याय: समाप्त: ।।

श्लोक ६, ओव्या ७३.

❑

अध्याय तिसरा

॥ श्रीपरब्रह्मणे नमः ॥

द्वितीय अध्यायीं परम पावन। निरोपिला तीर्थमहिमा जाण। वीरशैवाचें मुख्य लक्षण। गुरुभक्ति वर्णिली ॥१॥ वर्णिली तैसीच गुरुमूर्ति। ती कैसी पुजावी प्रेमप्रीतिं। आनंदूनि जगदंबा पार्वती। प्रश्न करी शंकरासीं ॥२॥

देव्युवाच–

को मार्गो वीरशैवानां का स्थितिः का च धारणा। का पूजा लिंगनिष्ठा का ब्रूहि मे परमेश्वर ॥१॥

कोण मार्ग स्वामी वीरशैवाचा। स्थिति धारणा कोण नेम तयाचा। कैसा नियम लिंगार्चनाचा। तो निरोपा स्वामी ॥३॥

शिव उवाच–

लिंगार्पितं विना भुंक्ते नामृतं विषमप्यथ। गते लिंगे त्यजेत्प्राणं वीरशैवः स एव हि ॥२॥

शिव म्हणे वो गिरिजे। आतां वीरशैव सांगूं वोजें। जया मार्गासीं म्यां वंदिजें। गुरुभावनेनें ॥४॥ लिंग

हाचि जयाचा प्राण। तो हरवताचि सोडी प्राण। ऐसें हें वीरशैव लक्षण। जाण देवी साच पैं ।।५।। जो मार्ग पतितपावन। त्या मार्गें जो चाले तो विरक्त पूर्ण। त्यासीं वंदितां तुटें बंधन। चौऱ्यांशीचें ।।६।। जो वीरशैवमार्गीं पुरतां। तो क्रियानिष्ठें आचरे शुद्धता। अणुमात्र क्रिया भंगतां। देहचि टाकी ।।७।। लिंगार्पित केलियावांचून। कांहीं पदार्थ न करी सेवन। पात्रीं अर्पिल्या विष म्हणोन। न सोडी कदापि ।।८।। लिंगनिष्ठा परिपूर्ण। तो लिंगीं असे लिंग होवोन। लिंग गेलियां प्राण। राहे केविं तयाचा ।।९।। आधीच लिंगीं प्राण भरला असे। तो लिंगचि होऊन वसे। लिंग गेलियां तो उरे ऐसें। केविं घडे ।।१०।। लिंग हृदयींचें जीवन। लिंग प्राणाचा प्राण। लिंगामाजीं मिश्रित होऊन। असे जो कां ।।११।। तें लिंग गेलियां देह ठेवी। हें ऐसें न घडेचि देवी। पति गेलियां वांचणें जीवीं। तरी ते नोव्हे पतिव्रता ।।१२।। तैसे लिंग गेलियां जो राहे। तो वीरशैवचि नोव्हे। प्राण गेलियां देह। प्रेतचि बोलिजे ।।१३।। जयाचा प्राण लिंगीं भरला। तो कैसा असे देहीं उरला। लिंग गेलियां देहीं संचारला। पिशाचवत् जाणिजें ।।१४।। लिंगाविण वाचणें। ते प्रेतासम जाणणें। कीं भ्रताराविणें जिणें। विधवा जैसी ।।१५।। विधवा झाली तरी काय होते। देवें काय उणें केलें दुजियातें। यातें उत्तर देईजेल तें। परिस वो देवी ।।१६।। जरी तिनें दुजा भ्रतार केला। तरी पाटकरीण म्हणती तिला। सवाशीणपणाचा महिमा गेला। देवीधर्मीं नाहीं ती ।।१७।। तेविं लिंग

गेलियां बांधी आणिक। तो पाटकरणीसमान देख। वीरशैव नोहे पोटवाईक। वेषधारी बोलिजें ।।१८।। म्हणोनि एकनिष्ठें वर्तिजें। गर्भकालीं प्राप्त शिवलिंग जें। तयासीच प्रेमभावें पुजिजें। एकनिष्ठें करूनिया ।।१९।। तोचि प्रेमें करावा जतन। वीरशैवाची जी मूळ खूण। ग्रंथांतरीं अवलोकून। भ्रष्टाचारें न वर्तावें ।।२०।। म्हणोनि लिंगामाजीं जयाचा प्राण। तोचि वीरशैव महागण। क्रिया कर्मनिष्ठा पूर्ण। तारक शिवाचारासीं ।।२१।। भवि देखतां अणुमात्र। न आचरें स्वकर्मतंत्र। भवीनें सेविलें जें पात्र। तें हातीं धरीना ।।२२।। इंद्रियाचें द्वारीं न बैसें। अंतरीं आत्म-ओवरी असे। तो बाहेर कदा येत नसे। स्वसुखीं रतला सदा ।।२३।। तयाचियें लागतां चरणीं। कृपा करी तेंचि क्षणीं। अजात भक्तनयनीं। अश्रुपात होतसे ।।२४।। नेमें षट्काल करी पूजा। तितुकीचि स्नानेंहि वोजा। न्यासध्यानयुक्त सहजा। करीतसे अत्यादरें मंत्रपुष्पें ।।२५।। सहा वेळां पूजा करी सहजा। त्या वेळां कोण कोण वोजा। जेणें संतोषें मी शिवराजा। निरोपुं तुज आतां ।।२६।। पहिली पूजा अरुणोदयीं करी। प्रहर दिन आलियां दुसरी। दोन प्रहरां ती तिसरी। चौथी तिसरे प्रहरीं कीं ।।२७।। पांचवीं सायंकाळीं करी। सहावीं पूजा मध्यरात्रीं। करावया आळस न करी। लिंगपूजेसीं ।।२८।। सहा पूजा न घडती जरी। तरी त्रिकाळ लिंगनिष्ठा धरी। त्रिकाळहि न घडती तरी। तो पशु जडजीव ।।२९।। बहु धांव एकान्तावरीं। एकान्तीं

लिंगअर्चा करी। भवि देखतां न करी। लिंगपूजा तो ।।३०।। लिंगपूजें वीरशैव। सदा पावती वैभव। जे कां भुक्ति अभिनव। लिंगपूजाप्रभावें ।।३१।। त्यायोगें मीहि सुंदरी। वसे वीरशैवा-मंदिरीं। पूजान्तीं प्रसादाची थोरी। असे जाण तेथेंचि ।।३२।। शिवभक्ताघरींचें अन्न। करी अज्ञान जनां पावन। तें असे सत्य शिवार्पण। अन्यार्पण नसेंचि ।।३३।। जें जें असे शिवार्पित। तें तें जाण परम पुनीत। तें सेविल्या मजसीच पावत। अनायासें तत्त्वतां ।।३४।। अलिंगीं अथवा लिंगधारीं। जो शिवधर्माची निंदा करी। त्याचें मुख न पाहे कांतारीं। तो वीरशैव जाणावा ।।३५।। जया वस्त्राची परवा नाहीं। पांघरी तरी एक घोंगडी पाहीं। अंगास जें वस्त्र तेहि। भलतैसें ।।३६।। जोड वस्त्र लिंगासीं। जोड कौपिन लावी तैसी। मिळाले तरी घाली पायतणाशीं। नित्य नेमें ।।३७।। पायीं नसूनि पादुका। न चालावे मार्गी देखा। वाहनीं आरूढावें अनेका। देश-संचाराकारणें ।।३८।। कौपिन जोडी शुद्धि करितां। हस्त पाऊड हातीं धरितां। सोऽहं सोहळा पवित्र युक्ता। शोभे भाळीं त्रिपुंड्र ।।३९।। रुद्राक्षमाळा शोभे गळां। स्नानपूजेचिया वेळां। न देखें भविजन मेळा। त्यातें भाषण न करी ।।४०।। सहजाचें घेणें देणें। तेंहि शरणांवांचून न घेणें। बहुत बोलणें विनोदें हंसणें। न करी कदा ।।४१।। आम्ही म्हणितलें सहजीं घेणें। परि सहजा तया जाणें। विधियुक्त घेणें करणें। आचारातें मिळे तैसें ।।४२।। चरण धरूनि तीन वेळां। कृपा करा म्हणतां

वेळोवेळां। तरीच घेईजे ऐसिया कळा। असत तो विरक्तमार्ग।।४३।। बिन्हाविण कांहीं। घेणेंचि तया नाहीं। सोने रुपें आदि कांहीं। न शिवी हातीं।।४४।। ज्ञान वैराग्य मिळे क्रियेशीं। राखें तोचि वीरशैव बोलिजे त्यासीं। क्रिया टाकी तयासीं। शिवगण न मानिती।।४५।। शिष्य आचार करी पूर्ण। देशिकां दे योग्य भोजन। त्यातें स्वयें देखोन। आनंद मानीतसे।।४६।। ज्ञान वैराग्य क्रियेशीं। राखीं तो धन्य वीरशैव वंशीं। क्रिया सोडोनि चाले त्यासीं। शिक्षेनें मार्गां लाविजें।।४७।। जो झालासे क्रियात्याज्य। तया कोण मानील पूज्य। अधर्में वर्ततां राज्य। नष्ट होय वैभव।।४८।। जरी ज्ञानी पूर्ण झाला। तरी स्वधर्माचारें मान त्याला। आचारभ्रष्ट होतां व्यर्थ गेला। जन्मां येऊनिया।।४९।। त्यानें अनेक परोपकारु। केली तीर्थें लहानथोरु। तैसेंचि दानें अपारु। गो वाजी रथ दिले।।५०।। तरी क्रियेविण जें पुण्य। तें सुकृतासी होय उणें। म्हणोनि न टाकिजें सज्जनें। क्रियाचाराशीं।।५१।। वडील अग्रगण क्रिया टाकिती। तरी नेणतेहि तैसेंचि वर्तती। म्हणून न टाकिजें अधिक स्थिति। वाढविजें सज्जनीं।।५२।। एऱ्हवीं क्रियारहित ज्ञान जाणें। परि जनाकारणें करणें। परोपकारार्थ वर्तणें। परि हें तो अक्रिय।।५३।। अंधां मार्गीं लाविजें। आपणहि हळूहळू चालिजें। तेविं अज्ञानअंध वोजें। लाविजें मार्गां क्रियेचिया।।५४।। ऐसा परोपकारी परम पुरुष। पट्टाधिकारी बोलिजें तयास। तोचि तारक शिवाचारास। धर्मगुरु।।५५।। आशा धरोनि

बोधिना। पूजा मान इच्छिना। परस्त्रीस पाही ना। कामदृष्टीं कदा।।५६।। जीवहिंसा करीना। शब्दें कोणास दुखविना। भुंवई उचलीना। कोणावरीं।।५७।। जयाचें नांव विरक्त। तो कासयासीं नोव्हे लिप्त। श्वानवमन मानीत। भोगविलास सर्व ते।।५८।। तयासीं लोह कांचन। गारा आणि सम रत्न। मान अपमान समान। आनंदभरित सर्वदा।।५९।। तया प्रिय अप्रिय कांहीं। सर्वथा उरलेंचि नाहीं। निंदास्तुति ऐकोनि। हर्षविषाद नोव्हे मनीं।।६०।। कोणी केली जरी निंदा। हर्ष मानी तयाच्या शब्दां। मान अपमानाचे भेदां। न जाणें विरागी तो।।६१।। शांति दया क्षमा सुबुद्धि। अनर्थ कोणां न करी कधीं। वासना तृष्णा कुबुद्धि। कुचाळी न करी कदा।।६२।। नाहीं जाणिवेचा तोरा। नाहीं क्रियेचा उबारा। तो शिवयोगी खरा। वीरशैवां श्रेष्ठ कीं।।६३।। ज्ञानानळीं इंद्रियव्यापार। होमिलें षड्विकार। तो आकाररूपी निराकार। शिवयोगी विदेही।।६४।। पातळ तेंचि गोठलें। घृत कण्याकार झालें। तेविं अमूर्त मूर्तीस आलें। वीरशैवरूपें।।६५।। काम क्रोध द्वेष मत्सर। लोभ मोह दंभ अहंकार। निंदा कुटाळी कुचेष्टा क्रूर व्यापार। नाहीं शिवयोगियां।।६६।। सोडणें बांधणें न करी जंजाळ। चिंता उद्वेग नाहीं हळहळ। मन कल्पनारहित निर्मळ। धुतलें मोती जैसें।।६७।। सकळ तीर्थांसी अधिपति। चरणस्पर्शें तीर्थें पावन होती। जग उद्धरावया विचरती। निष्कामबुद्धिं।।६८।। कोठें गोडी धरोनि तोषेना। मान दिधल्यां

फुगेना। अपमानिलियां कुंथेना। तोचि वीरशैव म्हणावा।।६९।। मृत्यूसीं कदा भिईना। मी मरेन हें ध्याईना। मी उपजलो हें आठवेना। स्वत:सिद्धपणें।।७०।। मी बाळ तरुण वृद्ध। हें नाठवें तया अखंडत्व बोध। जाति-कूळ-गोत्रसंबंध। नाठवें तया वीरशैवां।।७१।। जयाचा गर्भीच मंत्रपिंड। संस्कारें निपजला मार्तंड। अविद्या अनाचार हे बंड। राहेल केविं।।७२।। गुरुकृपेनें मांसपिंड गेला। तो संस्कारें मंत्र-पिंड झाला। अविद्या-अंधार दूर केला। प्रकाशला स्वप्रकाश।।७३।। आत्मा तरी स्वत:सिद्ध असे। तया कांहीं पावन नसें। पावनता जगीं जी वसे। देहाचियालागीं ती।।७४।। पाहतां देह तरी अपवित्र। तयाहि पावन करी गुरुमंत्र। आत्मा स्वत:सिद्ध सर्वत्र। वस्तुरूप झालासे।।७५।। बाह्य अभ्यंतरीं अवघाचि। कोंदाटला परब्रह्म तोचि। तो बोलें चालें तोचि। निजस्वभावें।।७६।। बोल बोलें प्रेमप्रीतिं। अमृतासीं परे सर म्हणती। ऐके तो आनंदें चित्तीं। सद्भाव उठे मनीं तया।।७७।। जें बोलें तें प्रतिबंधक। परिसे त्या होय सुखदायक। न बोलें लौकिक भेदिक। परमार्थालागोनि।।७८।। कायावाचामनें। जगालागीं सुख देणें। ऐसें असें जयाचें वर्तणें। तोचि विरक्त जाणावा।।७९।। पुढें पाहोनि चालणें। जीवमात्रासीं राखणें। सर्वांघटीं जाणणें। सदा शिवस्वरूप।।८०।। सदा शमदमीं वर्तत। अंत:करणीं शम इंद्रिय दमित। अखंड वैराग्यभरित। षट्स्थल ब्रह्म बोधी सदा।।८१।। ऐसा हा विरक्त पुरुष। तोचि तो

परमात्मा अविनाश। तद्रूप स्वयंप्रकाश। शिवयोगी तो ।।८२।। जी वस्तु अगम्य अगोचर। अव्यक्त अनंत अपरंपार। ब्रह्मरूपाचें हें बीजांकुर। घवघवीत विरूढलें ।।८३।। तोचि शिवयोगी साचार। उद्धरावया चराचर। वर्ततसे महीवर। ममाज्ञेंकरूनिया ।।८४।। जें कां अद्वैत अनुपम। अगोचर आणि अनाम। जें अचल अलक्ष परब्रह्म। तेंचि निस्सीम होवोनि असे ।।८५।। जो निजरूप अगम्य निर्गुण। जो निर्मुक्त निरामय निरंजन। तो परमपुरुष गुणनिधान। ऐसाचि होवोनि ठेला ।।८६।। तो निःसंग निर्लेप निष्प्रपंच। जो निजरूप अनिर्वाच्य। तोचि सुनिश्चय साच। होवोनि ठेला ।।८७।। तोचि चिद्रूप चिन्मात्रैक। जो चिदानंद चित्प्रकाशक। तोचि समरस होऊनि एक। राहे स्वरूपीं सदा ।।८८।। ऐसें जें वीरशैव-मार्गिक। ते स्वयं स्वतंत्र सुखदायक। तया मज नाहीं वेगळीक। पार्वती सत्य जाण पां ।।८९।। ते मज क्षणभरी न विसंबती। मीहि तैसाच तयाप्रति। म्हणोनि ते पूज्य सर्वांप्रति। जाण देवी निश्चयें ।।९०।। आम्ही तयासीं ध्याऊं। सदा तयाचे गुण गाऊं। तया गुरुत्वें भावूं। आम्ही देवी सर्वदा ।।९१।। तो देव आम्ही भक्त। तया ध्याऊं हृदयांत। आम्हां देवपण निश्चित। तयाचेनि योगें ।।९२।। तो प्राणसखा आम्हां बहु। त्याचे चरण हृदयीं ध्याऊं। तयावांचूनि न पाहूं। परवस्तु आणिक ।।९३।। परशिव म्हणिजें तयासीं। तो अतीत व्याप्य-व्यापकासीं। आतां बहु काय बोलणें आम्हांसीं। मुकुटमणि होय तो ।।९४।। तो

सर्वांसीं गुरुरूप होय। त्याचे भावें वंदी जो पाय। तो तात्काळ होवोनि ठाय। निजरूपचि ।।९५।।
स्थावरलिंगां जे ध्याती। तया स्थावर गुरु म्हणती। उपासनेची निजस्थिति। कार्या कारण असे ।।९६।।
कर्म उपासनें बांधूनि गांठीं। जे सर्वकाळ वाहती कंठीं। न करी दुजी वाटाघाटी। चरलिंग त्यां म्हणिजें ।।९७।।
तोचि जाणावा परशिव। गुरुमुखें घ्यावा अनुभव। आमुचा त्यावरी पूर्ण भाव। नसे परवस्तु आणिक ।।९८।।
तो सर्वां गुरुरूप होय। त्याचे भावें वंदी जो पाय। तो तैसाचि होऊनि जाय। निमग्न वस्तुरूपीं ।।९९।।
ऐसा जो श्रीगुरुनाथ। परम पावन पुनीत। जंगमरूपें वर्तत। तारावया भक्तांतें ।।१००।। तया सर्वस्वें भजावें। तनु मन धन अर्पावें। अन्नवस्त्रादिकीं सेवावें। गुरुरूप म्हणोनिया ।।१०१।।

अन्नवस्त्रादिकं देयं गुरवे तत्परायणः। अभावे सर्ववस्तूनां स्वशरीरं निवेदयेत् ।।३।।

तया सर्वस्वें भजावें। तनु मन धन अर्पावें। अन्नवस्त्र प्रेमें वोपावें। निष्कामबुद्धिं ।।१०२।। ज्यासीं वित्तविषय नाहीं। तेणें अंगें सेवा करावी कांहीं। सेवें शरीर निवेदिलें जेंहि। तत्पर होवोनि ।।१०३।। ऐसी अंगें करिता सेवा। शिवपद प्राप्त होय जीवां। गुरूतें भावितां ब्रह्मभावां। तरी स्वयें ब्रह्मचि होय ।।१०४।। ऐसा वेदान्तीचा भाव। गुरु न म्हणावा मानव। म्हणता दोष अभिनव। घडती सत्य जाणा ।।१०५।। गुरु मनुष्य ऐसें भाविता। तरी दोष होय तत्त्वतां। आपणिया ब्रह्मरूपता। घडें केविं ।।१०६।। म्हणोनि गुरु

परब्रह्म भाविजें। मग आपणहि ब्रह्म होईजें। श्रीगुरु निजवस्तु जाणिजें। सेवा कीजें सद्भावें ॥१०७॥

कर्मणा मनसा वाचा गुरवे भक्तिवत्सलः। शरीरं प्राणमर्थं च सद्गुरुभ्यो निवेदयेत् ॥४॥

मनबुद्धिवाचें जें जें कर्म होतीं। तें भक्तिवत्सल गुरूसीं अर्पिती। जें शरीर प्राण अर्थ निवेदिती। तेंचि अधिकारी मोक्षासीं ॥१०८॥ गुरुवांचोनि सर्वथा। आणिक नेणती देवता। गुरुमंत्रेंविण तत्त्वतां। फल नसे जापकांसीं ॥१०९॥ गुरु-आज्ञेंवेगळे न वर्तती। गुरु संतोषजे करिती। गुरुकृपा तेचि निजमुक्ति। सर्वकाळ शिष्यांसीं ॥११०॥ ऐसें गुरुभक्त पार्वती। तयाची अत्यंत मज प्रीति। ऐकोन संतोषली मूळ शक्ति। चरणीं माथा ठेविला ॥१११॥ म्हणे मी नेणें या वर्मा। बरवा निरूपिला गुरुमहिमा। धन्य धन्य भक्तविश्रामा। कृपा केली मजवरी ॥११२॥ श्रीगुरु महिमा सादर। ऐकता श्रोते चतुर। पावन होती सत्वर। भवार्णवापासूनिया ॥११३॥ पुढें प्रश्न करील पार्वती। ऐकून तोषेल पशुपति। अति रहस्य उमेप्रति। निवेदील शिव तो ॥११४॥ इति श्रीपरमरहस्यसारामृत। शिवगौरीसंवादीं वर्तत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृत्य मन्मथ ॥११५॥

॥ इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे वीरशैवविरक्तलक्षणनिरूपणं नाम तृतीयोऽध्यायः समाप्तः ॥

श्लोक ४, ओव्या ११५.

❑

अध्याय चौथा

॥ श्रीगुरुवे नमः ॥

तृतीय अध्यायाचे अंतीं। शिवें निरूपिलीं वीरशैव स्थिति। आतां प्रश्न करील पार्वती। ते ऐका सादर ॥१॥

देव्युवाच-

को वा बंधश्च मोक्षः कः स्वरूपमुभयस्य च। कथयस्व तथा स्वामिन् अतीतं बंधमोक्षयोः ॥१॥

पार्वती विनवी देवाप्रति। बंधमोक्षाची निरोपा स्थिति। बंधमोक्षाची कैसी रीति। निरोपावें स्वामी मज॥२॥

शिव उवाच-

विकल्परहितः शांतो निरहंकार एव च। तद्रूपो ब्रह्मसम्बंधी मुक्तात्मा भवति ध्रुवम्॥२॥

सर्व संकल्प विकल्प जेथ निमती। निरहंकार सदा शांति। तद्रूप ब्रह्मचि होऊनि असति। तोचि मोक्ष पैं देवी॥३॥ मी परब्रह्म निश्चयेसीं। नास्ति देखे भेदासीं। आपणाविण न देखे कवणासीं। तोचि मोक्ष

जाणावा ।।४।। इंद्रियव्यापारां बोळवण। ध्यानधारणा निमालें साधन। निमाली बुद्धि मन होय उन्मन। तोचि मोक्ष जाणिजे ।।५।। गंगा सागराशीं मिळाली। ती पुन्हा न परते सागरुचि झाली। तैसी चित्तवृत्ति समरसली। पूर्णानंदीं शाश्वत ।।६।। त्वंपद आणि तत्पदाचा। शबल शुद्धांश निवडिजे दोहींचा। उत्तम शबलांश शुद्ध गुण साचा। ऐक्यबोधु जो ।।७।। जो ऐक्यबोधु तो असिपद। जो जीवाचा समरस आनंद। तो आपण होईजे स्वत:सिद्ध। तोचि मोक्ष जाणावा ।।८।। सत् चित् आनंद तिन्ही जाणोन। तिन्हींचा जो साक्षी चिदानंदघन। तो स्वयें झाला जो आपण। तोचि मोक्ष वो देवी ।।९।। आतां विशेष मोक्ष ऐक। जेथ साक्षित्वहि निमालें देख। दुजें नाहीं जेथें साक्ष आणिक। तेथें उरे कोण स्वरूपें ।।१०।। आतां बद्धता जेथें नाहीं। तेथें मोक्ष कैंचा कांहीं। वर्म नेणती म्हणूनि पाही। बद्धमोक्ष रूढविती ।।११।। आतां बद्धता ती ऐक। ते दुष्कृत्याचे लेख। तेहि सांगू दोषिक। बद्धतालक्षण ।।१२।। जो अहंकारें गर्वित। कामाग्नींत लोलांगत। काम्यकर्मीं ज्याचें चित्त। तेंचि बद्धता ।।१३।। मी आचार्य महागण। आमुचे क्रियेपुढें आहे कोण। वाहे क्रियाकर्माचा अभिमान। तोचि बद्ध जाण देवी ।।१४।। आम्ही वीरशैव जंगम। आम्हांपुढें कोणी नाहीं उत्तम। आम्हीच जाणो म्हणती लिंगवर्म। तेंचि बद्धता ।।१५।। जळीं देखें आपुलिया छायेसीं। मी बुडालो म्हणोनि शोक करी मानसीं। तेविं नसतिया जन्ममरणासीं। भावितसे

तेंचि बद्धता ।।१६।। स्वप्नीचिया मरणां भिऊन। जागृतिं म्हणे मी कैसा वांचेन। तेविं संसारा लटिकिया दे मान। तेंचि बद्धता वो देवी ।।१७।। वस्तूचें अत्यंत विस्मरण। विषयाचेंचि सदा ध्यान। संकल्पविकल्पें भरिलें मन। तीच बद्धता जाण ।।१८।। अहंतामदें अखंडित। मीतूं-भेद वाहे मनांत। कामकर्दमीं जयाचें चित्त। सदा धुसधुसीत पैं ।।१९।। ऐसें बद्धतेचें लक्षण। यालागीं व्हावें सावधान। श्रीसद्गुरूसीं नमून। कृपाहस्त दान मागावें ।।२०।।

विकल्पी क्रोधनोऽशांत अहंकारसमन्वितः। दुर्धर्षो लोलुपो जीवो बद्धो भवति निश्चितम् ।।३।।

संकल्पविकल्प वाहे ज्याचें मन। मी कर्ता धरोनि अभिमान। अशांत क्रोधलोभाकडोन। सदा बांधिला तो ।।२१।। नाशिवंत संसारीं सुख। अत्यानंदें मानी मूर्ख। क्रोधें करी रखरख। सर्वथा बद्ध तो ।।२२।। मी जीव असे ही देहबुद्धि। ब्रह्मभावना नाठवे कधीं। कुकर्माचा सांगाती कुबुद्धिनिधि। तोचि बद्ध वो पार्वती ।।२३।। कुबुद्धि कुकर्माचा नाद। विषयीं काक जैसा सावध। न घे शिवपूजेचा स्वाद। बंधा कारण येणेंचि ।।२४।। ऐसें बद्ध-मुक्ताचें लक्षण। निरोपिलें तुज निवडोन। आतां बद्धमुक्तातीत कोण। ऐक वो देवी ।।२५।। ते गोष्टी असे अगम्य। कोणासीहि नोव्हे गम्य। तूं माझा आत्मा म्हणोन। उत्तम गुह्य तुज सांगतसे ।।२६।। परि तो न कळे सहज। अगम्य अगोचर तुज। मी सांगेन परम गुज। लक्ष देई

आदरें ।।२७।। जें गुह्य शास्त्रपुराणां न कळेंचि। जपतपध्यानां नाघवेचि। जें कां व्याकरणां ज्ञानां न येचि। तें गुह्य निरोपुं वो देवी ।।२८।। जें बद्धमोक्षातीत। तें क्षराक्षरां साक्षभूत। तोचि तुज सांगू गुह्यार्थ। सावध परिस आतां ।।२९।। ज्याचें होतां मानवां दर्शन। त्याचें तुटें बंधन। तो मज पावला जाण। स्तनपान न करी कदा ।।३०।।

बंधमोक्षद्वयं नास्ति तद्द्वयातीत एव सः। साक्षिरूपो महातेजा स्वयं ब्रह्मस्वरूपभाक् ।।४।।

शंकर म्हणे पार्वतीप्रति। अलक्ष लक्षी ब्रह्मज्योति। तेथें लोभ भय वसती। नसे कदा काळीं ।।३१।। ऐक पार्वती तिसरीयाचें लक्ष। अलक्षरूपें उभयांसीं साक्ष। बद्धता नाहीं तेथें कैंचा मोक्ष। तया परब्रह्मासीं ।।३२।। जो लोभें नाहीं बांधिला। तो भवभया चुकला। म्हणोनि तो मुक्तचि बोलिला। लोभें केला बद्ध एकें ।।३३।। जो बद्ध मोक्ष उभयपक्ष। जाणोनि असे सर्वसाक्ष। त्या केविं बाधे बंधमोक्ष। सदा सावध स्वरूपीं ।।३४।। अजन्म नित्य परब्रह्म मानसीं। तया बद्धता मुक्तता कायसी। बद्ध तो बांधला मुक्त सुटला त्यासीं। म्हणणें केविं ।।३५।। जरी मुळी बांधिलाचि नाहीं। तया सुटला म्हणणें कांहीं। बद्धमुक्त आठवुं जया नाहीं। तो सहजमुक्त तिसरा ।।३६।। जो बंध मोक्ष उभया साक्ष। तो केविं बोलिजें बंधमोक्ष। तो साक्षीचाहि साक्ष। देहीं न राहे परि असे ।।३७।। जेथ एकपण न सरें। तया

साक्षित्व साहें केविं दुसरें। परि जाणावयालागीं खूणमात्रें। बोलावें लागतसें ।।३८।। एऱ्हवीं ठाव कैंचा बोलां। जेथ पन्नास अक्षरांचा ठावो पुसिला। चहु वाचेचा गजर निमाला। तो कोण्या वाचें बोलिजे ।।३९।। परि एक नवल असें। तें बोलासंगेचि भासें। बोल निमालियावांचूनि येत नसें। हातां कोणाचिया ।।४०।। परि ते असो ऐक सावध होऊनि। जैसा काष्ठ जाळोनि अग्नि। मग आपणहि जाय सरोनि। उरे भस्मलेशु ।।४१।। तैसें इंद्रियविकार अज्ञान। जाळोनि जें समर्थ ज्ञान। तें ज्ञानहि जाय ज्ञेयीं बुडोन। मग जें उरें तें गे तें ।।४२।। बंधरूप मृगजळ। मोक्षरूप किरणें केवळ। उभयां साक्षी सूर्यमंडळ। तेविं तें प्रकाशस्वरूप ।।४३।। तिसरा प्रकाशलिया पुरुष। प्रकृति-पुरुषाचा करी नाश। जेविं उभय काष्ठीं प्रकाशला अग्निलेश। तो जाळी दोहीं काष्ठां ।।४४।। दृश्य द्रष्टा लोपून। महाद्रष्टा असे होऊन। तो न दिसे तरी नास्तिपण। मानूं नको ।।४५।। कापूर अग्नीनें जाळिला। सरिसा अग्निहि विझाला। परि परिमळरूपें उरला। असेचि कीं ।।४६।। तेविं दृश्य द्रष्टा निमालें। परि उभया साक्षित्व उरलें। उरलेंपणेंविण संचलें। आईतेचि असे ।।४७।। साखर साखरेचा रवा जैसा। उदकीं रवेपणा मुकला सहसा। परि गोडीपणें उरला ऐसा। मानावाचि कीं ।।४८।। दृश्यत्वें दिसेना। ज्ञानासीं भासेना। म्हणोनि नाहींपणा। मानिसीं झणीं ।।४९।। कांहीं नसोनि असें। परि तें असोनहि नसें। जाणत्यांहि जाणतु असें। तरी जाणपण

नाहीं ।।५०।। जरी दुसरेपण असतें । तरी जाणतेपण साजतें । जेथ प्रळयांबूचें भरतें । तेथ प्रवाहो कैंचा ।।५१।। जैसें जागृति ना स्वप्न । सुषुप्तिहि जाय विरोन । की प्रलयतेजें ग्रासिलें रात्रंदिन । मग अवघाचि प्रकाशु ।।५२।। तेविं प्रकृति पुरुष गिळोन । अहं सोऽहं जाय मिळोन । मागें जें उरें तें घनानंद पूर्ण । निजरूप आमुचें ।।५३।। तिन्ही देवांचें विश्रामधाम । तेंचि आमुचें गुह्यरूप परम । तयाचें सत्तें सृष्टिकर्म । करिती देव आनंदें ।।५४।। तया रूप नाम ना रेखा । तें एक ना दुजें आहे ना नाहीं लेखा । नुरेंचि जेथें मीतूंपण आशंका । प्रकाशमय तें ।।५५।। ध्येय-ध्याता-ध्यान । नसें ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान । कर्ता-कार्य-कारण । या त्रिपुटीसीं साक्ष तो ।।५६।। जो भोग्य-भोक्ता-भोगातीत । दृश्य-द्रष्टा-दर्शनविरहित । साध्य-साधक-साधना जाणत । स्वयें देव ।।५७।। जेथ विवेक शब्देसीं बुडाला । अनुभव अनुभवासीं निर्बुजला । वक्ता श्रोता निमाला । तेथें देखें कवण कवणां ।।५८।। देखणारा देखणेसीं । बुडाला भाविता भावनेशीं । गुरुशिष्यनामासीं । उच्चार नुरेंचि कांहीं ।।५९।। जो गुरुशिष्याचा संवाद । जो निजानंदाचा आनंद । जो निजबोधाचाहि बोध । स्वत:सिद्ध आईता जो ।।६०।। जो आला ना गेला । तो झाला ना मेला । धाला ना विरूढला । रचिला ना आईता कीं ।।६१।। तो कांहीं नसोनि असे । तो न दिसोनि वसे । दिसण्या असण्या जाणतसे । जाणपणेंविण ।।६२।। जाणणें नेणणें त्या नाहीं जाणें । जाणणें अवघेचि नेणें । सर्वस्व

आपण होणें। अवघेचि ।।६३।। तें म्हणतां हें येते। एक म्हणतां दुजें होतें। परि भेदांविण अभेदातें। केविं जाणिजें ।।६४।। म्हणोनि भेदचि अभेद जाणिजे। गुणेंचि निर्गुण ओळखिजे। मग भेदगुण निमे सहजे। तद्रूपता आलिया ।।६५।। म्हणसी ब्रह्म कैसें असें। तें चर्मचक्षूतें न दिसें। ज्ञानांजनें पूर्ण प्रकाशें। हृदाकाशीं वो देवी ।।६६।। सुगंधपुष्पांमाझारीं। परिमळ न दिसे जरी। तरी नाहीं म्हणतां नये गौरी। घ्राणेंद्रियां सुख होय ।।६७।। पानांपुष्पांमाझारीं। प्रभा दिसेना जरी। नास्ति म्हणो नये सुंदरी। अस्तित्व भरलें असें मगमगित ।।६८।। चंद्रबिंबाभीतरीं। प्रकाश न दिसे जरी। परि भूमंडळावरीं। प्रकाश भरला असे ।।६९।। तेथ दृश्य-द्रष्टा हरपें। मग आहे नाहीं कोण म्हणिपें। हेंचि अनुभवीं निर्विकल्पें। तेंचि वस्तुरूप ।।७०।। एक माझी स्फूर्ति जाण। जागृत असे अनुदिन। तिचे शब्दें हें गगन। उत्पन्न झालीं तत्त्वें पैं ।।७१।। तया कारणें मी सगुण। रूपा आलो देवी जाण। मागुती शक्ति आणि गण। उत्पादिलें ब्रह्मा-विष्णु ।।७२।। त्या माझिया मूळस्वरूपां। विसरोनिया जन्मखेपां। अज्ञानें जीव त्रिविध तापां। पावती जाण वो देवी ।।७३।। ती परवस्तु जाण। असे चराचर व्यापून। त्याची जाणावया खूण। गुरूसीं शरण रिघावें ।।७४।। आतां बहुत करितां कथन। ग्रंथासीं होईल विस्तारपण। जी निरोपिली त्याची खूण। ती विसरूं नको ।।७५।। जें माझ्या जीवाचें जीवन। जें माझें हृदयींचें ध्यान। तें तुज केलें

निरूपण। बीजाचें निजबीज ।।७६।। जें दुर्लभ ब्रह्मादिकांसीं। जें अनिर्वाच्य न ये लक्षासीं। जें न भासें वेदशास्त्रांसीं। तें तुज निरोपिलें ।।७७।। ऐसी वस्तु जी पार्वती। तेचि वीरशैव अवतरती। तयां शिवयोगी बोलती। माझेचि अंश जाण ते ।।७८।। ते सदा उदासवृत्ति। भोगविलास थुंकोनि टाकिती। विष्ठेसमान विषयसुख मानिती। सदा संतुष्ट ते ।।७९।। ते मजला सदा पूज्य। उदासवृत्ति महाराज। ज्याच्या क्रियाचाराचें तेज। दूर करी भवातें ।।८०।। त्यासीं लोह-सुवर्ण जाण। समानचि मान-अपमान। अरि-मित्र प्रिय-अप्रिय समान। सहजमुक्त जंगम तो ।।८१।। ऐसा तो सहजमुक्त जंगम। गुरुपद पावला उत्तम। तो सद्गुरूवांचोनि परब्रह्म। आणिक नेणें दुजें ।।८२।। आपुलेसहित श्रीगुरुच। अवघाचि अवघा तोच। ऐसें निश्चया आलें साच। गुरुविण आनु नेणें तो ।।८३।। येथें संपवून ब्रह्मनिरूपण। पार्वतीप्रति सांगे आपण। जगन्माता आनंदून। प्रश्न करी शिवासीं ।।८४।। त्या श्रवणां वीरशैव जन। बैसले लावूनिया ध्यान। वक्ता मनीं सद्गदून। श्रवण करवी श्रोतयांसीं ।।८५।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। शिवगौरीसंवादीं वर्तत। त्याची टीका करूनिया प्राकृत। कृतकृतार्थ मन्मथ ।।८६।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे मुक्ततत्त्वविवेकवर्णनोनाम चतुर्थोऽध्यायः समाप्तः ।।

श्लोक ४, ओव्या ८६.

❑

अध्याय पाचवा

॥ श्रीजंगमलिंगाय नमः ॥

तुम्ही सांगितलें मुक्तस्वरूप । मागिले अध्यायीं अमूप । आतां वर्णावें जी स्वरूप । सद्‌गुरुनाथाचें ॥१॥

देव्युवाच–

रूपं सद्‌गुरुनाथस्य ज्ञातुमिच्छामि सांप्रतम् । ब्रूहि मे कृपया देव वल्लभोऽसि मम प्रियः ॥१॥

पार्वती म्हणे जी सदाशिवा । गुरु तोचि देव म्हणावा । ऐसें निरोपिलें एकभावा । तें मज आतां स्पष्ट करा ॥२॥ सद्‌गुरुरूप कैसें । सांगावें जी मज सौरसें । कोण भाव मूर्तत्वें असे । स्वरूपीं त्या ॥३॥

शिव उवाच–

गुरुर्माता गुरुः पिता हितकृत् श्रीगुरुः स्वयम् । गुरुदेवात्परं नास्ति तस्मै श्रीगुरवे नमः ॥२॥

शिव म्हणे हो वरानने । जो गुरूवांचोनि कांहीं नेणें । सर्वस्व माझे गुरु म्हणे । अनन्यभावें शरण तो ॥४॥ गुरु माता गुरु पिता । स्वहितकर्ता गुरुचि दाता । ज्यापरतें दैवत नाहीं तत्त्वतां । तया श्रीगुरूसीं नमूं आतां ॥५॥ सखा तो जिवलग जीवीचा । गुरुचि बंधु मित्र पूर्वज कुळीचा । जयानें परशिव केला

जीवाचा। तया श्रीगुरूसीं नमो ।।६।। आप्त सोयिरा लिंगांगीचा। जो उन्मेष षट्स्थल ब्रह्माचा। बोधक ऐक्यतत्त्वाचा। तया श्रीगुरूसीं नमावें ।।७।।

न गुरोरधिकः शम्भुर्न गुरोरधिको हरिः। शिवकोपे गुरुस्त्राता गुरुकोपे न कश्चन ।।३।।

गुरूहूनि अधिक नाहीं त्रिपुरारी। गुरूविण अधिक नाहीं हरि। कोपे शिव हरीच्या गुरु तारी। गुरु कोपी कोणी तारीना ।।८।। हरि-हर गुरूचे अंकित। अखंड स्तुति ध्यान करीत। कळिकाळ पायां लागत। गुरुभक्तांचिया ।।९।।

मन्नाथस्त्रिजगन्नाथो मद्गुरुस्त्रिजगद् गुरुः। स्वात्माऽपि सर्वभूतात्मा तस्मै श्रीगुरवे नमः ।।४।।

म्हणोनि माझा नाथ जगन्नाथ। माझा गुरु तोच जगाचा गुरु होत। माझा आत्मा सर्वभूतात्मा निभ्रांत। तया श्रीगुरूसीं नमो नमो ।।१०।।

देव्युवाच-

ध्यानं किमात्मकं ध्येयं पूजामूलं च किं भवेत्। को वा मंत्रः सदा जप्यः मोक्षमूलं च किं वद ।।५।।

पार्वती वदे जी शंकरा। दयानिधे करुणाकरा। मज सांगा जी उदारा। प्रश्ननिर्णय करोनि ।।११।। कोण मूल ध्यानासीं। कोण मूल पूजेसीं। कोण मूल मंत्रासीं। मूळ मुक्तीसीं कोण पैं ।।१२।।

शिव उवाच-

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम्। मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा ॥६॥

शंकर म्हणे पार्वतीप्रति। ध्यानास योग्य गुरुमूर्ति। तयाचें चरण सद्भावें पुजिती। अन्य पूजा कासया ॥१३॥ ध्यान श्रीगुरूचेंचि करावें। ध्यानां मूळ गुरुरूप जाणावें। पूजा मूळ गुरुचरण भावें। आन पूजा निरर्थक ॥१४॥ मंत्रासीं मूळ गुरुवाक्य जाण। आन मंत्र निष्कारण। जयासीं कृपा करी पूर्ण। तोचि मुक्त जाणावा ॥१५॥ श्रीगुरूविण मुक्ति नाहीं। वेद गर्जे ऊर्ध्वबाहीं। मुक्तिदाता श्रीगुरु पाही। मम रूप जाणिजें ॥१६॥ देवामाजीं मीचि ईश्वर। मर्त्यलोकीं वीरमाहेश्वर। क्रियाचारासीं आधार। सत्य जाण वो देवी ॥१७॥

अंगुष्ठाग्रे अष्टषष्टितीर्थान्यपि वसंति ते। सप्तसागरपादोर्ध्वे तदधः कुलपर्वताः ॥७॥

अंगुष्ठीं अडुसष्ट तीर्थें असती। अष्ट तीर्थें स्नानीं वसती। सप्त पदीं नांदती। जया श्रीगुरूचिया ॥१८॥ महातीर्थें सप्तसागर। तेंहि चरणीं वसती स्थिर। कुल पर्वत धुरंधर। गुरुपदीं नांदती तें ॥१९॥

नक्षत्रग्रहरुद्राद्या तस्य गुल्फे वरानने। जंघायां वसति नित्यं षट्त्रिंशत्तत्त्वमालिका ॥८॥

ईशानादि रुद्र जे असती। गुल्फद्वयीं नवग्रह वसती। जांघें छत्तीस तत्त्वें नांदती। तया श्रीगुरूच्या ॥२०॥

सप्तसागरपर्यंतं तीर्थस्नानेषु यत्फलम्। सहस्रगुणितं तस्माद् गुरुपादांबुधारणम्।।९।।

सप्तसागर सृष्टीचीं तीर्थें। तें जें देती दानफळातें। सहस्रांशें गुरु-अंगुष्ठथेंबातें। सरी न पावती कीं।।२१।। फल जें गुरुतीर्थसेवनाचें। शेष वर्णूं शकेना महिमान त्याचें। मा म्यां काय वदावें वाचें। पामरानें।।२२।।

निराकारो गुरुः प्रोक्तः साकारो लिंगरूपभाक्। ज्ञात्वैक्यमुभयोर्नित्यं भजेत्सायुज्यसिद्धये।।१०।।

श्रीगुरुमूर्ति असे निराकार। लिंगमूर्ति असे साकार। परि जाणोनि उभय निराकार। एकत्वें भजिजें।।२३।। पातळ घृत तेंचि गोठलें। तरी काय घृतपणा उणें आलें। तेविं निराकार गुरुत्व आकारलें। लिंगरूपें।।२४।। कापूर आकार दिसे रवा। परि तो परिमळचि आघवा। तैसा लिंगरूप जाणावा। गुरुचि आकारला।।२५।। म्हणोनि लिंग तो गुरुचि जाणिजें। अभेदत्वें उभया पुजिजें। तयाच्या अंगसंग होवोनि असिजें। निरंतर वो पार्वती।।२६।।

गुरुरूपं तु यो विद्वान् शिवरूपमिति स्मरन्। अशरीरात्मसंबधी गुरुः शिष्यमनुग्रहेत्।।११।।

ज्ञानियां गुरु आणि शिव एक असे। उभयवर्ग निर्गुण निराकार भासे। गुरु निराकार भाविजें विश्वासें। सदा शिष्यानें।।२७।। लिंगरूपी जो परमपुरुष। जो न कळेचि वेदश्रुतींस। तया न म्हणावें आकारास। निर्गुण निराकारचि जाणावें।।२८।। गुरुहि आहे तयेपरी। तयाची देवाहून अधिक थोरी। वर्णितां शिणले

वेद चारी। अगम्य रूपा अगोचरा॥२९॥ शिव तो निराभास भासेना कोण्हासीं। पाहतां वेदशास्त्र-पुराणांसीं। तो भासवी सत्‌शिष्यासीं। म्हणोनि शिवासीं गुरु अधिक॥३०॥ जो ध्यानाजपानामावरी। गवसेना कोण्हासीं कोण्हे परी। तो शिव स्वयें शिष्यासीं करी। म्हणोनि अधिक गुरु॥३१॥ शिव परब्रह्म होय सही। परि भेटीं बोलणें न घडें कांहीं। हा भेटे बोले समाधान करी सर्वहि। यालागीं गुरु अधिक॥३२॥ पूजापत्री भावभक्ति। कैसी करावी निराकाराप्रति। सेवेसी पूजेसी गुरुमूर्ति। म्हणोनि विशेष हा॥३३॥ गुरु परशिव एकचि पाहीं। परि परशिवां बोधणें बोलणें नाहीं। हा बोधी बोले स्वयें स्वरूपाचे ठायीं। समरस करी॥३४॥ निराकारचि आकारला। जडजीव तारावया गुरुरूप झाला। म्हणोनि मनुष्य म्हणूं नये तयाला। परब्रह्मचि तो॥३५॥

यो गुरुं कायरूपेण गुरुभावं च भावयेत्। शिष्यज्ञानप्रदीपेन अप्रमाणमगोचरम्॥१२॥

शिष्यानें देहभावना गुरूसीं न भाविजें। अप्रमाण अगोचर गुरूतें जाणिजें। ऐसें जाणोनि भजे तरी ज्ञान सहजें। अप्रमाण अगोचर होय॥३६॥ गुरूसीं देहधारी मानिता माणूस। ब्रह्मत्वें न बैसे विश्वास। तरी तो केविं पावें परब्रह्मास। गुरु माणूस मानितां॥३७॥ गुरु मानव न भाविजें विश्वासें। तयासीं स्वयें ज्ञान प्रकाशें। मग आपणहि होय गुरुरूप सरिसें। गुरुध्यानें॥३८॥ कीट भृंगी वैरध्यानें। तात्काळ

भृंगचि होणें। मा शिष्य तरी सद्भावध्यानें। गुरुरूप केविं नव्हिजें।।३९।। म्हणोनि गुरूचें ध्यान करावें। तरी गुरुरूपचि व्हावें। झालिया कळिकाळ स्वभावें। शरण येती वो देवी।।४०।। गुरु देहधारी न म्हणावें। ब्रह्म अगोचर तया जाणावें। तरीच परब्रह्मां पावावें। येणे भावें करूनिया।।४१।। सद्गुरु अव्यक्त असती। व्यक्त शिष्यां उपदेशिती। प्रदीप्त ऐसी ज्ञानज्योति। दाखविती पूर्ण ब्रह्म।।४२।। तेव्हां तेहि होती गुरुरूप। घेती ब्रह्मानंदीं झेप। शिष्य-गुरुत्वाचा विक्षेप। न उरे कदा तेथें।।४३।। गुरुशिष्यां ना दिसे भेद। ध्यानयोगें असे अभेद। गुरुकृपें होय सद्गद। तो सत्शिष्य जाणावा।।४४।।

एक मूर्तिस्त्रियोभागा: गुरुलिंगं तु जंगम:। जंगमं च गुरुर्लिंगं त्रिविधं लिंगमुच्यते।।१३।।

एक निर्गुण मूर्ति त्रिभागां आली। गुरु लिंग जंगम ऐसी भासलीं। तिन्ही मिळूनि एकरूप जईं झाली। तोचि जंगम अथवा लिंग।।४५।। जो गुरु तोचि जंगम। जंगम तोचि लिंग उत्तम। त्रिविध लिंग ऐसा नेम। असिजो वो पार्वती।।४६।। यास्तव तीन रूपांमाझारीं। माझा वास असे सुंदरी। तदन्य स्थानांभीतरीं। अजाग्रत असे मी।।४७।। लिंगरूपी जो सद्गुरु। वाहे स्वधर्माचा अहंकारु। तोचि वीरशैवाचारु। उद्धारु जगामाजीं।।४८।। जो भाव गुरूसीं पाही। तोचि असावा लिंगाचें ठायीं। तोचि भाव जंगमाचे पायीं। विश्वासें असावा।।४९।।

गुरुदेवं महादेवमेकभावेन भावयेत्। भावद्वयविभागेन नरके कालमक्षयम् ।।१४।।

श्रीगुरूसीं सदाशिवासीं ऐक्यभावें। भजिजें तरी गुरुरूपचि व्हावें। द्वैतभावें निरयासी जावें। कल्पांतवरी ।।५०।। गुरुदेव आणि महादेव। उभयीं नसे भेदभाव। म्हणोनि असे श्रेष्ठ प्रभाव। गुरुपूजनीं ठेविला ।।५१।।

गुरुरूपोद्भवं लिंगं लिंगरूपोद्भवो गुरुः। भक्तो भेदवादी यो चांडालो गुरुपातकी ।।१५।।

गुरूपासोनि लिंगप्राप्ती। लिंगापासोनि गुरुतृप्ति। उभयां ठायीं शिवाची व्याप्ती। असे जाण पार्वती ।।५२।। गुरूमाजीं लिंग लिंगामाजीं गुरु। ऐसा भक्ताचा असावा निर्धारु। लौकिकभावें धरी भेदाकारु। तो चांडाळ गुरुपातकी ।।५३।। लिंगासीं गुरुभावनें पुजिजें। तें पूजन गुरूसीं अर्पे सहजें। म्हणोनि अष्टविधार्चनें पुजिजें। त्रिकाळ लिंगासीं ।।५४।। स्थावर आणि दुजे चर। हे दोन लिंगाचे प्रकार। दोन्ही रूपीं मीच ईश्वर। परि गुरु चरलिंग जाणावें ।।५५।। म्हणोनि गुरूसीं ध्यातां अर्चितां जाण। कोटी लिंगांचें घडें पूजन। अर्बुद पात्रीं भोजनदान। घडतसें अनायासें ।।५६।। कोण्ही म्हणती लिंग तरी साकार। तेथें भजतां केविं संतोषें निराकार। यासीं दृष्टान्त ऐक साचार। जेणें संदेह फिटे ।।५७।। नट सोंगरूप अवगला। सोंग देखून सभें संतोष झाला। सोंगा त्याग दिधला। नानाविध ।।५८।। त्याग

सोंगानें भोगिला। कीं सोंगातील नटासींच पातला। सोंग लटिकें म्हणोनि पावला। त्याग नटासीच कीं ।।५९।। म्हणोनि लिंगजंगमीं भजन जें जें। कीजें तें तें अपें गुरूसीं सहजें। ऐसिया अभेदें जो भजें। तोचि गुरुभक्त वो देवी ।।६०।।

यो गुरुं मृतभावेन तद्दिने यश्च शोचति। गुरुलिंगप्रसादं च नास्ति तस्य वरानने ।।१६।।

गुरु मृत्यु पावला हे भावना। भावून अंतकाळीं करी रुदना। तो गुरुपुत्र नव्हे अज्ञाना-। माजीं लेखिजें ।।६१।। कां म्हणसी तरी तो निराकार। त्यासीं मुळीच नाहीं शरीर। तो अविनाश अजर अमर। मृत्यातीत तो ।।६२।। ऐसिया सद्‌गुरूसीं नेणोनि। जो मृत मानी तो चांडाळ अज्ञानी। त्यासीं गुरुलिंगाचा प्रसाद कोण्ही। न देआवा वो देवी ।।६३।। गुरु ब्रह्म ऐसें नेणोनि। भक्ति करी भावें जनीं। मृत्यु पावला हे मनीं आणी। तो चांडाळ जाणावा ।।६४।। गुरुरूप सबराभरीत। त्याचा न लागें मानवा अंत। अदृश्य अगोचर अतीत। असें जाण सर्वांठायीं ।।६५।। चरगुरु चिरंजीव। न मानी जो मानव। तया प्रसादवैभव। नाहीं नाहीं सर्वथा ।।६६।। प्राण लिंगीं ऐक्य करोनि। लिंगां प्राणाहूनि प्रिय मानी। ऐसें अभ्यासोनि वर्तें जनीं। तोचि वीरशैव जाणावा ।।६७।। त्यानें केला देहत्याग। तो जाणावा महायाग। प्राण राहे लिंगीं सांग। म्हणोनि दग्ध करूं नये ।।६८।।

प्राणेन लिंगसंयुक्तं लिंगेन प्राणसंयुतम् । प्राणेन त्यक्तकायस्य दहनं वर्जयेत् सुधीः ।।१७।।

लिंग आणि प्राण एक होऊनि। प्राण लिंगीं लिंग प्राणीं मिळोनि। जे असती त्याचिया देहालागूनि। दग्ध न कीजें वो ।।६९।। कां म्हणसी तरी ऐक पुढती। तुज निरोपितो दृष्टान्तीं। जेणें देहाची बुंथी। तात्काळ जाय ।।७०।।

दग्धस्य दहनं नास्ति पाकस्य पचनं न हि। ज्ञानाग्निदग्धदेहस्य नच दाहो नच क्रिया ।।१८।।

जैसें सिद्ध अन्नातें उपरी। पुनः पचविता निर्धारीं। विषतुल्य होय सत्वरीं। प्राणहरण करावया ।।७१।। तयाचे परी लिंगधारी। दहन करितां दोष भारी। प्राणहानी होय एकसरी। म्हणोनि दाहो वर्जावा ।।७२।। जें दग्ध झालें तें काय जाळावें। जें पाक झालें तें काय शिजवावें। तैसें ज्ञानाग्नीनें दग्ध स्वभावें। त्यासीं दग्ध करूं नये ।।७३।। लिंग आणि प्राण एक होऊनि। येरयेरासीं वस्तुपणीं। तयाचा देह घालू नये अग्नीं। मा देहक्रिया कैंची ।।७४।। जें शिवाग्नीनें दग्ध झालें। त्याचें दहन कदा काळें। करूं नये हिमनगबाळे। उदकक्रिया वर्जावीं ।।७५।।

वरानने गुरुस्तस्मात् पशूनां पतिरिष्यते। पशुपाशविनिर्मुक्त्यै गुरुभावं निरीक्षयेत् ।।१९।।

आवो वरानने ऐक स्वभावपण। गुरु तो सर्व पशूंसीं पति म्हणोन। पशूंचे पाश छेदूनि निर्मुक्तपण।

करी नाम-मात्रें ।।७६।। ऐक्यभावें गुरु वस्तु निरीक्षितां। पशु प्राणी पावती मुक्तता। गुरु तोचि परब्रह्म भावितां। आपणहि तेंचि होय ।।७७।। मीच असे पशुपति। सगुण रूपें श्रीगुरुमूर्ति। जन्मा खुंटवोनि मुक्ति। पाश छेदूनि देतसे ।।७८।। जन्मां येण्याचीं कारणें अनेक। परि पापपुण्य समानचि देख। त्यावांचोनि नरदेहां सुख। मिळणेच नाहीं जाण पां ।।७९।। जरी नरदेह पावला उत्तम। तरी पुढें चौऱ्यांशीचा नेम। ठेविला करोनि प्रचंड यम। शिक्षा द्यावया प्राणियांसीं ।।८०।। त्याचे हेर चित्रगुप्त। भूमंडळीं असती अलिप्त। ज्या ज्या कर्मीं प्राणी होती लिप्त। तें तें वरिष्ठ लिहिताती ।।८१।। अंतीं तया तेचि नेती। पापपुण्याचा झाडा घेती। निर्दय शिक्षा अधोगति। प्राणी भोगिती यातना ।।८२।। परि जे माझे पूर्ण भक्त। तयापुढें यम राबत। तयासीं प्रार्थूनिया शिवदूत। अंतीं नेती शिवपदा ।।८३।। माझिया दूतांची सरी। दुजे देव कांहीं न करी। ममाज्ञा मोडितां एकसरी। प्राप्त होती कष्टाते ।।८४।। भस्मरुद्राक्षांकित देह। जरी यमदूत स्पर्शे लवलाहे। त्याचें शिर छेदूं पाहें। वीरभद्र साक्ष पैं ।।८५।। जो प्राणी माझा अंकिला। त्या न पाहे यम डोळां। आज्ञा असे कळिकाळां। शिवभक्तां वंदावे ।।८६।। शिवाचाराचेनि योगें। जे चालती अनुरागें। तया मोक्षाचिया जागे। कीजें सत्य कैलासीं ।।८७।।

पतिरेव गुरुः स्त्रीणां परानुग्रह नैव च। सुरतार्चितसंतुष्टः सुभगो लिंगसंयुतः ।।२०।।

स्त्रीसीं पतीच गुरु बोलिजे। तियेसीं पराची दीक्षा न दिजे। तनमनधन अर्पण कीजें। तियेसीं तेचि भक्ती ।।८८।। जेणें जेणें अंगें पति संतुष्ट होय। तेणें तेणें अंगें होतु जाय। पतिव्रता म्हणावया कारण काय। जे पतिच व्रत तियेसीं ।।८९।। ऐसियाचे अष्टभोगी संतुष्ट। जो लिंगसंयोगें भोगी लिंगनिष्ठ। अभेदभावनें भोगी वरिष्ठ। लिंगसंयोगें भोगी तो ।।९०।। लिंगांगीची स्वपत्नी श्रेष्ठ। अभेदभाव भोगे वरिष्ठ। लिंगपूजा करी एकनिष्ठ। सदा संतुष्ट मानसीं ।।९१।। पतिपत्नी असती एक। सव्यापसव्य अंगभौतिक। पूर्वार्जित असे नैष्ठिक। तरीच घडे सत्य हें ।।९२।। गुरु लिंग आणि आपण एक। यालागीं स्त्रीसीं पतीचा अनुग्रह देख। म्हणोनि जरी दोहांसीं गुरु एक। घडे तरी भेद नाहीं ।।९३।।

दीक्षा च पतिपत्न्योश्च गुरुरेको भवेत् खलु। तन्मन: प्राणनैवेद्यमतिसौख्यं वरानने ।।२१।।

स्त्री-पुरुषासीं एकचि गुरु। एकचि दीक्षा दिजे हा निर्धारु। दोहीची भावभक्ती घडे एकाकारु। भेद न घडे दोहीसीं ।।९४।। त्या दोहीचें घडें जें भक्तिसुख। तो सर्वभोक्ता होय गुरुचि एक। संतोषोनि होय मोक्षदायक। उभय वर्गासीं ।।९५।।

गुरुदीक्षा पतिपत्न्योरन्यान्या भेदभावत:। यदि स्याच्चेतदा तत्तु भक्तिहीनं सुरेश्वरि ।।२२।।

पतीसीं पत्नीसीं दोन्ही गुरु बोलिले नाहीं। घडले तरी भेद झाला पाहीं। दोघे भजती दो ठायीं। तंव

दोन भाव जाहले ।।९६।। दोन गुरु तंव दोनी भाव। दोन भाव तंव दोन देव। तंव मोक्षपदहि सर्वथैव। दो प्रकारीं असें कीं ।।९७।। पतिपत्नी म्हणती एक। ती त्याची अर्धांगी अर्धभौतिक। हें तंव वाक्य झाले मिथ्यैक्य। जंव झालें दोन भाव ।।९८।। हे ज्ञानिये तरी न मानिती। उभयाचा एकभाव असावा म्हणती। म्हणोनि दोहींसीं दीक्षाप्राप्ती। एक गुरुनें दीजे ।।९९।। मुळीच दोन्ही भिन्न असावी। तरी दो गुरूची दीक्षा घ्यावी। ते आधीच ऐक्य स्वभावीं। जैसे देह आणि आत्मा ।।१००।। यालागीं उभयासीं गुरु एक। एकभावना होतां होय निजसुख। भेद खंडतां मोक्षदायक। होय श्रीगुरुनाथ ।।१०१।।

पतिपत्निभ्रातृपुत्रदासीगृहपदातिनाम्। एकदीक्षा भवेद् देवि विशेषशुद्धभक्तिमान् ।।२३।।

यालागीं पति पत्नी बंधु पुत्रां। एकचि गुरुदीक्षा सर्वत्रां। गृहीचे दासी सेवक पुत्रां। एकचि गुरु पाहिजे ।।१०२।। कां म्हणसी तरी ऐक। सर्व घरचिया गुरु झालिया एक। तरी एकभाव होय सर्वांचा देख। एका गुरूचे पायीं ।।१०३।। सर्वांचा एकभाव एकविश्वास झालिया। मग सहज जाती मोक्षाचिया ठायां। ते भिन्न भिन्न दिसती परि काया। एकचि सर्व असे ।।१०४।। एकभावें विशेष शुद्ध भक्ति। जया घडे एकचित्तीं। तयासीं मोक्षपदाची प्राप्ती। घडे ऐक्य वो देवी ।।१०५।।

गुरुरेको तथा लिंगं एकदीक्षा विशेषत:। प्रसादस्त्वेकमेव स्यात्सत्यमेव मयोदितम् ।।२४।।

घरीच्या सर्वांसीं गुरु एक। सर्वांसीं लिंग देतां एक गुरु देख। एक दीक्षा प्रसाद आणिक। दुसरा नाहीं ॥१०६॥ एक गुरु एक लिंग एक प्रसाद। एकत्वीं तेथें खंडला भेद। दुसरे नास्ति म्हणोनि मोक्षपद। अभंग वो वरानने ॥१०७॥ सति पति दोघे नांदता। दोहींचा भाव एक नसता। तरी मुक्तीची केविं होय प्राप्तता। म्हणोनि उभयां एक गुरु ॥१०८॥ भिन्न गुरु असतां जाण। भिन्नाचारें वर्तें मन। तेथें स्त्रीपुरुषां सौजन्य। कदाकाळीं असेना ॥१०९॥ दोन भाव दोन भक्ति। भिन्नाचारें उत्पन्न होती। परधर्मीं तया निंदिती। एकी नसे म्हणोनिया ॥११०॥

न भवेत्पतिपत्न्योश्च गुरुद्वय वरानने। गुरुद्वयं च लिंगं च द्वयमेव भवेत्तदा॥२५॥

पति आणि पत्नीस। एकचि गुरु असे उभयांस। दोहींस दोन गुरु होतां विश्वास। दो ठायीं झाला ॥१११॥ दोन गुरु तंव दोन लिंग। दोन लिंग तंव भावहि द्विअंग। द्विभाव तंव मोक्ष न घडे चांग। म्हणोनि एकचि गुरु कीजें ॥११२॥ पुरुष हा स्वस्त्रियेचा गुरु। हाचि शास्त्राचा होय विचारु। परि पतिगुरु तो स्त्रीगुरु। निर्धारें जाणावा ॥११३॥ पतिगुरूच्या वचनें। सतीनें वर्तावें अनुदिनें। नाहीं तरी द्विभावें वरानने। मोक्ष नये हातासीं ॥११४॥ जरी स्त्रीपुरुषां दोन विचार। तरी तो जाणावा अनाचार।

एकविचारें वर्ततां साचार। यशकीर्ति वाढतसे ।।११५।। म्हणोनि भेदभावां त्यागावें। एका गुरुलिंगासीं भजावें। तेणें गुरुकृपाहि स्वभावें। प्राप्त होय अनायासे ।।११६।। गुरुकृपा होता नि:शंक। तो गुरुरूप आवश्यक। गुरुपदाचा गर्व देख। आणीता नरक कल्पवरी ।।११७।। देह कावलासी कैवल्य केलें। जेणें स्वस्वरूप शिष्यास दिलें। जीवां शिवपदीं बैसविलें। गुरुमातेनें वात्सल्यें ।।११८।। ऐसें सगुण-निर्गुणातीत करोन। चारी मुक्तीचिया पैलतीरीं नेऊन। पांचवीच्या सिंहासनीं पूर्ण। बैसविलें कृपाळुत्वें ।।११९।। म्हणोनि परब्रह्मीं जो पावला। त्यानें न विसरावें गुरुस्वामीला। विसरे तो जाय अधोगतीला। सत्य सत्य पार्वती ।।१२०।। यास्तव गुरूपरतें दैवत। नाहीं नाहीं त्रिभुवनांत। मी तुज सांगितलें निभ्रांत। भजा निश्चयें श्रीगुरूसीं ।।१२१।।

यदा दीक्षा द्विधा चैव प्रसादो द्विविधो भवेत्। एवं हि द्वैविधं देवि विशेषं पातकं भवेत् ।।२६।।

जेथें दीक्षा दोन तरी प्रसाद दोन। दोन भावें केविं होय पावन। भिन्न भेद तेथें पातक दारुण। घडें वो देवी ।।१२२।।

पतिपत्निगुरुर्लिंगं एकभावं न पश्यति। अष्टाविंशतिकोटिस्तु नरके कालमक्षयम् ।।२७।।

पतिपत्नी गुरुलिंगमूर्ति। जे एकभावें न पाहती। अठ्ठावीस कोटी वरुषें जातीं। निरयभोगासीं ।।१२३।। म्हणोनि भेदभावां त्यागावें। एकत्वें गुरुलिंगजंगमीं भजावें। मग गुरुत्वचि स्वभावें। अंगासीं ये ।।१२४।। जरी गुरुत्व ये अंगासीं। तऱ्ही फुगारा न ये त्यासीं। ऐसा गुरुभजनें पावून गुरुत्वासीं। गुरुभजनीच असिजें ।।१२५।। शास्त्रीं जे पंचमा मुक्ति म्हणती। चहु मुक्तीचिया माथां तिची वसती। जी सायुज्यावरती गुरु-भक्ति। ते पांचवी बोलिजे ।।१२६।। एऱ्हवीं सायुज्यपर जो जाला। तो तेव्हांचि क्रियाकर्मांसीं मुकला। परि गुरुभक्तीसीं उरला। सप्रेमभावें ।।१२७।। जेणें कावलाचें कैवल्य केलें। रंकासीं राज्यपद दिधलें। जीवासीं शिवपदीं बैसविलें। जया गुरुनाथें ।।१२८।। शेखीं सेवकत्वहि नेलें। निर्गुणत्व जेणें दिल्हें। गुण नास्ति म्हणोनि निर्गुणत्व दिल्हें। अनुपम्य केलें गुरुरायें ।।१२९।। ऐसें सगुणनिर्गुणातीत करोन। स्वत:सिद्ध केलें चिदानंदघन। तया गुरूसीं न भजे ऐसा कोण। चांडाळ पातकी असे ।।१३०।। म्हणोनि परब्रह्म जरी झाला। तरी भजिजें श्रीगुरुस्वामीला। न भजतां जाय निरयाला। सत्य सत्य वो पार्वती ।।१३१।। म्हणोनि गुरूपरतें दैवत। नाहीं नाहीं वो निभ्रांत। यालागीं पूजन भजन एकान्त। त्यासींच कीजें ।।१३२।। ऐसें गुरुमाहात्म्य निरोपिलें। तेणें पार्वतीचें चित्त संतोषलें। संतोषोनि पुसूं

आरंभिलें। परमरहस्याते ।।१३३।। इति श्रीगुरुमाहात्म्य उत्तम। हें गुरुपुत्रासीं गुह्य परम। तूं माझी भक्त म्हणोनि परम। निरोपिलें वो देवी ।।१३४।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृत्य किंकर मन्मथ। पंचम अध्याय संपविला ।।१३५।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे गुरुमाहात्म्यनिरूपणं नाम पंचमोऽध्यायः समाप्तः ।।

श्लोक २७, ओव्या १३५.

❑

अध्याय सहावा

|| श्रीगणेशाय नमः ||

जयजय सद्‌गुरु परशिवा । सत् चित् सुखात्मका भवोद्‌भवा । परब्रह्मीचा तूं निज ठेवा । तुज नमूं ॥१॥ पंचम अध्यायाचे अंतीं । तुवां निरोपिलें मुक्तीप्रति । पुढील ग्रंथश्रवणीं प्रीति । विरूढली हृदयीं मम ॥२॥ ऐसें विनवूनि उठाउठीं । गिरिजा अंकीं बैसोनि गोमटी । आदरें प्रार्थूनिया धुर्जटी । प्रश्न करी ॥३॥

देव्युवाच-

को वा प्रकृतिकायश्च ज्ञानकाया यथा भवेत् । भेदं च किं द्वयोर्देव किं बीजं कथयस्व मे ॥१॥

गिरिजा प्रश्न करी शंभूसीं । प्रकृतिकाया ती कैसी । ज्ञानकाया म्हणिजे कोण्हासी । हा बीजभेद निरोपा स्वामी ॥४॥ दोन्ही कायेचे सविस्तर । मज सांगावें भेदाकार । बीजाक्षराचाहि विचार । प्रकट कीजें मजलागीं ॥५॥

शिव उवाच-

विकल्पहीनशिष्यस्य श्रोत्रे बीजं च सद्गुरुः । अव्यक्तं प्रोक्तवान् शुद्धं ज्ञानांगं तत् समीरितम् ॥२॥

ईश्वर म्हणें अंबेप्रति। तुझे प्रश्न गहन असती। परि अज्ञान जनाचे चित्तीं। प्रेमभाव प्रगटेल ॥६॥ जो शिष्य शुद्ध प्राज्ञिक। सुज्ञ सुबुद्धि सुचित्त चोख। निरभिमानी सात्त्विक। भजनशीळ पैं ॥७॥ ऐशा सानुराग शिष्यास। श्रीगुरु निरोपिती श्रोत्रीं बीजास। मग अविद्याकल्पनेचा होय नाश। ते ज्ञानलक्षणयुक्त काया ॥८॥ तरीच गुरुमंत्र बीज। तयाचे कर्णीं राहे सहज। धर्मनीतीचे उदकें काज। होती अंकुर बीजांतें ॥९॥ बीज विरूढता कर्णीं। पातकाची होय हानी। अव्यक्त ज्ञान मुरूनि। ज्ञानांगें दृढ होय ॥१०॥

शिवमंत्राक्षरं बीजं प्राप्तं येन गुरोर्मुखात्। स प्राणी ज्ञानकायश्च प्रकृतिप्रतिबिंबवत् ॥३॥

शिवमंत्र बीजाक्षर बरवे। ते उपदेशिले श्रीगुरुदेवें। शुद्ध काया म्हणोनि सद्भावें। बिंबले तेथें ॥११॥ तें सद्गुरूचें बीजाक्षर। जेथें बिंबलें तेथें झालें ब्रह्माकार। प्रपंचाचा झाला संहार। म्हणोनि ज्ञानकाया बोलिजे ॥१२॥ श्रीगुरु-उपदेशेंकरून। अंतर्बाह्य गुरुचि झाला आपण। मग प्रकृतिकाया विरोन। ज्ञानकाया जाहली ॥१३॥ जैसें प्रथम होतें सघन वन। नाना वृक्षवेष्टित ऐंचण। तें शुद्ध कीजें सर्व छेदून। क्षेत्रालागीं कृषकें ॥१४॥ पिकाचि लागीं असे कृषि। नांगरोनि मोगडोनि धरी कुळवाडीसीं। मग वनपण जाय क्षेत्र म्हणिजें त्यासीं। बीजायोग्य म्हणूनिया ॥१५॥ तैसें अरण्य म्हणिजें। प्रकृतिकाया ती बोलिजे।

षड्विकार वृक्ष सहजें। वन केलें तेणें हें।।१६।। ते अनुतापकुऱ्हाडी धरून। षड्विकारादि वृक्षसंहरण। करोनि शेतीचें आरंभण। पालव्या छेदून आशामनिशेचिया।।१७।। बुद्धि-कुदळीं खणोन। कामक्रोधादि खुंटे टाकिली छेदून। मग ज्ञान-नांगर धरोन। वनाचें क्षेत्र केलें।।१८।। गुरूनें बीज देऊनि पिकविलें। वनासीं शेत हें नांव पावलें। तैसें प्रकृतिशरीर ज्ञानकाया झाले। श्रीगुरुकृपेंकरोनिया।।१९।। ते जाणिजे शुद्ध काया। न करी कर्मेंद्रियांची दया। सदा शुद्धभावें गुरुराया। शरण असे वरिष्ठ।।२०।। जया शुद्ध कायेभीतरीं। गुरुकृपेनें बीजाक्षरीं। मंत्र संपादण्याची थोरी। देवादिका दुर्लभ।।२१।। मंत्र साध्य झालियाविण। ज्ञानकाया नोव्हे जाण। मंत्रामाजीं पंचानन। शिवमंत्र असे पैं।।२२।।

प्रकृतिज्ञानकायश्च तथा भेदसमन्वितः। तत्तद् गुणेन भावेन ज्ञानकायस्तथा भवेत्।।४।।

प्रकृतिकाया ज्ञानकायेसीं भिन्न। जैसें पात्रीं वाढिलें अपक्वान्न। क्षुधाक्रांत भक्षितां होय खिन्न। तैसी जाण प्रकृतिकाया।।२३।। तेंचि पक्वान्न पात्रीं वाढितां। जेविं तृप्ति होय तत्त्वतां। तेविं ज्ञानकायेची वार्ता। समाधान पावतसे।।२४।। जरी प्रकृति ज्ञानकाया दिसे भिन्न। ती प्रकृतिकाया लाभें ज्ञान। तरी तेंचि बोलिली पूर्ण। ज्ञानकाया वो देवी।।२५।। ऐसी अज्ञान तें ज्ञानकाया जाहली। तत्त्वमात्र सर्व बोलों ठेलीं। सकळ ब्रह्मत्वें स्थिति झाली। ती ज्ञानकाया बोलिजे।।२६।।

न जाग्रद्वा सुषुप्तोऽथ स्वप्नमज्ञानवृत्ति वा। दिवारात्रस्य न ज्ञानं न कालस्यापि कल्पनम्।।५।।

ऐसी जे ज्ञानकाया पाही। तया दिनरात्रीं कालकल्पना नाहीं। जरा-मृत्यु-जन्मांतर कांहीं। नुठेचि ते ज्ञानकाया।।२७।। षडूर्मि षड्विकार। नाहीं तेथें द्वेष मत्सर। निर्लोभ निरहंकार। ती ज्ञानकाया म्हणिजे।।२८।। आशा मनिशा तृष्णा। नाहीं भिन्न भावभावना। अभेदभावें नातळे त्रिगुणा। ती ज्ञानकाया बोलिजे।।२९।। कामक्रोधादि षड्विकार संग। नातळें जयाचें अणुमात्र अंग। नाहीं मीतूंपणा कडसणी सांग। ती ज्ञानकाया बोलिजे।।३०।। समाधानी सदा शांत। सदा संतुष्ट सदोदित। नाहीं हळहळ पूर्णभरित। ती ज्ञानकाया बोलिजे।।३१।।

यद्दिवा यच्च रात्रं च तथा कालस्य कल्पना। प्रपंचमयभावश्च प्रतिबिंबे दृढस्तथा।।६।।

अज्ञानकाया म्हणिजे ऐक। जेथ स्वरूपाची विस्मृति विशेख। अहंकृति जेथें निष्टंक। ती अज्ञानकाया।।३२।। जे देहीं काळकल्पना असे। दिनरात्र काळकल्पना भासे। सदा प्रपंचाकार वर्ततसे। ती अज्ञानकाया।।३३।। जैसें प्रतिबिंब साच मानणें। तैसी प्रकृतिकाया म्हणे। येणें निश्चतार्थें वर्तणें। ते अज्ञानकाया बोलिजें।।३४।। आतां बहु काय बोलूं ऐका। जें ज्ञानकायेचें लक्षण निरोपिलें देखा। ते ज्या नसती आवश्यका। ती अज्ञानकाया।।३५।। ऐसी ही कर्मब्रह्मसंपदा। तुज निरोपिली सुबुद्धा। तुवांहि

असावें गौरी सदा। ज्ञानकाया जाणोनि ।।३६।। मजहि असे ज्ञानकायेचें कोड। अत्यंत त्या कायेची आवड। म्हणोनि तुवांहि असावे अखंड। ज्ञानकाया होवोनि ।।३७।।

फाले त्रिपुंड्रकं यस्य गले रुद्राक्षमालिका। वक्त्रे षडक्षरो मंत्रः स रुद्रो नात्र संशयः ।।७।।

तैसी जी ज्ञानकाया सुचित। त्या कायेसीं भाळीं त्रिपुंड्र विभूत। चंद्रकोर विशेष शोभत। मद्रूप देवी ।।३८।। भाळीं त्रिपुंड्र मुखीं बीजाक्षर मंत्र। कंठीं रुद्राक्षमाळा शोभती पवित्र। ते साक्षात् जाणिजें महारुद्र। यासीं संशय नाहीं ।।३९।। मंत्रावांचूनि मुख निर्फळ। मुग्धपणें नसावी तळमळ। अमंत्रें क्षोभें जाश्वनीळ। म्हणोनि समंत्रें पुजी कां ।।४०।। षडक्षर मंत्रेंविण। शिवार्चन निष्फळ होय जाण। षडक्षराची उत्पत्ति गुणभेद जाणोन। भजिजें शिव शिवभक्तीं ।।४१।।

देव्युवाच-

केन मंत्रेण वा पूजा कर्तव्या साधकोत्तमैः। केन मंत्रेण सिद्धिः स्यात् जपपूजादिकस्य च ।।८।।

कोणत्या मंत्रें करावी पूजा। ऐसें विचारीतसे गिरिजा। कोण मंत्र जपसिद्धिबीजा। नंदिध्वजा सर्व सांगा ।।४२।। महामंत्र सप्तकोटी। असती जाण धुर्जटी। तुम्ही कथिलें परमेष्टी। ते श्रवण मज झाले ।।४३।।

शिव उवाच-

स्नात्वा अर्घ्यादिसामान्यसंस्थाप्याप्युपचारकैः। पंचाक्षरेण मंत्रेण अर्चितव्यो महात्मभिः ।।९।।

शिव म्हणे वो देवी। तुझी पृच्छा असे बरवी। जेणें अज्ञानाची गोवी। जाय गळोनि ।।४४।। शुद्ध स्नान करूनि जाण। महामंत्रें करावें ध्यान। अर्घ्य पाद्य पात्रेंकरून। आरंभावें संकल्पां ।।४५।। नित्य संकल्प होतां पूर्ण। मग करावें माझें ध्यान। ध्यानासरिसे प्रार्थून। शुभ्रासनीं बैसवावें ।।४६।। मग अर्घ्य पाद्य होतां मान्य। घालावें शुद्धोदकें स्नान। वस्त्रालंकारें गौरवून। परिमळ धूपां अर्पावें ।।४७।। पात्रीं नैवेद्य षड्रसान्न। समर्पावें भावेंकरून। एकारती दीपां ओवाळून। ध्यान स्वरूपीं लावावे ।।४८।। ती पूजा करकमळीं। करीतसे वीरमंडळी। पूजा होतां पुष्पांजळी। वेदमंत्रें करीतसे ।।४९।। महामंत्र षडक्षरी। जपालागीं झडकरी। एकाग्रतेचि यापरी। वैखरीनें उच्चारी कां ।।५०।। हा मंत्र ऐकता कर्णीं। मी सदा होतसे ऋणी। जी इच्छा जापकाचें मनीं। आनंदें पुरवीतसे ।।५१।। पंचाक्षरी महामंत्राची थोरी। वर्णितां न वर्णवे निर्धारी। सप्तकोटी मंत्रांचा पुढारी। उद्धारक जगताचा ।।५२।।

देव्युवाच-

पंचाक्षरस्य चोत्पत्तिः पंचाक्षरगुणस्तथा। पंचाक्षरस्य वा भेदा ब्रूहि मे परमेश्वर ।।१०।।

गिरिजा म्हणें जी शंकरा। कैसी षडक्षराची उत्पत्ति दातारा। गुणभेद कोण परमेश्वरा। निरोपा स्वामी ।।५३।।

शिव उवाच-

यथा क्षेत्रस्य बीजस्य संबंधः फलदस्तथा। तथा शिष्यस्य कर्णे तु मंत्रः पंचाक्षरो मतः ।।११।।

शंभु म्हणें वो गिरिजे। तुवां गुह्य पुसिलें जें। त्यास दृष्टान्त निरोपिन जे जे। ते तूं बरवे परिस देवी ।।५४।। जैसीं क्षेत्रबीजां पडे गाठी। तें पीक असंभाव्य उठी। तेविं षडक्षर श्रोत्रक्षेत्रां भेटी। होतां पिके अपार ।।५५।।

तच्छिष्यज्ञानक्षेत्रे तु कर्णद्वारे च सद्गुरुः। तन्मंत्रबीजमव्यक्तं तच्च क्षेत्रसमन्वितम् ।।१२।।

शिष्याचें क्षेत्र ज्ञानदेह जाणिजें। त्याचें श्रोत्र तें द्वार म्हणिजें। तेथें शिवमंत्र बीजाक्षर वोजें। पडतां पिके अपार ।।५६।।

तद्बीजं द्विविधं ज्ञेयं मंत्रन्यासविभेदतः। एको दीर्घस्तु यः कुर्यात् पंचमाशक्तिमाश्रयेत् ।।१३।।

मंत्रबीज दोन रूपीं। न्यासबीज विघ्नें थोपी। ऱ्हस्वदीर्घ उच्चार अर्पी। पंचमशक्तिकारणें ।।५७।। तया बीजाचें रूप द्विविध। पंचाक्षरी षडक्षरी प्रसिद्ध। उभयां एका प्रणवाचा भेद। उत्पत्तीस कारण

तोचि पैं ।।५८।। न्यासभेदाकुन । बीजभेद झाला जाण । पंचाक्षरी षडक्षर म्हणोन । प्रसिद्धीसी पावले ।।५९।। त्या बीजाचें रूप द्विविध भासें। षडक्षरी बोलिला असे। पाहतां पंचाक्षरी मिश्रित वसे। ॐकाराचे पोटीं ।।६०।। ॐकारापासूनि अक्षरांच्या हारी। त्यामाजीं निवडून काढिला पंचाक्षरी। तोचि निर्णय निरोपुं अवधारी। ऐक चित्त देवोनिया ।।६१।। ॐकारा-पासूनि सर्व वर्ण। उत्पन्न झाले ते बावन्न। तयामध्यें मुख्य जाण । तयाचे दशद्वय भेद ।।६२।।

अक्षरादितवर्गान्तं पवर्गान्तं शुभानने। शिकारोऽथ यवर्गान्तं मवर्गान्तं बभूव तत् ।।१४।।

ऐक अक्षराचा भेद । पंचाक्षरी असे संबंध । पन्नास अक्षरांतून बीजबोध । काढिला तो ।।६३।। तकाराचा अंत नकार। प वर्णाचा अंत मकार। य वर्गाचा अंत शकार। एवं तिन्हीहि ॐकारापासाव ।।६४।। थांतस्थ नकार। तो संयोजिला सह अकार। यवर्गादिस्थ यकार। पंचाक्षरी विनटला ।।६५।।

दांतं बांतं च यांतं तु तृतीयस्वरभूषितम् । लांतं यांतसमायुक्तो मंत्रः पंचाक्षरो भवेत् ।।१५।।

द काराचा अंत नकार । य काराचा शेवट तो मकार । य वर्गांतस्थ शकार । इ स्वरानें अंकिला ।।६६।। तेविं य वर्गाचा जो अंत्य । अकारादेशें वर्ते सत्य । जेणें घेतलेसे य वर्गाधिपत्य । तोहि येथें घेतला ।।६७।। एवं पंचाक्षरी विस्तार । एका प्रणवापासोनि साचार । जे कां सप्तकोटी मंत्राचें सार । वर्णिलें शास्त्रीं ।।६८।।

ऐसीं हीं पंचाक्षरें गोमटीं। असती प्रणवाचिया संपुटीं। तीं प्रगटलीं भक्तिसुखासाठीं। वीरशैवाकारणें ।।६९।।

ह्येष पंचाक्षरो मंत्रः सर्वश्रुतिशिरोगतः। प्रणवेन समायुक्तो षडक्षर इहोच्यते ।।१६।।

आतां निरोपिला जो पंचाक्षरी। तोचि ओंकारासहित षडक्षरी। जैसा द्विविध झाला निर्धारी। ते तुज निरोपुं आतां ।।७०।।

त्वदीयं प्रणवं चैव मदीयं प्रणवं तथा। एतद्धि देवि मंत्राणां शक्तिभूतं न संशयः ।।१७।।

षडक्षरासीं तुझी माझी शक्ति। म्हणोनि मंत्रासीं बळ असे निगुती। तो षडक्षर मंत्र बोलिला स्थिति। ॐकार-सहित ।।७१।। त्या ॐकारां उभयाची शक्ति। अर्ध भाग तूं अर्ध मी निश्चिती। म्हणोनि मंत्रासीं सामर्थ्य स्थिति। प्राप्त असे वो देवी ।।७२।।

उकारश्च मकारश्च अकारः प्रणवो मम। अर्धमात्रा स्वरूपा त्वं शक्तिभूता सनातनी ।।१८।।

अकार उकार मकार। हे माझे अंश साचार। परि तुझे संबंधें उच्चार। होत असे मम सत्तें ।।७३।। हीं तीन बीजें स्वतंत्र। यापासाव कर्में चालती सर्वत्र। तेथें तुझाहि संबंध असे पवित्र। अर्धमात्रेच्या रूपानें ।।७४।। यालागीं प्रणव द्वितीय बोलिजें। माझा अंश संबंधें तुझ्या उच्चारिजें। म्हणोनिचि मंत्र

म्हणवी वोजें। ॐकारु हा ॥७५॥ याचा भेद न कळे कवणासीं। हे दुर्लभ मुमुक्षु जनांसीं। हे जाणे जो जंगम बोलिजें त्यासीं। पवित्र सत्यशरण ॥७६॥ तया जंगमीं तुझे माझे दिसे। अंश संबंधत्वें तेथ वसे। उभयसंयोगें जंगम असे। सत्य जाण पार्वती ॥७७॥

षडक्षरसमाख्यातं षडाननमुदीरितम्। षड्भेदं यो न जानाति पूजा तस्य तु निष्फला ॥१९॥

षडक्षराची उत्पत्ति षण्मुखीं। ती षण्मुखीची ऐकतां निकी। जाणोनि जप करी तो सुखी। जंगम अथवा भक्त ॥७८॥ षडक्षरी मंत्रासारिखा मंत्र नाहीं। कार्तिकस्वामी सदा जपत राही। षड्भेद जाणोनि लवलाही। पूजा कीजे एकाग्र ॥७९॥ याचा भेद न कळे कोणां। दुर्लभ असे अज्ञ जनां। गुह्य जाणे शिष्यराणा। जंगममुखें करोनिया ॥८०॥ एवं लिंग-पूजकावांचोन। न होय षडक्षरसाधन। श्रीगुरुमुखें करोनि ग्रहण। करिता जप सिद्धि होय ॥८१॥ याचा भेद नेणोनि पूजा करी। त्याची पूजा निर्फळ होय अवधारी। तोहि अज्ञानियाचा पुढारी। गुरुपुत्र नव्हे तो ॥८२॥ षड्चक्राचें स्वरूप सरोभरी। तुवां पुसिलें गौरी। निरोपिन पुढारी। चक्राक्षर भेद ऐक आतां ॥८३॥

षडक्षराणि क्रमशः चक्रबीजानि वै यथा। चक्रबीजाक्षरज्ञाता दुर्लभो भुवि पार्वति ॥२०॥

हीं सहा अक्षरें षड्चक्रासीं। आधार असतीं त्या कर्मासीं। तयाविण गति चक्रासीं। कदांकाळीं

असेना ।।८४।। कोण चक्रीं कोण अक्षर। हा असे शिवयोग विचार। जो वर्ते पूर्ण जाणोनि साचार। दुर्लभ ऐसा सत्यशरण ।।८५।। ज्यानें देहीं षड्चक्रें भेदिलीं। तेणें ब्रह्मांडे सर्व जिंकलीं। वर्णाक्षरोत्पत्ति वहिली। ऐक गिरिजे सावध ।।८६।।

एकैकाक्षरतो जाता: पंचपंचाक्षरा: पुन: ।गुह्यं हि परमं ह्येतज्ज्ञायते श्रीगुरोर्मुखात् ।।२१।।

एका एका अक्षराचे ठायीं। पांच पांच उद्भवली अव्ययी। संहारकाळीं पावती लयी। पंचाक्षरी सर्व वर्ण ।।८७।। ऐसीं हीं अक्षरें पंचप्रकारी। वर्ततां आपुलिया परी। हा भेद जाणावा चतुरीं। श्रीगुरुमुखापासोनि ।।८८।। ती पंचाक्षरें परस्पर। पावन करिती चराचर। अंतीं सामावती सत्वर। निजस्वरूपीं सदा ।।८९।।

देव्युवाच-

ज्ञानदेह: समाख्यात: षडाधारेण संयुत:। तद्बीजाक्षरभेदश्च क्रमेण कथयस्व मे ।।२२।।

शिवाप्रति पार्वती पुसे। ज्ञानकाया जी षड्चक्रयुक्त असे। तरी कोण्या चक्रीं कोण अक्षर वसें। तें निरोपावें स्वामिया ।।९०।। षड्चक्राचें मुख्य बीज। निवडोनि सांगावें जी मज। तरीच होय महत्काज। अपराधी जीवाचें ।।९१।।

शिव उवाच-

आधाराख्ये नकारं स्यात् स्वाधिष्ठाने मकारकम्। शिकारं मणिपुरे च वाकारं तु अनाहते।।२३।।

आधारस्थानामाझारीं। चतुर्दळ कमळाभीतरीं। नकार बीज वस्ती करीं। अपान शक्ति बोलिजें।।९२।। स्वाधिष्ठान असें उत्तम। षड्दल कमल असें अनुपम। मकार बीज सर्वोत्तम। तेथें राहें प्रीतीनें।।९३।। मणिपुरीची ऐक मौज। दशदलावरी पेरिलें बीज। शिकाररूपी वर्ते सहज। समान वायू तेथींचा।।९४।। अनुहत तें हृदय जाण। जेथें वकाराचें अधिष्ठान। द्वादशदळीं अंगुष्ठप्रमाण। प्राणवायु वसतसे।।९५।।

विशुद्धौ तु यकारं स्यादाज्ञायां प्रणव एव हि। एवं बीजाक्षरस्थानं ज्ञानकाया प्रकीर्तिता।।२४।।

विशुद्धि हेचि तालुमूल। जेथें कमळ असें षोडशदल। यकार बीज हें अमल। उदानें तें रक्षिलें।।९६।। अग्निस्थान तेंचि ललाट। द्विदलें शोंभे श्रीगोल्हाट। ॐकार मूळ औटपीठ। चंद्रप्रभा तयावरी।।९७।। तेथें कोटी सूर्यांची प्रभा। परमहंस शिव उभा। स्वानंदाचा पूर्ण गाभा। दमदमीत।।९८।। देव गंधर्व यक्ष गण। किन्नर नारद तुंबरु जाण। स्तिमित होती तया देखून। स्थिर मौन निचेष्ट पैं।।९९।। ऐसीं हीं साही अक्षरें। तुज निरोपिली नाना प्रकारें। सर्वहि एकवटली एकाकारें। सातवें अक्षरीं।।१००।। सातवें तें निराक्षरीक। ज्या शरीरीं याचा असे विवेक। ती ज्ञानकाया बोलिजे सम्यक्। ऐक आतां शैलात्मजे।।१०१।।

जें कां सहस्रदळ कमळ। महालिंग वसें निर्मळ। तेथें समरसे सकळ। ज्ञान-कळा ॥१०२॥ ऐसी ज्ञानकाया ज्या पुरुषाची। तो कळा जाणे वस्तुलिंगाची। तया कळेमाजीं रमे सदा शुचि। उत्तम जंगम तो ॥१०३॥ ऐसे ऐकतां पाहतां डोळां। परम कळवळे हिमनगबाळा। हं क्षं तत्त्वाचा सोहळा। गर्जे घोष अहं सोऽहं ॥१०४॥ श्रीपरमरहस्ये ग्रंथानुवादें। उमामहेश्वराच्या संवादें। षडक्षर पंचाक्षर दोन भेदें। वर्णिलें ज्ञान भाविकां ॥१०५॥ इति श्रीपरमरहस्यसारामृत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृतार्थ किंकर मन्मथ। सहावा अध्याय संपविला ॥१०६॥

॥ इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे पंचाक्षरषडक्षरभेदनिरूपणं नाम षष्ठोऽध्यायः समाप्तः ॥

श्लोक २४, ओव्या १०६.

❑

अध्याय सातवा

।। श्रीगुरुवे नमः ।।

सहावे अध्यायीं संपूर्ण। कथिलें षड्चक्र ज्ञान। पंचाक्षर षडक्षर महिमान। अत्युत्तम वर्णिलें ।।१।। षड्लिंगाचे भेद सहा। दाखविले कृपें पाहा। त्यामाजीं चित्‌हृद्‌गुहां। प्रवेशले स्वभावें ।।२।। तेणें वस्तूची लागली गोडी। न उठे दृष्टी झाली वेडी। परात्परां पाहातां थोकडी। बुद्धि वैखरी निमग्न ।।३।।

देव्युवाच-

किंवा वस्तु कथं जातं ग्राह्यं वा केन तत्पुनः। कलास्थानं तथा रूपं ब्रूहि मे परमेश्वर ।।१।।

वस्तु म्हणजे कोण कैसी। कवणें परी जाणावें तियेसीं। कैसी कळा स्थान सकळांसीं। तें निरोपावें स्वामी ।।४।। जी कळा अगम्य सकळां। ती मज निरोपावी दयाळा। म्हणोनि ती हिमनगबाळा। चरणीं लागली सांबाच्या ।।५।।

शिव उवाच-

वस्तुत्वगम्यमव्यक्तं निर्गुणं निश्चलं तथा। अगम्यं वेदशास्त्रैश्च तत् कलापि च पार्वति ।।२।।

शंकर म्हणे वो गिरिजे ऐक। तुवां प्रश्न केला सुखदायक। माझें उल्हासलें निजसुख। तुझ्या प्रश्नेंकरोनिया ।।६।। कोण्ही म्हणती प्रश्नें सुख उल्हासलें। पहिलें काय होतें तें मुरालें। यया बोलां अखंडत्व खंडलें। तया चित्-सुखाचें ।।७।। तरी यास दृष्टान्त देईन। जैसा कुंडामाजीं असे अग्न। घृतधारा पडतां तो हुताशन। दैदिप्यमान होय पैं ।।८।। जरी कुंडामाजीं अग्नि नसे। तरी घृतें रक्षा काय प्रकाशे। असे म्हणोनिचि प्रकाशतसे। घृतधारेसरिसा ।।९।। तैसें पार्वती-प्रश्नाचेनि मिषें। उल्हासलें वस्तुज्ञान प्रकाशें। तया वस्तुकळेस उल्हासें। निरोपितां झाला ।।१०।। शंकर म्हणे पार्वतीस। तुवां वस्तु पुसिली व्यापक सर्वांस। परि ते सद्गुरूवांचोनि कोणास। न कळेचि सर्वथा ।।११।। अग्निचक्राचे पैलतीरीं। मसूरप्राय छिद्राभीतरीं। विलोकितां अमरपुरी। दृष्टिगोचर होतसे ।।१२।। तेंचि पाहतां पाहतां जाण। अचल भासे वस्तु निर्गुण। सांगता नये गूढ मौन। गुरुकृपें ओळखावें ।।१३।। ती वस्तुकळा अगम्य अगोचर। ती व्यक्तातीत अव्यक्त अपार। ती निरवयव निराकार। वस्तु पुसिली त्वां ।।१४।। ती वस्तु निरामय निर्गुण। अढळ ढळेना निश्चळ जाण। अनंत कोटी निमाले भान। जया वस्तुप्रकाशीं ।।१५।। जेथें वेदशास्त्रांसीं पडें मौन। जें ज्ञानातीत विज्ञान। तें अनिर्वाच्य न वदवें वाचेकडून। नये जपतपधारणेसीं ।।१६।। वस्तु देहामाजीं अमरत्वें असत। परि देहीं असूनि देहासीं अतीत। गुरुकृपें

प्रगटलिया निभ्रांत। देहबुद्धि नाशीत ।।१७।। जैसा अग्नि काष्ठीं असतां। परि तो काष्ठांसीं न दाही तत्त्वतां। अरणीमिषें प्रगटलिया नासिता। होय सगळीया काष्ठांते ।।१८।। तेविं गुरुकृपा-अरणीसंबंधें। वस्तुकळा प्रगटे स्वानंदें। मग देहबुद्धि नासे स्वच्छंदें। क्षणामाजीं तत्त्वतां ।।१९।।

यथाऽग्नौ दाहकत्वं च यथा क्षीरे घृतं स्थितम्। यथा तिले स्थितं तैलं सर्वस्थाने तथा कला ।।३।।

म्हणोनि काष्ठीं जेविं अग्नि असे। कीं घृत क्षीरामाजीं वसें। तेविं वस्तु सर्व देहीं दिसे। ज्ञानियांसीं ।।२०।। जेविं तिळांमाजीं तैल। कीं पुष्पीं असें परिमळ। तेविं वस्तुकळा सकळ। व्याप्त असे साकारीं ।।२१।। आकार तो भ्रम भासत। पाहतां निराकारचि असत। जरी थिजोनि घृत आकारत। तरी घृतपणा मुकेल काय ।।२२।। तैसी वस्तु वस्तुपणेंचि असे। आकार तो भ्रमबुद्धि भासे। जैसें निद्रेचेनि सौरसें। काय एक न देखिजें ।।२३।। परि तें जागृतीसरिसें। स्वप्नीचा सर्वहि आभास नासे। तेविं आकार जो जो दिसे। तो नासे वस्तु प्रकटलिया ।।२४।। ती वस्तुकळा प्रकटे कैसी। म्हणसी तरी ऐक त्या विवेकासी। एका ज्ञानियावांचोन कोणासीं। न कळेचि वस्तु ती ।।२५।। तूं म्हणसी बाळियां भोळियांसीं। ज्ञान कैसें होय त्या अबलांसीं। तोहि उपाय निरोपिन तुजसी। अभ्यासयोगें ।।२६।। अष्ट प्रहरांमाजीं एक निमिष। एकनिष्ठें भजिजें धरूनि विश्वास। मग निमिषोनिमिषीं प्रकाश। लाहिजे अभ्यासें ।।२७।। जें निमिषें

निमिषें भजनसुख घडें। तितुकेचि भवदु:ख विघडें। इकडे भजन जितुकें चढें। तितुकें झडें पापहि ।।२८।। भानु निमिषें निमिषें पैं चढे। तैसा तैसा प्रकाश मांडे। मांडतां मांडतां माध्यान्हीयाकडे। पाहो शके कोण तो ।।२९।। तेविं भजन नित्य नित्य चढतां। शिवत्वाच्या माध्यान्हीं येत तत्त्वतां। मग त्याकडे सर्वथा। कळिकाळ पाहूं न शके ।।३०।। निमिषोनिमिषीं भजतां। तो सुख चढतसें चित्तां। मग चित्त चैतन्य तत्त्वतां। होवोनि ठाकें ।।३१।। नदी चढतां तरी दिसत नाहीं। परि चढतां भेदी दरडिया पाही। आच्छादूनि कांहीं ना बाही। पाणी चालें अमाप ।।३२।। तेविं निमिषें भजन दिसें थोडें। परि संतोषें चढतां होय गाढें। तेणें भजनें परमात्मा आंतुडे। मा ज्ञान बापुडें न यें केविं ।।३३।। तरी एक निमिष लक्ष लावोन। एकचित्तें केलिया स्मरण। तितुकियानेंच होय पावन। ऐसें न घडेचि कां ।।३४।। जैसें कीजें नामस्मरण। तैसी येई अंगीं शांति पूर्ण। शांतियोगें अक्षय ज्ञान। येई हातां क्रमानें ।।३५।। भाव ठेवोनिया पूर्ण। जें जें कीजें नामस्मरण। तें तें कीजें गुरूसीं अर्पण। निष्काम-बुद्धिं ।।३६।। येणेंपरी भजनभक्ति करितां। सहज वस्तुकळा ये हातां। मग स्वयें होय वस्तुतां। परि भजन न सोडिजें ।।३७।। भजन करोनिया काय। जरी जीवां दु:ख देणें होय। तरी तें भजनचि न होय। विषम पडे म्हणोनि ।।३८।। इकडे माझी पूजा करोनि बरवेपरीं। तिकडे जीवाची हिंसा करी। तरी त्याची पूजा कैसी घेऊ अवधारी। मुखीं घांस माथीं

डांग ।।३९।। म्हणोनि सर्व जीवीं निर्वैर व्हावें। सर्व जीवीं वस्तूसीं देखावें। कायावाचां सुख द्यावें। सर्व जीवांसीं ।।४०।। सर्वत्र व्यापक वस्तूची कळा। सर्व जीवां वस्तूचा जिव्हाळा। काष्ठीं अग्नीची ज्वाला। गुप्त जैसी ।।४१।। तैसी वस्तूची कळा जाण। सर्व देहीं असे व्यापून। क्षीरीं घृत कीं तिळीं तैल भरोन। सर्वांगीं असे ।।४२।। तैसी वस्तु सर्वत्र असे। ऐसें जाणोनि भजे विश्वासें। मग वस्तुच होईजें अपैसें। भक्तिमार्गें वो देवी ।।४३।। म्हणोनि भक्तिमार्गीं वर्ततां। वस्तु सहजचि ये हातां। मग स्वयेंचि होय वस्तुतां। श्रीगुरुकृपेनें ।।४४।। ती वस्तु सर्वत्र व्यापक असे। सर्व देहीं तिची कळा वसे। तुज सूक्ष्मत्वे सांगतसे। व्यापक वस्तु ती ।।४५।।

ज्वालाकालानलाभासा तडित्कांचनसुप्रभा। तत्कोटिभास्वरा दिव्या चिद्रूपा परमा कला ।।४।।

जैसी अग्निज्वाला सूक्ष्म असे। प्रकाशरूपें लखलखीत दिसे। तैसी वस्तुकळा सर्वत्र वसे। चिद्रूपाकार ।।४६।। ती वस्तुकळा सर्व ज्ञानरूप। होवोनि असें सूक्ष्मत्वें अमूप। परि श्रीगुरूविण निजस्वरूप। न भासें कोणांसीं ।।४७।। न भासें म्हणो तरी काय एकांग दिसें। एकांग न भासें तरी काय नसें। ऐसें विषमत्व काई असें। वस्तूसीं त्या ।।४८।। वस्तु तरी सबराभरीत। आपादशिखापर्यंत। भरिली असे सदोदित। भरिलेपणे-विणें ।।४९।। भरिले म्हणो तरी रिते होते काये। तरी भरलेपण म्हणो लाहे।

पाहतां रिते भरिले आहे। वस्तूसीं काय।।५०।। म्हणोनि ते भरीवचि आहे सर्वांगें। परि भरिला ऐसें जें बोलिलो मागें। तें बोलावेचि लागे निरूपणागें। बोधावया निःसंशय।।५१।।

वाचातीतमनोतीतं वर्णातीतं च तत्पदम् । ज्ञानातीतं निरंजन्यं कलासौक्ष्म्यं तु भावयेत्।।५।।

जी सर्वत्र जाणती कळा। तीचि ही साजे अत्यंत सूक्ष्म कळा। तीमाजीं निमग्न सकळा। वाचादिकां सर्वहि।।५२।। परा पश्यंति मध्यमा वैखरी। वाचा निमाल्या जेथे चाऱ्ही। आतां विचारावें कवणें अक्षरीं। विचारी पां।।५३।। जेथ पन्नास अक्षरां पुसिली लीप। मा कैंचा तेथ वेदस्वरूप। श्रुतिस्मृतिहि माप। करूं सरली।।५४।। मा शास्त्र आणि पुराणांतें। कोण पुसे हो तेथें। वाचावें सांगावें ज्या मनादिकाचे हातें। तें मनचि निमालें।।५५।। आतां वर्ण व्यक्तीचा लकारु। केविं साजे हा भेदविकारु। तें तत्पद निर्विकारु। ज्ञानासीं अतीत।।५६।। अज्ञानछेद करी। म्हणोनि कीं ज्ञानाची थोरी। जेथ अज्ञानचि नाहीं मा ज्ञान कोणेपरी। मिरवूं शके तें।।५७।। सूर्यासीं अंधार मुळीचि नाहीं। मा सायास करावें कांहीं। अंधकार दूर करावा ठायीं। ठायावरूनि।।५८।। तेविं वस्तूचे ठायीं काय अज्ञान आहे। मा तेथें ज्ञान मिरवूं लाहे। म्हणोनि निरंजनकळा पाहे। ज्ञानासीं अतीत ते।।५९।। जी अत्यंत सूक्ष्म कळा जाण। तीमाजीं गेले सर्व निमोन। ऐसी वस्तुकळा लिंगाची विवेचून। निरोपिली तुज देवी।।६०।।

एषा वस्तुकला देवि सद्गुरुः शिष्यमस्तके। हस्ताभिमर्षणं कृत्वा बोधयेत्तत्त्वरूपतः ।।६।।

ऐसी सूक्ष्म वस्तूची कळा जाण। गुरु उपदेशिती मस्तकीं हस्त ठेवोन। जैसा हस्त तैसी कळा उत्पन्न। होय शिष्यां चैतन्य ।।६१।। जैसी अंधकारीं लागली ज्योति। तैसीच होय देहस्थिति। अज्ञान जाऊनि मागुति। ज्ञानबुद्धि उपजत असे ।।६२।। ज्या गुरूची जैसी उपदेशकळा। शिष्यां तैसीच ये भावलीला। जैसें बीज तैसें येतसें फळां। वृक्ष जेविं ।।६३।। घरोघरीं गुरु म्हणविती। शिष्यां स्वार्थें उपदेशिती। परि वस्तुकळा जे बोधिती। ते सद्गुरु जाणावें ।।६४।।

यथा कला तथा भावो यथा भावस्तथा मनः। यथा मनस्तथा दृष्टिर्यथा दृष्टिस्तथा लयः ।।७।।

म्हणोनि जैसा उपदेशी गुरु भेटे। तैसीच ती कळा प्रगटे। जैसी कळा तैसा भाव उमटे। शिष्यचैतन्यीं ।।६५।। जैसा भाव तैसेंचि होय मन। जैसें मन तैसी दृष्टी होय जाण। तैसीच लयगत राहे होऊन। स्मरणीं भजनीं ।।६६।। एवं भाव मन दृष्टी तिन्ही। एकमतें वर्तती म्हणोनि। लय लागे निश्चयेकरूनि। शुद्धकर्मीं जीवांसीं ।।६७।। जैसें भजन तैसें फळ घेईजें। जैसें फळ तैसे भोग भोगिजें। जैसा भोग तैसें पाविजें। सुख अथवा दुःख ।।६८।। या सर्वांसीं मूळ कारण। श्रीगुरुचि असे जाण। आपला कुलधर्म जाणोन। सद्गुरु कीजें स्वधर्मीचा ।।६९।। गुरु अनेक कळेचे असती। तरी त्यांसीं

गुरुचि म्हणती। परि जे ज्ञानकळा जाणती। तेंचि सद्गुरु जाणावे ।।७०।।

कर्णे वाक्यं करे लिंगं दत्वा संबोधयेद्गुरुः। इष्टप्राणस्तथा भावलिंगानामैक्यतत्त्वतः ।।८।।

सत्शिष्याचिया कर्णद्वारीं उपदेशिती। महावाक्यबीज निश्चिती। मग हस्तकीं लिंग देती। कृपाळुत्वें श्रीगुरु ।।७१।। श्रीगुरु इष्टलिंग देऊनि पाहे। काय बोलती शिष्यां स्वहित लाहे। हा इष्ट आणि प्राणलिंग पाहे। भावलिंग तिसरा तो ।।७२।। या तिही लिंगां ऐक्यभावें । याच्या ठायीं गुरुत्वेंचि भजावें। भेद सांडोनि राहावें । गुरुवचनीं निष्ठा धरोनि ।।७३।।

देव्युवाच–

लिंगभक्तिरितिख्याता गुरुहस्तसमुद्भवा। कथं प्राणेन संमिश्रा कथयस्व ममानघ ।।९।।

गुरूच्या हस्तकीं लिंगभक्ति। उत्पन्नली तिची निरोपा ख्याती। तेथें कैसे मिश्रित असती। देह प्राण आणि लिंग ।।७४।।

शिव उवाच–

वपुर्यदा समुत्पन्ना तदा प्राणेषु मिश्रिता। गुरुकरजातलिंगं तु शिष्यप्राणेषु मिश्रितम् ।।१०।।

प्राण देहसंयोगें उत्पन्नला। तो प्राण देहसंयोगें मिश्रित झाला। त्या देहीं संयोग घडला।

इष्टलिंगाचा ।।७५।। जो गुरुहस्तकीं लिंग जन्मला। त्यासीं देहसंयोगें प्राण मिश्रित केला। तोचि भक्तिसंयोग झाला। जांणिजें वो पार्वती ।।७६।।

तत्प्राणो लिंगदेहश्च जातो गुरुकरेऽप्यथ। ज्ञात्वैक्यमेत योः सम्यक् भजते ज्ञानवान् पुमान्।।११।।

प्राणलिंग गुरुहस्तकीं जो जन्मला। त्यासीं ऐक्य जो लिंगदेही बोलिजे त्याला। यापरि लिंगभक्ति लाधला। तोचि ज्ञानी पुरुष ।।७७।। त्या पुरुषानें षड्लिंगीं भावें। ऐक्यत्वें पूजन करावें। मिश्रित होवोनि भजे स्वभावें। तो गुरुकरजात बोलिजें ।।७८।।

आचारं गुरुलिंगं च जंगमं च प्रसादकम्।महालिंगं तु विज्ञेयं षड्विधं स्थलभेदतः।।१२।।

तें षड्लिंग म्हणसी कोण कोण। आचारलिंग गुरुलिंग जाण। शिवलिंग जंगमलिंग ओळखण। चतुर्थीचि बोलिजें ।।७९।। प्रसादलिंग प्राणलिंग नेमून। हीं महालिंगें बरवी जाणून। जो मिश्रभावें करी पूजन। तोचि भक्त जंगम तोचि ।।८०।।

मिश्रभावसमायुक्तं पूजागुह्यं तु तत्त्वतः। अज्ञात्वा कुरुते यस्तु पूजा तस्य च निष्फला।।१३।।

जो हा मिश्रपूजनाचा प्रकार। अति रहस्यमय साचार। जाणोनि करिजे पूर्ण आचार। गुरुमुखेंकरोनि ।।८१।। जो न जाणताचि पूजा करी। त्याची व्यर्थ जाय पूजापत्री। त्याचा प्रसाद तोहि

अवधारी। निष्फळ होय ।।८२।। जो आचारसंपन्न शिवगण। तो वीरशैव शिवयोगी पूर्ण। तोचि जाणतो या मार्गाची खूण। येरां न कळे वो देवी ।।८३।। जो करी प्राण लिंगीं मिश्रित। तिन्ही मिश्रित करोनि वर्तत। तोचि जाणिजे शिवभक्त। सत्य सत्य पार्वती ।।८४।।

देव्युवाच-

भगवन् तापसश्रेष्ठ तपोमार्गं निरूपय। येन पाशनिवृत्तिस्याद्वीरशैवाध्ववर्तिनाम् ।।१४।।

देवी म्हणे देवाधिदेवा। तपश्चर्येचा मार्ग दाखवा। ज्या नियमें उद्धार व्हावा। पशुजीवांचा ।।८५।।

शिव उवाच-

त्रिदीक्षासंयुतो मर्त्यः शांतिदांतिसमन्वितः। गृहं त्यक्त्वा वनं गच्छेत्तपस्तप्तुमथारभेत् ।।१५।।

श्रीशंकर हास्यवदनेंकरून। सांगूं लागले तपोविज्ञान। पार्वती तें सावधान श्रवण। चित्त देऊनि करीतसे ।।८६।। तपश्चर्या योग कठीण। न साधे संसारीं राहून। त्याकारणें सेवावें वन। योगसिद्धि होय मग ।।८७।। तपश्चर्येकारणें प्राणी। असावे सावधान अंतःकरणीं। घ्यावया लिंगपूजेची आवरणी। दीक्षेप्रति साधिती ।।८८।। त्या दीक्षा त्रिविधा असती। क्रिया मांत्री वेधा निगुती। गुरुकृपें सहजस्थिति। प्राप्त होती कुलक्रमें ।।८९।। शिवदीक्षा झाल्याविण। जो मूढ करी शिवपूजन। तो पामर जीव म्हणून।

देव पूजन न घेती त्याचें ।।९०।। दीक्षावंत भक्त पवित्र। सदा मुखीं जपे शिवमंत्र। तो असे स्वतंत्र। शिवानुष्ठानाकारणें ।।९१।। तेणें आसन ध्यान भस्मधारण। गळां शोभें रुद्राक्षाभरण। सदा शुचि वस्त्रपरिधान। करावा जप महामंत्रें ।।९२।। मंत्रजपालागीं जाण। तपनीं घाली आसन। नित्यनेम झालियाविण। स्थान चालन न करावें ।।९३।। उत्तम आसनीं बैसून। करावें मन तें उन्मन। चित्त चैतन्यां व्यापून। ज्ञानमुद्रा साधावी ।।९४।। तेणें होय ज्ञानदृष्टी। सम पाहावी सर्व सृष्टी। तेणें कर्म सुटें उठाउठीं। जन्मलिया वेळीचें ।।९५।। निष्कर्म जीव होता जाण। न करी कोणासीं संभाषण। शत्रु मित्र जया समान। उदारशीळ तापसी ।।९६।। जयाचे वैखरीं शिव शिव। ह्वदयीं मुराला अहंभाव। सवेचि विज्ञान संभव। आकळून राहतसे ।।९७।। कर्तुमाकर्तुमन्यथा कर्तुमाची शक्ति। प्राप्त होय सहजगति। तया सत्य देव मानिती। पूर्ण वस्तु म्हणोनिया ।।९८।। हा माझा राजयोग उत्तम। मानावा शिवप्राप्तीचा क्रम। सांगितला तुज पूर्ण नेम। आचरावा सत्य पैं ।।९९।। दुसरा मार्ग असे भजन। निर्भयपणें आनंदून। करीत असावें रात्रंदिन। दुजी चिंता नसावी ।।१००।। अबला जनां हें सुलभ। गर्वरहित होवोनि गर्जवी नभ। तनुमनधनें करितां दुर्लभ। सिद्धि प्राप्त होती त्यां ।।१०१।। स्वधर्मीं ठेवितां विश्वास। पुण्य घडें तया विशेष। मोक्षप्राप्ती अविनाश। होईल पां वराननें ।।१०२।। येणेंपरी संचलें संचित। तें वाचें उच्चारूं

नये निभ्रांत। अर्पण करावें हें उचित। शिवालागीं सत्वर ।।१०३।। हा महिमा परम अद्भुत। लिंगधारी आचरती व्रत। तपयोग त्यासींच घडत। जंगमभक्तीकारणें ।।१०४।। स्त्रिया लिंगपूजा करिती। त्यासीं नसे हो अधोगति। दीक्षावंत सती पवित्र असती। लिंगाईत धर्मनिष्ठ ।।१०५।। ऐसें हें रहस्य सुंदर। अपर्णेसीं बोधी श्रीशंकर। पुढें करील प्रश्नोत्तर। श्रोते सावधान परिसावें ।।१०६।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृतार्थ मन्मथ। सप्तमोऽध्याय संपूर्ण हा ।।१०७।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे वस्तुकलानिरूपणं नाम सप्तमोऽध्याय: समाप्त: ।।

श्लोक १५, ओव्या १०७.

❑

अध्याय आठवा

।। श्रीगणाधिपतये नमः ।।

सप्तमीं निरूपिली वस्तुकळा। जी अतर्क्य ब्रह्मादि सुरां सकळां । तिचें परमगुह्य दयाळा। श्रवण केलें सादर।।१ ।।

देव्युवाच-

बाह्यांगे दृश्यते लिंगं प्राणो देहस्य मध्यतः। कथं प्राणस्य लिंगेन संबंधो भवति तद्वद ।।१।।

पार्वती विनवी जी त्रिपुरारी। लिंगासीं देह मिश्रित कवणेंपरी। प्राण असे देहाभीतरीं। तो देहासीं मिश्रित कैसा।।२।। लिंग देह प्राण तिन्ही। येरयेरासीं मिश्रित होवोनि। कैसे असती जी शूलपाणि। तें निरोपा मज।।३।।

शिव उवाच-

यथा प्राणस्य संबंधो विद्यते इंद्रियैः सह। व्याप्यव्यापकभावेन सलिले पावको यथा।।२।।

जैसा प्राणलिंग सिद्ध झाला। तो सर्वेंद्रिय व्यापूनि राहिला। व्याप्य-व्यापकत्वें देहीं भरला। जळीं

अग्निसम पैं ।।४ ।। जैसें जळ उष्ण होय अग्नीसंगें। तैसें देह मिश्रित लिंगार्चनयोगें। प्राण तरी सहज अंगे। एकचि असे ।।५।। तरी लिंगासीं देह मिश्रित कोणेपरी। पूर्वील देहबुद्धि अव्हेरी जरी। दाही इंद्रियें लिंगार्चन करी। अखंड लाविजें ।।६।। ऐसी ज्याची सर्व संबंधे तुटली। त्याची लिंगकळेसी बुद्धि बांधिली। तया प्राणलिंग पदवी आली। तो अंश होय माझाचि ।।७।।

घटमध्ये स्थितं तोयं वन्हिर्ज्वलति बाह्यत: । वन्हिज्वालासुसंयोगात् उष्णं भवति वार्यपि ।।३।।

जळ तरी घटामाजीं असे। अग्नि तो बाहेरीच दिसे। परि घटाग्निसंयोगें होत असें। जळ तप्त ।।८।। घट तप्त होतां जळ तप्त। मग तिन्हीहि अग्निरूप होत। एकमेकांचें संयोगें मिश्रित। होती तात्काळ पैं ।।९।। तेविं सत्क्रिया आणि लिंगार्चन। करिती गुरुत्वें पूजन। लिंगसंगें देह झाला लिंगरूप जाण। मग भेद कैंचा ।।१०।। लिंगसंगें देह एक होतां। देहसंगें सहज प्राणऐक्यता। एवं देह प्राणलिंग एकरूपता। गुरुकळा बिंबे ।।११।। ऐसे तिन्ही भावें करी एकार्चन। तोचि भक्त शिवाचारसंपन्न। अथवा जंगम झाला तरी भजन। येणेंचि भावें करावें ।।१२।। इष्ट प्राण भाव जाण। लिंगरूपाची मुख्य खूण। गुरुमंत्रातें आठवून। पुजितां पुण्य विशेष ।।१३।। जो ऐक्यभावें न करी पूजन। जरी भाव धरी भिन्न भिन्न। तरी तो भक्त असे परि जाण। पूजा त्याची निर्फळ ।।१४।। सांडोनिया लिंगार्चना। जो करी आन देवतापूजना।

तो शिवभक्त नोव्हे त्याचिया वदना। अवलोकूं नये।।१५।। आणखी सांगतो सोय एक। शिवलिंगपूजा न सोडावी देख। प्राणहानी झाली तरी नेमिक। व्रत न सोडावें पूजेचें।।१६।। लिंगपूजा सोडूनि मानव। जरी भोगी राज्यवैभव। तोहि पावे नरकार्णव। प्रायश्चित्ताकारणें।।१७।। जो सर्व देवांसीं असे श्रेष्ठ। सर्व ऋषिमुनींसीं वरिष्ठ। तो लिंग हृदयीं असोनि नष्ट। आन देवतांसीं पुजितो।।१८।। ज्यासीं हरि विरंचि ध्याती। हरीनें नयन वाहिलें जयाप्रति। तो इष्टलिंग हृदयीं असूनि पुजिती। देवतांतरा मूढ।।१९।। गण-गंधर्व-इंद्रादिकांसीं। वरिष्ठ शेष-कूर्म-वराहासीं। तो शिव सांडोनि देवतांतरांसीं। भजे तो मूर्ख जाणावा।।२०।। शिवभक्त म्हणविणें। परि शिवासीं न पुजणें। तरी निरयासीं जाणें। क्रियाभ्रष्ट म्हणोनिया।।२१।। थोरीव मिरवी शिवाचाराची। क्रिया राहटे आणिकाची। व्यभिचारिणी सेवा करी पतीची। परपुरुषीं जावया।।२२।। आपुला आचार सांडून। पर-आचारीं वर्ते रात्रंदिन। श्वान-सूकरयोनी जाण। भोगील कल्पवरी।।२३।। आणखी सांगणें तुज एक। कुलवधूची रीति देख। प्राण गेलिया न पाहें मुख। परपुरुषाचें।।२४।। सति पति सदाचारें वर्तती। तैसीच वीरशैवधर्म स्थिति। एकनिष्ठें भजावी लिंगमूर्ति। दुजी भक्ति दोषिक।।२५।।

अंतर्ज्ञान क्रियाबाह्यं एकीभावं भवत्यपि। यथा कुंभोदकं तप्तं भवत्यग्निप्रभावतः।।४।।

यालागीं आपुली क्रिया न सांडिजें। गुरुकृपें ज्ञान साधिजें। ज्ञान आंतरबाह्य क्रिया कीजे। बरवी निपुण ।।२६।। अंतरीं ज्ञान बाहेर क्रिया। दोन्ही एकचि झालिया। मग कैंचा प्रपंच कैची माया। तया सत्य शांत शरणांतें ।।२७।।

यथा कुंभजलं देवि दह्यते अग्निवेधतः। तथा ज्ञानक्रियावेधाद्देहो लिंगमयो भवेत् ।।५।।

बाह्य क्रिया अंतरीं ज्ञान। दोहीचें कैसें होय एकपण। तयासीं दृष्टान्त देईन। तो परिस देवी ।।२८।। अग्नि तरी असे बाहेरी। जळ असे घटाभीतरीं। घट तप्त होय अग्निकरी। तंव जळ तप्त होय ।।२९।। तेविं क्रिया करितां निपुण। इष्टलिंगां करितां अष्टविधार्चन। एवं क्रियायोगें देह प्राण। लिंगकळा पावती कीं ।।३०।। यालागीं स्वक्रिया न सांडावी। गुरुकृपें अंतर्ज्ञानकळा धुंडावी। ऐसी एकविध भक्ति होआवी। वीरशैवीं निश्चळ ।।३१।।

शिवप्रसादसंपत्त्या जातनिर्मलदेहिनाम्। पंचेंद्रियप्रवृत्तिः स्यात् पंचतनुप्रतर्पणम् ।।६।।

प्राणाची मलिनता गेलियाविण। प्राणलिंगीं लिंगकळा न ये जाण। म्हणोनि दश इंद्रियें दमून। स्वाधीन ठेविजें ।।३२।। प्राणाचें भोक्तव्य असें जें जें। तें आधी लिंगासीं अर्पिजें। मग आपण आरोगिजें। ऐसा नेम असावा ।।३३।। यापरी क्रिया आचरण। हें प्राणलिंगीचें लक्षण। क्रिया आणि ज्ञानाविण। न

पावे मोक्षमार्ग ।।३४।। ऐसे पूर्व अवगुण जातां सहज। प्राणलिंगकळेचें प्रकाशेल तेज। मग देह होय प्राणलिंगी सहज। लिंगलक्षण अंगां ये ।।३५।। तें कैसें म्हणसी तरी ऐक। ईश्वराचीं जीं पंचमुखें नेमक। पंचेद्रियें अर्पिजें सुख। जें जें होईल तें तें ।।३६।। येणेंपरी क्रिया आचरण। होतां सहजचि प्राणलिंगां अर्पण। म्हणोनि क्रिया ज्ञान उभयांविण। न साधे वस्तु ।।३७।। क्रियाहीन ज्ञानेकुन। वस्तु साधू म्हणती अज्ञान। अथवा क्रियेनेंचि साधू ज्ञानेविण। भाविती तेहि मूर्ख ।।३८।।

न क्रियारहितं ज्ञानं न ज्ञानरहिता क्रिया। उभयोर्योग एवास्य जन्तोर्बंधनमोचकः ।।७।।

क्रियेविण न शोभें ज्ञान। ज्ञानेविण न शोभे क्रिया जाण। म्हणोनि दोहींसीं अनुलक्षून। वर्तिजें भावें संसारीं ।।३९।। जैसें प्रकृति पुरुष दोन्ही। एकचि मतें होऊनि। सृष्टिकर्म अनुदिनी। चालविती तैसें हें ।।४०।। क्रियेविण ज्ञान दुर्बल। ज्ञानाविण क्रिया निर्फळ। उभययोग होतां प्रबळ। वस्तु येत निजहातां ।।४१।। यासीं दृष्टान्त सांगतसे एक। जेणें संदेह फिटे देख। आपले मनीचा संकल्प। सुटोनि जाय तत्क्षणीं ।।४२।।

प्रदीप्तपावके देशे अन्धपंगुसुसंगतौ। परस्परसहायेन दुःखान्मुक्तौ बभूवतुः ।।८।।

एक अंध एक पंगु तत्त्वतां। उभय एका स्थळीं असतां। तेथ अनल लागला तत्त्वतां। तो देखिला

पंगूनें ।।४३।। पंगु तें ज्ञान जाणें डोळस। अंध तो क्रिया करी दृष्टी नाहीं त्यास। परि पंगूनें देखिलें अग्नीस। गृह जळतां ।।४४।। परि क्रिया-पायाविण अडला। तेथून न निघवे सुखस्थळाला। मग अंधासीं विचार मांडिला। पंगूनें कैसा ।।४५।। पंगु म्हणे अंधालागूनि। काय निश्चिंत अससी गृहीं लागला अग्नि। आतां मी तूं एक होवोनि। जाऊं निघोनि वेगेसीं ।।४६।। पंगु म्हणें अंधालागून। मी तुझे खांदीं बैसोन। जिकडे जिकडे मार्ग दावीन। तिकडे तिकडे चालावें ।।४७।। हा विचारु जरी न कीजें। तरी दोघेहि जळोन जाईजें। एकेविण एक न पाविजें। सुखस्थळातें ।।४८।। तंव ते दोघे एक होऊनि। पावले गुरुकृपें सुखस्थानीं। तेविं ज्ञान क्रिया एकपणीं। वस्तु पाविजे वो देवी ।।४९।। यालागीं येरयेराविण। स्वहित साधू म्हणती तें अज्ञान। न प्रकाशें चैतन्यघन। कल्पांतीहि पार्वती ।।५०।। तेलवातीविण कैसे प्रकाशे ज्योती। वाद्ये वाजविल्याविण नाद काय उमटती। मेघभूमीविण निपजती। धान्यबीज काई ।।५१।। यालागीं क्रिया-ज्ञानाविण। न प्रकाशें चैतन्यघन। म्हणोनि न विसंबती सज्ञान। उभयांसीं जाण पां ।।५२।। दोही पंखांविण पक्ष्यासीं। न उडवे जेविं आकाशीं। तेविं क्रिया-ज्ञानेविण वस्तूसीं। न पाविजे कदा ।।५३।। शतयोजन एक पक्ष असे। तरी पक्षी उडो लाहे काय कैसे। तेविं ज्ञान अथवा क्रिया एकचि असे। तरी तो तरे काई ।।५४।। म्हणोन ज्ञान क्रिया दोहीविण। न तरे पार्वती सत्य जाण। दो पक्षांविण उड्डाण। न

घडें पक्ष्यासीं ।।५५।। क्रियाकर्म बरवे करिती। परि वस्तुज्ञान नेणती। तरी ते सरते न होती। शिवस्वरूपीं ।।५६।। अथवा ज्ञान वस्तूचें बरवें जाणती। आणि क्रियाकर्म न करिती। तरी तेहि न तरती। म्हणोनि दोन्ही युक्त असिजें ।।५७।।

गवां सर्पिशरीरस्थं न करोत्यात्मपोषणम्। विकृतं कर्मरचितं पुनस्तासां तु भेषजम् ।।९।।

गाईचें जें दिव्य घृत। अप्रत्यक्षपणें तियेचें शरीरीच वर्तत। परि ते पोषण न करी यथार्थ। तया गोदेहाचें ।।५८।। दोहन करोनि दुग्धाचें। अग्निसंगें तापवून तयाचें। विरझण घालावें साचें। मग दधि होय पैं ।।५९।। दधिमंथनेकरून। नवनीत बाहेर ये निघोन। तें कढवितां परिपूर्ण। घृत हातां येतसें ।।६०।। तें घृत देतां गाईस। परितः पुष्टी करी तियेस। औषधरूप आले देहस्थ घृतास। क्रियेचेनि योगें ।।६१।। शुद्धकर्म ती गाय जाण। तिचें भरणपोषण करून। बुद्धिविवेकें घेईजें दोहून। क्षीर तियेचें ।।६२।। तें क्षीर लक्ष लावून ताविजें। निश्चयार्थ विरझण घालिजें। मग तें विवेकें घुसळिजें। निज नवनीत हातां ।।६३।। तेंहि ताविजें स्वानुभवेकरून। मग तें घृत चिदानंदघन। तें दिनेंदिनें करीत आरोगण। पुष्टी चढे अनुपम्य ।।६४।। नातरी घृत घेऊनि त्यागितां गाईसीं। मग घृतलेश कैसा येर दिवशीं। ऐसें न करावें करितां निजसुखासीं। मुकिजेल सत्य पैं ।।६५।। ऐसी क्रिया घृतदात्री कळली। तीस विसंबूं नये पाहिजे

पाळिली। मग दिनेंदिनें घेईजें नव्हाळी। निजघृताची।।६६।। घृत नासे कांहीं काला। अक्रिय ज्ञान तैसें बाळा। दुर्गंध सर्पीचा कंटाळा। तैसें जाण ज्ञान तें।।६७।। म्हणोनि नित्य गाईचें दोहन। तद्घृतेंचि होय शुद्ध अन्न। बहु दिवसाचें करवी वमन। तेविं ज्ञान अक्रियेचें।।६८।। यास्तव एका ज्ञानेंकरून। न होय सत्य योगसाधन। क्रिया आचरतां निर्वाण। विज्ञान येई हातां।।६९।। ऐसी क्रियेची आहे थोरी। केवळ ज्ञान न करी बरोबरी। क्रिया ज्ञान होतां एकसरी। विज्ञान प्राप्त।।७०।। विज्ञान तें कैसें ऐक। जेथ खुंटला विवेक। चिद्रूप ब्रह्म नैष्ठिक। स्वस्वरूपीं बिंबलें।।७१।। तेणें बाणें पूर्ण समाधान। अन्य विद्येमाजीं असे अभिमान। जेणें गर्वित करी भाषण। तें ज्ञान निंद्य जाणावें।।७२।। यालागीं प्रामाणिक क्रिया करिजें। मग सम्यक् ज्ञान होईल सहजें। दोहीविण कदापि न होईजें। प्राणलिंगसंबंध।।७३।।

देव्युवाच-

स्थावरं केन संमिश्रं जंगमं केन वा पुनः। संबंधो ब्रूहि मे देव कृपया भूतभावन।।१०।।

पार्वती प्रश्न करीतसे। स्वामी स्थावर जंगम मिश्रित कैसे। हें निरोपावें प्रकाशें। ज्ञानाचेनि।।७४।।

शिव उवाच-

भक्तो माहेश्वरश्चैव प्रसादी स्थावरं भवेत्। प्राणलिंगी शरण्यश्च लिंगैक्यो जंगमस्तथा।।११।।

तंव शंकर म्हणे गिरिजे। साही स्थळ जें बोलिजें। तें तीन तीन वाटणी म्हणिजे। स्थावर जंगम ।।७५।। तें षट्स्थल म्हणसी कोण। भक्त माहेश्वर प्रसादी जाण। ते तिन्ही मिश्रित होऊन। स्थावर बोलीं बोलिजें ।।७६।। प्राणलिंगी शरण ऐक्य जाणिजें। हे तिन्ही मिश्रित जंगम बोलिजें। येणेंचि परी षड्लिंग वोजें। मिश्रित स्थावरजंगमीं ।।७७।।

आचारं गुरुलिंगं च स्थावरं शिवलिंगकम्। चरलिंगं प्रसादं च महालिंगं च जंगमम् ।।१२।।

आचार आणि गुरुलिंग। शिवलिंगहि असें स्थावरांग। चरप्रसाद महालिंग। जंगमांगीं वसती सदा ।।७८।।

स्थावरं जंगमं चैव द्विविधं लिंगमुच्यते। जंगमस्यावमानेन स्थावरं निष्फलं भवेत् ।।१३।।

स्थावर आणि जंगम। हीं दोन लिंगें उत्तम। परि चरलिंग पूजा नेम। विशेष पुण्याकारणें ।।७९।। स्थावरलिंगां संस्कारून। अर्चिती शिवकळा कल्पून। चरलिंग आहे याहून भिन्न। जंगम म्हणती जया ।।८०।। स्थावराचे होय जंगम। जंगमाचे स्थावर हा भ्रम। न कळे गुरूवांचोनि वर्म। स्थिर चर काय तें ।।८१।। स्थावर जंगम एक तरी न मानिजें। जंगम उदरोनि स्थावर पुजिजें। तरी ते पूजा निष्फळ जाणिजे। भेदवादी म्हणोनिया ।।८२।।

स्थावरं जंगमं चैव एकरूपं तु मूलतः। इति भेदपरिज्ञानं दुर्लभं श्रुणु पार्वति॥१४॥

सव्य वाम दिसती दोन्ही भाग। परि दोन्ही मिळोनि एकचि अंग। तेविं स्थावर जंगम एकचि लिंग। ऐसें जाणें तो दुर्लभ॥८३॥ स्थावरजंगमाचीं स्थानें। तुज सांगूं पूर्णपणें। भक्त माहेश्वर प्रसादी जाणें। स्थावरांग जयाचें॥८४॥ प्राणलिंगी शरण आणि ऐक्य। हें माझें सर्वदा प्राणाधिक्य। तयावेगळा मी राहणें अशक्य। ते जंगमरूप जाणावें॥८५॥ ही माझी आत्मशक्ति। मी तुज सांगितली समूळ युक्ति। तैसीच आचरावी पार्वती। तरीच योग्य भक्त तो॥८६॥

देव्युवाच-

दासोऽहं भावकः को वा सोऽहं भावश्च कीदृशः। भेदो भावद्वयस्येह ब्रूहि मे परमेश्वर॥१५॥

पार्वती प्रश्न करी सहजें। सोऽहंभाव कोणासीं म्हणिजें। आणि दासोऽहंभाव बोलिजें। कवणासीं पैं॥८७॥ या उभयांसीं भेद कांहीं। असे अथवा मुळीचि नाहीं। बरवा अर्थ निरूपिजें लवलाही। कैलासपति देवराया॥८८॥

शिव उवाच-

दासोऽहं भक्तभावश्च सोऽहं भावश्च जंगमः। भेदो भावद्वयोर्नास्ति प्रकृतिप्रतिबिंबवत्॥१६॥

शिव म्हणे वो पार्वती। तुज निरोपुं भावस्थिति। ते ऐकोन धरी चित्तीं। सावधपणें तत्त्वां॥८९॥ दासोऽहं म्हणिजे भक्तोत्तम। सोऽहं म्हणिजे तो जंगम। या उभयां भेद नाहीं हें वर्म। गुरुमुखें जाणिजे॥९०॥ बिंब आणि प्रतिबिंबासीं। जैसा भेद नाहीं दोहोसीं। तैसा भक्त आणि जंगमासीं। भेद नाहीं वो देवी॥९१॥ मीचि भक्त मीचि जंगम जाण। आपुलिया सुखालागीं झालो दोन। परि भंगलें नाहीं एकपण। जाणती खूण ज्ञानी ते॥९२॥ सोनें भूषणपणा आलें। तरी काय सोनेपण भंगलें। तैसें देव भक्त होवोनि ठेलें। माझें स्वरूप॥९३॥

सोऽहं दासोऽहमाख्यातं केवलं नामभेदतः। वस्तुभावद्वयं नास्ति प्रतिबिंबसमं मतम्॥१७॥

सोऽहं दासोऽहं हें केवळ नामचि दोन। जैसे बिंब प्रतिबिंब असती अभिन्न। तैसें देव-भक्तां नाहीं दुजेपण। देहीं आत्मा जैसा॥९४॥ म्हणोनि भक्त माझा आत्मा जाण। भक्त असे माझें हृदयींचें ध्यान। भक्त माझें जीवाचें जीवन। जाणावी खूण पार्वती॥९५॥ मज ईश्वरा ईश्वरपण। तें भक्तेंचि दिधलें जाण। मी मिरवतो दैवतपण। तें भक्तांचेनि योगें॥९६॥ मज भक्तांचेनि येथें असणें। भक्तांचेनि योगें माझें जिणें। मी भक्तांचेनि महिमानें। श्लाघ्यतु असे॥९७॥ भक्तांचेनि मज भूषणें। भक्तांचेनि मज लेणें नेसणें। भक्तांचेनि आज्ञावचनें। मी वर्तत असे वो देवी॥९८॥ भक्तांचेनि कार्यगुणें। मज

निराकारां आकारणें। मी निर्गुण परि गुणासीं येणें। भक्तांचि लागीं ।।९९।। मी भक्ताचे प्रीतिभक्तीपायीं। संतोषोनि तुजहि देवी पाही। रावणासीं देतां मागें पुढें कांहीं। पाहिलें काय म्यां ।।१००।। नाना भक्ताची मज अत्यंत प्रीति। म्हणोनि तुज भक्ताचे हातीं। देतां भिन्न भाव चित्तीं। मज न उपजेचि ।।१०१।। मी प्रसन्न होतो भक्तातें। भक्त फिरोनि पडती मातें। परि मी घातपात त्याते। विचारीत नाहीं ।।१०२।। तुझेचि देखतां पार्वती। मी प्रसन्न झालो भस्मासुराप्रति। तो माझ्याचि मस्तकीं हात ठेवूं पाहे चित्तीं-। विकल्प धरोनि ।।१०३।। आपण त्याचा क्षय करावा। कीं मियांचि तयाचा फळभोग भोगवावा। ऐसें विचारून धरिता शांतभावा। स्वगुणेंचि भस्म जाहला तो ।।१०४।। येथवरी मज भक्ताची प्रीति। मी सर्वस्वें असे भक्तांचे हातीं। भक्तांवांचून या त्रिजगतीं। प्रिय नाहीं मज अन्य ।।१०५।। भक्त माझें ध्येय मी त्यांचा ध्याता। भक्त माझें ज्ञेय मी त्यांचा ज्ञाता। भक्त माझें भोग्य मी त्यांचा भोक्ता। ऐसा पढियंता आम्हां तो ।।१०६।। मी त्याचा देह तो माझा आत्मा जाण। तयाचें हृदयीं माझी सेज सुखासन। येराविण येर एक क्षण। न राहो आम्ही ।।१०७।। आम्ही भक्तिभावाचे पाहुणे। भक्तीविण नावडती शाहणे। जे फुगती भक्ति-अभिमानें। ते प्रिय न होती मज ।।१०८।। करिती माझी भक्ति प्रीति। परि माझिया भक्तां निंदिती। ते नावडती मज जरी प्रीति। निंदकु म्हणोनि ।।१०९।। माझी अत्यंत भक्ति

करिती। येरीकडे हिंसा करी जीवघातीं। ती भक्ति नव्हे माझिया घाताप्रति। प्रवर्तला तो ।।११०।। तरी त्याची भक्ति घडे कैसी। मुखीं घालोनि पंचामृतासीं। मग वरोनि हाणी डांगेसीं। मस्तकावरी ।।१११।। माझी अत्यंत भक्ति करी। कामक्रोधासीं थारा अंतरीं। चित्ताचें अनुसंधान विषयांवरी। तरी तोहि नावडे ।।११२।। म्हणोनि सांडोनि अभिमान। अखंड माझे करितां अनुसंधान। मग मीचि तो आपण। होऊनि ठाके ।।११३।। मी भक्तिभावाचा विकला। मी भक्तिभावें होय जोडिला। भक्ताचे अंकित होय त्याचिया बोलां-। माजीं वर्तत ।।११४।। म्हणोनि भक्ता मज वेगळीक। नाहीं दोघे मिश्रित असो एकीएक। अष्ट महासिद्धि दासी त्यांच्या देख। घरी राबती मुक्ति चाऱ्ही ।।११५।। मुक्ति राबती हें नवल काई। मी अंगें राबें पार्वती पाही। यापरतें विशेष नवल कांहीं। सांगावें चोज ।।११६।। जैसें मृत्युकाळीं अमृत गोड। कीं दुष्काळीं भणंगां मिष्टान्नाचें कोड। याहून भक्तीची मज आवड। अत्यंत गोड वो देवी ।।११७।। परि क्रिया शुद्ध असे ज्याची। पूर्ण भक्ति मानूं त्याची। ज्ञान क्रिया उभयाची। मेळणी असावी तेथेंहि ।।११८।। ही माझी आत्मशक्ति। मी तुज सांगितली समूळ युक्ति। तैसीच आचरावी पार्वती। तरी योग्य धर्म तो ।।११९।। लिंगांगीं धर्म अति सूक्ष्म। क्रियाहि तैसीच तीक्ष्णक्रम। उत्तम धर्माचा हा नेम। कठिणचि जाणिजे ।।१२०।। वीरशैवमतां बोधी। इतर धर्माची न लगे उपाधि।

शिवतत्त्व सर्वज्ञ संबोधी। असे उत्तम धर्म हा।।१२१।। त्यामाजीं हा परमरहस्य। ग्रंथ उभवी श्रीपरमेश। लिंगाईत धर्माचे अधीश। बोधिती जनां संक्षेपें।।१२२।। हा ग्रंथ अति उत्तम। लिंगभक्तीचा नित्यनेम। तयासाठीं अनुपम। निर्मियलें ज्ञान पैं।।१२३।। जो येथ न धरी विश्वास। त्याचा सदा होईल कार्यनाश। आदरें रूढवी जगास। लिंगभक्ति थोर पैं।।१२४।। शील क्रिया भक्ति धर्म। नम्रपणें वर्ततां विक्रम। परधर्माचा तुटे भ्रम। स्वधर्मांकुर विरूढलिया।।१२५।। स्वधर्माचें करावें मंडन। परधर्माचें होय खंडन। अशी दृढ शास्त्रांतून। वाक्यें शोधून पाहावीं।।१२६।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। ईश्वरपार्वतीसंवादीं वर्तत। त्याचा साद्यंत मथितार्थ। आदरें श्रुत केला मन्मथें।।१२७।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे स्थावरजंगमनिर्णयनिरूपणं नाम अष्टमोऽध्याय: समाप्त: ।।

श्लोक १७, ओव्या १२७.

❑

अध्याय नववा

॥ श्रीगणाधिपाय नमः ॥

अष्टम अध्यायाचे अंतीं। निरूपिली तपश्चर्येची स्थिति। संतोषोनि गिरिजा शिवाप्रति। काय पुसे ते ऐका॥१॥

देव्युवाच-

के भेदा भक्तिमार्गस्य गुणाः के तस्य वै शुभाः।तद्रूपं न हि जानामि कथयस्व महेश्वर॥१॥

पार्वती म्हणे देवोत्तमा। ज्या भक्तीची सांगता एवढी महिमा। त्या भक्तस्थळाची भेदगरिमा। निरोपा स्वामी॥२॥ ज्या भक्तीचिया सामुग्री आतुडा तुम्ही। म्हणतसा भक्ताचे घरीं अंगें राबे मी। त्या भक्ताचे गुणभेद स्वामी। निरोपावें मजलागीं॥३॥

शिव उवाच-

सदाचारः शिवेभक्तिर्लिंगजंगमएकधीः। लांछने लीनभावश्च भक्तस्थलमुदीरितम्॥२॥

शिव म्हणे वो पार्वती। भक्तस्थळ निरोपुं तुजप्रति। जें ऐकतां पावन त्रिजगती। चराचर होय॥४॥

महापापाच्या झाल्या असतां राशी। जें ऐकतांच जाती क्षयासी। ऐसें भक्तस्थळ तुजपासीं। निरोपीन वो देवी।।५।। सदाचारें शिवभक्तीनें वर्तिजें। गुरुलिंगजंगम ऐक्यभावें मानिजे। परि आधी गुरु कीजें। दीक्षा घेईजें सद्भावें।।६।। सद्भावें विश्वास गुरुचरणीं। तोचि भाव लिंगपूजनीं। जंगमहि तेचि भावी मनीं। तोचि उत्तम भक्त जाणिजें।।७।। जेथें देखे गुरुलांछन। तेथ सद्भावें करी शरण। निरभिमानी होऊन। करी भक्ति।।८।। एकभावें धरी प्रेम। वंदी सदा गुरु लिंग जंगम। त्यासीं तीर्थप्रसादाचा नेम। नित्याचारें वर्ते तो।।९।। जंगम देखूनि भावें वंदावें। माझें तुझें बगीचें न म्हणावें। रूप देखोनि शरण जावें। हें गुरुभक्ति-लक्षण।।१०।। जंगमाचे गुण अवगुण। न उच्चारावे आपण। तो कैसा तरी असो परि वंदन। भावें कीजें।।११।। जंगमाचे पूर्वज न विचारिजें। तो गुरुरूपचि मानिजे। आवडी नावडी न धरिजे। जंगमलिंगाचे ठायीं।।१२।। जें जें आपणां आवडत। तें तें जंगमलिंगीं अर्पित। जऱ्ही हातां आलें अमृत। तरी न वंची तो।।१३।। मुखीं षडक्षरी मंत्र सतत। लल्हाटीं विभूति शोभत। कंठीं रुद्राक्षमाळा मिरवत। भक्तरायाच्या।।१४।। तीर्थप्रसादाची आवडी मोठी। सेवितां पडो नेदी भवीच्या दृष्टी। शिवाचार परिपाठीं। आणिकाहि लावीतसे।।१५।। जंगम देखतांचि दृष्टीं। धांवोनि सद्भावें घाली मिठी। लिंगयुक्त शरण लल्हाटीं। चरणरज लावी।।१६।। प्राण गेला तरी जावो। परि न सांडी निष्ठाभावो। तोचि

निजभक्तीसीं ठावो। शुद्ध भक्तस्थळ या नांव।।१७।। तनु मन धन अर्पितां। शीण न मानी सर्वथा। म्हणे ज्याचें त्यासीं देतां। मी कां कुंथो।।१८।। उदयकाळीं उठतां। हीच मनीं वाहे चिंता। कीं जंगमलिंगां अर्पितां। तरी भाग्य बरवें।।१९।। लिंगार्चितासीं जंगम आलिया। धांवोनि विश्वासें लागे पायां। शीतल विभूति पुढें करोनिया। म्हणे स्वामी कृपा करा।।२०।। नेवोनि बैसवी सिंहासनावरी। भावें बरवी पादार्चना करी। तीर्थ अर्पोनि प्रसाद स्वीकारी। उत्तम भक्त या नांवें।।२१।। भोजनोत्तर मुखशुद्धि। तांबूल अर्पितसे सुबुद्धि। भावें करूनि त्रिशुद्धि। शरण होत प्रीतीनें।।२२।। जे सुखभोग ते जंगमलिंगाचे। जे कष्ट ते प्रारब्धाचे। ऐसा भाव धरोनि वर्ते साचे। तोचि भक्त जाणावा।।२३।।

भृत्याचारसमाचारो लिंगजंगमरूपिणी। द्वयोरैक्यसमायुक्तो भक्तराज: सुबुद्धिमान्।।३।।

सेवकभाव अंगीं धरोनि। भक्तीचा अभिमान सांडोनि। एक भाव लिंगजंगमपूजनीं। करी तोचि उत्तम भक्त।।२४।। लिंगजंगमीं भिन्न भाव धरितां। केली भक्ति निर्फळ होय तत्त्वतां। मा मुक्ति सायुज्यता। तयासी कैंची।।२५।।

किंकरवाणीसमायुक्तो लिंगरूपेण जंगमम्। मनसा भावयत्येव भक्तस्थलसमन्वित:।।४।।

किंकरवाणी वृत्ति धरोनि। शांतिरूपी मन लीन होऊनि। लिंग जंगम एकरूप मानूनि। सद्भावें पुजी

जो ।।२६।। तो माझा मुकुटमणि जाण। महाभक्त शिवाचारसंपन्न। त्याचेनि माझें शिवपण। मिरवतसें ।।२७।। तो भक्त भक्तस्थळालागीं। जीवन जीववयालागीं। आहे म्हणोनि सर्वांग संगीं। भक्ति नांदतसे उल्हासें ।।२८।।

अर्थप्राणाभिमानं च गृहदारादिकं तथा। अर्पयेत् परया भक्त्या भक्तस्थली सुबुद्धिमान् ।।५।।

अर्थ प्राणाभिमान। पुत्रदारादि गृह जाण। ही सर्वहि कीजें अर्पण। लिंग-जंगमीं भक्तीनें ।।२९।। कायावाचामनेंकरोन। उदार व्हावें भक्तीलागोन। एकभावें तल्लीन होऊन। समर्पावें लिंग-जंगमीं ।।३०।। अमृताहूनि अधिक। प्रसाद मानी तो देख। सकळ तीर्थां विशेख। पादतीर्थां मानी ।।३१।। त्यासीं शिवलिंग जंगम प्राण। होऊनि सत्यत्वें असे जाण। ही खूण जाणती सत्यशरण। जे भक्तिपंथा लाधले ।।३२।।

गुरुधर्माभिमानी स्यात् लिंगनिष्ठो हि जंगमः। उपाचार्यः सदाचारी भक्तिमान् सुदृढव्रती ।।६।।

स्वधर्माभिमान असावा गुरूसीं। भावें पाळीत शास्त्राज्ञेसीं। कदापि न चुकती वचनासीं। धर्माभिमानी सत्य ते ।।३३।। लिंगाचा इच्छित हेतु। पूर्ण करितां जंगम भक्तु। तया वेगळी मातु। नसे जाण दुसरी ।।३४।। यालागीं वीरशैवीं। दुजी सेवा न करावी। इष्टलिंगासीं अर्पावी। शुद्ध कर्में आपुलीं ।।३५।। अमृताहूनि अधिक। प्रसाद मानिती देख। पंक्तिभोजन आवश्यक। इच्छीतसे भक्त पैं ।।३६।। शिव सांगे गणांप्रति।

जे शिवाचारें वर्तती। तया नसे अधोगति। सत्य जाणा वचन हें ।।३७।। भक्त तयासीच नांव। येरां नसे अनुभव। भवाचें भय सावेव। स्वप्नीं नसे सद्भक्तां ।।३८।।

प्रभाते मुखप्रक्षाल्य हस्तपादौ च क्षालयेत्। दंतधावनशौचादि कृत्वा नित्यं शुचिर्भवेत् ।।७।।

प्रात:काळीं उठूनि सत्वर। शौचमार्गें मौन धरूनि साचार। न बोलतां परस्पर। परतोनि यावे स्वगृहीं ।।३९।। ऐसे स्तब्ध येण्याचा काय हेतु। स्वमस्तकांतील ज्ञानतंतु। खर्ची घालूं नये व्यर्थु। योग्य विचारां योजावे ।।४०।। जो जो बोलण्याचा व्यापार। तो तो ज्ञानतंतु होती जर्जर। निद्रेअंतीं तयाचे अंकुर। सतेज पुन्हां होती पैं ।।४१।। म्हणोन तया खर्ची व्यर्थ। घालू नये हें यथार्थ। शिक्षक गुरु समर्थ। सांगतसे शिष्यांतें ।।४२।। मौनें घरीं येतां परतून। सप्त मृत्तिका करांसीं लावून। वर उदक दुसऱ्याकडोन। घ्यावें तेणें क्रिया शुद्ध ।।४३।। पादप्रक्षाळन करून। मग लिंगोदकें मुखमंडन। दंताचा मल धुवून। टाकी सत्य प्रतिदिनीं ।।४४।। येणेंपरी मुखमार्जन कीजें। मग लल्लाटावरून हस्त उतरिजे। परि मुखीं घेऊन न घालिजें। शीतळ लल्लाटावरी ।।४५।। आत्मस्थान असें भ्रूस्थानीं। म्हणोनि न घालिजें मुखपाणी। तेथेंहि देवाची मिळणी। सदा असे ।।४६।। म्हणोनि अर्ध मुखीं अर्ध करीं। ऐसें जल न घालिजें लल्लाटावरी। ऐसे न विचारोनि घालिजे जरी। तरी दोषी होईजे ।।४७।। येणेंपरी मुखमार्जन करून। मग करावें

भस्मधारण। पूजासामुग्री मेळवून। शुचिर्भूत असावें सदा ।।४८।।

मज्जनं च त्रिकालेषु शुचिपाकसदासुधी:। भविसंगपरित्याग इत्येतद् हितकारकम् ।।८।।

मग शुद्ध स्नान करोन। नेसावें शुक्ल धौत वसन। वरी उत्तरीय धारण करोन। प्रवर्तावें पूजनीं ।।४९।। ऐक लिंगपूजेचें विधान। लिंगाचें त्रिकाळ कीजें पूजन। एकान्त स्थळ पाहोन। शिवपूजा कीजें सावध ।।५०।। आधी दोन्ही हात प्रक्षाळून। मग पात्रार्चन करोन। विभूति शीतळ पात्रासीं लावून। मग लिंगासीं काढिजें ।।५१।। लिंग करस्थळीं धरोन। लिंगमुखीं शीतल घालून। तयाचें कीजें मुखमार्जन। आचमनादिकीं पैं ।।५२।। मग आरंभिजें शिवलिंगार्चन। बैसिजें मन आकर्षित करोन। शुद्धासनीं बैसून। करावें ध्यान शिवाचें ।।५३।। आधी लिंगासीं विभूति अवधरिजे। बोटीं शेष उरले ते मस्तकीं लाविजे। मग त्रिपुंड्र चर्चिजें। ललाटभरी ।।५४।। परि तें मंत्रीं शुद्धि करून। ऊर्ध्वमुखीं ललाटीं लावून। गंध धूप दीप नैवेद्य निवेदून। घंटासंयुक्त कीजे ।।५५।। शंख चवरे दर्पण। आणिकहि जें पूजेचें भूषण। तें तें समुदाय घेऊन। लिंगार्चना पैं कीजे ।।५६।। ऐसी लिंगाची पूजा त्रिकाळ। जो करी सद्भावें होऊन निर्मळ। जाणावें शुद्ध भक्तिस्थळ। उत्तम साच तें ।।५७।। ते त्रिकाळ म्हणशील कोण कोण। प्रात:काळीं उदय होतां अरुण। ते काळीं कीजें लिंगार्चन। तैसेचि मग माध्यान्हीं ।।५८।। चांदणी निघाली नसतां।

आणि सूर्य अस्तमान होतां। त्या सायंकाळीं लिंग पुजतां तत्त्वतां। यया त्रिकाळीं लिंगार्चन होय ।।५९।।
ऐसें त्रिकाळ लिंगार्चन। वरी शुद्ध शुचि पाक करून। लिंगासीं कीजें निवेदन। न देखतां भवि ।।६०।।
स्नान केल्याविणे स्वयंपाक। केलिया अनाचार पातक। घडें ऐसें शास्त्रादिक। सांगती धर्मग्रंथीं ।।६१।।
स्त्रिया शुचिर्भूत असाव्या सदा। भविस्पर्श करू नये कदा। जरी संसारीं असे आपदा। तरी आचारां सोडूं नये ।।६२।। स्वधर्माचारें वर्ततां। इंद्रसंपत्ति ये हातां। खोटें नाहीं हो सर्वथा। स्वधर्मनिष्ठा श्रेष्ठ ।।६३।।
पाक झालिया पात्रशुद्धि। करावी भस्मधारणेआधी। जंगम पंक्ति सत्यविधि। भोजनालागीं असावा ।।६४।। लिंगपूजा होतां क्षणीं। नैवेद्य अर्पण मंत्रेंकरूनि। लिंगार्पित प्रसाद मानूनि। ग्रहण करी सदा ।।६५।। वीरशैवाघरींचें अन्न। पवित्र असें परिपूर्ण। तयाचा अंश घरांतून। बाहेर कदा न जावा ।।६६।।
यास्तव तयाचा स्पर्श। घेतां देतां जेवितां विशेष। आसन-वस्त्रां अंगां लेश। लागूं देतां दोष घडे ।।६७।।
ऐसी क्रिया लिंगधर्मीं। पाळी तो विशेष मर्मीं। तयाची वाढतसे नित्य लक्ष्मी। क्रमानें ।।६८।। भवि देखतां शिवातें अर्पण। न कीजें ऐसें नीलकंठीचें प्रमाण। म्हणोनि भविसंग त्यागोन। भक्तिमार्गी वर्तिजें ।।६९।। ऐसा शिवार्चनाचा नेम। तेंचि भक्तस्थळ उत्तम। परि भवि म्हणावें कवण तो नेम। ऐक वो देवी ।।७०।। ज्यासीं पंचकलश दीक्षा नाहीं। तीर्थप्रसाद तो नेणेंचि कांहीं। तोचि भवि पार्वती पाही।

गुरुविण नांदे म्हणोनि ।।७१।। त्याचा संग त्यागावा। शिवमंत्र नाहीं म्हणोनि बोलावा। तोचि प्राणी भवि म्हणावा। अनंत जन्मा-कारणें ।।७२।। म्हणोनि धन्य ते शिवभक्त। जे झाले गुरुकरजात। आणि भविसंग न करीत। शिवभक्त शुद्ध ते ।।७३।। वीरशैव सदाचार स्थिति। जाणे तो एक जंगममूर्ति। जनां संस्काराची स्फूर्ति। प्रगट कीजे सत्वर ।।७४।। ऐसे जे भक्त असती। ते माझे मुकुटमणि वो पार्वती। तो आत्मा मी देह ऐसी प्रीति। भक्ताची मज ।।७५।। ऐसें भक्तिस्थळ उत्तम। तुज निरोपिलें जाणोनि तुझें प्रेम। ऐसें आचरे तेंहि वर्म। तुज दाखविलें वो देवी ।।७६।। ऐकोनि भक्तस्थळ पार्वती। पूर्ण संतोषली चित्तीं। मग नमस्कार करोनि पुसती। झाली कांहीं आणिक ।।७७।। वीरशैव सदाचार स्थिति। जाणे तो एक जंगममूर्ति। जन्मसंस्काराची स्थिति। प्रगट कीजे सत्वर ।।७८।।

गर्भाधानं पुंसवनं सीमंतं जातकर्म च। तथा दीक्षाप्रभावेन लिंगनिष्ठा भवेद् ध्रुवम् ।।९।।

गर्भाधान हा संस्कार। सर्वांसींच असावा साचार। त्याचा न करावा अनादर। पंचाचार विधीनें कीजे तो ।।७९।। हाचि जाणावा संस्कार प्रथम। दुजा तो डोहाळे इच्छा काम। तिसराहि पुण्य पराक्रम। जननापूर्वी होतसे ।।८०।। चौथा तो जातकर्म जाण। जन्मकालीं लिंगधारण। ऐसें शास्त्र बोलें वचन। वीरशैवधर्माचें ।।८१।। ऐसे हे चार गर्भसंस्कार। वीरशैव धर्माचे प्रकार। तया धर्माध्यक्ष वारंवार। श्रुत

करी लिंगायतां ।।८२।। नामकरण बारावे दिवशीं । उत्साहेकरोनि बालकासीं । नांव ठेवणेंचि अनायासी । आप्तगोत्रां कळावया ।।८३।। अन्नभक्षणाचा विधि । धर्मनीति दिनशुद्धि । पाहूनिया उदय संधी । ग्रह शुभ स्थानासीं ।।८४।। उपनिष्क्रम म्हणती । जेथें असे ती परमभक्ति । शिशूसीं चालावयाची शक्ति । आणूं पाहती आवडी ।।८५।। चौल संस्कार आठवा । देहस्थितीचा मानावा । सुखदुःखाचा वानवा । कळतसे तेणें पैं ।।८६।। सर्व संस्कारांचा राजा । जयाचेनि योगें शिवपूजा । करितां घडे पुण्यकाजा । स्वधर्मनिष्ठा ती ।।८७।। दीक्षा-संस्कारावांचून । लिंगायतचि नव्हे जाण । ज्ञातिधर्माची असे खूण । सत्य जाण पार्वती ।।८८।। लिंगायतां हा संस्कार । लागू असे शास्त्राधार । तयावांचून क्रियाचार । शुद्ध नसे साक्षिपें ।।८९।। जंगमदीक्षा असे दुसरी । अगाध असे तयेची थोरी । महेश्वरी अधिक तिसरी । वंद्य देख देवादिकां ।।९०।। या दोही दीक्षा जाण । गुरुपदाचें भूषण । स्वधर्माचा अभिमान । जेणें राहे सत्य पैं ।।९१।। म्हणोनिया धन्य ते भक्त । जे झाले गुरुकरजात । तेचि वीरशैव सद्भक्त । अन्य धर्मांवेगळे ।।९२।। येथें झाले नऊ संस्कार । पुढें विवाहाचा होय प्रकार । गोत्र सूत्र वधु कुलाचार । पाहोनिया योजावा ।।९३।। हे ऐसे दश संस्कार । तयापुढें धर्म पर । सांगोनि अंतीं विचार । मुख्य संस्कार हे ।।९४।। याचे परि उपसंस्कार । षोडश संख्या समग्र । त्याचा विधिमंत्र फार । लिहिला असे धर्मशास्त्रीं ।।९५।। ते पाहून

लिंगधारी। सर्व विधि प्रेमें करी। असत्य मानी तो भिकारी। जन्मोजन्मीं होईल ।।९६।। जो याच नेमें जाणे स्वधर्म। कदा न होय तया चिंताभ्रम। सावधान आणि सप्रेम। निष्ठा असे धर्मावरी ।।९७।। यावरील संस्काराचे मंत्र। महाशुद्ध आणि पवित्र। तयावेगळे स्वतंत्र। दुजे मंत्रचि नसती ।।९८।। हे मंत्र उपाचार्यमुखीं। वसती सदा पुण्यश्लोकीं। त्यावेगळी मिरवी शेखी। तया अज्ञान मानावें ।।९९।। उपाचार्यें आपुलें कर्म। सांभाळावें मुख्य धर्म। तयांचें मंत्रापासीं प्रेम। सर्वकाळ असावें ।।१००।। उपाचार्य जंगम असती। ते लिंगायताप्रति पाळिती। आचारधर्माची काळजी वाहती। सावरिती वेळोवेळीं ।।१०१।।

देव्युवाच-

जंगमस्य कथं रूपं जंगमस्य च के गुणाः। जंगमस्य च के भेदा ब्रूहि मे परमेश्वर ।।१०।।

पार्वती पुसे शंकरासीं। जंगमाचें रूप निरोपा मजसीं। जंगम म्हणावें कवणासीं। कैसा लक्षणभेद त्याचा ।।१०२।। कैसें आचरण कोण स्थिति। कैसी नीलकंठी कोण वृत्ति। ते निरोपा कैलासपति। आवडी माझिये ।।१०३।।

शिव उवाच-

ज्ञानं जंगमरूपं स्यात् सोपाधिनिरुपाधिकम्। भक्तप्राणसमायुक्तं एतज्जंगमलक्षणम् ।।११।।

सदाशिव म्हणे मेनके ऐक। जंगमाचें रूप ज्ञान एक। ज्ञानावांचून आणिक। शोभेचिना ।।१०४।। ज्ञान म्हणसी ते कोण। तरी वस्तूचें जाणपण। जाणोनि स्वयेचि झाला आपण। तोचि जंगम जाणिजे ।।१०५।। वस्तु होवोनि सदा असत। सदा शिवानंदें डुल्लत। करी ना तो करवीत। कर्ता ना अकर्ता तो ।।१०६।। मीतूंपणाचा भास तयासीं। नुन्हेचि कोणे काळेसीं। उपाधिनिरुपाधीसीं। विरहित तोचि जंगम ।।१०७।। तो स्वतंत्र विधीनें असे। कोणाआधीन तो नसे। गुरुबुद्धिविण कांहीं करीतु नसे। तोचि जंगम उत्तम ।।१०८।। तोचि गुरु मोक्षदाता। मोक्षहि होय पायां लागतां। न मानी तो सर्वथा। श्लाघ्यता कांहीं ।।१०९।। मुक्त म्हणिजे सुटिला। बद्ध म्हणिजे बांधिला। जो मुळीच बांधिला नाहीं त्याला। सुटला म्हणावें काई ।।११०।। कां जो बंधमोक्षातीत। वस्तुरूपचि असे साक्षिभूत। वस्तूसीं बंध मोक्ष म्हणता संत। हासती ऐकोनिया ।।१११।। तो स्वयें स्वरूपचि होओन। असे निर्विकल्प निर्गुण। निराश निजभरित निर्वाण। तोचि जंगम उत्तम ।।११२।। तो ध्येय-ध्याता-ध्यानासीं। अतीत ज्ञेय-ज्ञाता-ज्ञानासीं। भोक्ता-भोग्य-भोगासीं। विरहित जंगम ।।११३।। कर्ता-कार्य-कारणासीं। अतीत दृश्य-द्रष्टा-दर्शनासीं। सत्त्व-रज-तम त्रिगुणांसीं। विरहित तो जंगम ।।११४।। ऐसा जंगम तो वीरशैव। तोचि भक्ताचा सगुण जीव। न धरी कदापि द्वेषभाव। स्वधर्मीं जनां तारक ।।११५।।

अंगमिश्रितमाचार आचारः प्राणमिश्रितः। तत्प्राणमिश्रितं लिंगं लिंगं जंगममिश्रितम् ।।१२।।

अंग आचारासीं मिश्रित असें। आचार प्राणासीं मिश्रित वसे। प्राण तो लिंगासीं आश्रित असे। लिंग जंगमीं मिश्रित ।।११६।। एवं परस्पर येरयेरांस। मिश्रित होओनि असती समरस। येणें विधि वर्ते जो गुरुरूप त्यास। बोलिजें शुद्ध जंगम ।।११७।।

कामक्रोधविनिर्मुक्तो लोभमोहविवर्जितः। सर्वसंगपरित्यागी सर्वश्रेष्ठस्तु जंगमः ।।१३।।

कामक्रोधादि विरहित। मोहदंभासीं अतीत। सर्व संगासीं विनिर्मुक्त। तोचि जंगमश्रेष्ठ बोलिजें ।।११८।। आतां कामक्रोध कोण्या रीति। लोभ मोह कवणां म्हणती। त्याग म्हणिजे कोण स्थिति। जाणोनि मग त्यागिजे ।।११९।। काम तो बहुतांपरी असे। एक काम स्वर्गसुख मानसीं वसें। स्वर्गांगनाभोग अमृतपान असे। त्यासाठीं कामीं लुब्धती ।।१२०।। एक काम राज्यादि भोगासीं। इच्छितातीं गजान्त लक्ष्मीसीं। एक पाताळादि भोगासीं। इच्छितो काम ।।१२१।। एक काम विषयेच्छा धरी। वरपडा पडे दाही विषयांवरी। एक काम फळ-इच्छा अंतरीं। पुढें भोगूं म्हणोनि ।।१२२।। येणेंपरी काम असें बहुतांपरीसीं। त्यानें नाडिलें थोरथोरांसीं। तया त्यागून जो राहे त्यासी। शुद्ध जंगम बोलिजे ।।१२३।। स्त्रीकाम महाबाधक। त्यातें त्यागितां असें महासुख। त्या कामासीं भिती ब्रह्मादिक। दुर्धर म्हणोनि ।।१२४।। यालागीं धन्य

त्याचें जाणपण। जेणें सर्व काम टाकिलें थुंकून। तोचि एक जंगम जाण। शिवाचारासीं तारक ॥१२५॥ ऐक क्रोधाची खूण। बरवेपण पराचें देखून। वाटें करावें तयाचें नाशन। त्या नांव क्रोध जाणिजें ॥१२६॥ इच्छिलें काम पूर्ण न होतां चित्तें। महा चरफडीचें यें भरतें। शुद्ध क्रोध म्हणो तयातें। कामाचा पुत्र क्रोध तो ॥१२७॥ कामाचा होता हरास। तरी ठाव नुरेचि क्रोधास। त्यां दोहीसीं अतीत जो त्यास। शुद्ध जंगम बोलिजें ॥१२८॥ लोभें लोभोनि मोहित। मोहिलें नुखळें चित्त। लोभें स्त्रीबाळें समस्त। आपुली म्हणूनि मोहिला ॥१२९॥ बरवा पदार्थ देखोन। तेथें लोभ मोह न धरोन। जो निरपेक्ष सत्यशरण। तोचि लोभमोहातीत ॥१३०॥ तो वरपडा नव्हे षड्विकारावरी। दर्शनमानें फुगारा न धरी। माझें तुझें भेदासीं अंतरीं। थारा नेदीच तो ॥१३१॥ विषयातें विष मानी। स्वर्गादि सुख तुच्छ गणीं। स्वयें गुरुरूपचि होवोनि। असे तो उत्तम जंगम ॥१३२॥ कोणासीं न करी कचकच। कोणासीं न बोलें उच्चनीच। लटिके त्यागूनि वदे साच। तो उत्तम जंगम ॥१३३॥ कुचेष्टा कुचाळी। न करी कदा रळींरांगोळीं। कुवाक्यें कोणां न सळीं। तोचि उत्तम जंगम ॥१३४॥ जो परजीवाची न करी हिंसा। परनिंदा न करी कांहीं आशा। परस्त्रिया मानी मातेशा। तोचि जंगम उत्तम ॥१३५॥ तो निर्मळ तरी कैसा। पाताळगंगेचा ओघ जैसा। राव रंक जया सरिसा। तोचि उत्तम जंगम ॥१३६॥ तो परमानंदभरित। कधीं नाहीं

हकहकित चित्त। कोणासीं न परिहासित। तोचि जंगम उत्तम ।।१३७।। सहजस्थिति तेणें असणें। भक्तीविना न राहणें। परापेक्षा घेणें देणें। तोचि जंगम उत्तम ।।१३८।। सर्व त्यागूनि विरक्त असणें। अन्नवस्त्रां लोलुप नसणें। वैराग्यवृत्तिं सदा राहणें। जंगमोत्तमाचे ।।१३९।। सर्व त्यागावें हें श्लोकीचें पद। तरी काय त्यागावें ऐक भेद। सर्व दोषांचा उपडिजें मूळ कंद। अहंकार तो ।।१४०।। एकला अहंकार त्यागितां। सर्व त्यागिले होय तत्त्वतां। जेवि मुळीहूनि वृक्ष उन्माळितां। शाखापल्लव उन्माळिलें ।।१४१।। तेविं अहंकार त्यागितां सर्व। त्यागिले होय भवभाव। तोचि जंगम जाणिजें देवाधिदेव। आम्हांसीं वंद्य तो देवी ।।१४२।। त्याचें दर्शन स्पर्शन। जरी घडें संभाषण। तरी भक्ति मुक्ति वोळंगे अंगण। कल्पांतवरी ।।१४३।। तो पाहे जयाकडे कृपादृष्टीं। तरी होय तया आनंदाची सृष्टी। स्वानंदां चढे पुष्टी। उठाउठीं तत्काळ ।।१४४।। त्याची भेटी व्हावयासीं। कांहीं पुण्य असावें गाठीसीं। पुण्यावांचून न भेटें कवणासीं। सत्यशरण तो ।।१४५।। पदरीं कांहीं पुण्याची असेल जोडी। तरीच जंगमलिंगीं होय आवडी। अन्य तो जाणावा कबाडी। संसारीं बद्ध तो ।।१४६।। सुखपदार्थ दृष्टीं देखोनि। त्याची इच्छा करी लोभ धरोनि। कीं कुकर्मासीं आश्रय देऊनि। वर्ते त्या जंगमां सोडावें ।।१४७।। स्वतः न पाळी शास्त्रनीति। सांगे तया विपरीत बोलती। अधर्में कुळें नरका जाती। सत्य जाण वो देवी ।।१४८।। स्वधर्माची जो करी

निंदा। स्वकर्णें ऐके मुदां। प्रत्युत्तर न देत कदा। जंगमवंश नव्हेचि तो ।।१४९।। ज्ञाति जंगम असून। जो न धरी स्वधर्माभिमान। तो श्वान-शूकरयोनी जाण। भोगी देवी कल्पवरी ।।१५०।। जो अखंड स्वधर्मातें। प्रतिपादितसे सदर्थें। करी धर्मप्रसिद्धि जगातें। जंगमवंश तोचि जाण ।।१५१।। ऐसा आतां जो निरोपिला जंगम। तोचि वीरशैवमार्ग उत्तम। तुझें स्वरूप हें तुझें वर्म। तुज निरोपिलें वो देवी ।।१५२।। श्रीशंकरानें पार्वतीप्रति। निरोपिली जंगमस्थिति। ही वीरशैव धर्माची स्तुति। उच्चारिता पुण्य बहु ।।१५३।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। शिव-गौरीसंवादीं वर्तत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृत्य मन्मथ ।।१५४।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे भक्तमार्गजंगमस्वरूपवर्णनं नाम नवमोऽध्यायः समाप्तः ।।

श्लोक १३, ओव्या १५४.

❑

अध्याय दहावा

॥ श्रीशिवाय नमः ॥

नवम अध्यायीं जंगमस्वरूप । वर्णिलें स्वामी तुम्ही अमूप । परि मम हृदयींचा संकल्प । उरलाचि असे ॥१॥

देव्युवाच-

शिवयोगिस्वरूपस्य जंगमार्यस्य के गुणाः । स्वरूपं च तथाचारः श्रोतुमिच्छामि सांप्रतम् ॥१॥

जो शिवयोगी जंगमलिंग असे । त्याचे गुण निरोपा कैसे । त्याचा आचार कवणे स्थितिं वसे । हे निरोपा स्वामी ॥२॥ आणिक विचारूं मुख्य खूण । जंगमाचें कवण चिन्ह । इच्छा उदेली मजलागून । पूर्ण करी कृपाळुत्वें ॥३॥

शिव उवाच-

जंगमं लिंगमाख्यातं द्वयमेवास्ति तत्तथा । द्वयमेव समायुक्तं श्रेष्ठं तल्लिंगजंगमम् ॥२॥

जंगम लिंग एकचि असे । बाहेरी नामाचा भेद दिसे । ऐसा जाणोनि भेद समरसे । तो उत्तम जंगम ॥४॥

जंगम लिंगांत लिंग जंगमांत। एवं येरयेरांतें मिश्रित। अभेद भेद उभयांत। जाणोनि वर्ते तो जंगम ।।५।। जैसें पुष्प परिमळांत। कीं परिमळ पुष्पांत। भेद नाहीं येरयेरांत। तेविं लिंग जंगमीं ।।६।। रस जळांत कीं जळ रसांत। गूळ गोडींत कीं गोडी गुळांत। तीळ तेलांत कीं तेल तिळांत। भिन्न भेद दिसेना ।।७।। तेविं लिंग-जंगमातें। भेद नाहीं सर्वथा उभयातें। ऐसा ऐक्यभावें निभ्रांते। तोचि शुद्ध जंगम बोलिजे ।।८।। जंगम आणि स्थावर। बोलती द्वय विचार। भेद कैसा वर्ते साचार। ऐक शक्ति सावधपणें ।।९।। एकरूपी लिंग जंगम। असती जाण सप्रेम। म्हणोनि गुरुत्वाचा नेम। तया प्राप्त झाला कीं ।।१०।। सद्योजातादि पंचवदन। मम मुखें असती प्रसिद्ध जाण। तेथून उद्‌भवले तीच खूण। जंगमलिंगाची असे पैं ।।११।। जंगम आणि लिंग एक। बाह्य नामाचा भेद देख। परि असे ते व्यापक। सर्वाठायीं सर्वदा ।।१२।। त्याच्या दर्शनमात्रेंकरून। अष्टोत्तरशत तीर्थें होतीं पावन। तो सकळां श्रेष्ठ पूज्यमान। उत्तम जंगम बोलिला ।।१३।।

मुखे मंत्रो हृदि ध्यानं मस्तके लिंगधारणम्। शिखारुद्राक्षभस्मानि ह्येतज्जंगमलक्षणम् ।।३।।

मुखीं मंत्र हृदयीं गुरूचें ध्यान। प्राणासीं लिंगासीं एकचि आसन। इष्ट प्राण मिश्रित करोन। वर्ते तोचि जंगम ।।१४।। इष्टलिंग तो अर्च्य लिंग। प्राणलिंग तो ध्यान अंग। समाधिस्थ राहे कदा नोव्हे

भंग। जंगमप्राणी जाण तो ।।१५।। त्याचें हृदय तें गुरूचें भुवन। विश्रांतीचें तेंचि स्थान। त्याचें हृदय तें गुरूचें वदन। म्हणोनि भोक्ता तो सर्वांसीं ।।१६।। त्याचे चालीं गुरु चालत। त्याचे बोलीं गुरु बोलत। ऐसा जंगम जो योगयुक्त। तो मुकुटमणि माझा ।।१७।।

निःशब्दं स्थावरं प्रोक्तं समंत्रो जंगमो भवेत्। लोकपुण्यपरं श्रेष्ठं दैवतं लिंगजंगमम् ।।४।।

स्थावरासीं शब्द मंत्र नाहीं। त्याची जंगममंत्रें स्थापना पाही। जीवनकळा त्याचे ठायी। एऱ्हवीं ते स्थावर ।।१८।। तो जंगम सर्व लोकांस। पूज्यमान होय भाविकांस। तया पुजितां होय स्वयंप्रकाश। निजभक्तांसीं ।।१९।। सद्भावें पुजितां तयासीं। नाश होय तत्काळ अविद्येशीं। तो पावे शिवरूपासीं। जो पुजी कां विश्वासें ।।२०।। विश्वास कैसा म्हणसी। सदा शिव भावे तयासीं। पूजोनि तीर्थप्रसादासीं। सेविजें विश्वासूनि ।।२१।। विश्वासेविण पुजितां। ती पूजा पावे निष्फळता। जंगमलिंगाविण निजभक्तां। अन्य दैवत नाहीं ।।२२।। विश्वासें न पुजी गुरु। तो कदा नोहे पैलपारु। जंगमलिंगाचा महिमा थोरु। किती म्हणोनि वर्णावा ।।२३।। देवाधिदेव जाणोन। जंगमलिंगां करी पूजन। तो स्वरूपीं शिव होय आपण। तया जंगमाचें लक्षण ऐक देवी ।।२४।।

निःसंगत्वं निराभासं निःसीमं निरुपाधिकम्। निर्देहं निर्मलं नित्यं एतज्जंगमलक्षणम् ।।५।।

तो निःसंग सर्व संगाचे ठायीं। भोईभार नव्हेचि कांहीं। भासमान पण तेंहि। आगळेंचि असें।।२५।।
निःसीम म्हणिजे मिति नाहीं। नसें आधिनत्व तें कोठेंहि। उपाधीचा लेशु तोहि। अंगीं नसे तयाच्या।।२६।।
देहीं असूनि विदेही। सदा निर्मल नित्य पाही। स्वतःसिद्ध पालटु नाहीं। येणें लक्षणें लक्षित तो।।२७।।
तो निःसंग कां म्हणसी तरी ऐक। संगास्तव होय जन्मदुःख। अंतकाळीं जो संग आठवे देख। तेचि होणें न चुके त्या।।२८।। जरी असें गुरूचें ध्यान। तरी अंतकाळीं तेंचि स्मरण। झालिया गुरुरूप होणें आपण। न चुके पाही।।२९।। म्हणोनि ज्याचा संगध्यास असे। अंतकाळीं तेचि आठवें विश्वासें। मग देहान्तीं ते होय सावकाशे। न चुके कोण्हां।।३०।। म्हणोनि सर्व संग त्यागून। अखंड गुरुरूपाचें करी पूजन। तेणें अंतकाळीं होय तेचि आठवण। गुरुरूपचि होणें मग।।३१।। जंगमपद तेंचि गुरुपद जाणा। ऐक तयाच्या सर्व खुणा। गुरुस्थळापासोनि आपणां। मोक्षप्राप्ती होत असे।।३२।। शरण आलिया जंगमासीं। गुरुपद देत शिष्यांसीं। भेदभाव नसे मानसीं। शुद्ध अंतःकरणी जंगम तो।।३३।। जो शिष्य जंगमपद घेऊन। गुरुपणा मिरवी धुडकावून। कृतघ्न निंदी जंगमालागून। अपकीर्ति होय त्याची।।३४।।
जंगमकुळीचा कुमार सुदृढ। असावा गुरुपदारूढ। जंगमवेश देऊनि हुड। न मिरवावा सिंहासनीं।।३५।।
तेणें होय धर्मभ्रष्ट। पापें आचरतीं अरिष्ट। तयासंगें शिष्य श्रेष्ठ। श्रद्धा त्यागिती धर्ममार्गीं।।३६।।

निष्कलंकं निरपेक्ष निर्दोषं निस्पृहं तथा। सत्यवाक् सदयं शांतमुक्तं जंगमलक्षणम् ।।६।।

निष्कलंक निरपेक्ष गुण दुसरा। निर्दोष निराश सत्यवादी पांचवा खरा। दया शांति सात गुण वो सुंदरा। तया जंगमलिंगाचे ।।३७।। अवधारी वो पार्वती। ते सात लक्षण जया अंगीं मिरवती। तो जंगम कैलासपति। स्वयेंचि बोलिजें ।।३८।। ते सात लक्षण निर्णय करोनि। एक एक सांगेन विवेचोनि। ते ह्वदयीं धरोनि वर्ते जनीं। तोचि सत्यशरण ।।३९।। निष्कलंक म्हणिजे वासनात्याग। वासनेचा कलंक न धरी अंग। वासनात्यागें निष्कलंक चांग। तोचि उत्तम जंगम ।।४०।। निरपेक्ष म्हणिजे अपेक्षा नाहीं। कोणासीं मागणे नाहीं कांहीं। कोणे एके पदार्थाचीहि। अपेक्षा न करी ।।४१।। अमृताहूनि अधिक भोग। जरी प्राप्त झाले चांग। तरी अपेक्षेचे अंग। तिळभरी न सेवी तो ।।४२।। नित्यतृप्त अखंडित। तया अपेक्षा कैंचा हेत। संतुष्ट स्वानुभवें तृप्त। निरपेक्ष जंगम तो ।।४३।। वाटेवरी धन पडिलें असतां। त्यासीं धनी कोणी नसतां। तेहि अपेक्षेत ठेवोनि घेतां। निरपेक्षता ती उडाली ।।४४।। मग अपेक्षा करोनि घातें। मेळविजें जे नाना भोगांते। ते कांहीं न घडे सत्यशरणांते। संकटीं अडले जरी ।।४५।। एवं निरपेक्षता गुण दुसरा। आतां ऐक निर्दोष गुण तिसरा। मनादि दोषें इंद्रियें अणुमात्रा। लिंपेचिना ।।४६।। प्रपंचादि दोष समस्त। परि नातळें जयाचें चित्त। सर्वदोषविरहित। तोचि शुद्ध जंगम ।।४७।। नि:स्पृह म्हणिजे स्पृहा

नाहीं । कोणाचा संग आसरा न धरी कांहीं । निराश आशा अणुमात्र न करी पाही । कोणां पदार्थांची ।।४८।।
पाताळादि भोगविलास । ने घे तो ध्यानीं मानस । नाशिवंत जाणोनि सर्वांस । निःसंगत्वें वर्ततसे ।।४९।।
ऐसा निस्पृह गुण चौथा । पांचवा सत्यवादी निरोपुं आतां । जया लक्षणें मुक्तता । तात्काळ पावे ।।५०।।
प्राण जात असतां संकटीं । तरी असत्य उमटेना ओठीं । सदा सत्य वाक्य वाहे पोटीं । स्वहितालागीं ।।५१।।
मा अल्पासाठीं तत्त्वतां । असत्य वदेना सर्वथा । तो सत्यवादी असत्य बोलतां । सत्याची दशा जाय ।।५२।।
नातरी सत्य बोलोनि इकडे । जीवघात करी जरी तिकडे । तरी वाचा नव्हे लांवचि जाण पुढें । सत्य वदोनि घात केला ।।५३।। परमार्थ बोलावा निभ्रांत । परि कोणाचें न दुखवावें चित्त । ज्या वचनें होय घातपात । तें वाक्य काय खरें ।।५४।। परमार्थचि बोले वाक्यदीप । दहा जनांसीं होय सुखरूप । एकादोघातें होय दुःखरूप । तरी तो काय परमार्थ ।।५५।। एकाचा बुडतां संसार । अथवा सुळीं घालावया नेती चोर । तेथें लटके बोलोनि वाचवी जो नर । तो साचचि जाणिजें ।।५६।। नातरी साचचि बोलोनि निश्चितार्थ । येरीकडे होतसे घात । तरी ते साच न मानिती संत । सत्यरूपीं असत्य म्हणोनि ।।५७।। जो सत्यवादी पुरुष । कुश्चल दोषयुक्त न बोले कवणास । कपटी काल्पनिक वाक्यास । मुखासीं न आणी कधीं ।।५८।।
सत्यवाक्य जें गुरूचें । सदा मुखीं उच्चारण त्याचें । अन्यथा घोष न करी वाचें । तें सत्य वाक्यलक्षण

पांचवें ।।५९।। आतां आईक दयेचें लक्षण। पीडितां देखे परजीवां आपण। नेणो सांडील आपुला प्राण। शुद्ध दया त्या नांव ।।६०।। जीवातळीं आपुला जीव आंथुरी। अत्यंत कृपेनें संरक्षण करी। तो कोणासीं न दुखवी अंतरीं। तेंचि दया जाणिजें ।।६१।। कां सर्वांभूतीं परमात्माचि असे। म्हणोनि कोण्हासीं दुःख देत नसे। यालागीं दया नांदतसे। मूर्तिमंत तेथें ।।६२।। त्यासीं द्वैतार्थचि नसे पाही। कोण्हाचा घात न करी कांहीं। नेणो आपणचि वर्ते सर्व देहीं। ऐसी दया जयापाशीं ।।६३।। आपणचि अवघा झाला। मग कांहीं दुःख होईल आपणाला। आपुले हातें आपुला डोळा फुटला। तरी काय हात छेदिजें ।।६४।। हात छेदितां दोन्ही होती घात। डोळा फुटला गेला हात। हाताचा अन्याय गिळितां निश्चित। तरी एकचि दुःख ।।६५।। तैसे कोणी दुःख दे आपणांस। आपणहि दुखविजें त्यास। तरी आपणचि वरपडा होईजें दुःखास। कां आपणचि अवघा म्हणोनि ।।६६।। यालागीं कोणी करितां हानी। दुःखदायी कोणासीं नोहे झणीं। दुःख दे त्यासीं सुख चिंती मनीं। त्या नांव दया वो देवी ।।६७।। ऐसी दया ज्यापासीं। तो स्वामी होय आम्हांसीं। तो जगीं श्रेष्ठ होय सकळांसीं। दयानिधि जाणिजें ।।६८।। आतां शांति तें सातवें लक्षण। तें अंगीं बाणलें संपूर्ण। जैसा अथांगीं गुंडा जाय बुडोन। तैसा परवाक्यां क्षोभेना ।।६९।। पराचे शब्द तीक्ष्ण बाण। ते लागती धरूनि वर्मसंधान। परि न डळमळें जयाचें समाधान। ते शुद्ध शांति

वो ।।७०।। काम क्रोध दंभ अहंकार। ते असोनि शांतीचा बडिवार। मिरवी तो मूर्ख साचार। सोंग लौकिक नाटक।।७१।। पूर्ण शांति आली जाणिजें केव्हां। नीचाचे नीच बोल साहे जेव्हां। कधीं नुठी अहंभावा। ते जे तेंचि शांति।।७२।। जेथें विकाराची समाप्तता। केलें सुकृत न मिरवी सर्वथा। जाणीव शाहणीव ज्ञानाभिमानता। नाहीं जया तेंचि शांति।।७३।। सर्व करितां अपहारास। तरी न धरी अल्प क्रोधास। ऐसी शांति जया योगियास। तो शुद्ध जंगम वो देवी।।७४।। शांति बाणली ऐसी ज्यासीं। कामक्रोध निमाले त्यापासीं। मी माझे पदवी बैसवी त्यासी। तो पूज्यमान आम्हां।।७५।। स्वधर्माचा कंटाळा ज्यास। त्याचें ज्ञान भ्रष्ट विशेष। त्यासीं भाषण न करी उदास। शांति तया बोलिजें।।७६।। ऐसी शांति आदि सात लक्षणें। ज्याच्या अंगीं बाणलीं भाग्यगुणें। तोचि जंगम मी म्हणे। येर ते वेषधारी।।७७।। हें सप्तहि ज्याच्या अंगीं लक्षण। त्यासीं कळिकाळ येई शरण। तेथें भव भय बापुडे कोण्या मुखेकरोन। सन्मुख येती।।७८।। या लक्षणीं जो जंगम भूषित। त्या आधीन मी कैलासनाथ। त्याचे चरणीं तीर्थें नांदती समस्त। काशी आदि करोन।।७९।। तो जिकडे पाहे सहज दृष्टीं। तिकडे होय सुखाची वृष्टी। त्यासीं वंदी तो उठाउठीं। ईश्वरु होय।।८०।। तो ज्यासीं सुखी राहे म्हणे। त्यासीं म्यां अगत्य उद्धरणें। तो ज्यासीं देववी त्यासीं देणें। त्याचिया वचनें पार्वती।।८१।। आतां आणिक एक लक्षण। जंगमाचें

निरोपुं आपण। तें ऐकतां होईजें पावन। निजभक्त जनीं ।।८२।।

मुग्धत्वं मूर्तिमंतत्वं मदमोहादिवर्जितम्। मायादित्रिमलं नास्ति यस्यासौ जंगमः स्मृतः ।।७।।

मुग्धमौन होवोनि असे। कोण्हासीं सर्वथा बोलणेंचि नसे। मा गदारोळ करोनि बडबडीतसे। हें केविं घडें ।।८३।। तयासीं अधिक बोलणें नाहीं। जरी बोलो लागेहि कांहीं। तरी अमृताहूनि गोड पाही। तेहि मपितचि बोलणें ।।८४।। नातरी पडसादीचीं उत्तरें। जें बोलिजेती तेंचि उमटती अक्षरें। कोणी न बोलतां मौनाकारें। उगेचि असिजें जैसें ।।८५।। तेविं जो जितुके बोले बोलणें। तेणेंसीं तितुकेचि वदिजें वचनें। परि कोण्हासीं अधिक उणे। न बोले मौन ।।८६।। विकाराचा शब्द मुखां नाणी। निंदा कुश्चित न वदे वचनीं। शिवमूर्ति शांत होवोनि। असे तोचि जंगम तारक ।।८७।। स्थिरबुद्धि सदा मदमोहातीत। कुबुद्धि विकारासीं विरहित। मायाममता देहबुद्धि नातळत। व्योमातीत तो ।।८८।। तो त्रिमळाविरहित असे। त्रिमळां कधीं आतळत नसे। तो जंगम मजभीतरीं असे। मी तया आंतबाहेरी ।।८९।। म्हणसी ते त्रिमल कोण। प्रथम आणव मल जाण। दुसरा तो मायीय मल कुलक्षण। आला असे मायावशें ।।९०।। आतां तिसरा तो अवधारी। कर्मज म्हणोनि कार्मिक म्हणती एकसरी। त्याचा कर्ता जीव निर्धारी। बोलिला असे सर्वज्ञें ।।९१।। ऐसिया त्रिमळातें त्यागून। स्वस्वरूपीं असे रममाण। ऐसिया शिवदासां जंगमपण।

सहजचि प्राप्त होय ।।९२।।

माता नास्ति पिता नास्ति नास्ति नाम कुलस्य च। अयोनिसंभवं शुद्धमुत्तमं जंगमस्थलम् ।।८।।

त्यासीं मातापिता नास्ति गोत। त्यासीं नाम नाहीं कूळ जात। अयोनिसंभव सदोदित। चिन्मय चिद्रूप तो ।।९३।। जंगमस्थलाची ऐक थोरी। माता पिता नास्ति जन्मांतरीं। अयोनिज निर्मिला त्रिपुरारी। जंगमवंशाकारणें ।।९४।। याचा महिमा पूर्ण। पाहा शिखामणीची खूण। दुजें पाशुपत प्रमाण। असें सत्य अवलोकी ।।९५।। तेणें होय तें समाधान। स्वधर्मीं राहे अभिमान। धर्मोपदेशकांचें मन। आनंद पावे तेणेंचि ।।९६।। जो जंगम अभिमानी प्रचंड। गुरुस्थलां जाणावया शोधी ब्रह्मांड। तो मूळ स्थळाचा दोर्दंड। पार करी भवार्णवा ।।९७।। स्वधर्मीं निष्ठा ठेवलिया। भवसागरा तरावया। तरी तयाच्या पूर्णकार्या। विघ्नबाधा न होय पैं ।।९८।। गुरु शास्त्रें असत्य मानितां। तरी नरक प्राप्त होय तत्त्वतां। जंगममूळ शोधोनि भजतां। क्रिया राहे अचूक तेथें ।।९९।। क्रियेस्तव शोधावें मूळ। एऱ्हवीं वृथा न करी छळ। वेष पाहिलिया तत्काळ। उत्थान द्यावें भक्तीनें ।।१००।। जो भाव राखी गुरुपदासीं। जो क्रिया भंगू न दे मानसीं। तोचि गुरुपुत्र अविनाशी। पद पावेल सत्वर ।।१०१।। वेषधारी जंगम होती। भ्रष्टाचारें ज्ञातींत वर्तती। ते उभय कुल नरकां नेती। अधर्माभिमानें करोनिया ।।१०२।। याकरितां जंगमकुळीचा जंगमोत्तम।

त्यासींच गुरुपदाचा नेम। म्यां निरोपिला स्वमुखें सुगम। तंत्रांतरीं वेळोवेळां ।।१०३।।

स्वधर्मनिरता माता पिता यस्य तथैव च। तस्यापि जांगमी दीक्षा गुरुसूत्रक्रमेण हि।।९।।

शंकर म्हणे हिमनगबाळा। म्यां तुज निवेदिले जंगमकुळां। शुद्ध जंगमाचाचि पुतळा। योग्य असे गुरुपदां ।।१०४।। कोणी गादीस नवस करिती। पुत्र झालिया गादीस अर्पिती। त्याची दीक्षा करोनि सोडिती। सेवाधारी म्हणोनिया ।।१०५।। त्यानें त्यजूनिया संसार। घेऊन जंगमवेष निर्धार। गुरुसेवा करावी फार। आत्महिताकारणें ।।१०६।। सेवाधारीस दीक्षा असणें। हें तंव शास्त्राज्ञेप्रमाणें। परि पदारूढ होऊन त्यानें। गुरुपद घेऊं नये ।।१०७।। जरी गुरुपद घे कपटें धरून। तरी तया कृतघ्नता घडे जाण। अधर्मी म्हणूनि तयालागून। विश्वास त्याचा न धरावा ।।१०८।। आपण बुडोन दुसऱ्यास बुडवी। स्वधर्माचा अभिमान सोडवी। तेणें तया अधोगतीची पदवी। मिळेल सत्य पार्वती ।।१०९।।

आसप्तमकुलं शुद्धं यस्य चोभयपक्षकम् । तस्य जंगमवंशस्य दीक्षा माहेश्वरी शुभा।।१०।।

याकरितां सत्‌शिष्य जाण। सप्तकुळया शुद्ध पाहून। जंगमदीक्षा तयालागून। द्यावी सत्य उद्धारा ।।११०।। जंगमकुळीचाच शिष्य। पदीं घ्यावयास निर्दोष। उत्तम कूळ शुद्ध विशेष। माहेश्वर पूज्य तोचि ।।१११।। स्वधर्मीचे ठायीं रत। मातापितरांसहित। भूरुद्र अवतार सत्य। गुरुस्थळां

जाणावें ।।११२।। गुरुस्थलाचें माहात्म्य। पूर्वाध्यायीं शिवागमें। वर्णिलें तें अनुपमें। श्रोत्यांलागीं सादर।।११३।।

ये पुनर्भुवाबाह्यास्ते न ग्राह्या: संकरास्तथा। प्रमादात् प्राप्तदीक्षोऽसौ वर्जयेत् श्वानवद् बुधै: ।।११।।

माहेश्वरी दीक्षाकारणें। सप्तकुळ्या विवाहित असणें। तरीच माहेश्वरी दीक्षेते पावणें। पुनर्विवाह माता वर्ज्य ।।११४।। संकर जाति असतां। तरी माहेश्वरदीक्षा नाहीं तत्त्वतां। चुकोनि दीक्षा प्राप्त होतां। त्याचा त्यागचि करावा ।।११५।। जैसा श्वानाचा स्पर्श पाही। तैसा धरावा भ्रष्ट देही। दीक्षा झाली म्हणोनि कांहीं। शंका न धरावी तेथें।।११६।। गुरुस्थलापासोनि जन्म। त्यासींच क्रियेचा नित्यनेम। तोचि स्वधर्माचा धरी प्रेम। पूर्वोघाकारणें ।।११७।। नेमें करी त्रिकाळ स्नान। तैसेच भस्म-उधळण। न स्वीकारी पर-अन्न। सदा कर्मीं पवित्र ।।११८।।

देहो नास्ति कुलं नास्ति नास्ति जिव्हारुचिस्तथा । नास्त्यासंग: संगो न श्रेष्ठं तज्जंगमस्थलम्।।१२।।

जेथें देहचि नास्ति। तेथें कुळयातीस कैसी गति। सर्वव्यापक स्वयंभू मूर्ति। परि मूर्तीचा साक्षी तो ।।११९।। मूर्ति-अमूर्तिविरहित। वर्णाश्रमांसी अतीत। दर्शनाभिमानां नातळत। शुद्ध जंगम तो ।।१२०।। पांची इंद्रियें हातीं न धरी। काम्य कर्मेंद्रियां कैंची उरी। तेथें लंपट जिव्हारुचीवरी। काय होईल वो ।।१२१।।

तयासीं भुकेचिया तोंडा। मिळो कोंडा अथवा मांडा। परि दु:खां नसे वरपडा। रसनेसाठीं ।।१२२।। जो संतुष्ट सदा जंगमलिंग। तो न करी हकहक न इच्छी भोग। ऐसा सत्यशरण जो चांग। तो त्रैलोक्यांसीं वंद्य ।।१२३।। संग कुसंगासीं न धरी। नि:संग एकाकी निर्विकारी। ऐसा जंगमस्थळीं निर्धारी। उत्तम जंगम तो ।।१२४।।

शांत्यैव भस्ममुद्धूल्य शुचित्वमणिभूषणम्। विषयान् शिक्षितुं दंडं परतत्त्वं चं खर्परम् ।।१३।।

शांत निवांत ते शरण। नित्य करी भस्मस्नान। सदा शुचित्व असे अंत:करण। गंगाजळाहूनि ।।१२५।। नातरी त्रिकाळ स्नान करी। द्वादश टिळे लावी शरीरीं। जरी त्रिगुण मळकट अंतरीं। तरी ते विटंबना कीं ।।१२६।। म्हणोनि अंतरीं ज्ञानें शुद्ध झाला। बाहेरी क्रियेनें क्षाळिला। शुद्ध शुचित्व बोलिला। शिवाचारसंपन्न तो ।।१२७।। ऐसें शुचित्वलक्षण। तें रुद्राक्षमाळा भूषण। सुवर्ण हिरे रत्न मुक्ताफळ जाण। हें भूषण नोव्हे त्यासी ।।१२८।। त्याचें भूषण तें शुचित्वलक्षण। येर ते तया तृणासमान। विवेकाचा दंड करोन। विषयासीं दंडी सदा ।।१२९।। धरोनि विवेकाचा दंड करी। विकारा पशुत्वातें निवारी। परमतत्त्वाची हाती खापरी। येणें भूषणें भूषित तो ।।१३०।।

रूपारूपं समाख्यातं कामनिष्काम एव च। मायानिवारणेनोक्तमेतज्जंगमलक्षणम् ।।१४।।

रूपा अरूपत्वें मानी। चांगलें वोखटें न करी कडसणी। जें जें दिसे तें तें शिवार्चनीं। निंदास्तुति दोन्ही न करी ॥१३१॥ काम निष्काम नाहीं भावना। माया सांडोनि निर्माय झाला हे आठवेना। निराकार निर्माय जाणा। वस्तु आपण ॥१३२॥ हेचि भावी भावनेरहित। मा निर्मायेसीं नातळत। परात्पर होवोनि असत। येणें लक्षणें ॥१३३॥

पंचाक्षरं पंचवक्त्रं प्रणवं मूर्तिसंयुतम्। परत्वस्य परित्राणं श्रेष्ठं तज्जंगमस्थलम् ॥१५॥

पंचाक्षरी पंचमुखी जाण। ती पंचमुखें ओंकारापासून। ओंकार परतत्त्वापासून उत्पन्न। तें परतत्त्व जो जाणें ॥१३४॥ तें परतत्त्व गुरुमुखें जाणोनि। मग तेंचि असे होवोनि। जागृतिं सुषुप्तिं स्वप्नीं। पालटु नाहीं जया ॥१३५॥ तो मनुष्यदेही ही भावना। न भावून वस्तुत्वे भावी आपणा। तोचि जंगम श्रेष्ठ जाणा। शिवाचारासीं गुरु होय ॥१३६॥

आचारो वाप्यनाचारो सीमा निःसीमवर्जितः। गमनागमनं नास्ति स एवोत्तमजंगमः ॥१६॥

त्यासी आचार अनाचार नाहीं। कोण्ही म्हणती तें बोलणें कांहीं। तरी याचा निर्णय पाही। निरोपुं वो देवी ॥१३७॥ तो आचार करोनि अकर्ता। म्हणोनि आचार नाहीं सर्वथा। अनाचार तरी तत्त्वतां। आचरेचि ना ॥१३८॥ म्हणोनि आचार अनाचार नाहीं। बोलिलो तेहि अनुभवें पाही। एऱ्हवीं आचार

सोडो नये कांहीं। जरी वस्तुरूप झाला ।।१३९।। हरपली वस्तु तरी दीपु पाहिजे। सापडलिया मग दीपु त्यागिजे। येणेंपरी क्रिया त्यागिली म्हणिजें। तरी न मानिती संत या बोलां ।।१४०।। क्रिया करितां वस्तुचि जरी झाला। तरी न त्यागिजें आचाराला। जरी आचारत्यागी तरी मोडिला। भक्तिपंथ आपणचि ।।१४१।। येथें त्याग-अत्यागाचा सोस नाहीं। जरी गुरुकृपें आपणचि वस्तु होई। तरी सहजचि ढाळे ढाळे राही। आचारक्रिया ।।१४२।। तो आचारक्रिया करोनि अकर्ता। फळहेत नाहीं त्याचें चित्तां। तेथ मी मा न मा कोण म्हणतां। माझें तुझें ।।१४३।। तया गमनागमन तरी नाहीं। जरी गमन करी तरी ठायीचा ठायीं। देह हिंडतां आपण पाही। स्थिर अढळ असे तो ।।१४४।। कुंभाराचे चाकाखालील। खुंटा जैसा असे अढळ। तैसा गमनागमनीं निश्चळ। मेरु जैसा ।।१४५।। त्याचे इतुकेचि अर्थवर्म। जे अकर्ता केवळ परब्रह्म। सृष्टीं विचरे भक्ताचें प्रेम। घ्यावयालागीं ।।१४६।।

जंगमे गमनं नास्ति स्याच्चेत्तद् भक्तमन्दिरम्। अन्यस्य गृहमिच्छेद्य: सद्यो गोमांसभक्षणम् ।।१७।।

जंगमासीं नाहीं गमनागमन। जरी उठेचि मनीं गमनकारण। तरी भक्ताचे गृहीं जाणें जाण। निराशपंथें ।।१४७।। अभक्त भवीच्या गृहासीं। जावयाची इच्छा धरी मानसीं। तरी गोमांसभक्षण घडे त्यासीं। पातकिया होय तो ।।१४८।। अभक्त भवि म्हणिजे कवणासीं। पंचकळश दीक्षा नाहीं ज्यासीं।

गुरूविण जीवे त्या निगुरीयासीं। अभक्त भवि बोलिजें ।।१४९।। शिवभक्त म्हणवी आपणासीं। पुजी आन दैवतासीं। अभक्त भवि बोलिजें त्यासीं। अनाचारी म्हणोनि ।।१५०।। तीर्थप्रसादाची वार्ता। कधी कोणे काळीं नेणें सर्वथा। लिंगपूजनीं नावडी चित्ता। तो गे तोचि भक्त भविया ।।१५१।। ऐसिया भवीच्या घरासीं। जरी इच्छा धरी मानसीं। तरी आमिषभक्षण घडे त्यासीं। यालागीं भविसंग त्यागिजें ।।१५२।। पंचकलश दीक्षा शिवमंत्र ज्यासीं। एक जाणे गुरु-लिंग-जंगमासीं। तीर्थप्रसादी प्रेम भक्त बोलिजें त्यासीं। त्याच्या घरां सुखें जाणें ।।१५३।।

भक्तेन सुखगोष्टिः स्याद् धनं भक्तप्रतिग्रहम्। भक्तैः सह वसेन्नित्यं भक्तानां गृहसंगभाक् ।।१८।।

ऐसिया शिवभक्ताचे घरीं जाईजें। त्यासीं गुह्य गोष्टी बोलिजें। त्याचें अन्न धन दान प्रतिग्रह घेईजें। गुरुकरजात म्हणोनि ।।१५४।। जो एकभावें पुजी गुरु-लिंग-जंगम। ज्यासीं तीर्थप्रसादीं नित्यनेम। त्याचा संग कीजें उत्तम। भविसंग त्यागोनिया ।।१५५।।

भक्तस्त्रीभक्तहस्तेभ्यः शुचिरन्नं प्रतिग्रहः। भक्तकायनिवेद्यं च इत्येतज्जंगमस्थलम् ।।१९।।

भक्ताचे स्त्रीचे हस्ताकुन। सेवा घेईजे प्रेमभक्तिकुन। भक्ताघरींचें अन्नपाणी सेवन। क्रियामुखें कीजें देवी ।।१५६।। ज्या भक्तें तन मन धन अर्पण। त्याची काया कीजें पावन। ऐसें हें जंगमस्थान।

निरोपण करी शिव भक्तीं ।।१५७।। वीरशैवाचे संस्कार। गर्भादि अंतकालावर। लिंगधारीनें सत्वर। गुरुहस्तें करवावें ।।१५८।। गुरु तोचि असे देख। उपगुरूचा वंशक। तया हस्तें ही मांत्रिक। क्रिया करावी शास्त्राज्ञें ।।१५९।। शिवाचारासीं जंगम गुरु। ऐसा आगम गर्जे मेरु। तोचि करील भवपारु। वीरशैवांलागूनि ।।१६०।।

लिंगार्पितं न कर्तव्यं कर्तव्यं जंगमार्पितम्। लिंगजंगमसंयुक्तं जंगमस्य विशेषत: ।।२०।।

जंगममुखेविण अर्पण। लिंगासीं नोव्हे हो जाण। समीप जंगम न होता नैवेद्यन। स्वमुखें कीजें तें ऐका ।।१६१।। अन्नावरोनि हात फिरवोनि लिंगासीं दाविजें। तोचि हस्त मुखां लाविजें। येणेंचि परी तीन वेळां कीजें। निवेदन लिंगासीं ।।१६२।। लिंगजंगमसंयुक्तेकुन। प्रसाद कीजें विश्वासेकुन। तोचि जंगम त्रिजगती पावन। मजहि पूज्यमान तो ।।१६३।। लिंगासीं दाविल्याविण तृणकाडी। न सेवी सर्वथा थोडी। विष अथवा अमृतगोडी। विसरोन तो न घाली मुखीं ।।१६४।। हे कां म्हणसी तरी ऐक। गुरु लिंग जंगम तिन्ही एक। म्हणोनि लिंगासीं पुजितां देख। गुरुचि पुजिला होय ।।१६५।। तैसाचि जंगम पुजितां देख। गुरु पुजिला होय विशेख। म्हणोनि गुरु-लिंग-जंगम एक। भावें पुजी तो जंगम अथवा भक्त ।।१६६।। कोणी म्हणती जंगम तो परब्रह्म। त्यासीं पूजेचा कायसा नेम। वस्तु झालिया

क्रियाकर्मधर्म। कायसा तयासीं ।।१६७।। तरी यदर्थी उत्तर ऐकिजें। शिव शिवेचि यजिजे। हें उत्तर श्रुतिशास्त्रीं बोलिजें। जाणती शिवशरण ।।१६८।। देव होवोनि देवां भजिजें। आपुलिया भक्तिसुखां आपण घेईजें। आपणचि भक्तिसुखां वाढविजें। आपुलिया सुखासाठीं ।।१६९।। जेणें जीवासीं दिधलें शिवपण। आणि रंकासीं रावपण। म्हैशासीं सिंहपण। दिधलें ज्या गुरूने ।।१७०।। त्या गुरूची न कीजें कैशी भक्ति। न करितां जाय अधोगति। सायुज्याचे माथां नांदती। गुरुभक्ति वो देवी ।।१७१।। भक्तीविण नुसतें ज्ञान। तें जैसें नासिकेविण मुख जाण। यालागीं भक्तिवैराग्यज्ञान-। संपन्न तो उत्तम जंगम ।।१७२।।

स्थावरार्पितनैवेद्यं न मे स्यात् तृप्तिकारकम्। जंगमार्पितनैवेद्यं मम तृप्तिकरं परम् ।।२१।।

स्थावरीं करितां निवेदन। तेणें मी तृप्त नोव्हे त्रिनयन। जंगमलिंगीं करितां अर्पण। मी तृप्त होय वो देवी ।।१७३।। ज्यासीं नाहीं शिवाचार। त्यानें पुजिजें स्थावर। ज्याचें हृदयस्थळीं शंकर। त्यानें स्थावर पुजूं नये ।।१७४।। अमान्य करोनिया हृदयींचें लिंग। जो धरी स्थावरीं भक्ति-अंग। तो शिवभक्त नोव्हे केवळ सोंग। बहुरूपियाचें ।।१७५।। इष्टलिंग लोळतसे उराखालीं। अन्य स्थावरां दंडवत घाली। त्याचें मुख देखतां अंघोळी। वस्त्रांसहित करावी ।।१७६।। गळां असोनिया त्रिनयन। जो अन्य देवताचें

करी उपासन। तो भवीहून परता जाण। लिंगनिष्ठा नाहीं म्हणोनिया ।।१७७।। यालागीं लिंगीं निष्ठा धरिजे। जंगमहि तद्रूप मानिजें। जंगममुखें लिंगासीं अर्पिजें। तेणेंपरी तृप्त वो पार्वती ।।१७८।।

निराकारं च साकारं निर्विकारं सुखावहम्। साक्षान्मुक्तिप्रदं भावमुत्तमं जंगमस्थलम् ।।२२।।

जंगमस्थळ तें निराकार। तेंचि बोलिजें साकार। साकार होवोनि निर्विकार। षड्विकारविरहित ।।१७९।। ते षड्विकार म्हणसी कोण। जायते स्थिति विवर्धते तीन। चौथा विपरिणमते पांचवा अपक्षियते जाण। मृत्यु तो साहवा विकार ।।१८०।। या विकारांचा निर्णय सांगेन। जायते म्हणिजे जन्मला आपण। अज अजन्मा आत्मा असोन। मी जन्मलो हा विकार वाहे ।।१८१।। स्थिति म्हणिजे मी एक इथें आहे-। नाहीं हें आत्म्यास नाहीं पाहे। तो सदोदित अस्ति नास्ति होय ना जाये। ऐसें असोनि मी एक आहे म्हणे ।।१८२।। मी एक आहे म्हणिजे स्थिति। तो मी नाहीं होईन हेहि वाटे कीं चित्तीं। असे नसे मी हा विकार दुसरा स्थिति। श्रुति बोलती ग्वाही ।।१८३।। तिसरा विवर्धते विकार। म्हणे मी वाढतो होतो लहान झालो थोर। आत्म्यास वाढणें लहान थोर आकार। घडे काय तो ।।१८४।। आत्म्यासीं विवृद्धि वाढणें नाहीं। तो जैसा तैसा असे तिहीं अवस्थांच्या ठायीं। ऐसे असतां म्हणे मी वाढतो देहीं। हा विकार वाहे नसतांचि ।।१८५।। विपरिणमते विकार चौथा। मी तरुण विषयविलासभोक्ता। ऐसी

तारुण्याची वाहे अवस्था। विसरोनि आपणिया ।।१८६।। आत्मस्वरूप तें तरी स्वत:सिद्ध। त्यास कैसें बाल्य तारुण्य वृद्ध। ऐसा असोनि निजबोध। मी तरुण हा विकार वाहे ।।१८७।। अपक्षियते तो विकार पांचवा जाण। म्हणे मी म्हातारा मज वृद्धपण। आतां मज येणार मरण। ही घोकणीच राहे चित्तीं ।।१८८।। वृद्ध-अवस्था आत्मत्वीं न लगे। तंव मृत्यु-अवस्था कैसी लागे। मी मरेन हा विकार वाहे अंगे। नाथिलाचि देहबुद्धि ।।१८९।। आत्मा जरी जरामरणातीत। त्यासीं जन्मला ही स्थिति वाढवीत। तारुण्य वार्धक्य मृत्यु भावीत। हे साही विकार नसतांचि ।।१९०।। ऐसिया षड्विकारांसीं नातळत। म्हणोनि सदा सुखरूप सदोदित। तोचि उत्तम जंगम जगभरित। सद्गुरु बोलिजें त्यासीं ।।१९१।। तो साक्षात् प्रभु साक्षिभूत। त्यासीं चार्‍ही मुक्ति शरणागत। तो पावला निर्गुण मुक्ति निभ्रांत। हेंहि बोलणें न्यून वो देवी ।।१९२।। बद्ध म्हणिजे बांधिला। मुक्त म्हणिजे सुटला। बंधमुक्तीचा निर्णय केला। हाच कीं साधुजनीं ।।१९३।। जो मुळीच बांधला नाहीं। त्यासी सुटला म्हणणें काई। म्हणोनि बद्धमुक्तावेगळा पाही। जंगम तोचि जाणिजें ।।१९४।। स्वप्नीं राजा मोळीविक्या झाला। जागृति आलिया पाहो लागला। तंव राज्यपदीं देखे आपणाला। स्वप्न मिथ्या जाहलें ।।१९५।। जरी राजा स्वप्नीं मोळीविक्या झाला। तरी राजपदां काय मुकला। निद्रेस्तव भास जो भासला। तो लटिका नसताचि ।।१९६।। तैसें लटिकेचि

बांधलेपण। तें सत्यत्वें भासे संकल्पें जाण। तो गुरुकृपें संकल्प गेलिया निमोन। मग कोण बद्ध मुक्त म्हणे ।।१९७।। ऐसा बंधमुक्तीसीं विरहित। षड्विकारांसीं अतीत। ऐसिया जंगमाचें मी करीत। ध्यान वो देवी ।।१९८।। तो धीर गंभीर अचल अढळ। अकूळ अमूळ अद्वैत अकळ। अव्यक्त अविनाश अमळ। त्रिमळाविरहित ।।१९९।। अनाम अगम्य अगोचर। अनुपम्य अलक्ष अपरंपार। अकल्पित असंग अगणित अपार। नेणवे कोणां ।।२००।। निर्गुण निराकार निजरूप। निर्धुत निरामय निर्विकल्प। निष्प्रपंच नि:संग निष्पाप। निर्वैर सर्वांभूतीं ।।२०१।। निराश निश्वास निराभास। निर्गम्य निरुपम निजानंद नि:शेष। निश्चळ निरिच्छ निर्दोष। निरंजनमूर्ति जंगम ।।२०२।। जगदाकार जगन्निवास। जगद्रूप जगन्नायक जगदीश। जगज्जीवन जनीं वनीं वास। सर्वत्र जयाचा ।।२०३।। व्यापून सकळ ब्रह्मांडास। सर्वत्र असे जयाचा वास। परब्रह्म पुरुष अविनाश। जंगम तो ।।२०४।। परब्रह्म परमेश्वर परमानंद। परवस्तु परात्पर प्रसिद्ध। परमगहन परंधाम निजानंद। परमपावन जंगम तो ।।२०५।। चिद्रूप चैतन्य चिद्घन। चिदानंद चिन्मात्र पूर्ण। चिदैक चिद्विलास चैतन्यघन। सच्चिदानंद तो ।।२०६।। सदोदित सबराभरीत। सद्रूप सदोदित सदा शांत। सत्स्वरूप सद्बोध सुमत। कुमतातीत जो जंगम ।।२०७।। जो स्वयें प्रभुरूप झाला। पुन: काय वर्णावें तयाला। अमृतां गोड ऐसें बोलतां बोलां। बोलचि लाजे ।।२०८।।

कां गोडचि त्यासीं गोड म्हणणें । म्हणतां म्हणणिया उणे । गोडचि त्यासीं गोडपणें । काय स्तविजें ।।२०९।। तैसें अनुपम्य वस्तु पूर्णपणें । जें असें तें आपण झाला गुरुकृपेनें । त्यासीं काय वर्णावें कवणें । तेथें वेदश्रुति थकित ।।२१०।। ऐसा जंगम तो शिवमूर्ति । निराभास भासेना कोणाप्रति । अढळ ढळेना प्रळयकल्पांतीं । म्हणोनि निश्चळ सदा तो ।।२११।।

नादं निश्चललिंगस्य बिंदुर्निश्चलजंगमः । नादबिंदुसमायुक्तं श्रेष्ठं तज्जंगमस्थलम् ।।२३।।

लिंगासीं नाहीं जैसा नादु । तैसा जंगमासीं नाहीं बिंदु । नादबिंदुसमायुक्तं ऐसा बोधु । जंगम-लिंगासीं असे ।।२१२।। लिंग नादाविण मौन केवळ । न बोले कोणासीं असे निश्चळ । तैसा जंगमहि न बोले कोणासीं निवळ । होवोनि असे तो ।।२१३।। तयासीं बोलणें तरी नाहीं । परि परोपकारार्थ बोले जरी कांहीं । ज्या बोलें सुख होय परदेही । तैसें बोलणें बोलें ।।२१४।। म्हणोनि नादबिंदूसीं अतीत । नाद तें बोलणें नाहीं बहुत । नाद जिंतिला मौनें निश्चित । होवोनि ठेला ।।२१५।। परि आपुलें क्रियाकर्मे करी । केलियाची सय न धरी अंतरीं । प्रवृत्ती लौकिक बोल जिव्हाग्रीं । नाणी कदा तो ।।२१६।। म्हणोनि नादातीत जंगम । बिंदु तरीच तो निःसीम । तो शिवभक्तिरूप देखे परब्रह्म । तंव बिंदु कैंचा तया ।।२१७।। यालागीं नादबिंदुकलाज्योति- । विरहित जो परब्रह्ममूर्ति । हें उत्तम स्थळ वो पार्वती । निरोपिलें तुज ।।२१८।।

ही जंगमलक्षण स्थिति। देवी निरोपिली तुजप्रति। हे ऐकोनि ऐसे जे होती। ते धन्य होती संसारीं ।।२१९।।
जंगम ऐसें म्हणवावें। आणि या लक्षणीं न वर्तावें। तरी तें सोंग जाणावें। मैंदाचिये घरीचें ।।२२०।।
यालागीं धन्य तोचि जंगम। जो येणें लक्षणें वर्ते उत्तम। तोचि जाणिजें परब्रह्म। मीहि वंदी तयातें ।।२२१।।
हें जंगमस्थळ पतितपावन। पार्वती तुज निरोपिलें प्रेम जाणोन। ऐकतां सद्भाव धरोन। शिवलोकां पाविजें ।।२२२।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। शिवगौरीसंवादीं वर्तत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृत्य मन्मथ ।।२२३।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे जंगमस्थलनिरूपणं नाम दशमोऽध्याय: समाप्त: ।।

श्लोक २३, ओव्या २२३.

❑

अध्याय अकरावा

॥श्रीशिवाय नमः॥

मागील अध्यायीं जंगममाहात्म्य । श्रीपरमात्में वर्णिलें अत्युत्तम । परमरहस्य अनुपम । विशेषेकरून वर्णिलें ॥१॥

देव्युवाच-

को भेदो नादरूपस्य बिंदुभेदस्तथैव च। कलारूपमिदं देव ब्रूहि मे परमेश्वर॥१॥

पार्वती म्हणे देवाधिदेवा। नादरूपाचा भेद निवेदावा। बिंदुभेद तोहि दाखववावा। कळारूप तें कोण कैसें॥२॥ त्याचा निरोपावा भेद। मी अज्ञानी मतिमंद। पुरवावा माझा हा छंद। कृपाळुत्वें परशिवा॥३॥

शिव उवाच-

नादो गुरुमुखं चैव बिंदुर्लिंगमुखं तथा। कला चरमुखं ज्ञात्वा अर्पयेत् स प्रसादभाक्॥२॥

ईश्वर म्हणे पार्वतीप्रति। ऐक नादबिंदूची स्थिति। सूक्ष्म म्हणती जयाप्रति। तेंचि तुज निवेदितो॥४॥ नाद तो जाणावा शब्द। तयाचें स्थान ध्युःशुद्ध। गुरुत्वास तो प्रसिद्ध। आला असे जाण पां॥५॥

म्हणोनि नाद गुरुच म्हणती। योगी योग्यां संकेतें जाणविती। अंतरीं आनंदें पोतीं भरती। मापें देती हर्षोनिया ।।६।। बिंदूचा कैसा विचार असे। तोहि सदा लिंगरूप भासे। लिंग तो परब्रह्मचि असे। म्हणोनि बिंदु म्हणती तया ।।७।। कला ती चरलिंगीं जाणावी। अव्यक्तां व्यक्तत्वास आणवी। क्रियारूप असोनि आघवी। मोक्षमार्गा दावीतसे ।।८।। ऐसा कलेचा महिमा। शिव सांगे ऐके उमा। प्रश्नोत्तराची सीमा। न वदवे मुखानें ।।९।। आतां सांगू मुख्य खूण। जेणें ज्ञान होय परिपूर्ण। ते संक्षेपेंकरून। निरोपुं आतां ।।१०।। नाद तो गुरुमुखें जाणिजें। बिंदु तो लिंगमुखें ओळखिजें। कला तें जंगममुख म्हणिजें। ऐसा त्रिविध भेद हा ।।११।। नाद बिंदु कला हे तिन्ही। गुरु लिंग जंगम जाणोनि। अर्पू जाणें भावें प्रसादमुखेंकरूनि। तोचि प्रसादी पुरुष ।।१२।। तोचि प्रसादी महाज्ञानी। अज्ञानांधा होय तरणी। जयाचे संसर्गेकरूनि। ज्ञान होय मूढ जनां ।।१३।। प्रसादी म्हणावें कोणासीं। गुरु लिंग आणि जंगमासीं। ऐक्य भावूनि मानसीं। वर्ते निर्मत्सरीं सदा ।।१४।। ऐशा त्या नाद बिंदु कळा। प्रसादीं मिळाल्या सकळा। ऋद्धिसिद्धीचा पूर्ण मेळा। प्राप्त होय प्रसादिकां ।।१५।। जे प्रसादिक होऊ इच्छिती। त्यांनीं शरण जावें गुरुप्रति। पाहूनिया शिष्याची आचारशक्ति। स्वशील द्यावें आवडीनें ।।१६।। शील चालविण्याकरितां। पाहिजे कुटुंबाची श्रद्धा तत्त्वतां। स्वधर्माभिमानें वर्तता। क्रिया राहे सतेज पैं ।।१७।। क्रियाचारें जो

तेज:पुंज। तया भितो यमराज। तपश्चर्येचें मूळ बीज। थोरी जाण क्रियेची ।।१८।।

नादबिंदुकलारूपं तद्रूपं भुवि निर्मलम्। गुरुजंगमलिंगाय ज्ञात्वा सततमर्पयेत् ।।३।।

नादबिंदुकळारूप। हें गुरुलिंगजंगमाचें स्वरूप। जाणोनि नित्य अर्पण करी तो निजरूप। उत्तम जंगम ।।१९।। नादबिंदुकलेचें रूप। वरी वर्णिलेंसे अमूप। त्रिविध ऐक्य भक्तिस्वरूप। जाणोनि अर्पी जंगम तो ।।२०।।

एवं लिंगमुखं ज्ञात्वा अंगभावेन भावितम्। जंगमस्य मुखं ज्ञात्वा संसारस्य न बंधनम् ।।४।।

जंगममुख सर्व मुखाधिक। त्याचाहि भेद ऐक। देहभावनेस जाणिजें लिंगमुख। लिंगमुखें प्राण सुखी ।।२१।। लिंगमुखीं जें जें होय अर्पण। तेणें अर्पणें सुखी होय आपण। परि लिंगार्पण जंगममुखें जाण। लिंगाचें मुख जंगम ।।२२।। म्हणोनि जंगममुखेविण। लिंगासीं नव्हे अर्पण। यालागीं जंगम चैतन्यघन। परब्रह्मचि तो ।।२३।। ऐसिया जंगमाचें करी जो पूजन। विश्वासें सद्भाव धरोन। त्यासीं नाहीं भवबंधन। तो चिद्रूप होय ।।२४।। त्याचे मुखीचा प्रसाद चरणीचें तीर्थ। जो सेवी विश्वासें परम भक्त। त्यासीं कळिकाळ येती शरणागत। मा भवबंधन कैचें त्यां ।।२५।।

प्रसादस्य मुखं ज्ञात्वा परं चेह न विद्यते। त्रिविधैक्यमिदं देवि ज्ञातव्यं सोहऽमेव च ।।५।।

ऐसा प्रसादमुखेंकरून । जो जाणोन भजे ऐक्यभावें सज्जन । त्यासीं इह पर जाण । इच्छिणें नाहीं ।।२६।। गुरु लिंग जंगम त्रिविध । ऐक्यभावें भजे भावना शुद्ध । तोचि भक्त तोचि जंगम निबद्ध । तारक शिवाचारासीं ।।२७।। तोचि मी मी तोचि जाणिजें । तया मज भेद न मानिजें । तयाचेनि देवपण माझें । एऱ्हवीं मी देव ना भक्त ।।२८।। पाहतां मी निर्गुण निराकार । भक्तिसुखास्तव धरिला अवतार । त्याचें योगें मी देव साचार । तो भक्त म्हणोनि ।।२९।। भक्तांगें देव देवांगें भक्त । एऱ्हवीं तो देवभक्तनामाविण सदोदित । परि आपुलिया सुखां देव भक्त । आपणचि होवोनि ठेला ।।३०।। देव भक्त एकचि असत । परि सापेक्ष ऐसी असे मात । नसतां देव कोठील भक्त । आपणचि सर्वत्र भरला असे ।।३१।। तीच वस्तु इष्टलिंग प्राणलिंग । होऊनि ठेली भावलिंग । भक्तिसुखालागीं रूपें अभंग । अनेक धरिली प्रभूनें ।।३२।।

देव्युवाच-

इष्टलिंगमुखं किं वा प्राणलिंगमुखं तथा। भावलिंगमुखं चैव ब्रूहि मे परमेश्वर ।।६।।

पार्वती म्हणे सदाशिवा । इष्ट प्राण आणि भावां । या लिंगत्रयीं प्राण अर्पावा । हें पूर्वी कथिलेसे ।।३३।। तरी याचीं वदनें किती । तीं सांगावी मजप्रति । तरीच मी धन्य धन्य त्रिजगती । होईन सत्य स्वामिया ।।३४।। इष्टलिंगासीं मुखे किती । निरोपावी कैलासपति । प्राणलिंगासीं कोण मुख गति । मुखे

किती भावलिंगासीं ।।३५।।

शिव उवाच-

इष्टलिंगमुखं पंच प्राणलिंगस्य तत्तथा। पंच एव मुखं देवि भावलिंगस्य कीर्तितम् ।।७।।

शंकर म्हणे वो गौरी। मीच वसे लिंगाभीतरीं। मम मुखेंचि निर्धारी। असती सर्व लिंगां ।।३६।। इष्टलिंगासीं मुखें पांच जाण। प्राण अपान व्यान उदान समान। हे पांची प्राण पांच मुखें नेमून। इष्टलिंगासीं ।।३७।। इष्टलिंगासीं प्राण। मिश्रित झाला आपण। म्हणोनि प्राणलिंग ऐसें उच्चारण। प्राणलिंगां बोलिजें ।।३८।। इष्टलिंगासीं प्राण समरसला। म्हणोनि प्राणलिंग नांव पावला। त्याचीं पंचमुखें लाधला। समरसला यालागीं ।।३९।। इष्टलिंगासीं भाव मिश्रित झाला। म्हणोनि भावलिंग नाम पावला। तोचि पांच मुखें लाधला। समरसला यालागीं ।।४०।। पांची प्राणमुखेंकरून। जे जें होय अर्पण। तें तें इष्टलिंगासीं जाण। त्याचीं मुखें म्हणोनिया ।।४१।। प्राणलिंग भावलिंग निगुती। इष्टलिंगीं मिश्रित असती। म्हणोनि तेंहि लाधती तृप्ति। जी होय इष्टलिंगासीं ।।४२।। ऐसा इष्ट प्राण भाव लिंग। हे तिन्ही मिळोन एक अंग। करोनि पुजी तो पावे पद अभंग। जंगम अथवा भक्त ।।४३।। त्रिविध ऐक्य मानोनि करी पूजा। तेणें संतोष वृषभध्वजां। होतसे अनायासे कैलासराजा। लिंगपूजा श्रेष्ठ ही ।।४४।।

देव्युवाच-

इष्टप्राणादिलिंगानां पूजनस्य च को विधिः। भावलिंगस्य का पूजा सर्वं कथय विस्तृतम्।।८।।

गिरिजा पुसे ईश्वरासीं। इष्टलिंगासीं पूजा कैसी। प्राणलिंग-भावलिंगासीं। पुजिजें कैसें।।४५।।

शिव उवाच-

अष्टविधार्चनं कुर्यात् इष्टलिंगस्य पूजने। प्राणलिंगानुसंधानं प्राणलिंगस्य पूजनम्।।९।।

ऐक इष्टलिंगाचें पूजन। गंध धूप दीप अष्टविधार्चन। नैवेद्यफलतांबूलादि समर्पण। इष्टलिंगासीं कीजें।।४६।। बरवा त्रिकाळ साधून। एकान्त स्थानीं करी पूजन। गुरुरूप लिंगासीं भावून। पुजिजें वो देवी।।४७।। ऐक आणिकहि पूजन। घंटा चामर दर्पण। काडवाती कर्पूरदहन। अनेक विधार्चनीं पुजिजें।।४८।। ऐक प्राणलिंगाचें पूजन। ध्यान धरिजें मानस दृढावून। ध्यानीं लिंग आणिजें गुरुभावेंकुन। प्राणलिंगपूजन या नांव।।४९।। या षोडशोपचारें वोजें। मानसपूजा बरवी कीजें। येणेंपरी संतोषविजे। प्राणलिंगालागोनि।।५०।।

मनोलयपरे तत्त्वे भावलिंगस्य पूजनम्। एतल्लिंगार्चनज्ञानं विशेषं श्रुणु पार्वति।।१०।।

मन तल्लीन ठेवोनि लिंगासरिसे। लिंगामाजीं समरसोनि असे। मनां मनपणाचा आठवु नसे। त्या

नांव भावलिंगपूजा ।।५१।। मनाचें रूप तें संकल्प विकल्प जाण। ते संकल्प विकल्प गेलिया निमोन। मग मनासीं कैंचे मनपण। त्या नांव मनोलयपूजा ।।५२।। ऐसें मनोलयपूजन। तेंचि भावलिंगाचें अर्चन। घडे जया तयाचें विशेष ज्ञान। ऐक वो पार्वती ।।५३।। या तिन्ही पूजा लिंगासींच घडती। त्रिविध भावें एकचि लिंगमूर्ति। ते गुरुत्वें ऐक्यस्थिति। पुजिजें एकत्वें ।।५४।। ऐसें त्रिविध मिळोनि एक लिंग। तें श्रीगुरूचेंचि निजांग। म्हणोनि लिंगासीं जी पूजा कीजें चांग। ती गुरूसीं अर्पण होय ।।५५।। म्हणोनि लिंग तें परमेश्वर पूर्ण। कां म्हणसी तरी गुरु-लिंगासीं नाहीं भिन्नपण। जें परब्रह्म तेंचि गुरु चैतन्यघन। यालागीं लिंग तें परब्रह्म ।।५६।। ऐसी जो नित्य करी भावलिंगपूजा। तेणें वश केला कैलासराजा। स्वधर्माचा पाया मूळ बीजां। अधिकारी होय तो ।।५७।। भावलिंग हेचि भक्ति-अंग। विश्वभरीं असे त्याचा वेग। प्राणिमात्रीं हें तत्त्व वसें चांग। म्हणोनि धर्मवृत्ति असे ।।५८।। जयाची भावभक्ति निमाली। तुच्छत्वें बुद्धि फांकली। त्याचिया धर्मां भ्रष्टता आली। हें सांगणें कासया ।।५९।। जो धर्मघ्न होय तर्कटी पूर्ण। धर्मज्ञें त्याचें न पाहावें वदन। पंक्तिसमागमें न करी भोजन। दुष्टां शासन हेचि पैं ।।६०।।

देव्युवाच-

इष्टलिंगार्पितं किं वा प्राणलिंगार्पितं तथा। भावलिंगार्पितं तद्वद् ब्रूहि मे परमेश्वर ।।११।।

पार्वती म्हणे लिंगमूर्ति। लिंगत्रयाची अर्पणस्थिति। मज निरोपावी पशुपति। जग-उद्धाराकारणें ।।६१।। इष्टलिंगासीं कोणा अर्पणें तृप्ति असे। प्राणलिंगीं तृप्ति कैसी वसे। भावलिंगीं तृप्ति जगदिशे। निरोपावी कैसी ती ।।६२।।

शिव उवाच-

इष्टलिंगार्पितं अंगं प्राणलिंगार्पितं मनः। भावलिंगार्पिता तृप्तिरित्यवेहि वरानने ।।१२।।

शिव म्हणे गिरिजे ऐक खूण। इष्टलिंगां शरीर कीजें अर्पण। प्राणलिंगां अर्पिजें मन। भावलिंगासीं तृप्ति पैं ।।६३।। देहबुद्धीचा सर्वस्वें त्याग कीजें। त्या नांव इष्टलिंगार्चन सहजें। मनाचें चंचळत्व अर्पिजें। प्राणलिंगार्चन त्या नांव ।।६४।। जें जें घडें तयास तृप्ति। तें तें भावलिंगां अर्पणस्थिति। यापरी त्रिलिंगीं अर्पणगति। निरोपिली तुज ।।६५।। आणिक सांगतो तुज एक। लक्ष देवोनि ऐक सम्यक्। इष्ट देह असे नैष्ठिक। जीवालागीं निश्चयें ।।६६।। देह हा इष्टलिंगार्पित असे। इष्ट देहीं इष्टलिंग वसें। आन देहीं तो न वसें। अलिंगी जाण बोलती तया ।।६७।। इष्टलिंग वीरशैवास। तयें त्यासी अर्पिलें शरीरास। प्राणलिंगार्पित मानस। तृप्ति जाण भाव-लिंगां ।।६८।। लिंगधारी महायोगी। जे विनटले भावलिंगीं। तयाची इच्छा

अहंता जगीं। न प्रवर्ते कालत्रयीं ।।६९।। हे भेद चरलिंगाचे। दुजे स्थावर बोलती वाचे। भेदाभेद काढितां तयाचे। वाटे विस्मय मानसीं ।।७०।। ज्या ज्या काळीं धर्महानी। शिवभक्तीते उच्छेदूनि। वीरशैवमार्गालागोनि। बुडविती वेळोवेळां ।।७१।। त्याची करावया स्थापना। आचार्य गुरुरूपी जाणा। करिती ज्या भूलिंगांतूनि गर्जना। तीं चरलिंगें मानावी ।।७२।। जेथून आचार्य प्रगटले। तें स्थान स्वायंभुवागमीं वर्णिलें। तें पाहिजे पाहिलें। प्रत्ययालागूनि ।।७३।। हे आचार्य पांच असती। त्यांच्या अवतारीं विशेष शक्ति। ब्रह्मादि देव अनुसरती। पावन मार्ग तयांचा ।।७४।। ते ज्या स्थानीं गुप्त होती। तीं स्थलें पवित्र असती। तीर्थें तयांसीच म्हणती। शिवस्थानांलागूनि ।।७५।। त्या लिंगासीं चरलिंग। मानावें सत्य शास्त्रांग। वीरशैव आचारभंग। येणें नोव्हे कल्पांति ।।७६।। वीरशैव धर्माचें मुख्य तत्त्व। शिवावांचून अन्य दैवत। न मानणें श्रेष्ठ अद्भुत। एक शिव सर्व कर्ता ।।७७।। ज्या लिंगांसीं ईश्वरनाम। तीं चरलिंगें जाणावी उत्तम। वंद्य असे श्रीशैल्य धाम। वीरशैवां जाणावें ।।७८।। अरण्यस्थानीं उदास। पूर्वी स्थापित लिंग विशेष। अर्चिती जया तापस। तींहि चरलिंगेंचि ।।७९।। चरलिंगें स्थिर होती। तया स्थावर बोलती। कालांतरें प्रगटती। धर्महानी झालिया ।।८०।। तया स्थावरांसीं वंदावें। भक्तिभावें अर्चवावें। प्रसिद्धपणें पुढें व्हावें। लिंगमाहात्म्य वाढवावया ।।८१।।

देव्युवाच-

षट्स्थलं च कथं जातं षट्स्थलस्य च के गुणाः। षट्स्थलानां तु भेदं हि कथयस्व ममानघ ॥१३॥

पार्वती म्हणे स्वामी त्रिनयना। षट्स्थळ कैसें झालें सांगा खुणा। कोण गुण कैसा भेद प्राणां। निरोपावें स्वामी ॥८२॥

शिव उवाच-

श्रुणु देवि प्रवक्ष्यामि गौप्याद्गौप्यतरं परम्। यत् श्रुत्वा शुद्धचित्तेन न पुनर्जननं भुवि ॥१४॥

शिव म्हणे ऐक गूढ गुह्याकार। षट्स्थळ तें अत्यंत गौप्य परात्पर। तें तुज निरोपीन साचार। परि सुचित्त होवोनि ऐक देवी ॥८३॥ हें निरोपुं नये भक्तिहीनासीं। जो कधीं नेणें गुरुलिंगजंगमासीं। भक्तिमार्गाचें प्रेम दिसें तुजपासीं। म्हणोनि निरोपुं तुज ॥८४॥

महालिंगमिदं देवि मनोतीतमगोचरम्। निर्नामनिर्गुणं नित्यं निरंजननिरामयम् ॥१५॥

षट्स्थळाचें साही अंग साचें। तयामाजीं श्रेष्ठ जें सहावें मुळीचें। आधी ऐक महिमान तयाचें। अगम्य अगोचर ॥८५॥ पूर्वी जीं जीं लिंगें कथिली। सहा संख्येनें दाखविली। एक एकापासून झालीं। लिंगें जाण षड्विध ॥८६॥ सर्व लिंगांसीं आधार। महालिंग होय साचार। तयापासोनि ॐकार। प्राप्त होय

योगियां ॥८७॥ ते मनातीत अगोचर। मन बुद्धि चित्त न पावती पार। नाना मत विवेक विचार। निमाले जेथें ॥८८॥ ते निर्नाम नामरूपातीत। निर्गुण सर्वगुणविरहित। ते नित्यानित्यासीं नातळत। नाम तरी महालिंग जाण ॥८९॥ श्रोते म्हणती अनाम निरोपिलें। पुन्हां महालिंग नाम कां स्थापिलें। तें भासावया खूण नाम लाविलें। एऱ्हवीं साचचि अनाम तें ॥९०॥ तें निरंजन निरामय महालिंग। तेंचि जाहलें साही लिंगांसीं अंग। आपणचि षट्स्थळ अभंग। होऊनि ठेलें ॥९१॥

निर्मलं निष्कलं ज्ञेयं निर्भेदं निरुपाधिकम्। अद्वैतानन्दसंपूर्णमसादृश्यमिदं श्रुणु ॥१६॥

तें निर्मळ त्रिमळातीत। तें निष्कळ कलाविरहित। भेदाभेदांसीं नातळत। उपाधिरहित तें ॥९२॥ अद्वैतानंद संपूर्ण निराश। समदृष्टी जया समसरिस। तो महालिंग वो विश्वास। धरूनि ऐक पां ॥९३॥

महालिंगात् समाख्यातं प्रसादस्य समुद्भवः। प्रसादलिंगाच्चैव जंगमस्य समुद्भवः ॥१७॥

ऐसें महालिंग निरोपिलें। तेंचि प्रसादलिंग होवोनि ठेलें। प्रसादलिंगापासाव झालें। जंगमलिंग तें ॥९४॥ जंगम-लिंगापासून। कोण लिंग झालें तेहि निरोपीन। तूं भक्तराज म्हणोन। तुज गुह्य चोरूं नये ॥९५॥

तथा जंगमलिंगाच्च शिवलिंगसमुद्भवः। शिवलिंगात्तथा देवि गुरुलिंगसमुद्भवः ॥१८॥

जंगमलिंगापासोन वहिले। शिवलिंग उद्भवलें। शिव-लिंगापासून जाहलें। श्रीगुरुलिंग तें ।।९६।।

गुरुलिंगात्तथाचारलिंगस्यापि समुद्भवः। षट्स्थलं तत्परिज्ञेयमेकीभावे विशेषतः ।।१९।।

गुरुलिंगापासाव उद्भवलें। तें आचारलिंग होवोनि ठेलें। येणेंपरी षट्स्थळ झालें। एकचि महालिंग तें ।।९७।। ही साहिं लिंगे एकभावनें। गुरुमुखीं जाणोनि पुजणें। विधियुक्त सद्भावनें। निजनिष्ठें ।।९८।।

प्राण आचारलिंगस्य गुरुलिंगं भवत्यपि। प्राणस्तु गुरुलिंगस्य शिवलिंगं भवेत्तथा ।।२०।।

साहिं लिंगें येरयेराप्रति। प्राण होवोनि असती। आचार-लिंगासीं प्राण पार्वती। गुरुलिंग जाणिजें ।।९९।। गुरु-लिंगासीं प्राण। शिवलिंग नेमस्त जाण। हें तुज निरोपितो गुह्य ज्ञान। तूं भक्तींत रत म्हणोनिया ।।१००।।

प्राणश्च शिवलिंगस्य जंगमलिंगमेव च। तत्तु जंगमलिंगस्य प्रसादं लिंगमेव हि।।२१।।

शिवलिंगासीं प्राण जाणिजें। जंगमलिंग तें बोलिजें। म्हणोनि मी न विसंबें सहजें। जंगमलिंगासीं ।।१०१।। जंगमलिंगासीं मंत्र प्राण। तया जाणावें आवरण। जीवित्वाची मुख्य खूण। प्रसादलिंग होय ।।१०२।।

तत्प्रसादगतप्राणमहालिंगमिदं श्रुणु। अस्य प्राणसमाख्यातमेकभावसमन्वितम् ।।२२।।

प्रसादलिंगासीं प्राण। महालिंग स्वयें जाण। या साहिं लिंगांसीं नाहीं भिन्नपण। अभिन्न ऐक्यत्वें असती।।१०३।। महा-लिंगापासून उद्भवलें। महालिंगीं विलय पावलें। ऐसें हें सहा प्रकार वहिले। एका लिंगापासोनिया।।१०४।। महालिंगाचें बीज अकार। ॐकाररूपी निर्विकार। स्वयंस्फूर्तीचा होता चमत्कार। प्रगटतसे सर्वत्रीं।।१०५।। ऐसा हा षड्गुण-ऐश्वर्यसंपन्न। एकचि शिव परमपावन। तयावांचून महा-प्रलयांतून। कोणी न राहती ब्रह्मादिक।।१०६।।

प्रभा वन्हेर्यथाऽभिन्ना तथैवात्रापि भाव्यते। महालिंगस्थलं देवि षड्विधं व्याकृतं तथा।।२३।।

अग्नीस आणि अग्निकांतीस। भिन्न भेद नाहीं दोहीस। तेविं पांचा आणि महालिंगास। भेद नाहीं ऐक्यभावें।।१०७।। एकलें महालिंगचि जाण। षट्स्थळ झालें आपण। म्हणोनि नाहीं भावना भिन्न। तया महालिंगासीं।।१०८।। जरी षट्स्थल होवोनि ठेला। तरी भिन्न भेदासीं नाहीं आला। जरी वृक्ष शाखा उपशाखा झाला। तरी भेदावला नाहीं तो।।१०९।। जैसा ऊस कांडोकांडीं चढला। तरी तो उसपणा नाहीं मुकला। कांडी भिन्न दिसती परि त्याला। ऊसचि बोलिजें आघवा।।११०।। तैसा एकचि महालिंग। झाला षट्स्थळाचें अंग। परि तया नाहीं भिन्न भाग। वेगळेपणाचा।।१११।। म्हणोनि षट्स्थळांसीं। आणि महालिंगासीं। भेद नाहीं येरयेरांसीं। एकचि म्हणोनि।।११२।।

एवं लिंगं समाख्यातं षट्भेदात्तु यथाक्रमम्। ज्ञात्वा लिंगार्चनं कुर्यात् प्राणाभेदेन मुक्तये।।२४।।

ऐसें एकभावें लिंगार्चन। करी सांडून भेदाचें भान। तैसें षड्लिंगीं भजन। एकत्वें कीजें।।११३।। प्राणासीं लिंगासीं भेद नाहीं। हें जाणोनि पूजा करी जो पाही। तो निजभक्त त्याचे पायीं। तरे शिवाचार।।११४।। ऐसी अभेदक्रिया चुको न दिजे। तरी सहजें महालिंग होईजें। महालिंग झालिया तैसेचि असिजें। तेणें स्थिति।।११५।। तेणेंचि स्थिति असतां। तरी स्वयेंचि होईजे वस्तुता। निर्विकल्प झाल्याविण तत्त्वतां। नये हातां ती वस्तु।।११६।। शिवपूजा करावयाकारणें। भक्तिभावाप्रति पाळणें। इष्ट वस्तु विरोढून संतुष्ट होणें। इष्टलिंगें करोनिया।।११७।।

देव्युवाच-

इष्टलिंगस्य का भाषा को वा वर्णस्तथार्चनम्। धारणं केन कर्तव्यमधिकारोऽत्र कस्य वै।।२५।।

पार्वती म्हणे जी महेशा। मज सांगा इष्ट भाषा। जेणें तुटे सर्वेशा। पुनर्जन्मबंधन।।११८।। इष्टलिंगाचा वर्ण कोण। कवण्या काळीं अर्चावें जाण। तयाचें व्हावें निरूपण। प्राणवल्लभा मजलागीं।।११९।। आणिक जया वर्णाप्रति। इष्टलिंगाची असे प्राप्ती। तयाची वर्णावी स्थिति। अधिकारपरत्वें मज।।१२०।।

शिव उवाच-

स्थूलदेहेषु यल्लिंगं तदिष्टं नीलवर्णकम्। धार्यते भाविकैः सर्वैः भक्तियोगैकतत्परैः ।।२६।।

स्थूलदेहीं जें लिंग असें। तया म्हणती इष्टलिंग विश्वासें। शास्त्रीं निरोपिलीं सौरसें। मूल लिंग म्हणोनिया ।।१२१।। हे इष्टलिंग नीलवर्ण। पूजेलागीं होय जाण। त्याप्रति करावें जतन। प्राणाहूनि अधिक पैं ।।१२२।। जया भक्तिभाव असे अधिक। तेणें धारण करावें इष्टलिंग देख। तेही गुरु-आज्ञापूर्वक। शिवदीक्षाविधीनें ।।१२३।। नारीनरां सकळिकां। येथें अधिकार असे देखा। तेथें वर्णाश्रमाचा उपखा। काढूं नये पैं ।।१२४।।

उत्तमांगे गले वाऽपि कुक्षौ वक्षस्थलेऽपि वा। तथा हस्तस्थले वाऽपि प्राणलिंगं धरेत् सुधीः ।।२७।।

लिंगधारणेचीं स्थानें। तुज सांगूं वरानने। मस्तकीं कंठीं असणें। अथवा हृदयावरी ।।१२५।। हृदयावरी अथवा करस्थळीं। धारण करी वीरमंडळी। तेणें संतोषें मी चंद्रमौळी। देवी भक्तांकारणें ।।१२६।। नाभीचे खाली लिंग येतां। दोष घडे लिंगधारकां तत्त्वतां। देहापासूनि वेगळे करितां। प्रायश्चित्त घेणें लागे पैं ।।१२७।। त्रिकाळ करावें अर्चन। भावें बिल्वदळे वाहून। प्राणलिंगचि जाणून। इष्टलिंगां

भजावें ।।१२८।।

निर्विकल्पमिदं ज्ञेयं प्राणे लिंगं तु लीयते। लिंगमेव परब्रह्म तस्य नाम चराचरम् ।।२८।।

निर्विकल्प होओनि लिंगार्चन। कीजें लिंगीं तल्लीन होऊन। प्राण तो लिंगीं लयात नेवोन। तेंचि होऊन राहिजें ।।१२९।। कां करी लिंग तें परब्रह्म। केवळ उत्तमाचे उत्तम। लिंग कैसें परब्रह्म घडें हें वर्म। ऐक निरोपुं वो देवी ।।१३०।। सद्गुरूनें लिंग दिधलें जेव्हां हातीं। तेव्हां काय निरोपिलें शिष्याप्रति। हें लिंग जाणिजें माझीच मूर्ति। सद्भावें पुजिजें यासीं ।।१३१।। जें जें लिंगासीं करी अर्पण। तें तें मजचि होय समर्पण। म्हणोनि मद्भावें करी पूजन। हें निरोपण श्रीगुरूचें ।।१३२।। तंव गुरु आणि जंगम-लिंगासीं। भेद कैंचा उभयांसीं। लिंग तोचि गुरु ऐसें अनुभवासीं। आलें कीं वो देवी ।।१३३।। आतां गुरु तोचि परब्रह्म। हें तूं जाणसी सहज वर्म। मागें निरोपिलें गुरु उत्तम। परब्रह्मचि तो ।।१३४।। गुरु जंव परब्रह्म होय। तंव लिंगासीं ब्रह्मत्व केविं नये। म्हणोनि लिंग परब्रह्मचि पाहें। येणें न्यायें वो देवी ।।१३५।। यालागीं लिंगासीं गुरुभावें पुजिजें। लिंगीं प्राण लयासीं नेईजें। यापरी लिंगीं लिंग होवोनि असिजें। सदाकाळ तद्रूप ।।१३६।। एवं लिंग तें परब्रह्म। भाविजें जाणोनि हें वर्म। तैसेंचि षड्लिंगें उत्तम। पुजिजें तेणेंचि भावें ।।१३७।।

देव्युवाच-

महालिंगस्य के भेदा: प्रसादस्य तथा पुन: । भेदा: जंगमलिंगस्य शिवलिंगस्य ते तथा ।।२९।।
गुरुलिंगस्य के भेदा: आचारस्य च के पुन: । इति तत्त्वं न जानामि कारुण्याद् ब्रूहि शंकर ।।३०।।

देवी म्हणे जी शंकरा । प्राणवल्लभा करुणाकरा । षड्लिंगाचा भेद दातारा । गौरीहरा निरोपावा ।।१३८।। महालिंग प्रसादलिंग । जंगम आणि शिवलिंग । गुरुलिंग आणि आचारलिंग । सहा लिंगें हेंचि कीं ।।१३९।। हें कोण कोणापासाव झालें । कोण मुखीं कोण लिंग उत्पन्नलें । तें पाहिजे निरोपिलें । सर्वेश्वरा मजलागीं ।।१४०।।

शिव उवाच-

महालिंगमिदं देवि प्रसादं लिंगमेव च। तस्माज्जंगमलिंगं च शिवलिंगमभूत्तत: ।।३१।।
ततो हि गुरुलिंगं च आचारं च तत: पुन: । एकैकप्राणमाख्यातमेकैकेन समन्वितम् ।।३२।।

शंकर म्हणे देवी ऐक। महालिंगापासून प्रसादलिंग देख। प्रसादलिंगापासाव नेमक। जंगमलिंग तें ।।१४१।। जंगम-लिंगापासोन। शिवलिंग झालें उत्पन्न। शिवलिंगापासून। गुरुलिंग तें ।।१४२।।

गुरुलिंगापासाव आचारलिंग जाण। हें उत्पन्नलें एकमेकाचे प्राण होऊन। म्हणोनि तें अभिन्न होऊन। असती भेदविरहित।।१४३।। महालिंगापासाव पांच लिंगें झालीं। तें पांच मुखीं पांच जन्मलीं। तीं पांच मुखें महालिंगाची भली। निरोपुं तुज ऐक।।१४४।। ईशान तत्पुरुष अघोर तीन। वामदेव सद्योजात हे पांच जाण। या पांच मुखांतून उत्पन्न। लिंगें झालीं ऐक पां।।१४५।।

एकैकमनुते यस्तु पंचाननसमुद्भवः। प्रसादोद्भव ईशानात् तत्पुरुषाज्जंगमोद्भवः।।३३।।
शिवलिंगमघोराच्च वामदेवात्तथा गुरुः। आचारस्योद्भवं चापि सद्योजातान्मिदं श्रुणु।।३४।।

एकेका मुखांतून। एकेक लिंग झालें उत्पन्न। कोण्या मुखांतून कोण। तें ऐक वो देवी।।१४६।। प्रसादलिंग ईशानमुखातून। तत्पुरुषीं जंगमलिंग उत्पन्न। शिवलिंग अघोरमुखापासोन। जाहलें जाण पां।।१४७।। गुरुलिंग वामदेवमुखातून। आचारलिंग सद्योजातापासून। ऐसीं पांच मुखांतून। प्रकाशलीं तीं।।१४८।। महालिंग आणि पांच लिंगें। हीं रूपा आलीं जयाचिये संयोगें। ती आणिक असती तीन लिंगें। तींहि ऐक निरोपुं तुज।।१४९।।

भावादित्रिषुलिंगेषु जगत्सृष्ट्यादिकारणम्। एकैकाच्च द्वयं जातं नवलिंगस्य उद्भवः।।३५।।

सृष्टी तारावया चांग। विस्तारली षड्लिंगें अभंग। एकेकापासाव स्वयं भाग। द्वय द्वय ते।।१५०।। साहीं लिंग तें तीन लिंगांपासोन। सहा आणि तीन नवलिंगे जाण। एकेकांपासोन दोन दोन। तें ऐक निरोपुं तुज।।१५१।।

आचारं गुरुलिंगं च इष्टलिंगाद्विजायते। शिवं जंगमलिंगं च प्राणलिंगसमुद्भवम्।।३६।।
प्रसादं च महालिंगं भावलिंगाद्विनिर्गतम्। एतानि शिवलिंगानि क्रमशो वर्णितानि ते।।३७।।

आचारलिंग गुरुलिंग जाण। हें झालें इष्टलिंगापासोन। शिवलिंग जंगमलिंग उत्पन्न। प्राणलिंगापासाव।।१५२।। प्रसादलिंग महालिंग ऐक। भावलिंगापासाव देख। तिन्ही आणि सहा नेमिक। खूण निरोपिली तुज।।१५३।। या नवलिंगांची खूण। विरळा जाणे कोणी सत्यशरण। जयाचें चरणीं तीर्थें पावन। त्याते वंदू आपण आम्ही।।१५४।। हीं नवलिंगें स्वयंपूर्ण। असती इष्टलिंगरूप होऊन। ही धर्म-शास्त्राची खूण। गुरुकृपें ओळखावी।।१५५।। इष्ट प्राण भाव हीं नांवे। अर्च्यलिंगां असती आघवे। जाणोनिया पूर्णभावें। वर्तावें वीरशैवें।।१५६।। सर्व पूजेचें सार प्रसिद्ध। एक लिंगपूजाफल अगाध। शिवागमीं वर्णिलें विशद। विष्णु आदि देवांतें।।१५७।। लिंगपूजेनें तापसी। नाम पावले ब्रह्मऋषि।

ब्रह्मविचार तयें मानसीं। येत शिवकृपेनें।।१५८।। ऐसी जी लिंगपूजा श्रेष्ठ। सकल ब्रह्मांडीं ही बलिष्ठ। तेथें नसें कदा अनिष्ट। ग्रहदशा जाण पां।।१५९।। शिव सांगे भवानीप्रति। माझें धारण जे करिती। तया नसे अधोगति। पवित्र कैलास प्राप्त होय।।१६०।। तीं हीं नवलिंगें ऐक्यत्वें असती। येरयेरां मिश्रित वसती। तेंचि पुसें कर जोडूनि पार्वती। मिश्रित कैसी म्हणोनि।।१६१।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। उमा-महेश्वरसंवादीं वर्तत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृतार्थ मन्मथ।।१६२।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे षट्स्थलनवलिंगस्वरूपवर्णनं नाम एकादशोऽध्याय: समाप्त: ।।

श्लोक ३७, ओव्या १६२.

❑

अध्याय बारावा

॥ ॐकाराय नमः ॥

एकादश अध्यायीं लिंगविचार। सांगितला नवलिंगप्रकार। तैसाच मिश्र भाव सविस्तर। वर्णिला येथें॥१॥

देव्युवाच–

किं मिश्रितं सदाचारं किं मिश्रं गुरुलिंगकम्। किं मिश्रं शिवलिंगं स्यात् किं मिश्रं जंगमं तथा॥१॥

प्रसादमिश्रितं किं स्यान्महालिंगं तथैव च। इत्येतन्मिश्रितं भावं सकलं कथयस्व मे॥२॥

पार्वती म्हणे शंकरासीं। कवण लिंग कवणासीं। मिश्रित होवोनि असें तत्त्वांसीं। सांगा मज स्वामिया॥२॥ आचारलिंग कोणाशीं मिश्रित। कोणां मिश्रित गुरुलिंग असत। मिश्रित कोणासीं शिवलिंग वसत। जंगमलिंग मिश्रित कैसें॥३॥ प्रसादलिंग मिश्रित कोणासीं। मिश्रित निरोपा महालिंगासीं। ऐसें साहीं लिंगें कोण कोणांसीं। मिश्रित निरोपा स्वामी॥४॥

शिव उवाच-

आचारं गुरुलिंगं च प्रसादं जंगमं तथा। शिवलिंगं महालिंगमेकैकेन सुमिश्रितम्।।३।।

शिव म्हणे अंबेप्रति। मिश्र लिंगांची कैसी व्याप्ती। उभय लिंगें ऐक्यें सामावती। तो मिश्रभाव जाणावा।।५।। गुरुलिंग आचारलिंग मिश्रित असती। शिवलिंग जंगमलिंग मिश्रित वसती। प्रसादलिंग महालिंग स्थिति। असती तें एकत्वें।।६।। ऐसें सहा लिंग मिश्रित। येरयेरांतें असत। हें ऐकोनि संतोषलें चित्त। मग प्रश्न करी कांहीं।।७।।

देव्युवाच-

ज्ञानबीजाक्षरं किं वा आचारस्य च बीजं किम्। गुरुलिंगस्य किं बीजं किं बीजं शिवलिंगकम्।।४।।

पार्वती पुसे शिवातें। महालिंगासीं बीजाक्षर कोणतें। आचारलिंगासीं निरुते। कोणतें बीजाक्षर।।८।। कोणतें बीजाक्षर गुरुलिंगासीं। कोणतें अक्षर शिवलिंगासीं। कोणतें अक्षर जंगमलिंगासीं। प्रसादलिंगासीं अक्षर कोण।।९।।

शिव उवाच-

प्रणवं ज्ञानबीजं च आचारस्य नकारकम्। मकारं तु गुरोर्बीजं शिकारं लिंगमूर्तिकम्।।५।।

वाकारं जंगमं बीजं प्रसादस्य यकारकम्। एवं बीजाक्षरज्ञाता दुर्लभश्च वरानने।।६।।

पार्वतीसीं निरोपी शंकर। महालिंगासीं बीज ॐकार। आचारलिंगासीं बीज नकार। गुरुलिंगासीं बीजाक्षर मकार बोलिजें।।१०।। शिवलिंगासीं बीज शिकार। जंगमलिंगासीं वाकार। प्रसादलिंगासीं यकार। बीजाक्षर बोलिजें।।११।। नमः शिवाय हा पंचाक्षरी। ॐकारसंयोगें बोलिजें षडक्षरी। तें षडक्षर षड्लिंगासीं अवधारी। साहिं बीजें निरोपिली।।१२।। तींच साहिं बीजें तत्त्वादिकांसीं। कोण बीज कोणासीं। तें ऐक एकचित्त मानसीं। होवोनिया।।१३।।

ओंकारः पंचभूतात्मा नकारो दशइंद्रियः। मकारो मनपंचानां शिकारः प्राणनायकः।।७।।
वाकारो दशवायूनां यकारस्त्रिगुणं भवेत्। एवं षडक्षरबीजं श्रुणु मे पार्वति यथा।।८।।

ॐकार बीज पंचभूतात्मकासीं। नकार तो दश इंद्रियांसीं। मकार अंतःकरणपंचकासीं। प्राणपंचकासीं शिकार तो।।१४।। वाकार तो दशवायूंसीं। यकार तो त्रिगुणांसीं। ऐसें बीज तत्त्वांदिकासीं। नेमिलें असती वो देवी।।१५।। हीं साहीं बीजें षड्लिंगासीं। हें षट्बीज षट्चक्रासीं। हेंचि साहीं षट्स्थळासीं। तें षट्स्थळ पार्वती पुनः पुसे।।१६।।

देव्युवाच-

नामानि षट्स्थलस्यास्य गुणरूपाणि सर्वथा। प्रीत्यर्थं मम देवेश कृपया वद सांप्रतम्।।९।।

पार्वती म्हणे देवा महेशा। षट्स्थळाचा नामरूप ठसा। निरोपावें स्वामी जगदीशा। कृपाळुवा।।१७।। गूढ रहस्य हें षट्स्थळ। सांगा जी मज निर्मळ। वीरशैवाचें आदिमूळ। अलभ्य जे ब्रह्मादिकां।।१८।।

शिव उवाच-

भक्तो माहेश्वरश्चैव प्रसादी प्राणलिंगकः। शरण्यः शिवलिंगैक्य इदं षट्स्थलमुत्तमम्।।१०।।

ईश्वर म्हणे वो देवी ऐक। प्रथम भक्तस्थळ म्हणिजें एक। माहेश्वर दुसरें नेमक। तिसरें तें प्रसादी बोलिजें।।१९।। चौथें तें प्राणलिंगी जाणिजें। पांचवे तें शरणस्थळ ओळखिजें। सहावें ऐक्यस्थळ बोलिजें। महा सत्यशरण।।२०।। याचीं नामे कळती तऱ्ही कांहीं। परि याची स्थिति कळली पाहिजे पाही। कळलियावरी तैसाचि वर्ततां होई। तरी तो सत्यशरण।।२१।। हें ऐकतांचि निजवर्म। पार्वती प्रश्न करी धरोनि प्रेम। या षट्स्थळांची स्थिति उत्तम। ती निरोपा स्वामी।।२२।।

देव्युवाच-

भक्तो माहेश्वरश्चैव प्रसादी प्राणलिंगकः। शरणः शिवलिंगैक्यः षट्स्थलं च कथं भवेत्।।११।।

पार्वती पुसे शंकरासीं। नमन करूनि चरणासीं। एकेका स्थळाची कैसी। आचरणूक कोणेपरी ।।२३।।

शिव उवाच-

सदाचारः शिवे भक्तिः लिंगजंगमएकधीः। लांछने शरणं यस्तु भक्तस्थलमनुत्तमम् ।।१२।।

शंकर म्हणे वो पार्वती। षट्स्थल ऐके प्रेमप्रीति। त्यातून प्रथम भक्ति-। स्थळ निरोपुं तुज ।।२४।। सदाचारें आचरें शिवभक्ति। तो आचार निरोपुं प्रेमप्रीति। अनाचार न धरी अणुमात्र हातीं। कोटी लाभ जोडे ज-ही ।।२५।। तरी अनाचार तो न करी। आवडी गोडी अत्यंत शिवाचारीं। शिवावांचून ब्रह्माहरि। न मानी कोणासीं ।।२६।। जैसें पतीस भावभक्ति चित्त। आपुलें पतीचें तिला व्रत। म्हणोनि पतिव्रता निभ्रांत। नाम तियेचें ।।२७।। ती जैसें आपुले पतीविण। सर्वथा न करी कोणाचें ध्यान। वर्णितां न करी श्रवण। ती धन्य जाण पतिव्रता ।।२८।। तैसा न स्मरे शिवाविण आन। पूर्ण एकविध भक्ति धरून। राहे सदा निष्ठेतें ठेवोन। हें भक्तिस्थळ उत्तम ।।२९।। शिवावांचून कांहीं। ध्यानीं मनीं स्मरणीं आन नाहीं। शिवलांछन देखें ज्याचें ठायीं। धांवोनि पायीं मिठी घाली ।।३०।। इतर देव असती शिवाचे सेवक। तया भजतां दोष अनेक। भक्तिभावें अर्चितां नरक। प्राप्त होय श्रुति वदे ।।३१।। गुरु लिंग

आणि जंगम। तिहींच्या पूजेस एकचि नेम। तिहीं एकभावें पुजी भक्तोत्तम। तो मुकुटमणि शिवाचारासीं ।।३२।। एक मूर्ति त्रिभाग झाली भक्तकाजें। म्हणोनि गुरु लिंग जंगम बोलिजें। तिन्ही एकचि मानूनि पुजी वोजें। तोचि भक्त उत्तम ।।३३।। जंगमलांछन देखोनि नयनीं। आपुली परावी बगी न धरी मनीं। धांवोनि भावें लागे चरणीं। भक्तस्थळ उत्तम या नांव ।।३४।। जंगमलिंगीं भेद धरितां। अधोगति पावे तत्त्वतां। परमात्मभावें मानितां। पुजितां मोक्षपद पावे ।।३५।। गुरुवचनीं अविश्वास। शास्त्रवाक्यां लावी दोष। कुतर्कीं पांडित्य विशेष। अभक्तस्थळ हेंचि ।।३६।। स्वधर्म-पुराणां कंटाळत। परधर्म-श्रवणां धांवत। तयाचे धर्म श्रेष्ठ मानीत। अभक्तस्थळ तेंचि ।।३७।। स्वधर्म सोडोनि आपुला। जरी उत्तम धर्म स्वीकारिला। अधोगति नरक तयाला। स्वधर्म त्यागितांचि ।।३८।। जैसें परस्त्री परधन। अनर्थासीं होय कारण। तैसें परधर्म-आचरण। घडे पातक सत्य पैं ।।३९।। तीर्थासीं विश्वास अत्यंत। लिंगजंगमीं ठेवी चित्त। ऐसें भक्तस्थळ थोडियानें बहुत। निरोपिलें तुज देवी ।।४०।। आतां माहेश्वरस्थळ। तुज निरोपुं निर्मळ। जें ऐकतां पातक सकळ। जळोनि जाय ।।४१।।

परस्त्रियं परार्थं च वर्जितो भावशुद्धिमान्। लिंगनिष्ठो जितात्मा च माहेश्वरस्थले पुमान् ।।१३।।

आतां माहेश्वरस्थळ महिमान। पार्वती ऐक विश्वास धरोन। तयासीं परस्त्री मातेसमान। काम नाहीं तयासीं ।।४२।। कां म्हणसी तरी ऐक। तयासीं आत्मा आत्मीं नाहीं देख। जें देखें तें शिवचि एक। तेथें आत्मा आत्मीं कैची ।।४३।। त्यासीं स्त्रीचि दिसत नाहीं। जें देखें तें शिवचि पाही। मा कामना उठे तया काई। भोगविषयासीं ।।४४।। वीरनिष्ठा अंगीं येतां देख। तो करी सारासारविवेक। मग वासनेचा पल्ला एकाएक। येईल कोठोनिया ।।४५।। तया परद्रव्य पाषाणासमान। परनिंदा हिंसा न करी आपण। इत्यादि वर्जी सर्व अवगुण। भावशुद्ध माहेश्वर तो ।।४६।। लिंगनिष्ठें निपुण करी पूजा। लिंग-जंगमीं भाव नाहीं दुजा। गुरुभावनें लिंगासीं पुजी वोजा। जंगमीं तेंचि निष्ठा ।।४७।। गुरूसीं भजे शिवभावना। ऐशा माहेश्वरस्थळाच्या खुणा। आतां प्रसादिस्थळाची विवेचना। निरोपुं ऐक वो देवी ।।४८।।

लिंगार्पितप्रसादं च सुभोगी लिंगसंयुत:। अनर्पितपरित्यागी प्रसादिस्थलमुत्तमम् ।।१४।।

ऐक तिसरें प्रसादिस्थळ। प्रसादसेवनीं निष्ठा अढळ। नित्य प्रसादां सेवी निर्मळ। भावें विश्वासें ।।४९।। जंगम परब्रह्मचि मानिजें। त्याचा प्रसाद लिंगमुखें सेविजें। तृण तेंहि लिंगासीं दाविजें। मग स्वयें सेविजें आपण ।।५०।। प्रसादां गोड कडु बहु थोडे। जे म्हणती ते केवळ वेडे। शिवगणीं मिरवी कोण्या तोंडे। नित्य गोडी नेणे प्रसादाची ।।५१।। प्रसाद न मिळे धर्मभ्रष्टां। जो करी परधर्माचा सांठा। कुतर्की

पाखांडमतश्रेष्ठां। प्रसाद वर्ज्य असे पैं ।।५२।। प्रसादमहिमा विशेष। होतसे ऋद्धिसिद्धि वश। वेदचर्चा प्राप्त श्वानास। प्रसादानें घडलीसे ।।५३।। अनर्पित तें न अर्पिजें। कठिण अंश तो सांडून देईजें। आपपर जंगमीं न लेखिजें। भावें सेविजें प्रसाद ।।५४।। प्रसादां विन्मुख न घडे कधीं। प्रसादी लिंगार्पित करी आधी। भावें सेवितां प्रकाशे सद्बुद्धि। अष्ट महासिद्धि ओळंगती अंगणीं ।।५५।। हें लटिकें म्हणसी तरी ऐक। अष्ट महासिद्धीचें काय कौतुक। श्वानमुखें वेद वदविला देख। मा अष्ट महासिद्धि त्या किती ।।५६।। प्रसादनिष्ठा जयासीं पूर्ण असे। तो वंदिजें म्यां महेश। त्याचें दर्शन घें विश्वासें। तो पुण्यपुरुष भाग्याचा ।।५७।। ऐसा प्रसादनिष्ठेचा नेम। तुज दाविला निरुपम। आतां प्राणलिंग उत्तम। चौथें स्थळ तें ऐक ।।५८।।

तथा प्राणगुणे लिंगं लिंगे प्राण: समाहित:। सुखदु:खभयं नास्ति प्राणलिंगिस्थलं भवेत् ।।१५।।

प्राणलिंगिस्थळाचें ऐक निरोपण। लिंगीं ऐक्य प्राण-गुणेकरोन। प्राण तो लिंगीं लयाते नेओन। लिंग प्राण एक झाला ।।५९।। लिंग तो प्राण प्राण तो लिंग। उभयाचें एक असे अंग। म्हणोनि लिंग गेलिया मग। देह केविं राहे ।।६०।। भानु अस्तमानीं किरण जाये। दीप गेलिया प्रकाश केविं राहे। तैसा लिंग गेलिया प्राण पाहे। राहूं शके केविं देवी ।।६१।। आत्मा गेलिया देह जरी राहे। तरी लिंग गेलिया

प्राणलिंगीं ठायें। यालागीं प्राणलिंगीं न राहे। लिंग गेलियावरी ।।६२।। अखंड त्याचा प्राण। लिंगीं असे होवोनि मग्न। यालागीं प्राणलिंगी नामाभिधान। शोभें तयासीं ।।६३।। तो लिंगरूप होवोनि असे। म्हणोनि तया सुख दुःख भय नसें। तो सुखदुःखाविरहित वसे। निर्भय होवोनिया ।।६४।। सुख झालिया फुगेना। दुःख झालिया तो उतरेना। कळिकाळासीं तो भिईना। निष्ठेचेंनि बळें ।।६५।। जो स्वयेंचि रावो जाहला। तो काय भिईल सेवकाला। तैसा तो लिंगीं लिंग होओनिया ठेला। तया काळ यम कैंचा ।।६६।। प्राणलिंगीं तत्त्वसमाधि। लिंगीं प्राण अर्पी सुधी। कासया तया मृत्यु-उपाधि। अमर असे जगीं तो ।।६७।। म्हणोनि लिंगधारी दहन। करणें गोत्रहत्या जाण। स्वयं समाधिस्थ म्हणोन। समाधिच करिती तया ।।६८।। हा शिवधर्म परमपावन। साधन करितां साध्य होय जाण। जो असे वीरशैवकुलोत्पन्न। जाणें मर्म गुरुकृपें ।।६९।। ऐसें हें प्राणलिंगिस्थळ। तुज निरोपिलें सकळ। आतां शरणस्थळ निर्मळ। निरोपुं पांचवें तें ।।७०।।

पतिर्लिंगं सती चाहमिति युक्तं सदाधिया। पंचेंद्रियसुखं नास्ति शरणस्थलमुत्तमम् ।।१६।।

ऐक शरणस्थळाचें महिमान। लिंगासीं स्वपति करोन। आपण सति होई शरण। प्रेम तयासीं धरोनि ।।७१।। सति पति जैसें एक असती। येरयेरासीं भेद न धरिती। तैसी लिंगीं अति प्रीति-। युक्त

होवोनि असे ।।७२।। सति-पतीची शरीरें वेगळी दिसतीं। परि आत्मत्वें एक हावोनि असती। तैसें लिंगीं शरणस्थिति। होवोनि असे ।।७३।। देखोनिया सत्यशरण। तात्काळ करी दंडप्रणाम शरण। किंकरवृत्ति निरभिमान। म्हणोनि शरणस्थळ नाम हें।।७४।। पांची इंद्रियांचें सुख अथवा दु:ख। अणुमात्र नाहीं देख। लिंगसुख सुखदायक। होवोनि असे ।।७५।। लिंगसुखीं तो रत झाला। त्रिकाळ पूजा करूं लागला। अखंड अहर्निशीं रमो ठेला। लिंगीं लीन होवोनि ।।७६।। ज्याचें मुखीं अखंड अमृतवाटी। तो काय कांजीसी लाळ घोटी। लिंगसुख सोडोनि विषयांसाठीं। रंक नोव्हेचि तो ।।७७।। वोकिल्या वोकासीं। परतोनि कोण्ही न सेवी त्यासीं। तैसा न घे विषयासीं। तें शरणस्थळ उत्तम ।।७८।। श्रीगुरूची सेवा करावया। सदा देह ठेविला पायां। तोडिली संसृतीची माया। तया शरण म्हणावें ।।७९।। पतिव्रता पतीचें वचनासीं। न टळे सदा सावध जैसी। तेविं लिंगपूजा गुरुदर्शनासीं। न टळे कालत्रयीं ।।८०।। ऐसा लिंगमोही विषयत्यागी। तें शरणस्थळ निरोपिलें तुजलागीं। आतां ऐक्यस्थळ उत्तममार्गी। निरोपुं तुज तें सहावें ।।८१।।

षडूर्मयश्च षड्वर्गो नास्ति चाष्टविधार्चनम्। निर्भयं शिवलिंगैक्यं शिखिकर्पूरयोगवत्।।१७।।

ऐक्यस्थळ तें सहावें। तें षडूर्मीवेगळे असें स्वभावें। षड्वर्गांसीं तें ना गवें। निरंजनमूर्ति ।।८२।।

सुखदुःख मानापमान। नाहीं आपपर निरभिमान। क्षुधा तृष्णा शीत उष्ण। लागतां न डळमळी तो ।।८३।। काम क्रोध लोभ दंभ मोहो। जयाकडे न लभे पाहो। मदमत्सर सर्व विकारसमूहो। अणुमात्र विटाळ न तयाचा ।।८४।। मी तूं हें नाहीं तया कधीं। आशा मनिषा विषय कुबुद्धि। नेघे आलिया अष्ट महासिद्धि। शरणागत वीर ।।८५।। तो स्वयेंचि वस्तु होवोनि असे। यालागीं जरामरण आठवतु नसे। मा देहबुद्धि तया असे। हें केविं घडें ।।८६।। जेथें देहबुद्धिचि नाहीं। तेथें अष्टविधार्चन पूजा कांहीं। पूज्य-पूजक-पूजा आपण पाही। होवोनि ठेला ।।८७।। तो भवभयाविरहित। न करी लौकिक गोष्टी मात। न मिरवी जाणीव शाहणीव व्युत्पत। लिंगीं रत होवोनि असे ।।८८।। तो लिंगीं मिळोनि कैसा गेला। जैसा कर्पूर अग्निरूपचि झाला। तैसा लिंगीं मिळोनि ठेला। लिंग होवोनि तो ।।८९।। भूताकृति भिन्न देखेना। त्रिभुवनीं देखे आप आपणां। विश्वीं ऐक्य विश्व आपणां। पाहे म्हणोनि ऐक्यस्थळ तो ।।९०।। निजरूप निरालंबभरित। निर्विकल्प निरंजन मूर्त। निजानंद निर्धुत। निरामय तो ।।९१।। तो निराश निःसंग। अनुपम्य अनुरागी अनंग। अनाम अप्रमेय निजांग। होवोनि असे ।।९२।। तो शिवतत्त्वीं मग्न होवोन। ईश्वररूपें राहें आपण। अज्ञ जनांतें उद्धरून। निजमार्गां लावीतसें ।।९३।। शिवपूजा शिवस्मरण। करितां नसे त्यासीं भान। शिवतत्त्वाची मुख्य खूण। लीन जाण तेथेंचि ।।९४।। तया जरा मरण नाहीं। तो अमर असे विदेही।

योगाभ्यासीं सदाहि। पूर्णत्व पावला ॥९५॥ सर्व नाडींचें शोधन करोन। जेथीचें तेथेंचि खुंटवोन। दश दिशांप्रति शोधून। दशद्वारां आकर्षी ॥९६॥ प्राण व्याप्त शरीरांभीतरीं। न काढोनि ब्रह्मरंध्रीं। प्रवेशितसे निर्धारी। कोटी चंद्रसूर्यप्रभा जिथें ॥९७॥ तेथें धीर धरूनि उघडितां नेत्र। तो तया प्रभेच्या परत्र। अतिसूक्ष्म न वर्णवें अणुमात्र। ज्योति पवित्र दिसतसे ॥९८॥ तो मार्ग परम कठिण। मना प्रवेश नोव्हे जाण। म्हणोनिया योगी उन्मन। म्हणती तया ॥९९॥ तेथें गुरूचें न चालें। कोण्या उपायां न हालें। एक निश्चल तत्त्व डोलें। स्वस्वरूपीं अखंड ॥१००॥ त्या दृष्टीचें आवरण। अति सदृढ होय म्हणोन। जरी मागें न पाहें परतोन। तरीच चढे पुढती ॥१०१॥ विद्युत् चपळगति आत्मदृष्टी। चमकोनि मिळे ज्योतिपोटी। मागुती चढोन येता त्रिकुटी। उठाउठीं भेटतसे ॥१०२॥ जीवशिवां पडिल्या गांठी। हीच असे ऐक्यता मोठी। तत्त्वाविना जेथें सृष्टी। उद्भव होय जाण ॥१०३॥ हा जाणोनि ऐक्ययोग। जो करी लिंगार्चन सांग। तो ऐक्यस्थळाचा मार्ग। पावला असे निश्चयें ॥१०४॥ तोचि सद्गुरु शिवाचारासीं। आणि तारक विश्वजनासीं। जो पुजी ऐसिया विश्वासेसीं। तो होय तद्रूपचि ॥१०५॥ त्याचे मुखीचा प्रसाद चरणींचे तीर्थ। विश्वासें सेवितां अधोगति चुकत। तो परब्रह्मभावना निभ्रांत। भाविजें निजभक्तिं ॥१०६॥ जो जयाकडे कृपादृष्टीं पाहे। तयासीं सुखाची दिवाळी होय। त्याचे कळिकाळ वंदिती पाय। मा इतरांचें

भय काय तया ।।१०७।। तें परब्रह्मचि मुसावलें। भक्तिसुखालागीं अवतरलें। वीरशैव नाम पावलें। ऐक्यस्थळ तें ।।१०८।। त्या स्थळीं सत्यशरण। असती तेंचि होवोन। ते मजहि होती पूज्यमान। षट्स्थळ तें ।।१०९।। हें ऐक्यस्थळ सहावें। तुज निरोपिलें प्रेमभावें। ऐसें ऐकोनि आनंदली जीवें। मग प्रश्न करिती झाली पुढारी ।।११०।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। शिवगौरी-संवादीं वर्तत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृत्य मन्मथ ।।१११।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे षट्स्थलनिर्णयनिरूपणं नाम द्वादशोऽध्याय: समाप्त: ।।

श्लोक १७, ओव्या १११.

❑

अध्याय तेरावा

॥ श्रीगुरवे नमः ॥

मागील अध्यायाचे अंतीं । सहा स्थळांची निजस्थिति । ती श्रुत केली देवीप्रति । कृपादृष्टीकरोनि ॥१॥
आतां पुढें सुरस प्रकार । देवी प्रश्न करील साचार । वीरशैव धर्माचें सार । वारंवार प्रगटवा म्हणोनि ॥२॥

देव्युवाच-

मिश्रितं भक्तमाहेशं प्रसादिप्राणलिंगिनः । शरण्यैक्यं च किंवा स्याद् ब्रूहि मे परमेश्वर ॥१॥

पार्वती म्हणे जी शंकरा । हें षट्स्थळ कैसे मिश्रित दातारा । भक्त माहेश्वर प्रसादी येरयेरां । मिश्रित कैसे ॥३॥ प्राणलिंगी आणि शरण । सहावें ऐक्यस्थळ जाण । हें परस्परमिश्रित त्रिनयन । निरोपिले पाहिजे ॥४॥

शिव उवाच-

भक्तो माहेश्वरश्चैव प्रसादी प्राणलिंगकः । शरणः शिवलिंगैक्यः एकः पंचसु मिश्रितम् ॥२॥

शंकर म्हणे वो पार्वती । हें येरयेरां मिश्रित असती । एक एक पांचाप्रति । मिश्रित तें ऐक ॥५॥ भक्त

मिश्रित माहेश्वरस्थळासीं। प्रसादि-प्राणलिंगी यांसीं। तैसाचि शरण आणि ऐक्यासीं। मिश्रित असे भक्तस्थळ तें।।६।। तैसेचि माहेश्वर भक्तस्थळासीं। मिश्रित असे प्रसादि-प्राणलिंगासीं। शरण आणि ऐक्यासीं। मिश्रित माहेश्वर तें।।७।। तैसेंच मिश्रित प्रसादी पांचासीं। भक्त-माहेश्वर-प्राणलिंगी यासीं। शरण आणि ऐक्यासीं। मिश्रित असे प्रसादिस्थळ तें।।८।। तैसेंचि मिश्रित प्राणलिंगी पांचासीं। भक्त-माहेश्वर-प्रसादी यांसीं। शरण्य आणि ऐक्यासीं। प्राणलिंगी मिश्रित असें।।९।। तैसेचि शरण्य मिश्रित पांचासीं। भक्त-माहेश्वर-प्रसादी यांसीं। प्राणलिंगी-शरण्यासीं। ऐक्यस्थल मिश्रित असें।।१०।। ऐसें षट्स्थल मिश्रित येरयेरांसीं। तें निरोपिलें समस्त तुजसी। हें ऐकोनि संतोषिली मानसीं। पुनः प्रश्न करिती झाली आणिक।।११।।

देव्युवाच-

भक्ताद्यैक्यावसानानां स्थलानां क्रमशः प्रभो। अंगानि तानि सर्वाणि कथयस्व ममानघ।।३।।

पार्वती म्हणे कैलासनाथा। कोण्या स्थळांस कोण अंग निरोपा आतां। म्हणोनि चरणावरी ठेविला माथा। भक्तिभावें करोनिया।।१२।। अंबेचा प्रश्न रहस्य सार। प्रगट करी वारंवार। शंकर सांगे अरुवार। जन-उद्धाराकारणें।।१३।।

शिव उवाच-

अकारोंकारवबयो: सशयोरपि वा पुन:। भेदो हि नैव विद्येत छथयोर्जययोरपि।।४।।

अंग म्हणिजे अंगचि बोलिजें। अकारा ॐकारा भेद नेणिजें। वकारा बकारा भेद नाहीं जाणिजें। सकारा शकारा भेद नाहीं वो देवी।।१४।। दकारा हकारा भेद नास्ति। जकार यकार नाहीं भेदगति। छकारा थकारा उभयाप्रति। भेद नाहीं वो देवी।।१५।। ऐसे अक्षराचे जाणिजे भेद। जो जाणे तो ज्ञानिया स्वत:सिद्ध। तो वाचितां कथितां ग्रंथप्रबंध। गुंतेचिना कधीं।।१६।। गिरिजेनें षट्स्थळाची अंगे पुसिली। ते निरोपिती आतां चंद्रमौळी। तेंचि श्रोतियांप्रति सुगम बोलीं। निरोपुं आतां।।१७।।

भक्तस्यांगमिदं पृथ्वी जलं माहेश्वरस्य च। प्रसादिनोऽग्निरंगं स्याद् वायुस्तत् प्राणलिंगिन:।।५।।

आकाश: शरणांगं च ऐक्यस्यात्मा उदीरित:। एतदंगस्य विज्ञानं सुसूक्ष्मं कमलानने।।६।।

शंभु निरोपी गिरिजेसीं। ऐक वो षट्स्थळाचे अंगासीं। पृथ्वि-अंग भक्तस्थळासीं। निभ्रांत जाण पां।।१८।। जळांग माहेश्वरासीं। तेज तें शोभें प्रसादियासीं। प्राणलिंग तो वायु-अंगेसीं। असतुसे।।१९।। आकाश अंग शरण्यासीं। आत्मत्व अंग ऐक्यासीं। ऐसीं षट्स्थळाची अंगें तुजसी। निरोपिलीं वो गिरिजे।।२०।। इतके ऐकोनि संतोषिली। सद्भावें चरणां लागली। मग काय विनवती झाली। शंकरासीं

देवी ती ।।२१।।

देव्युवाच-

एतेषां षट्स्थलानां च के वा हस्ता भवंति हि। हस्तभेदं न जानामि ब्रूहि मे परमेश्वर ।।७।।

देवी म्हणे शंकरासीं। निरोपा षट्स्थळाचे हस्तासीं। कोण हस्त कोण्या स्थळांसी। त्यांची नामें कायसी ।।२२।।

शिव उवाच-

भक्तं सुचित्तहस्तं च सुबुद्धिश्च महेश्वरः। प्रसादी निरहंकारं सुमनः प्राणलिंगिनः ।।८।।

ज्ञानहस्तं शरणस्य भावमैक्यस्य तन्मतम्। एते हस्ताः परिज्ञेयाः षट्स्थलानां क्रमेण ते ।।९।।

शिव म्हणे गिरिजे ऐक। षट्स्थळाचे जे हस्तक। सुचित्तहस्त भक्तासीं देख। शोभतु असे ।।२३।। सुबुद्धिहस्त माहेश्वरासीं। निरहंकारीहस्त प्रसादियासीं। सुमनहस्त प्राणलिंगासीं। साजिरा दिसे ।।२४।। शरण्यासीं ज्ञानहस्त। भावहस्त ऐक्यासीं निभ्रांत। ऐसे साहि हस्त शोभत। षट्स्थळासीं ।।२५।। आधी षट्स्थळाचीं निरोपिलीं अंगे। आतां निरोपिले हस्त तेणेंचि भागे। देवी पुसे षट्स्थळाचीं लिंगें। कोण लिंग कोणासीं ।।२६।। अंबेचे प्रश्न असती गहन। परमात्मा स्वयें करीतसें विवेचन। हा संस्कृत संवाद

भावेकुन। आणिला प्राकृतीं ॥२७॥

देव्युवाच-

भक्तमाहेश्वरादीनां क्रमशो लिंगपूजनम्। कथ्यतां मे परब्रह्मन् षट्स्थलस्य रहस्यकम् ॥१०॥

देवी म्हणे कोण लिंग भक्तासीं। माहेश्वर पुजिजे कोण लिंगासीं। कोण लिंग प्रसादियासीं। प्राणलिंगासीं कोण लिंग ॥२८॥ कोण लिंग शरण्यासीं। ऐक्यस्थळ वंदी कोण लिंगासीं। हे निरोपा म्हणोनि चरणासीं। पार्वती लागे ॥२९॥

शिव उवाच-

भक्तस्याचारलिंगं स्यात् गुरुलिंगं महेशितुः। प्रसादिनः शिवलिंगं जंगमं प्राणलिंगिनः ॥११॥

शरणस्य प्रसादं स्यात् महालिंगं मतं ततः। ऐक्यस्याच्र्यं विशेषणं स्थलभेदाः प्रकीर्तिताः ॥१२॥

शंकर म्हणे वो गिरिजे। भक्तासीं आचारलिंग जाणिजें। गुरुलिंग म्हणिजें। माहेश्वरासीं ॥३०॥ शिवलिंग प्रसादियासीं। जंगमलिंग प्राणलिंगासीं। प्रसादलिंग शरणासीं। पूज्य असे निजहस्तें ॥३१॥ महालिंग तें ऐक्यस्थळासीं। ऐसीं स्थळे साहिं लिंगासीं। पुजिती षट्हस्तें नेमेंसीं। तें निरोपिले तुजलागीं ॥३२॥

देव्युवाच-

आचारस्य मुखं देवि गुरुलिंगमुखं तथा। शिवलिंगमुखं चैव चरलिंगमुखं च किम् ।।१३।।

प्रसादस्य मुखं किं वा महालिंगमुखं तथा। इदं सर्वं न जानामि कथयस्व महेश्वर ।।१४।।

गिरिजा म्हणे शंकरासीं। कोण मुख आचारलिंगासीं। मुख कोण ते गुरुलिंगासीं। शिवलिंगां कोण पैं ।।३३।। चर म्हणती जंगमासीं। कोण मुख असे त्या लिंगासीं। आणिक त्या लिंगस्थितीसीं। निरोपावें ।।३४।। प्रसादी आणि महालिंगासीं। मुखें किती निश्चयेसी। किती किती असती कवणासीं। वेगळाली सांगा मज ।।३५।।

शिव उवाच-

ज्ञानलिंगमुखं पंच आचारदिकमुच्यते। षड्विधानां तु लिंगानां मुखानि क्रमशः श्रुणु ।।१५।।

शंकर म्हणे गिरिजेसीं। पांच पांच मुखें एकएकां लिंगासीं। हें षड्लिंग येरयेरासीं। मुखें जाणिजें ।।३६।। महालिंग प्रसादलिंग दोन। जंगमलिंग आणि शिवलिंग चार जाण। पांचवें गुरुलिंग नेमून। हीं पांच मुखें आचारलिंगासीं ।।३७।।

जंगमं लिंगमाचारं ज्ञानलिंगं प्रसादकम्। शिवलिंगसमायुक्तं इत्येतद् गुरुलक्षणम् ।।१६।।

महालिंग प्रसादलिंग जंगमलिंग। शिवलिंग आणि आचारलिंग। हीं पंचलिंगें चांग। मुखें गुरुलिंगासीं ॥३८॥

महालिंगप्रसादं च जंगमाचारमेव च । गुरुलिंगमुखं पंच शिवलिंगस्य निश्चितम् ॥१७॥

महालिंग प्रसादलिंग। जंगमलिंग गुरुलिंग आचारलिंग। हें पांच शिवलिंगासीं चांग। मुखें शोभती ॥३९॥

आचारं ज्ञानलिंगं च गुरुलिंगप्रसादकम् । शिवलिंगमुखं पंच चरलिंगस्य तत्त्वतः ॥१८॥

महालिंग प्रसादलिंग जाण। शिवलिंग गुरुलिंग गहन। आचारलिंगादि पंच नेमून। मुखें चरलिंगासीं ॥४०॥

जंगमं शिवलिंगं च आचारं गुरुज्ञानकम्। एतत् पंचसमायुक्तं प्रसादं लिंगलक्षणम् ॥१९॥

महालिंग-आचारलिंग जाणिजें। शिव-गुरु-जंगमलिंग जें। हीं त्याचीं मुखें बोलिजें। प्रसादलिंगासीं पैं॥४१॥

जंगमं च शिवाचारं गुरुलिंगं प्रसादकम्। महालिंगस्य एतानि मुखानि मुक्तिदानि तु ॥२०॥

आचारलिंग-शिवलिंग-गुरुलिंग जाण। जंगमलिंग-प्रसादलिंग नेमून। हीं महालिंगासीं प्रमाण।

पांच मुखें बोलिजें ।।४२।। हें षड्लिंग येरयेराचीं मुखें। तुज निरोपिली भक्तिप्रेमसुखें। ऐकोनि सुख जाहलें निकें। पार्वती-देवीसीं ।।४३।। म्हणे अजि भाग्य उदयां आलें। जें बहुकाळ होतें लोपलें। तें स्वामीनें बोधिलें। कृपा करोनि मज ।।४४।। आजि माझ्या दैवां नाहीं पार। जें स्वमुखें निरोपितसा दातार। आतां कायसा दरार। जन्ममृत्यूचा ।।४५।। जन्ममृत्यु येथ केवढीयाचें। कर्तव्य पुसिलें यमकाळाचें। नाम नाहींच संसाराचें। ऐसें केलें कृपाळुत्वें ।।४६।। जें जें करितसा निरोपण। तेणें शिवाचार होय संपन्न। जें सत्यशरण शिवाचारासीं पावन। त्याचें हृदयींचें गुज हें।।४७।। जे नर करिती शिवधर्म-आचरण। तयाचें तुटे जन्ममरण। संसाराचें नुरे कारण। शिवपदां योग्य तो ।।४८।। जन्ममृत्यूचा दरारा। अशैवालागीं निर्धारा। नेमिले असे यमकिंकरा। शिक्षा द्यावयालागीं ।।४९।। वीरशैवाचें मुखीं शिवनाम। वीरशैवां अंग लिंग सम। त्याचे सूक्ष्म धर्म नेम। न कळे इतरांप्रति ।।५०।। ते करिती शिवागम श्रवण। तेणें शिवाचार होय संपन्न। स्त्रीपुत्रसेवकांदि जाण। होती निपुण शिवधर्मीं ।।५१।। ऐसा शिवाचार जाण। तो ऐकतां परमपावन। जो वर्ते शिवाचारें पूर्ण। उद्धरून जाय तो।।५२।। वीरशैवधर्म परम कठिण। तो न जाणावा इतरासमान। क्रिया शुद्ध परमपावन। असे जाण लिंगधारी।।५३।। लिंगपूजा हाचि नित्य नेम। भक्तिभावें तेचि करी सप्रेम। गुरु लिंग आणि जंगम। त्यातें भजे आवडी ।।५४।। पंच

शिवलिंगांपासोन। पंचाचार झाले निर्माण। ती लिंगांगी जाणती खूण। इतरां न कळें तत्त्व पैं।।५५।। परि लिंगपुराणाचे ठायीं। रुद्रसृष्टीचें मर्म पाही। उल्लेखिलें असें लवलाही। निजभक्तांकारणें।।५६।। ऐसा शिवाचार जाण। ऐकतां परम पावन। शिवाचारें वर्ततां संपूर्ण। उद्धरता होय जगां।।५७।। मी एकली होईन पावन। त्याचें आश्चर्य स्वामी कोण। परि शिवाचार संपूर्ण। उद्धरता होय।।५८।। मज पुसावया हेंचि कारण। जें मी उद्धरे आणि जग होय पावन। म्हणोनि आणिक प्रेमें प्रश्न। करिती झाली जगदंबा।।५९।।

देव्युवाच–

पंचभूतमयो देहः केन रूपेण चार्पणः। कस्मिन् लिंगे भवेत् स्पष्टं कथयस्व महेश्वर।।२१।।

गिरिजा म्हणे शंकराप्रति। हे पंचभौतिक शरीर अर्पिती। कोण्या लिंगीं कोण तत्त्व निवेदिती। तें निरोपा स्वामी।।६०।।

शिव उवाच–

आचारस्यार्पिता पृथ्वी गुरुलिंगार्पितं पयः। शिवलिंगार्पितं तेजो वायुश्च जंगमार्पितः।।२२।।
प्रसादार्पितमाकाशं प्रणवश्च ज्ञानार्पितः। एतदर्पणसद्भावं दुर्लभं श्रुणु पार्वति।।२३।।

शंभु म्हणे देवी ऐक मात। आचारलिंगासीं पृथ्वी अर्पित। गुरुलिंगां आप निभ्रांत। शिवलिंगीं तेज तें ।।६१।। वायु जंगमलिंगीं अर्पण। आकाश प्रसादलिंगीं निवेदन। महालिंगां अर्पिती जाण। प्रणव तो ॐकार ।।६२।। ऐसे षड्लिंगां षड्तत्त्व अर्पण। याचा भेद जाणे तो ज्ञानिया पूर्ण। त्याचे आम्ही वंदूं चरण। सत्य सत्य वो देवी ।।६३।।

विषया: पंचभोगा ये पंचेंद्रियसमन्विता: । पंचाक्षरे पंचवक्त्रे सद्भावेन समर्पिता: ।।२४।।

शब्दस्पर्शरूपरसं गंधश्चापि हि पंचम: । एतेषामर्पणं नित्यं निष्कामो मुक्तिभाक् नर: ।।२५।।

पंचविषयादि भोग जे जे। ते पंचाक्षरी अर्पण कीजें। पंचेद्रियांद्वारें समर्पिजें। पंचलिंगामुखीं ।।६४।। पांच इंद्रियेद्वारे पांच विषयांसीं। अर्पी प्रणव सहाव्या लिंगासीं। तेंचि लाधले मुक्तिपदासीं। परि ते दुर्लभ वो देवी ।।६५।।

एवं पंचादिकं चैव पंचवक्त्रे समर्पणम् । जानाति निर्मलो बुद्धस्तस्य हस्ते शिवं पदम् ।।२६।।

एवं पंचविषयादि भोग। पंचमुखीं समर्पिजे चांग। तो ज्ञानिया जाणिजे अभंग। शिवपद प्राप्त तयासी ।।६६।। ऐकोन गिरिजे संतोष झाला। अर्पणे प्राप्त होय शिवपदाला। तरी तेंचि पुसे शंकराला। अर्पण ते कैसे ।।६७।।

देव्युवाच-

कं लिंगमर्पयेत् को वा विषय: केन हेतुना। तत्सर्वं क्रमशो देव ब्रूहि मे कृपया शिव ।।२७।।

पार्वती पुसे कैलासपति। कोण विषय कोण्या लिंगाप्रति। अर्पिजें कवणे स्थिति। ते निरोपा परमेश्वरा।।६८।।

शिव उवाच-

शब्दं प्रसादलिंगाय चरलिंगाय स्पर्शनम् । शिवलिंगाय रूपं तद् गुरुलिंगाय वै रसम्।।२८।।

गंधमाचारलिंगाय महालिंगाय ओं तत:। एतन्मुखपरिज्ञानं दुर्लभं श्रुणु पार्वति।।२९।।

परमेश्वर म्हणे उमेस। शब्दविषय प्रसादलिंगास। अर्पिजे स्पर्श जंगमलिंगास। शिवलिंगास रूप पैं।।६९।। गुरुलिंगासीं रस। आचारलिंगां सुगंध सुरस। प्रणव तो महालिंगास। समर्पिजे आदरें।।७०।। ऐसे समर्पी जो जाणोनि खूण। तो दुर्लभ वो सत्यशरण। त्याचे अखंड आम्हां ध्यान। त्याचे चरण वंदू आम्ही।।७१।। ऐसेचि नेमें चालतां। तरी सायुज्य येतसे हातां। दुर्लभ असे आचरतां। वीरव्रत लिंगधारीचे।।७२।।

यदिंद्रियमुखज्ञानं तदिंद्रियमुखेन च। अन्येंद्रियेण भोक्तव्यं न भवेत् कर्मभेदत:।।३०।।

येथें ज्ञानिया म्हणसी कां स्तविजे। तो योग्यायोग्य जाणे वोजें। जेथीचे भोक्तव्य तेथेंचि देईजें। म्हणोनि धन्य तो।।७३।। आन इंद्रियांचे विषय आनासी। भोक्तव्य नव्हे ते तयासी। ज्याचे विषय ते त्याने त्यासीं। सुखें भोगिजें।।७४।। जैसे अन्य स्थानींचे भूषण। अन्य स्थानीं लेतां अमान्य। स्थानींचे स्थानी शोभायमान। दिसे साजिरे।।७५।। पाहतां तरी एकचि भोक्ता। दुसरा येथ नाहीं तत्त्वतां। परि इंद्रियद्वारे भोक्तव्यतां। भिन्नत्वें भोगी।।७६।। भिन्न भिन्न पदार्थ भोगी। परि ऐक्यत्वें एकाचि अंगी। विषय अनारिसे परि निजांगी। भोक्ता तो एकचि।।७७।। म्हणोनि जेथींचे विषय तेथेंचि भोगिजें। तेथें गुरुचि भोक्ता जाणिजें। म्हणोनि येरायेरां न लाविजें। लावितां विच्छिन्न पडे।।७८।। पुष्पाचा परिमळ नेत्रीं काय घेईजें। मुक्ताफळ चरणीं काय परीक्षिजें। आणि मुखें ऐकिजें। शब्द तो काई।।७९।। काय श्रोत्रें बोलिजें। की हस्तें चालिजें। काय चरणें कीजें। भोजनक्रिया।।८०।। म्हणोन येराची क्रिया येरासीं। न करवे करितां सायासीं। ज्याचें त्यानेंचि कीजें भोक्तां सर्वांसीं। श्रीगुरुनाथ एकचि तो।।८१।।

इंद्रियादिगतं किंचिद्यत्सुखं तत्तुपावनम्। तत्प्रसादं च भोक्तव्यं तदिंद्रियमुखेन च।।३१।।

इंद्रियद्वारें किंचिन्मात्र सुख। होय ते गुरुचि भोक्ता देख। तो प्रसाद मानिजें विशेख। ऐसा नेम असे।।८२।। परि लिंगमुखें जें होय अर्पण। तोचि प्रसाद बोलिजें नेमून। लिंगमुखेंविण जें होय निवेदन।

तो प्रसाद नोव्हे वो देवी ।।८३।।

देव्युवाच-

मिश्रितस्य स्वरूपं मे कथयस्व महेश्वर। परस्परं मिश्रभावं न जानामि सदाशिव ।।३२।।

पार्वती म्हणे ईश्वरासीं। ही विषये मिश्रित ती कैसी। कोण विषय कोणासीं। मिश्रित असती ।।८४।।

शिव उवाच-

शब्दं पंचसमायुक्तं स्पर्शं पंचसमन्वितम्। रूपं पंचसमाख्यातं रसः पंचसमन्वितः ।।३३।।

गंधः पंचसमायुक्तः मिश्रितस्तत्त्वतः श्रुणु। यथा द्रव्यमुखं ज्ञात्वा अर्पणं तत्तु दुर्लभम् ।।३४।।

शंकर म्हणे देवीसीं। एक एक मिश्रित पांचासीं। ऐसें मिश्रित येरयेरांसीं। असती वो देवी ।।८५।। हें मिश्रित मुखें जाणोन। जो करी आत्मार्पण। तो ज्ञानिया दुर्लभ जाण। सत्यशरण वो देवी ।।८६।।

देव्युवाच-

कानींद्रियाणि केभ्यश्च लिंगेभ्यः क्रमतोऽर्पयेत्। निर्णयं श्रोतुमिच्छामि सुस्पष्टं भगवन् वद ।।३५।।

पार्वती म्हणे शंकरासीं। कोण इंद्रिय कोण लिंगासीं। अर्पित निरोपा भेदासीं। कैसा निर्णयो देवा ।।८७।।

शिव उवाच-

श्रोत्रेंद्रियसमायुक्तं प्रसादं लिंगमेव च। त्वगिंद्रियमुखं ज्ञेयं जंगमस्य तथैव हि।।३६।।

नेत्रेंद्रियमुखं तस्य शिवलिंगस्य तन्महत्। हृदिंद्रिय मुखं चैव महालिंगस्य वै तथा।।३७।।

हे पार्वती ऐक वोजें। श्रोत्रेंद्रिय प्रसादलिंग बोलिजें। त्वगिंद्रिय जंगम जाणिजें। चक्षु शिवलिंग तें।।८८।। जिव्हेसीं गुरुलिंग जाणिजें। घ्राणासीं आचारलिंग ओळखिजें। मानस हृदयलिंग जाणिजें। तें महालिंग असे।।८९।। षड्लिंग षडिंद्रियमुखें। षड्विषय भोगिती सुखें। षट्स्थळासीं भोक्तव्य निकें। प्रसादमुखें तेविं।।९०।।

हृदिंद्रियमुखं ज्ञात्वा ऐक्यमेव प्रसादवान्। श्रोत्रेंद्रियमुखं ज्ञात्वा शरणस्तुप्रसादभाक्।।३८।।

त्वगिंद्रियमुखं ज्ञात्वा प्राणलिंगी प्रसादवान्। नेत्रेंद्रियमुखं ज्ञात्वा प्रसादी स्यात् प्रसादभाक्।।३९।।

या षड्इंद्रियामुखेंकरोन। प्रसादभोग जाणे तो प्रसादिया पूर्ण। मानस इंद्रियाचें मुखें जाणें तो जाण। ऐक्यस्थळ बोलिजें।।९१।। श्रोत्रमुखें जाणोन शब्दातें घेणें। तया शरणस्थळ-प्रसादी म्हणणें। त्वगिंद्रियमुखीं स्पर्श सेवणें। तो प्राणलिंगि-प्रसादी बोलिजें।।९२।। चक्षुरिंद्रियमुखें जाणोनि रूप घेणें। तया प्रसादिस्थळ-प्रसादी म्हणणें। ही खूण सत्यशरणचि जाणे। जो शिवाचारासीं अग्रगणीं।।९३।।

जिह्वेंद्रियमुखं ज्ञात्वा तत्प्रसादी महेश्वरः। घ्राणेंद्रियमुखं ज्ञात्वा तथा भक्तःप्रसादवान् ।।४०।।

जिव्हेंद्रियमुखें जाणोनि रस घेणें। तया माहेश्वरस्थळ-प्रसादी म्हणणें। घ्राणमुखें जाणोन गंध सेवणें। तया भक्तस्थळ-प्रसादी बोलिजें।।९४।। आतां षट्स्थळ षड्लिंगासीं। कोण्या अंगें कोण्या हस्तें कोण विषयासीं। कोण तृप्ति करी कोण्या लिंगासीं। ही खूण पुसो म्हणे देवी।।९५।। ऐसा पार्वतीप्रति शंकर। भक्ति ज्ञान सांगे आचार। जें ऐकतां वीरशैव एकाग्र। प्राणी पावन होती पैं।।९६।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। शिवगौरीसंवादीं वर्तत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृत्य मन्मथ।।९७।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे षड्लिंगनिर्णयनिरूपणं नाम त्रयोदशोऽध्यायः समाप्तः ।।

श्लोक ४०, ओव्या ९७.

❑

अध्याय चौदावा

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

मागील अध्यायाचें अंतीं। पार्वती प्रश्न करी शंकराप्रति। परम संतोषोनि कैलासपति। उपदेश करीतसे॥१॥

देव्युवाच-

स्थलानामंगहस्ताश्च लिंगानि च क्रमेण वै। अर्पणं तु तथा ब्रूहि प्रकारेण च केन वा॥१॥

देवी म्हणे भक्तस्थळादि करोन। कोण्या लिंगां कोण स्थळ करी पूजन। कोण्या अंगें कोण्या हस्तें कोण मुखेकरोन। कोण विषय अर्पिजें॥२॥ ही अर्पणविधि मजलागोन। षड्लिंगाचें निरोपावें पूजन। म्हणोनिया वंदिलें चरण। कृपा कीजें स्वामिया॥३॥

शिव उवाच-

चित्तहस्तेन भूम्यंगे भक्तस्याचारलिंगके। घ्राणे च तन्मुखे गंधं अर्पितं तृप्तिभाग्भवेत्॥२॥

शंकर म्हणे पार्वतीसीं। आधी ऐक भक्तस्थळासीं। तो पुजी कोण्या लिंगासीं। कोण्या पदार्थें॥४॥

भूमि-अंगें सुचित्तहस्तें। घ्राणमुखें गंधविषयातें। तृप्त करी आचारलिंगातें। तें भक्तस्थळ जाणिजें ॥५॥

माहेश्वरो जलांगे च बुद्धिहस्तेन सद्गुरुः। जिह्वामुखे रसतत्त्वं अर्पितं तृप्तिभाग्भवेत् ॥३॥

जळांगें सुबुद्धिहस्तें। जिव्हामुखें रसविषयातें। तृप्त करी गुरुलिंगातें। तें माहेश्वरस्थळ जाणिजें ॥६॥

निरहंकारहस्तेन अनलांगे प्रसादिकः। शिवलिंगमुखे नेत्रे अर्पितं रूपभोगवान् ॥४॥

अनलांगें निरहंकारहस्तें। नेत्रमुखें रूपविषयातें। तृप्त करी शिवलिंगातें। तो प्रसादी म्हणावा ॥७॥

मनोहस्तेन वाय्वंगे प्राणलिंगी तथैव च। जंगमे त्वङ्मुखेनैव अर्पितं स्पर्शभोगवान् ॥५॥

वायु-अंगें सुमनहस्तें। त्वगिंद्रियमुखें स्पर्शविषयातें। तृप्त करी जंगमलिंगातें। तें प्राणलिंगिस्थळ जाणिजें ॥८॥

ज्ञानहस्तेन शब्दश्च व्योमांगे तत्प्रसादकम्। श्रोत्रं च तन्मुखेनैव अर्पितं शब्दभोगवान् ॥६॥

व्योमांगें ज्ञानहस्तें। श्रोत्रमुखें शब्दविषयातें। अर्पित करी प्रसादलिंगातें। तें शरणस्थळ जाणिजें ॥९॥

आत्मांगे भावहस्तेन ऐक्यं चापि महात्मके । प्रणवं हृन्मुखेनैव पदार्थं तृप्तिभाग्भवेत् ॥७॥

आत्मांगें भावहस्तें। मानसमुखें प्रणवविषयातें। अर्पण करी महालिंगातें। तें ऐक्यस्थळ जाणिजें ॥१०॥

ऐसें षड्लिंग षडंगेकुन। जाणोनि जो करी आत्मार्पण। तोचि सत्य शिवगण। सत्यशरण बोलिजें ॥११॥

ऐसिया कळा जाणोन। जो करी सद्भावें पूजन। तो सर्व शिवाचारासीं संपन्न। सत्यशरण वो देवी ।।१२।। त्याचें दर्शन स्पर्शन संभाषण। जयासीं घडें भाग्याकुन। तरी निवारे जन्ममरण। कळिकाळ शरण तया ।।१३।। तो जयाकडे कृपेनें पाहे। तयासीं सृष्टी सुखाची होय। तो म्हणे मोक्षासीं जेथें राहे। तेथेंचि राहे त्याचे बोलां ।।१४।। त्याच्या दासी चारी मुक्ति जाण। अष्ट महासिद्धि येती शरण। परि तो न पाहे तयालागोन। निराश म्हणोनिया ।।१५।। ऐसे जे सत्यशरण। तेचि आचारासीं अग्रगण। शिवाचारासीं संपन्न। मुकुटमणि आमुचे ।।१६।। तयाचे प्रसादेकरोन। शिवाचार होय पावन। मजहि दैवतपण। तयाचेनि वो देवी ।।१७।। मी तरी निर्गुण निराकार। भक्ति-प्रेमालागीं झालो साकार। भक्त माझें हृदयींचें जिव्हार। त्याचें साचार ध्यान मज ।।१८।। त्याचें सदा मज चिंतन। त्याचें आवडें मज स्मरण। मी न विसंबे एक क्षण। तोहि अर्धपळ न विसंबे ।।१९।। तो आत्मा माझा मी त्याचे शरीर। तया मज नाहीं भेदाकार। जैसी गोडी आणि साखर। अभिन्न असे ।।२०।। ऐसें ऐकोन पार्वती। महा आनंद पावली चित्तीं। मग आणिक कांहीं विनंती। करिती झाली तें काळीं ।।२१।।

देव्युवाच-

चित्तादिसर्वहस्तांना क्रमोत्पत्तिः स्वभावतः। श्रोतुमिच्छामि स्पष्टं तद् ब्रूहि मे परमेश्वर ।।८।।

पार्वती म्हणे शंकरासीं। षड्हस्ताची उत्पत्ति कैसी। कोणापासोन कोणा हस्तासीं। निरोपा स्वामी ॥२२॥

शिव उवाच-

वस्तुनो भावहस्तश्च तस्मात् ज्ञानं ततो मनः। मनासोऽहंकृतिर्जाताहंकृतेः बुद्धिरेव च ॥९॥

बुद्धेश्चित्तं समुत्पन्नं क्रमशो लघुभावतः। एतद् हस्तस्य विज्ञानं अतिसूक्ष्मं वरानने ॥१०॥

शंकर म्हणे पार्वतीला। वस्तूपासोनि भावहस्त झाला। भावापासोन उत्पन्नला। ज्ञानहस्त तो ॥२३॥ ज्ञान-हस्तापासोन सुमनहस्त झाला। सुमनहस्तीं निरहंकारहस्त झाला। निरहंकारीं सुबुद्धि उत्पन्नला। परंपरेनें ॥२४॥ एवं षड्हस्ताची उत्पत्ति। निरोपिली असे तुज पार्वती। भावें धरावा सुचित्तीं। निर्णयो हाचि ॥२५॥

देव्युवाच-

चित्तादिसर्वहस्तैस्तु षड्लिंगानां क्रमेण वै। कथं वा क्रियते पूजा तद् ब्रूहि परमेश्वर ॥११॥

गिरिजेनें शंभूसीं पुसिलें। चित्तहस्तें कोण लिंग अवधारिलें। येणेपरी षड्लिंग पुजिलें। कोण लिंग कोण्या हस्तें ॥२६॥

शिव उवाच-

चित्तस्याचारलिंगं स्याद् गुरुलिंगं सुबुद्धिन: । शिवलिंगनिरहंकारो मनोहस्तेन जंगमम् ।।१२।।

प्रसादं ज्ञानहस्तेन महालिंगस्य भावकम् । इति गुह्यतमं ज्ञानं सुसूक्ष्मं श्रुणु पार्वति ।।१३।।

शिव म्हणे वो गिरिजे। चित्तहस्तें आचारलिंग अवधारिजें। सुबुद्धिहस्तें गुरुलिंग पुजिजें। पुढारी ऐक ।।२७।। शिवलिंग पुजिजें निरहंकारहस्तें। सुमनहस्तें जंगमलिंगातें। ज्ञानहस्तें प्रसादलिंगातें। अवधारिजें ।।२८।। भावहस्त महालिंगासीं। तेणें अवधारिजें तयासीं। एवं षड्हस्तें षड्लिंगांसीं। अवधारण निरोपिलें ।।२९।। हें अंतर्गुह्य माझें ज्ञान। अत्यंत सूक्ष्म प्रमाण। तें तुज केलें निरोपण। तूं भक्तराज म्हणोनिया ।।३०।। भक्ति-विश्वासेंविण। हें श्रवणीं न पडें निरोपण। तुझें प्रेम मज म्हणोन। बोधीतसे तुजला हें ।।३१।।

देव्युवाच-

किं मिश्रं चित्तबुद्धिश्च किमंहकारमिश्रितम् । किं मिश्रं ज्ञानभावश्च ब्रूहि मे परमेश्वर ।।१४।।

हे षड्हस्त षड्स्थळांसीं। मिश्रित अससी कोण्या पदार्थांसीं। ते निरोपा म्हणे शिवासीं। पार्वती देवी ।।३२।।

शिव उवाच-

भाव: पंचसमायुक्तो ज्ञानपंचसमन्वितम्। मन: पंचसमायुक्तमहंकारस्तथैव च ।।१५।।

बुद्धि: पंचसमायुक्ता चित्तं पंचसमन्वितम्। एकैकं पंचभिर्युक्तं सुसूक्ष्मं कमलानने ।।१६।।

ईश्वर म्हणे गिरिजेस। एकेक हस्त पांचापांचास। मिश्रित असे ते सावकाश। निरोपुं ऐक तें ।।३३।। ऐक्यस्थळाचा जो भावहस्त। तो पांचाशीं असे मिश्रित। शरणास जो सुचित्तहस्त। तोहि मिश्रित पांचासीं ।।३४।। प्राणलिंग अहंकारहस्त। तोहि पांचासीं असे मिश्रित। तैसा प्रसादियाचा निरहंकारहस्त। तो मिश्रित पांचासीं ।।३५।। माहेश्वरां सुबुद्धिहस्त। तो पांचासीं असे मिश्रित। भक्तास जो सुचित्तहस्त। तोहि मिश्रित पांचासीं ।।३६।। एवं हस्त येरायेरांसीं। मिश्रित असती पांची पांचासीं। ऐकोनि संतोष झाला गिरिजेसीं। मग आणिक प्रश्न करी ।।३७।।

देव्युवाच-

सहभाजनस्य के भेदा: का व्याप्ति: परिमाणत:। एतत् सर्वं समासेन ब्रूहि मे परमेश्वर ।।१७।।

गिरिजा म्हणे शंकरासीं। कोण लिंग कोण्या द्वारासीं। कोण्या हस्तें कोण विषयासीं। भोगीत तें निरोपावें स्वामी ।।३८।।

शिव उवाच-

घ्राणेनाचारलिंगं तु गंधं गृह्णाति यत् सदा। जिह्वया गुरुलिंगं हि रसं गृह्णाति तत्त्वत: ।।१८।।

चक्षुषा शिवलिंगं तद्रूपं गृह्णाति यत्तथा। त्वचा जंगमलिंगं च स्पर्शं तदनुभूयते ।।१९।।

भक्त भूमि-अंगें सुचित्तहस्तें। घ्राणद्वारें गंधविषयातें। आचारलिंग अर्पणातें। भोक्तव्य होय ।।३९।। माहेश्वर आप-अंगें सुबुद्धिहस्तें। जिव्हाद्वारें रसविषयातें। गुरुलिंग अर्पणातें। भोक्तव्य होय ।।४०।। प्रसादी तेजांगें निरहंकारहस्तें। चक्षुद्वारें रूप महाविषयातें। शिवलिंग अर्पणातें। भोक्तव्य होय ।।४१।। प्राणलिंगी वायु-अंगें सुमनहस्तें। त्वचाद्वारें स्पर्शविषयातें। जंगमलिंगीं अर्पणातें। भोक्तव्य होय ।।४२।।

श्रोत्रेण शब्दो गृह्णाति शरण्यो लिंगमूर्तिक: । हृदयेन तु महालिंग ओंकारं चापि गृह्यते ।।२०।।

शरण नभांगें ज्ञानहस्तें। श्रोत्रद्वारें शब्दविषयातें। प्रसादलिंगीं अर्पणातें। भोक्तव्य होय ।।४३।। ऐक्य चिदंगें भावहस्ते। हृदयद्वारें प्रणवविषयातें। महालिंग अर्पणातें। भोक्तव्य होय ।।४४।। ऐसें पांच लिंगांचें भोक्तेपण। तुज निरोपिलें विवरोन। आतां महालिंगाचें भोक्तेपण। लक्षण निरोपुं ऐक गिरिजे ।।४५।।

इत्येवमाश्रयेणैव महालिंगं सुबुद्धिमान्। गंधाद्यानंदपर्यंतमनुराददति सर्वदा ।।२१।।

ऐसें इंद्रियद्वारें विषय जाण। षड्लिंगीं जें जें अर्पण। तें तें भक्तिं महालिंगीं अर्पण। सर्व तोचि म्हणोनि ।।४६।। षड्लिंगांचा जो विस्तार। तो स्वयें महालिंग साचार। म्हणोनि सर्वभोक्ता परात्पर। तोचि बोलिला असे ।।४७।।

लिंगदृष्ट्या दर्शनं स्याल्लिंगहस्तेन स्पर्शनम्। लिंगश्रोत्रेण श्रोतव्यं लिंगजिह्वारसात्मवान् ।।२२।।

लिंगदृष्टीं दृष्टी देखत। लिंगाचे हस्तें देत घेत। लिंगाचे श्रोत्रें ऐकत। म्हणोनि महालिंग भोक्ता ।।४८।। लिंगजिव्हें रस चाखत। लिंगाविण कांहीं न चाले पदार्थ। आणिक कांहीं होत जात। ते लिंगाचिये सत्तें ।।४९।।

लिंगघ्राणेन घ्राणं तु लिंगेन पदते सह। लिंगमनुगतं नित्यं येन तत्सहभाजनम् ।।२३।।

लिंगाचिये घ्राणें घ्राण। गंधविषय भोगी आपण। लिंगाचें पद ते चरण चालन। लिंगाविण न चले कांहीं ।।५०।। लिंगें बोलविल्या वेदु बोले। लिंगें चालविल्या सूर्य चाले। लिंगें हालविल्या वायु हाले। सत्तामात्रें ।।५१।। लिंगें रचविल्या ब्रह्मांड रचे। लिंगें खचविल्या सर्व खचे। स्थिति नाद बिंदु कारण रचे। त्याचिया सत्तें ।।५२।। क्षितीनें भूतें वाहावीं। पर्वतीं बैसका पाडावी। सागरें सीमा नुल्लंघावी। ही आज्ञा लिंगाची ।।५३।। उत्पत्ति करिजें ब्रह्मयानें। प्रतिपाळ कीजें विष्णूनें। संहार कीजें रुद्रानें। सत्तामात्रें

लिंगाचिया ।।५४।। लिंगापासोन शक्ति झाली। तेव्हां पृथ्वी स्थितीत आली। ब्रह्मा विष्णु हीं बाळें व्याली। शक्तिसामर्थ्य अद्भुत ।।५५।। आतां एक एक काय सांगावें। सर्वचि चाले लिंगसत्ताप्रभावें। एवं महालिंग कर्ता भोक्ता स्वभावें। परि अकर्तृत्व न मोडें ।।५६।। जैसे भानूचे सत्तें सर्व चालत। परि तो न करिता करवीत। करवोनि निराळा राहत। त्यापरी अकर्ता तो ।।५७।। जैसा कुलालचक्राखालतां। खुंटा असे अकर्ता। सर्व घट होती त्याचिया सत्तां। परि तो उगाचि असे ।।५८।। ऐसा महालिंग सर्व भोक्ता कर्ता। चराचर चाले तयाचिया सत्ता। परि तो न लिंपे सर्वथा। अकर्तेपणेचि असे ।।५९।। तोचि होय महालिंग। स्वयंभू न चळे अभंग। कर्ताहर्ता होवोन असंग। शक्तिसामर्थ्य तया अंगीं ।।६०।। कर्ता असोनि अकर्ता। त्याची असे सर्व सत्ता। तेथें अहंकारें गर्वें वर्ततां। विघ्न प्राप्त तयासीं ।।६१।। सर्वत्र लिंगरूपी जाण। तें मी स्वयेंचि झालो आपण। लिंगां मज भिन्नपण। नसे जाण पार्वती ।।६२।। त्या लिंगाचे पूर्ण भक्त। ते मला असती आप्त। त्यावेगळा दुजा पुनीत। न मानी मी देवो ।।६३।। आपणां तया भेद नाहीं। जैसी भूषणें सुवर्णाठायीं। भानु-किरणां भेद कांहीं। नसे जाण सत्य पैं ।।६४।। तंतु आणि वस्त्रास। मृत्तिका आणि घटास। आकाश तैसेचि शब्दास। भेद नाहीं जाण पां ।।६५।। तैसा मी लिंगरूपी भक्तहृदयीं। वसे सदा निरालंब तत्त्वाठायीं। लिंगनिष्ठें करोनि कैलासालयीं। अंतीं येतो

धांवोनिया ।।६६।।

सर्वेंद्रियाणां द्वारैश्च महालिंगेन भुज्यते। इति यस्य स्थिरा बुद्धिः सहभाजः स उच्चते ।।२४।।

सर्व इंद्रियद्वारें भोक्ता। महालिंगचि तत्त्वतां। ऐसा जाणे बुद्धिवंत दाता। तोचि जंगम तोचि भक्त ।।६७।। करोनि अकर्ता ही खूण। कळली जया संपूर्ण। तो लिंगचि स्वयें होवोन। असे तोचि जंगम तोचि भक्त ।।६८।।

दृष्टाद् दृष्टिः श्रुतात् श्रुतं घ्रातात्घ्रातं तथैव च। स्पृष्टात्स्पृष्टं तु जानीयाद्रसनाद्रसनं तथा ।।२५।।

भुक्तात् भुक्तमाख्यातं तृप्तिं चैव तथैव हि। एकः प्राणः समाख्यातः सदैव सहवर्तिनाम् ।।२६।।

दृष्टीनें देखे तें तें जाण। कानीं ऐकें तें तें आपण। घ्राणीं परिमळ घेते जाण कोण। तया लिंगाविना ।।६९।। जिव्हेसीं रस घेत। स्पर्शासीं स्पर्शत। तयाविण दुजा नितांत। कोण तो विचारी पां ।।७०।। प्रणवादि विषयीं तृप्त होत। तोचि जाणे समस्त। तया लिंगाविण मात। येथ बोलोचि नये ।।७१।। ऐसा सर्वत्र लिंग व्यापक जाण। तेंचि तें स्वयें झालें आपण। आपणियां तया भिन्नपण। न देखती कदा ।।७२।। आपणियां तया भेद नाहीं। जैसे भूषण सुवर्णाचे ठायीं। भानुकिरणां भेद नाहीं। अंतरीं असें एकचि ।।७३।। अथवा तंतु आणि विस्तारां। मृत्तिका आणि धरां। अवकाश आणि अंबरां। भेदु जैसा नाहीं ।।७४।। तैसा लिंग

आपणियां। अभेद वर्ते निर्माया। तोचि शरण लिंगिया। भक्त अथवा जंगम।।७५।। तरी लिंगस्थिति वर्तती जे। तेणें लिंगचि आपण होईजें। ही स्थिति ऐक वो गिरिजे। निरोपुं तुज।।७६।। लिंग उगेचि असें जैसें। आपणहि उगेचि असिजें तैसें। लिंगासीं चळणवळण नसे। आपण निश्चळ तैसें व्हावें।।७७।। लिंग शांत असे। आपणहि तैसें विशेषें। लिंगासीं बडबड नसे। आपणहि तैसाचि।।७८।। लिंग निराश सर्वारहित। आपणहि निराश निश्चित। लिंग निराभिमानी निर्हेत। आपणहि तैसाचि।।७९।। कोणी म्हणतील आकार आहे। तैसा जरी हाहि होये। तरी जडत्व आलें पाहे। उभय वर्गां।।८०।। ऐसें जें बोलती। तें अज्ञान म्हणिजेती। कां म्हणसी तरी लिंग आकार भाविती। म्हणोनिया।।८१।। जें पातळ तूप तें थिजलें। तरी काय तुपपणा मुकलें। तैसें निराकार आकारलें। लिंग होवोनिया।।८२।। यालागीं लिंग निराकारचि असे। तया आकार प्रकार नसे। दिसे तरी कल्पिला असे। भक्ति-सिद्धीसाठीं कीं।।८३।। एवं भक्त आणि देव। उभयां नसे भिन्न भाव। तो भक्तश्रेष्ठ सावेव। लिंग होवोनि ठेला।।८४।। म्हणोनि येरयेरांचे प्राण। एक होवोनि ठेले जाण। लिंग भक्त मिळोन। उभय वर्ग एकचि।।८५।।

हृदयं हृदयं चैव श्रोत्रं श्रोत्रं च सर्वदा। स्पर्शनं स्पर्शनं चैव दृष्टिर्दृष्टिस्तथा पुनः।।२७।।
जिह्वा जिह्वेंद्रियं ज्ञेयं घ्राणं तद् घ्राणमेव हि। एकेव प्राणमाख्यातं लिंगेन सहवर्तिनः।।२८।।

आपुलें निजहृदयास। लिंगाचें हृदय असे सावकाश। आपुलिया श्रोत्रांस। श्रोत्र लिंगाचेचि ।।८६।। आपुले त्वगिंद्रियासीं जाण। लिंगाचेनि त्वगिंद्रियपण। आपुले चक्षूसीं नेमून। चक्षुपणा तेहि लिंगाचेनि ।।८७।। आपुले जिव्हेसीं। लिंगजिव्हा सावकाशी। आपुल्या घ्राणासीं। घ्राण लिंगाचे ।।८८।। आपुलिया वाक्यां वाक्यपण। लिंगवाक्यें असें जाण। पाणींद्रियालागोन। पाणींद्रिय लिंगाचें ।।८९।। पाद-इंद्रियां पाद-इंद्रिय जाण। लिंगासीं असती आपण। शिश्नासीं शिश्नपण। लिंगनिष्ठें जाण तें ।।९०।। गुदासीं गुदपण। ते लिंगगुदें जाण। एवं दश इंद्रियांसीं प्रमाण। लिंग-इंद्रियाचेनि ।।९१।। अंत:करणां अंत:करण। लिंगचि असे जाण। मनासीं मनपण। तेंहि लिंगाचेनि मनें ।।९२।। बुद्धीसीं बुद्धि जाण। लिंगाची बुद्धि आपण। आपुलें चित्ताचें चित्त नेमून। लिंगाचें चित्त असें ।।९३।। आपुल्या अहंकाराचा अहंकार। आपणचि असे लिंगेश्वर। एवं सर्ववर्तमान सर्वेश्वर। भक्तचि होवोनि वसे ।।९४।। यालागीं लिंग-इंद्रियाविण। न चालती भक्त-इंद्रियें जाण। म्हणोनि उभय वर्गी भिन्न। म्हणोचि नये ।।९५।। एवं उभयतांसीं मिश्रित जाणिजें। आपण या लिंगीं एकत्व कीजें। येरयेरां प्राण मिश्रित होईजें। अभिन्नपणें ।।९६।। ऐसें आपण तें लिंग लिंग तें आपण। ऐसा आचरे जंगम अथवा भक्त जाण। त्या नांव बोलिजें सर्ववर्तमान। सत्य सत्य वो गिरिजे ।।९७।।

लिंगदेही शिवात्मायं लिंगाचारी न लौकिक: । सर्वलिंगमयं रूपं लिंगेन सह लक्ष्यते ।।२८।।

लिंगीं प्राणी शिवरूप होवोनि। लिंगाचे वर्ते आचरणीं। तो लौकिकासीं न मानी जनीं। लिंगध्यानीं लिंगचि तो।।९८।। जो लिंगरूप देखे दृष्टीं सृष्टी। अनंत ब्रह्मांडें लिंगाचे पोटीं। अध: ऊर्ध्व मध्य शेवटीं। लिंगसंपुटीं सर्व देखे।।९९।। लिंगापोटीं सृष्टी म्हणणे। हेंहि बोलणे अवाच्य जाणणें। सृष्टी आणि लिंग दोनपणें। कशासीं भाविजें।।१००।। आघवा लिंगचि कां न म्हणावा। भेद सांडोनि अभेदचि जाणावा। हा निजभक्ति आपुला ठेवा। जाणोनि वर्तती ते।।१०१।। ते आपणियासहित लिंगचि देखती। लिंगरूपचि सर्व सृष्टी भाविती। शिवस्मरणीं शिवरूप होवोनि असती। तयाप्रति महालिंगी बोलिजें।।१०२।। तया आणि महालिंगासीं। भेद नाहीं उभय वर्गासीं। म्हणोनि तोचि महालिंग सर्वांसीं। सर्वभोक्ता होवोनि असे।।१०३।।

इत्थं सर्वं महालिंगं कर्ताभोक्ता प्रकाशक: । यो हि भेदो न जानाति प्रसादस्तस्य निष्फल: ।।२९।।

ऐसा महालिंगचि एक। सर्वत्र तोचि भोक्ता देख। एकावांचोनि आणिक। दुजा नाहीं कोणी।।१०४।। ही खूण न जाणतां पूजा करी। अधोगति जाय तो अवधारी। त्याचा प्रसाद निर्फळ सुंदरी। चुकला निजसुखासीं।।१०५।। एक नेणोनि पूजा करिती। एक अभिमानें तें न पुसती। एक ते अनुमानेंच आचरती।

गुरुमुखेंविण ।।१०६।। एक देखादेखी करिती। एक दंभास्तव आचरती। यालागीं दुःखातें पावती। जन्म-मृत्यूच्या ।।१०७।। म्हणोनि संप्रदायमार्गेविण। जें जें कीजें क्रिया-आचरण। तें तें निर्फळ होय जाण। प्रसादिक क्रिया ते ।।१०८।। तैसीच दुजी एक गोष्ट। जो स्वपराक्रमें बलिष्ठ। पुजूं पाहातसे गर्विष्ठ। त्याची पूजा निष्फळ होय ।।१०९।। आज हें तुजलागीं रहस्य। सांगतो सद्भक्तिवश। गुरुमुखें अर्चिता विशेष। पुण्य घडें तयासीं ।।११०।। जैसी पूजा तैसें भजन। आवडी करी प्रेमेंकरून। आळस न करी रात्रंदिन। नामस्मरण शिवाचें ।।१११।। प्रेमें टाळी वाजवून। घोषें अंबर गर्जवून। नाचोनि करी भजन। सद्भक्त माझा तो ।।११२।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। शिवगौरीसंवादीं वर्तत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृत्य मन्मथ ।।११३।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे षड्लिंगनिर्णयनिरूपणं नाम चतुर्दशोऽध्यायः समाप्तः ।।

श्लोक २९, ओव्या ११३.

❑

अध्याय पंधरावा

॥ श्रीगुरुभ्योनमः ॥

मागें जें जें निरोपिलें । तें तें पूर्णत्वेचि भासलें । पंचतत्त्वीं भरोनि उरलें । रूप तुझें स्वामिया ॥१॥ गुज खूण ब्रह्मांडाची । कथनी शक्ति असे अन्य देवाची । सत्ता सर्व तुमची । कर्ते तुम्हीच ईश्वरा ॥२॥ आतां पंचदशम अध्यायीं । कथा रसाळ श्रवणाठायीं । वदा म्हणोनि लागे पायीं । पार्वती देवी सादर ॥३॥

देव्युवाच–

लिंगं तु षड्विधं प्रोक्तं तत्रायं परमार्थतः । जीवो देहं परित्यज्य कस्मिन् लिंगे प्रलीयते ॥१॥

पार्वती म्हणे शिवासीं । तुम्ही षड्लिंग निरोपिले ऐक्यत्वासीं । तरी देहासीं प्राणलिंगासीं । ऐक्य कोण लिंगीं ॥४॥ तो तया लिंगीं सामावे कैसा । त्याचा प्रकार निरोपा सरिसा । श्रवणी झाली मन्मानसा । उत्सुकता पैं ॥५॥

शिव उवाच–

पंचेंद्रियमुखं ज्ञात्वा पदार्थं च समर्पितम् । यल्लिंगमनुते यस्तु तस्मिन् लिंगे प्रलीयते ॥२॥

पांची लिंगें ज्या लिंगाभीतरीं। तो पांची लिंगां भोक्ता अवधारी। जो भोगून अभोक्ता सर्वांतरीं। तया नांव महालिंग म्हणिजें ।।६।। तो महालिंग सर्वगत असे। देहान्ती तेथें जीव समरसे। परि हें तया घडे अखंड ध्यासें। महालिंगानुभव असे जया ।।७।। जो महालिंग सदा ध्यातु असे। अंतकाळीं त्यासीं आठवी विश्वासें। मग तोचि होय सौरसे। यासीं अन्यथा नाहीं ।।८।। महालिंगां अंतकाळीं आठविजें। तें होणें न चुके सहजें। म्हणोनि अंतकाळीं वोजें। असिजें सावधान ।।९।। जो महालिंगीं समाधि लावी। तो जन्ममृत्यूतें चुकवी। शिवध्यानीं बुद्धि सावध ठेवी। तोचि पावे मुक्तिपद ।।१०।। अंतकाळीं शिवस्मरण होणें। नसे अभ्यासाविणें। म्हणोनि नित्यनेमें शिवभजन। करावें जागृतिं स्वप्नींहि ।।११।। तयाचें होय साध्य साधन। स्वरूपीं राहे सावधान। नानापरीचे भोग त्यजून। नामस्मरणीं रत असिजें ।।१२।। नातरी म्हणशील आतां भोग भोगीन। मग अंतकाळीं सावध होईन। त्या वेळीं महालिंगाचें स्मरण करीन। देह त्यागीन तेंचि होवोनि ।।१३।। तरी हें न घडेचि सर्वथा। जरी इंद्रियें न निर्दाळितां। अथवा शिवध्यानहि नसतां। अंतकाळीं वस्तु होणें न घडें ।।१४।। अंतकाळीं जठराग्नि जाण। सावध असे जरी भाग्यें पूर्ण। नसतां जठराग्नि जाय विझोन। तेणें धूर कोंडोनि अंधारी होय ।।१५।। अंधारीं धूर दाटला जेव्हां। तें वेळीं सावध व्हावें केव्हां। मन बुद्धि भ्रमोनि जाय तेव्हां। आठवण केविं होय ।।१६।। अंतकाळीं

घाबरेपण। आसन घालोनि बैसेल कोण। मा आठवेल वस्तुपण। मग ब्रह्म होणें न घडें।।१७।। अंतीं जठराग्नि विझलियानें। धूर दाटलिया गुणें। तईं मनबुद्धि भ्रमपणें। तेथें चिंतनहेतु कैसा।।१८।। जरी हेतुध्यास कां नाहीं म्हणसी। तो आधीच नसतां निजध्यासीं। तरी अंतकाळीं स्मरणासीं। आठवु कैंचा।।१९।। यालागीं आतांचि अखंडितां। निजध्यास करावा प्रीत्यर्था। तरी अंतकाळीं ध्यासहेतु तत्त्वतां। महालिंगचि होतसे।।२०।। जेविं जागृतिं मन जेथें थोके। तेंचि स्वप्नीं वासनात्मक देखें। तेविं प्रयाणकाळीं आठवे तें न चुके। होणें देवी।।२१।। यालागीं देह असतां वस्तुध्यास असिजें। तरी तें अंतकाळीं आठवे सहजें। मग तेंच होणें न चुकिजें। देहान्ती वो गौरी।।२२।। यालागीं अखंड महालिंगासीं ध्यास। असे प्राणियां तोचि आठवे तयास। मग जीवासीं ऐक्य समरस। महालिंगीं होय।।२३।। तुवां पुसिले होते अंतकाळीं। जीव मिळे कोण लिंगमेळीं। ती निरूपिली तुझी प्रश्नावळी। निर्णय करोनि।।२४।। एऱ्हवीं असतां निजरूपाला। अंतकाळ कैंचा तयाला। देह असतां विदेह होवोनि ठेला। त्यासीं मरण कैंचे।।२५।। ज्यासीं मृत्युविकारचि शेखी नाहीं। तो अंतकाळ करील कधीं कांहीं। त्यासीं जाणें येणें मुळीच नाहीं। जीवन्मुक्त नरां त्या।।२६।। त्यासीं जन्मादि षड्विकार नाहीं। तेणें अंतकाळीं बसोनि स्मरावें कांहीं। ज्यासीं स्मरावें तेचि पाही। स्वयें होवोनि ठेला।।२७।। म्हणोनि अंतकाळीची व्यथा।

अभक्तासीं होय तत्त्वतां। निजभक्तासीं नोव्हे सर्वथा। मृत्युव्यथा प्रयाणीं ।।२८।। मरणासीं मारोनि सावकाश। मृत्युंजय झाला अविनाश। त्यासीं प्रयाणकाळीचा प्रयास। सर्वथा न लागे ।।२९।। देह गेलिया मोक्ष होय जरी। तरी कां अभ्यास सोसावे शरीरीं। अथवा फिरती देशांतरीं। तें काय व्यर्थचि जाणावें ।।३०।। आतां तंत्रमंत्र उपदेशिती। देह गेलिया मोक्ष होय म्हणती। ते सद्गुरु सर्वथा न होती। कैवल्यदानीं ।।३१।। जरी मुक्ति ये देहीं न घडे। तरी वैरागी कां शिणती वेडे। ब्रह्मज्ञानी गुरु न भेटतां बापुडे। करितील काय ।।३२।। यालागीं सद्गुरु ज्ञानी व्हावा। तो महालिंगीं मेळवी जीवां। यापरी जीवाचा ऐक्यठेवा। देवी तुज निरोपिला ।।३३।। प्रभुरूप श्रीगुरुनाथ। जया भेटती भाग्यानुसार समर्थ। ज्याचें बोधें परब्रह्म समस्त। शिष्यांसीं भासें ।।३४।। ऐसा तो परब्रह्मचि झाला। मग मनादि सर्वेंद्रियाला। वस्तुत्वें देखे तयाला। अभेदवादी होवोनिया ।।३५।।

यथा तत्त्वं तथा दृष्टिर्यथा दृष्टिस्तथा मनः। यथा मनस्तथा भावो यथा भावस्तथा लयः ।।३।।

जैसा तत्त्वरूपासीं आला। तैसाचि बोध दृढ बाणला। जें जें देखें तें तें तयाला। महालिंगचि भासें ।।३६।। ज्याची दृष्टी झाली चैतन्यघन। जैसी दृष्टी तैसें मन। जैसें मन तैसा भाव जाण। अभेद ज्याचा ।।३७।। जैसा भाव तैसा लय पावला। लयत्वें वस्तुत्वें लयीं विश्रांतीस आला। तो वस्तुचि होवोनि ठेला।

त्यासीं भेद नाहीं ।।३८।।

अर्पितानर्पितन्नास्ति भेदं वा अर्पणे तथा। पदार्थस्य प्रसादस्य किंचिद् भेदं न भावयेत् ।।४।।

ज्या पदार्थीं मिळे प्रसाद। तो अर्पावा नाहीं भेद। तो आपणचि स्वत:सिद्ध। म्हणोनि संदेह नाहीं ।।३९।। त्यासीं अर्पणीं अनार्पणीं भेद नाहीं। सहज अर्पण होतसे पाही। दोन्ही इंद्रियांचे ठायीं। ब्रह्मबोध ओसंडतसे ।।४०।। श्रवणीं ऐके कांहीं जें। त्वचेनें जें जें स्पर्शिजें। चक्षूनें जें जें देखिजें। तें वस्तुरूपचि ।।४१।। जिव्हेनें जें जें चाखिजें। घ्राणें जो जो गंध घेईजें। तें तें वस्तुत्व मानी सहजें। सत्यशरण तो ।।४२।। जें जें वागिंद्रियाचे बोलणें। पाणींद्रियाचें जें जें घेणें। पादेंद्रियाचें जें जें चालणें। तें तयाविण नाहीं ।।४३।। ऐसें सर्व इंद्रियांसीं। घेणें देणें अहर्निशीं। तें तें समर्पी महालिंगासीं। म्हणोनि तया भेद नाहीं ।।४४।। ऐसा जो तत्त्वरूप होवोनि। तत्त्वीं मिश्रित असे तत्त्वपणीं। त्यासीं अर्पित अनार्पित कोणी। भेदु न देखिजे ।।४५।।

अभावे भावमासाद्य ह्यस्थाने स्थानमाचरेत्। एतद्वयपरिज्ञानी प्रसादी सावधानक: ।।५।।

तूं म्हणसी अर्पित अनार्पित। भेद कां नाहीं त्यासीं निश्चित। तरी तो काय क्रियारहित। जाला म्हणसी ।।४६।। तरी तो ऐक विचार। तो क्रिया न टाकी चतुर। अभाव भाव सारासार। जाणता म्हणोनि ।।४७।। तो स्थानां अस्थानां जाणतां। सव्य अपसव्य ओळखतां। तो होय केविं क्रिया सांडितां।

विचारोनि पाहे वो देवी ।।४८।। भोग्याभोग्य जाणोन। जो वर्ते जाणे तो सज्ञान। अकर्तेपणें असें ज्याचें वर्तन। तो भयानें क्रिया टाकीना ।।४९।। अकर्तेपणें असतां। तो क्रिया न टाकी सर्वथा। स्वयें होवोनि वस्तुता। असे म्हणोनिया ।।५०।। यालागीं अर्पितानर्पितासीं। संदेह नाहीं तयासीं। कां म्हणसी तरी फळासीं। निराश म्हणोनिया ।।५१।। कां क्रिया आलियावरी। तरी फुगारा न धरी अंतरीं। अथवा बिघडल्यावरी अंतरीं। दुःखी न होय तो ।।५२।। तो अवघा आपणचि झाला। तो निराश फळासीं आला। म्हणोनि अर्पितानर्पित तयाला। संदेह नाहीं ।।५३।। परि तो क्रिया न टाकितां नित्य वर्ते। जडजीव तरतील या परोपकारार्थें। क्रिया करावी सर्व समर्थें। जरी झाला प्रभुरूप ।।५४।। यालागीं तो सत्यशरण। क्रिया करी चित्तवृत्ति ठेवोन। क्रियाफळास निराशपण। अकर्ता म्हणोनिया ।।५५।। ज्यासीं असें ऐसें ज्ञान। तया अर्पितानर्पितीं अलिप्तपण। म्हणोनि तया ठायीं भेदलक्षण। धरूंचि नये ।।५६।। येणेंपरी जो होय आचरता। तया बोलिजें सदा सावधानता। तोचि शुद्ध प्रसादी तत्त्वतां। सत्यशरण तो ।।५७।।

संयोगे च वियोगे च लघुबिंदुसुखार्पितम्। यः कुर्यादिष्टलिंगे च सावधानं निरंतरम् ।।६।।

संयोगीं अथवा वियोगीं। बिंदुमात्र जें सुख घडें अंगीं। तें अर्पिता जाण लिंगीं। तो सावधान

प्रसादी ।।५८।। ज्या ज्या क्षणीं जें जें होय सुख। अणुमात्र तेंहि अर्पी देख। इष्टलिंगाचे ठायीं निष्टंक। तो सावधान प्रसादी ।।५९।। कां म्हणसी तरी ऐक। गुरु लिंग जंगम तिन्ही एक। यालागीं लिंगासीं पूजा करी नेमक। हें तें गुरूसीं अर्पिजें ।।६०।। यालागीं जें पुजिजें। तें तें गुरूसीं अर्पे सहजें। तैसेचि इष्टलिंगासीं अर्पिजें। तें तो गुरु भोक्ता ।।६१।। ऐसिया अर्पणविधीनें जो वर्ते। सावधान प्रसादी बोलिजें त्यातें। तो जिवांहूनि आवडे आमुते। सत्यशरण वो देवी ।।६२।। जो सत्यशरण झाला। तो लिंग होवोनि ठेला। भेदाभेद निमाला। तया पुरुषाचा ।।६३।। त्याचे आम्हांसीं ध्यान। तो देव भी भक्त जाण। तो आत्मा मी देह आपण। ऐसा पढियंता तो आम्हां ।।६४।। तया आम्हां वियोगतां। कधी न पडे तत्त्वतां। मी तयांत तो मज अतौता। होवोनि असे ।।६५।। ऐसा जो सत्यशरण। तोचि प्रसादी सदा सावधान। अंतकाळीं तयाचा प्राण। वस्तूसीं समरसे ।।६६।।

प्राणप्रयाणकाले च लिंगभोगोपभोगिनः। अर्पयेत् सावधानेन स्वलिंगे प्राणनायकः ।।७।।

लिंगभोग भोगी जो सत्यशरण। लिंगीं लिंगरूप जाहला आपण। त्यानें प्रयाणकाळीं सावधान। प्राण अर्पावा महालिंगीं ।।६७।। लिंगभोग घेतां जो लिंगप्राणी। त्याने प्राण प्रयाणकाळीं मेळवोनि। महालिंगीं समरसोनि। महालिंगचि होईजें ।।६८।। ऐसा तो अंतकाळीं सावधान। महालिंगीं मेळवी

प्राण। त्या नामे प्राणलिंगी जाण। सत्यशरण वो देवी ।।६९।। नातरी जन्मवरी सावधान। अंतकाळीं पडें विस्मरण। तरी केले कष्ट व्यर्थ जाण। जाले त्याचे कीं ।।७०।। नरदेह पावोन उत्तम। करी सद्वर्तनाचा नेम। जो पुरुष सदा सप्रेम। शिवभक्ति करीतसे ।।७१।। तोचि या यातनेतून। दूर असे भक्तजन। त्याची निमाली सर्वथा जाण। अविद्याबंधनें पैं ।।७२।। जो आत्म-अनात्मविचार करी। त्यासीं प्राप्त होय मंगळेश्वरी। ऋद्धिसिद्धि परोपरी। राबती तेथें ।।७३।। तो पुरुष शिवचि झाला। ब्रह्मीचा अधिकार त्याला। प्रतिईश्वर बोलियेला। दयाशील म्हणोनि ।।७४।। ऐसिया दशेप्रत। प्राप्त होती शिवभक्त। जे आचरती शिवयोग निभ्रांत। एकनिष्ठ-पणें ।।७५।। देहसंबंधें जी जी क्रिया घडे। तें तें सुखदुःख घेतां रोकडे। न मानी आपुलें कर्म साकडे। ईश्वर-इच्छा भावीतसे ।।७६।। अंतकाळीचे क्लेश। निजभक्तां लागूं नेदी सर्वेश। दूर करी तयाचा भवपाश। शिवभक्तिकारणें ।।७७।। ऐसा निष्ठावंत भक्त। जो असेल गुरुकरजात। तो अहर्निश जपत। गुरुखुणेसीं ।।७८।। पूर्वी ध्यास जो होता गुरुखुणेचा। जरी अंतकाळीं विसर पडे तयाचा। तरी जें आठवें तें साचा। होणें न चुके कदा ।।७९।। गुरुखूण म्हणिजे श्रीगुरूचें स्वरूप। अरूपचि असें होवोनि रूप। जैसें पातळ तेंचि गोठोन तूप। तेंचि शुभ्र जाहलें ।।८०।। उदकाची गार गोठोन। साकार झाली एक क्षण। अंतीं विरोन नीरपण। नव जाय कीं ।।८१।। गार

विरतां न विरतां। नीरचि असे विवेकें पाहतां। तैसें गुरुरूपी निराकारतां। सदा शिष्याची भावना ।।८२।। निराकार गुरुरूपाची खूण। प्रयाणकाळीं जे आठवण। तरी तेंचि होईजें चैतन्यघन। परब्रह्मचि ।।८३।। हेहि बोल बोधावया बोलिलो देवी। तयासीं आठव नव्हता काय पूर्वी। अंतकाळीं आठव जहाला हे पदवी। बोलचि नव्हे ।।८४।। तरी अखंड ध्यास पूर्वी असे। तरी अंतकाळीं मुखासीं ये अपैंसे। आदि नसतां अंतकाळीं आठवूं बैसे। तरी आठवे केविं ।।८५।। ज्याचें जेथ असेल मानस। अंतकाळीं तेंचि आठवें तयास। तें होणें न चुकें सावकाश। ऋषिमुनिजनां ।।८६।। ज्या ज्या भावनें देह जाये। त्या त्या भावनें होणें आहे। हें न चुके तेंचि होय। तुझीच आण ।।८७।। कोणी म्हणती पार्वतीची आण। वाहिली काय म्हणोन। तेंचि तेहि ऐका श्रोतेजन। खूण सांगेन जी ।।८८।। पार्वती ते भक्तराज। भक्त म्हणिजे देवपणाचें बीज। देवपण आलें भक्तांगें सहज। एऱ्हवीं अव्यक्त अनाम ।।८९।। भक्त तरी देवपणें उच्चारिती। देव तरी भक्तीनें मिरविती। येरयेरांवांचून स्थिति। नुरेचि उभयां ।।९०।। भक्त भक्तीनें देवो झाला। तंव उभयासीं भेद खंडला। आतां देव भक्त म्हणणें बोल ठेला। भक्त देव एकचि ।।९१।। यालागीं देव तोचि भक्त भक्त तोचि देव। ऐसा जरी धरी अनुभव। तरी आणेचा संदेह। कां धरावा चतुरीं ।।९२।। पार्वती स्त्रीरूप दिसताहि। तो निजात्मचि असे पाही। विचार आत्मा आत्मी वस्तूचे

ठायीं। असे काय पाहतां ।।९३।। जैसा बहुरूपी नटे सोंग। सोंग लटिकें बहुरूपी अभंग। परि सोंगांवेगळें त्याचे अंग। अनेक ऐकिले काय ।।९४।। मत्स्य कच्छ पशु पक्षी योगी स्त्री। देव नृपति अंत्यज श्वान रूप धरी। इतुकीं रूपें करी खेळांभीतरीं। परि रूपीं न मिळे बहुरूपी तो ।।९५।। तैसा प्रभु तो एकला। अनंत रूपें तोचि नटला। तरी पार्वती आणि शिवाला। वेगळीक असे काय ।।९६।। म्हणोनि निजप्रीतिभावें। देवीची आण वाहिली देवें। हे सत्यशरण जाणती स्वभावें। अभेदपण ।।९७।। ऐसा अभेदपणें करी पूजन। अंतकाळीं असे सावधान। त्यासींच बोलिजें सावधान पुरुष जाण। सदाशिव साक्षात् तो ।।९८।।

लिंगार्पिततनुप्राणमर्पितं च पृथक् पृथक् । अर्पितं मुखसंबंधो सुखमिंद्रियगोचरम् ।।८।।

देहक्रिया प्राणक्रिया जे जे होत। ते ते जाणोनि महालिंगीं अर्पित। अकर्ता क्रियाकर्मा अलिप्त। तो सत्यशरण जाणिजें ।।९९।। देह प्राण क्रिया होतां। तेथें सुख होय जें तत्त्वतां। तें तें होय अर्पितां। महालिंगीं जेविं ।।१००।।

न कायप्राणकर्माणि प्राणलिंगांगसंगिनः। कालोऽपि शरणं याति जीवन्मुक्तः स्वभाविनः ।।९।।

लिंगप्राणी जो पुरुष। कर्मबंध नाहीं तयास। कां म्हणसी तरी सावकाश। विश्वास धरूनि ऐक पां ।।१०१।। देहक्रिया ज्ञानक्रियेस। तो न लिंपे उभयास। अकर्ता ज्ञानी बोलिजें तयास। तोचि शुद्धमुक्त

जाण ॥१०२॥ प्राण आणि लिंग एक कीजें। तयासीं प्राणलिंगी बोलिजें। कालभय शरण येई सहजें। तया सत्यशरणासीं ॥१०३॥

स लिंगीं प्राणमुक्तश्च मनोमुक्तस्तु जंगमः। प्रसादी कायमुक्तश्च त्रिविधस्तत्त्वनिर्णयः ॥१०॥

प्राणलिंगी तो प्राणमुक्त जाणिजें। जंगम तो मनोमुक्त मानिजें। प्रसादी तो शरीरमुक्त म्हणिजें। याचा निर्णय सांगूं ऐक ॥१०४॥ प्राण तो लिंगीं ऐक्य केला। म्हणोनि प्राणमुक्त बोलिजें त्याला। जंगम तो मनोमुक्त झाला। तेंहि निरोपुं तुज आतां ॥१०५॥ मनाचा संकल्प विकल्प। हेंचि बंधनाचें रूप। तें मनचि झालें उन्मनीं रूप। मनोमुक्त या लागीं ॥१०६॥ मनाचा संकल्प विकल्प तुटला। मनोमुक्त जंगम बोलिजें त्याला। सर्व विकारीं तो सुटला। म्हणोनिया ॥१०७॥ जंव संकल्प विकल्प तुटेना। तंव जन्ममरण सुटेना। संकल्प गेलिया मनोमुक्त जाणा। बोलिजें जंगम ॥१०८॥ प्रसाद विश्वासें सेवितुसे। प्रसादनिष्ठें देहबुद्धि नाशे। म्हणोनि शरीर मुक्त अपैसे। तया प्रसादियाचें ॥१०९॥ ऐसी तिही प्रकारची मुक्तस्थिति। तत्त्वनिर्णय चढे त्याचे हातीं। स्वयें तत्त्वचि होय महामूर्ति। तोचि सत्यशरण देवी ॥११०॥ तयासीं लौकिक व्यवहार। नाहीं प्रपंच आचार। तो तारावया शिवाचार। सद्गुरु बोलिजें ॥१११॥

प्राणलिंगी स्वयं शांतो लौकिकाचारवर्जित: । सर्वसंगपरित्यागी वर्तते शिवभाववान् ।।११।।

प्राणलिंगी जो पुरुष। तया लोकांचा उद्धेश। लोकाचार नावडे तयास। तत्त्वीं रत सदा तो ।।११२।। तो तिन्ही लोक वर्जित। त्यासीं नावडे स्वर्गपद पदार्थ। नावडे भोगविलास समस्त। तो परि रत माझे ठायीं ।।११३।। त्यासीं पाषाण तैसें कांचन। गारेऐसें माणिक्यरत्न। स्त्रीपुरुषां निवडण। नाहीं तया ।।११४।। हा गज हा मशक। हा स्वामी हा सेवक। हा राजा हा रंक। नेणेचि निवाडा ।।११५।। हा पापी दोषी हा साधु। हा चतुर हा मूर्ख मैंदु। हा वैरी हा बंधु। भेद नाहीं तया ।।११६।। निंदास्तुति सम धरी। मान अपमान नाठवे अंतरीं। मीतूंपणाची उजरी। नाहीं तया ।।११७।। सर्वत्र मजलाचि देखत। जें जें देखें तें मजरूपचि मानीत। अर्ध क्षण मजविरहित। न राहे तो ।।११८।। तो न राहे मजविण एक क्षण। मी नाहीं अर्ध क्षण त्याविण। तें माझे विश्रांतीचें स्थान। मी विश्रांति त्याची ।।११९।। ऐसें असोनिया ज्ञान। स्वधर्मे वर्ते निष्ठेकरून। अज्ञ जनां तारावया जाण। क्रिया करी नेमेसीं ।।१२०।। सर्वत्र मानितां अभेद। क्रिया भंग होय अबद्ध। असे धर्मशास्त्रीं प्रसिद्ध। भेद ठेवावा क्रियेलागीं ।।१२१।। अलिंगि-स्पर्श होतां जाण। तात्काळ करावें स्नान। क्रिया करी देह झिजवून। तोचि धन्य संसारीं ।।१२२।। जो तिन्ही लोकाचें सुख त्यागी। कष्ट करोनि राहे शिवमार्गीं। शिवयोगी रत विरागी। तो जाण निजभक्त ।।१२३।।

ऐसीं हीं नित्यमुक्त लक्षणें। श्रीशिवकृपें पार्वती जाणे। गुरुभक्ताविणें हें जाणणें। दुर्लभ देवी सर्वथा ।।१२४।।

नाहं वसामि कैलासे न मेरौ न च मंदरे। मद्भक्ता यत्र तिष्ठन्ति तत्र तिष्ठामि पार्वति ।।१२।।

ऐक पार्वती विश्वासें। मी कैलासीं तरी न वसे। मेरुशिखरीं सर्वथा नसे। मी असे भक्तांजवळी ।।१२५।। मी मंदराचळीं नाहीं। ढवळागिरीं नसे पाही। माझे भक्त असती जें ठायीं। तेथें मी वसतुसे ।।१२६।। माझे भक्त जेथ असती। तेथ मी तिष्ठे कैलासपति। ते अखंड माझे सांगाती। मी सांगाती तयांचा ।।१२७।। देखून भक्तवृक्षासीं। मी राहे त्याचे छायेसीं। ऐसी एकोपता मज त्यासीं। ऐक्यभाव अभेद ।।१२८।। यालागीं बसवेश्वरासीं म्हणे। तुझिया पालखातील मी तान्हें। मी श्लाघ्य तुझेनि भक्तिगुणें। भक्तिचिया प्रेमा मज ।।१२९।। भक्ताचा मी विकला। भक्तनामी अंकिला। भक्तिभावें बांधिला। कैलासनाथ ।।१३०।। ज्याचें हृदय निर्मळ। निष्कपट जैसें गंगाजळ। तेथ मी तिष्ठे जाश्वनीळ। सद्भाव देखोनिया ।।१३१।।

सद्भावं सद्गुणं चैव स्वधर्मे सावधानकः। सत्संगस्त्वनवद्यत्वं तत्र तिष्ठामि पार्वति ।।१३।।

देवी मी वसे तो ठाव ऐक। जे सद्गुणी जन सद्भाविक। दशक्रिया सुधार्मिक। तेथ मी तिष्ठतसे ।।१३२।। सात्त्विक आणि सत्यवादी। निरभिमानी सद्बुद्धि। सावधानी निरवधि। तेथें मी वसतसे सदा ।।१३३।।

शंकर म्हणे पार्वतीप्रति। जो सद्भावें अर्ची प्रेमें प्रीति। तयाचे गर्भवास चुकती। स्वधर्मनिष्ठें-करोनिया ।।१३४।। जे जे भाविक भक्त शुद्ध। तयाकारणें न लगे बोध। ते स्वधर्माचारें वर्तती सिद्ध। आचारज्ञानयोगें ।।१३५।। तया जे मानिती आप्त। तया जन्मयातना न होय प्राप्त। शिवपदालागीं अव्यक्त। भक्त असे तोहि पैं ।।१३६।। व्यक्त भक्तां ओळख। लिंगभस्मधारण देख। रुद्राक्षमाळाभरणें सुरेख। शोभतसे प्राणी तो ।।१३७।। लिंगधारण जया नाहीं। त्यांनीं पार्थिव पुजावें पाही। अथवा प्राणलिंगाचीहि। पूजा करावी आदरें ।।१३८।। लिंगधारण नाहीं ज्यास। जरी लिंगधारीचा घडे सहवास। तरी तो अलिंगी शुद्धपदास। पावे शिवस्पर्शें ।।१३९।। तैसाचि भस्माचा गुण। वीरशैवाचें भस्म पावन। अत्यादरें स्पर्श करितां जाण। तुटती जन्म-फेरे ।।१४०।। रुद्राक्षपरिधानाची गोडी। जया असे परम आवडी। तोही पावे कैलास भवंडी। शिवचिन्हें-करोनिया ।।१४१।। शिवचिन्हाची थोरवी मोठी। न वर्णवे कोणा उठाउठीं। धारण करितां शंकरभेटी। घडतसे निश्चयें ।।१४२।। ऐसे भक्तराज उत्तम। आचरती धरोनि नेम। तयाजवळी वसे सप्रेम। अन्य स्थळ नावडे ।।१४३।।

सद्भक्तिश्च सदाचार: सद्गोष्ठिश्च सदा सुखी। सम्यक्ज्ञानं सदानंदं तत्र तिष्ठामि पार्वति ।।१४।।

सद्भक्त सदाचारी असती। सद्गोष्टी सदा वसती। सदा शुचित्वें वर्तती। तेथ मी तिष्ठे

सदाकाळ ।।१४४।। सम्यक् ज्ञान सदा आनंद। सदा शांत सद्‌बोध। त्याचें हृदयीं शिवानंद। सदा क्रीडतसे ।।१४५।। जो उदासवृत्ति सोडून। सदा आनंदी ठेवोनि मन। कालमृत्यूतें विसरून। राहे सावधान मद्‌भजनीं ।।१४६।। जो अनिंदक अद्वैत। जो निराश निजभरित। तयाचें हृदयीं सदोदित। वास माझा असे वो देवी ।।१४७।।

विषयान् विषवत्त्यक्त्वा क्रोधं पारुष्यमेव च। भक्तिप्रेमदयायुक्तस्तत्र तिष्ठामि पार्वति ।।१५।।

विषयां विषासम मानोनि। जेणें त्यागिलें तत्क्षणीं। त्याचें हृदयीं मी शूळपाणि। सदा तिष्ठतु असे ।।१४८।। अक्रोधी जो सदा निवांत। क्रोधातें मांग मानोनि नातळत। त्याचें हृदयीं मी कैलासनाथ। अखंड असे ।।१४९।। जो निःसंग कोणाचा। संग न धरी त्रिगुणिकांचा। सुहृद असे जीवाचा। तेथ मी असे सदा ।।१५०।। भक्ति तरी प्रेमें करी। भूतदया सर्वांवरी। तेथ मी त्रिपुरारी। सदा वसतसे ।।१५१।।

मद्‌भक्तिरतो नित्यं मन्नामस्मरणं सदा। शरण्योऽऽचारसंयुक्तस्तत्र तिष्ठामि पार्वति ।।१६।।

एकविध भक्तिप्रेम करी। भूतदयायुक्त जो अंतरीं। तेथें असे मी त्रिपुरारी। अन्या ठायीं नसे कदा ।।१५२।। वेदशास्त्रें सांगती युक्ति। जीवें करावी शिवभक्ति। तेथें कलिकालाची नसे शक्ति। महिमा अद्‌भुत भक्तीचा ।।१५३।। माझी भक्ति कोणती म्हणसी। माझें नांव गावें सप्रेमेशीं। माझें

ध्यान अहर्निशीं। त्यापासीं सदा वसे ।।१५४।। नित्य नाम असे घेतां। मद्रूप होय तत्त्वतां। देखे लावी भक्तिपंथा। आचरोनि जो कां ।।१५५।। शिवकथा शिवगोष्टी। सांगतां उल्हास न माये पोटीं। तयापासीं मी धुर्जटी। सदा तिष्ठतु असे ।।१५६।। ते माझे अति जिवलग। ते आत्मा मी त्याचें अंग। तया मज वियोग। कदा नाहीं ।।१५७।। तेणेंचि केला सर्व नेम। त्यानेंचि केला सर्व धर्म। तोचि उत्तमाचा उत्तम। जो ध्यातो सादर नाम माझें ।।१५८।। त्या सत्यशरणाचा मी अंकित। तो चालतां मी खडे वेचीत। सदा मी त्याभोवतां भोवत। विघ्न निवारीत तयाचें ।।१५९।। जयास तो वचन देईल। म्हणे जाय तुझें बरें होईल। तया मज देणें लागेल। तो म्हणेल तेंचि तें ।।१६०।। सेवक जैसा स्वामिसेवेसीं। सदा सादर अहर्निशीं। तैसा मीहि भक्तापासीं। सेवेसीं सादर सदा ।।१६१।। मी सदा वर्ते त्याचे बोली। सदा असे त्याचेजवळी। अहर्निश तयाचे मेळीं। मी चंद्रमौळी भक्तीस्तव ।।१६२।। त्याचें आम्हांसीं ध्यान। आम्ही हृदयीं धरूं त्याचें चरण। तयाचेनि मज देवपण। तो भक्त म्हणोनि ।।१६३।। तयाचेनि योगें मी श्लाघ्य त्रिनयन। तो आमुचे देवतार्चन। तयाचे सद्भावें रात्रंदिन। करी पूजन मी देवी ।।१६४।। तो आम्हां पढियंता अत्यंत। तोचि जंगम तोचि भक्त। निराकारां आकार त्यानिमित्त। घेणे घडे आम्हां ।।१६५।। आम्हां तया भेद नाहीं। मी तोचि तो विवेकें पाही। मी त्यामाजीं मी त्याचे ठायीं। मीच होवोनि असे

तो ।।१६६।। काशी आदि सर्व तीर्थें जाण। तयाचे चरणीं होती पावन। गंगा यमुना सरस्वती मिळोन। चरणधुळी वांछिती ।।१६७।। कां म्हणसी तरी ऐक। तीर्थीं पाप फेडोनि जाती लोक। त्या तीर्थाचें पाप क्षाळी देख। सत्यशरणाचें चरणरज ।।१६८।। त्याचें चरणतीर्थ पावन। त्याचें चरण देवतासीं उद्धरण। पाषाणासीं येतें देवपण। तयाचें चरणतीर्थें ।।१६९।। ऐसे ते माझे मुकुटमणि। मी अखंड त्याचे ध्यानीं। आतां किती वर्णूं मी वाणी। तूंहि जाणसी वो देवी ।।१७०।। तो मज पूज्यमान जंगम। तोचि सत्यशरण जाण उत्तम। त्याच्या चरणीचें तीर्थ पावन। तिन्ही देवतांसीं ।।१७१।। ही शरणाची परम गति। तुज कथिली वो पार्वती। अभक्ताची काय स्थिति। ती परिसावी सावध ।।१७२।। जो अभक्त खल दुर्जन। निंदी सद्भक्ताचें वचन। अवमानी धर्मनीति जाण। कुमार्गीं रत सदा ।।१७३।। धर्मनियम तोडोनि पाही। स्वमताचार रूढवी कांहीं। पाखंड वाढवूनि लवलाही। स्वधर्मातें त्यजवी तो ।।१७४।। दुर्वासनें वर्तें आपण। तैसाचि करवी रोखून। तया वश न होतां जाण। खोड मोडी दुष्टत्वें ।।१७५।। जन्मापासून चालतां धर्म। त्यागून पाळवी अधर्म। प्रसिद्ध खूण सोडून। दुजे सांगे वर्तावया ।।१७६।। स्वजातीची करी निंदा। त्याचें वचन न मानी कदा। यम घालूनिया आपुलिया फंदा। नेत तया यमपुरासीं ।।१७७।। तेथ त्याची घेती झडती। पापपुण्याची करिती गणती। जे शिक्षेलागीं पात्र होती। तया ताडिती

शस्त्रघायें ।।१७८।। स्वधर्मीं निष्ठा नसे ज्यासीं। कुंभीपाकादि शिक्षा त्यासीं। काचरसाचे कुंडापासीं। नेती त्या बुडवावया ।।१७९।। अग्निस्तंभां भेटवून। सवेचि करविती वृश्चिकदंशन। तीक्ष्ण शस्त्रें टाकिती छेदून। पुनर्जन्मां पाठविती ।।१८०।। पापपुण्य होतां समस्थिति। मनुष्यजन्मातें घालती। तेथें जरी स्वधर्में वागती। नाहीं भीति यमाची त्या ।।१८१।। स्वधर्मीं पुण्य प्राण्यांस। विनयें भोगविती विलास। पुण्यक्षय झालिया नि:शेष। मृत्युलोकांस पाठविती ।।१८२।। ऐसी ही स्वधर्म-पुण्याची भीति। यमादिकां असे निश्चिती। पुण्यकर्माचा महिमा देव जाणती। वाखाणिती बहुसाल ।।१८३।। स्वधर्माचरणाचें यश। लाजवितसें शक्रास। म्हणोनि सांभाळावें तयास। स्वात्म-सुखालागीं ।।१८४।। माझे जे परम भक्त। त्याचे धर्मावर ग्रंथ। सूक्ष्म असती अत्यंत। गुरुगम्य ते ।।१८५।। जे मज आठविती रात्रंदिन। मज अर्चिती पंचाक्षरेंकरोन। ते मज प्रिय अनुदिन। लिंगधारी ।।१८६।। तया शिवभक्तां यम येत शरण। जे कां लिंगधारी करिती भस्मधारण। तैसेचि घालती रुद्राक्षाभरण। तें पावन ब्रह्मादिकां ।।१८७।। तेथें मी अहोरात्र वसे। भूतगणांसह परियेसे। अष्ट महासिद्धि सावकाशे। राबती तेथें ।।१८८।। न आवडे कैलासवास। कैलासीं मी असे उदास। भक्तगृहीं संतोषवश। डुलतसे आनंदें ।।१८९।। ऐसा सदाचारी तोचि जंगम। माझेंचि स्वरूप जाण सुगम। त्याविण मज नसें प्रेम। अन्या ठायीं ।।१९०।।

मद्देहं जंगमं देहं मत्प्राणश्चरलिंगकः। तस्माद्धिचरतीर्थेन मम तृप्तिर्वराननने ।।१७।।

माझा देह तंव जंगमदेह। माझा प्राण तो जंगम आहे। पाहतां विचारें पाहे। पूज्यमान तो आम्हां ।।१९१।। यालागीं चरणतीर्थ आम्हांसीं। सेवावया अधिकार नेमेसी। त्याचें तीर्थें तृप्ती आम्हांसीं। निजमानसीं वो देवी ।।१९२।।

अनादिजंगमं देवि संपूज्य चरणोदकम्। अर्पयेत्परया भक्त्या ब्रह्माविष्णुसुरेश्वरान् ।।१८।।

अनादिसिद्ध जंगममूर्ति। निराकार तारावया भक्तांप्रति। अवतरला सत्यशरण जाणती। सत्यशरणाला ।।१९३।। त्याच्या चरणीचें तीर्थ। आम्हां तिन्ही देवांसीं अर्पित। करावया अधिकार नेमस्त। असे वो पार्वती ।।१९४।। त्याचें चरण प्रक्षाळून। अष्टविधार्चनें कीजें पूजन। अंगुष्ठतीर्थाचें सेवन। आदरें कीजें ।।१९५।।

अनादिजंगमो नित्यो निजैवास्य चराचरम्। चातुर्वर्णं भवेत् शिष्यं जंगमो गुरुरुच्यते ।।१९।।

अनादिसिद्ध जंगम जाण। नित्य निर्गुण निरंजन। तो चातुर्वर्णासीं गुरु आपण। तारक जाणिजें ।।१९६।। यालागीं तोचि गुरुराव। त्याची दीक्षा घेवोनि एकभाव। तो त्यजूनि करी अन्य गुरुदेव। तरी निरयासीं जाईजे ।।१९७।। बहुलिंग बहुदैवतपूजन। बहुप्रसादी बहुगुरुसेवन। तयासीं दृष्टान्त जो देईन। तो ऐक वो

देवी ।।१९८।। जैसा दासीकुसीं पुत्र झाला। तो आप्पा म्हणेल भलत्याला। ऐसा विचार घडला त्याला। ज्याला गुरु बहु होती।।१९९।। एकनिष्ठा एकभावो। तोचि होय देवाधिदेवो। परि आधीच गुरुरावो। ज्ञानिया कीजें।।२००।। जो असे ज्ञानांकित। जयाची संतमुखीं स्तुत। त्याची दीक्षा निभ्रांत। घेईजें विशेषें।।२०१।। ऐसा जो गुरुरूप जंगम। मी तो जाण उत्तम। ज्याचे पूजेचा आम्हां नेम। तें विश्रामधाम आमुचें।।२०२।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। शिवगौरीसंवादीं वर्तत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृत्य मन्मथ।।२०३।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे शरणलक्षणनिरूपणं नाम पंचदशोऽध्याय: संपूर्ण: ।।

श्लोक १९, ओव्या २०३.

❑

अध्याय सोळावा

॥ श्रीगुरवे नमः ॥

पंचदश अध्यायापर्यंत। कथिलें असें रहस्य अमित। ऐकोनि सद्गदित झालें चित्त। जगदंबेचें तें काळीं ॥१॥ ऐसा हा शिवधर्म उत्तम। भूतळीं कैसा आला परम। ये विषयीहि प्रश्न सप्रेम। करीतसे पार्वती ॥२॥

देव्युवाच-

धर्मस्यास्य महादेव महिमातिशयशालिनः। प्रादुर्भावो हि भूलोके कथं जातं श्रुणोमि तत् ॥१॥

ज्याच्या सेवेनें होती लोक पावन। ऐसा हा शिवधर्म परम गहन। भूमंडळीं कैसा झाला उत्पन्न। तें ऐकूं वाटें मज ॥३॥ या शिवाचार-धर्माची प्रसिद्धि। कवण्या आचार्यानें केली वृद्धि। तयांचीं नांवें मज निवेदी। कृपा करोनि स्वामिया ॥४॥

शिव उवाच-

अतःपरं प्रवक्ष्यामि पंचाचार्यसमुद्भवः। तेषां नामानि स्थानानि सावधानमना श्रुणु ॥२॥

शंकर म्हणे अंबेप्रति। तुझा प्रश्न आचार्य-उत्पत्ति। शिवधर्म असे अनादिसिद्ध स्थिति। त्याची उत्पत्ति न वर्णवे ।।५।। प्रथम सांगेन आचार्य नाम। पुढें कथीन अवतार ग्राम। हा स्वायंभुवागमीं विस्तारक्रम। असे जाण पार्वती ।।६।। रेणुक दारुक एकोराम। पंडित विश्वाराध्य पंचम। या आचार्यांचा महिमा परम। वर्णूं शके कोण ।।७।। ऐसे पांची आचार्य शिवाचारमार्गीं। ते पांच झाले चहुयुगीं। त्यासीं आम्हांसीं भिन्नत्व जगीं। नुरेचि देवी ।।८।। तेविं ते महंत सत्यशरण। सातशें सत्तर गण। त्याज मजला भिन्नपण। सर्वथा नाहीं ।।९।। पांची आचार्य शिवाचारासीं मूळ। तयापासाव शिवाचार सकळ। वीरशैवमार्ग प्रबळ। विस्तार जाहला ।।१०।। तोचि मुळीचा शिवाचार। कल्याणीं अवतरला बसवेश्वर। त्यानेंहि केला विस्तार। शिवाचाराचा ।।११।। कोण्ही म्हणती शिवाचार नवा झाला। बसवेश्वरापासून विस्तारला। तें नेणोनि बोलती बोलां। अज्ञानपणें ।।१२।। जहींचा शिव तहींचा शिवाचार। नवा झाला म्हणती ते पामर। अनादि शिव तरी शिवाचार। अनादिसिद्धचि असे ।।१३।। शिव जरी होता युगानुयुगीं। तरी शिवाचार असेल कीं जगीं। जैचा शिव तैचा भक्तांगीं। शिवाचार अभंग असे ।।१४।। म्हणोनि अनादिसिद्ध। असे शिवाचार निबद्ध। नवा झाला म्हणती बुद्धिमंद। तें नेणोनि बोलती ।।१५।। मी अनादिसिद्ध शिवमूर्ति। शिवाचारहि अनादिसिद्ध पार्वती। यालागीं नूतन झाला जे म्हणती। ते मूर्ख

जाणावें ।।१६।।

यदा यदा प्राणशिवैक्यभाजां हानिर्भवेत् भूमितले गणेशः ।
तदा तदा भूमितलेऽवतीर्य कुर्वन्ति ते वै खलु धर्मसंस्थाम् ।।३।।

शंकर म्हणे अंबे ऐक। माझे पांच जे गणनायक। महापराक्रमी रेणुक। वीरशैव धर्ममूर्ति ।।१७।। तयाचे परी दारुक जाण। धर्मरक्षणाकारणें सुजाण। येती न लागतां एक क्षण। प्रतिसृष्टिकर्ते जे ।।१८।। ऐसे हे एकामागे एक। अवतरती गणनायक। वीरशैवधर्म प्रतिपालक। शिक्षा देत धर्म-भ्रष्टां ।।१९।। ज्या काळीं लिंगायतधर्म हानी। त्या काळीं सर्व धर्म लया जावोनि। अधर्म वाढे सतत मेदिनीं। धर्मविचार नसे कोणां ।।२०।। स्वधर्म सांडोनिया जाण। करिती अधर्म मंडण। तेणें पुण्यक्षय होऊन। अधर्मता प्राप्त होय ।।२१।। अधर्म जाहलिया सृष्टी। कदा नोहे पर्जन्यवृष्टी। तेव्हां कैलासीं येऊनि परमेष्टी। प्रार्थीतसे शिवालागीं ।।२२।। म्हणे अधर्म वाढला महिवरी। प्रजा सर्व जर्जर निरहारी। तयाचें संकट निवारी। कृपादृष्टीकरोनिया ।।२३।। तेव्हां शिव आज्ञा करी गणांसीं। तुम्ही त्वरें जावें मर्त्यलोकासीं। सर्व धर्म चालते ज्याचे त्यासीं। कीजें सत्य यावेळीं ।।२४।। वीरशैवधर्म परमपावन। तयाची वृद्धि करिता जाण। दुजे धर्म वाढावया कारण। हेंचि मुख्य साधन पैं ।।२५।। रेवणसिद्ध पूर्वदिशें। दक्षिणें मरुळसिद्ध असे।

पश्चिमदिशीं वसे। एकोराम ।।२६।। पंडिताराध्य उत्तरेसीं। विश्वाराध्य तो मध्यप्रदेशीं। शंकर निरोपी पार्वतीसीं। हे चहुयुगीं जाहले ।।२७।।

देव्युवाच-

भवदुक्त: शिवाचार: सम्यक्ज्ञातो मया प्रभो। अत:परं वद देव आचार्याणामनुक्रम: ।।४।।

पार्वती म्हणे शिवासीं। तुम्ही निरोपिलें शिवाचारासीं। ऐकोन संतोष झाला मानसीं। देवाधिदेवा ।।२८।। ऐसा शिवाचार जयापासोन। प्रबळला अतिगहन। ते आचार्य कोण कोण। त्याचीं नामें काई ।।२९।। ते कोण्या युगीं कोण अवतार। त्याचें कोण भूषण कोण आचार। कोण दिशा मुनीश्वर। मठ कोण कोण देशीं ।।३०।। इतुके निरोपा म्हणे पार्वती। ऐकोन सावध कैलासपति। तुझा प्रश्न बरवा म्हणती। निरोपुं आतां ।।३१।।

शिव उवाच-

गुरुर्रेवणसिद्धाख्य: सिद्धेशमरुळस्तथा। एकोराम: पंडितार्यो विश्वाराध्य इति क्रमात् ।।५।।

हे चहुयुगीं झाले आपण। रेवणसिद्ध मरुळसिद्ध दोन। तिसरा एकोराम महाप्रवीण। चौथा तो पंडिताराध्य ।।३२।। महाप्रतापी विश्वाराध्य। अखंड होवोनि राहिले निजबोध। निजचि ते स्वत:सिद्ध।

मुनीश्वर वो देवी ।।३३।। हे ते प्रत्यक्ष रुद्रचि असे। ज्ञानप्रकाशें भानु जैसे। जे परब्रह्म मुनिवेषें। अवतरले देख ।।३४।। चहुयुगीं पांची आचार्य। झाले असती गुरुवर्य। त्याची मठस्थिति कर्मकार्य। आघवे सांगो आतां ।।३५।। रेवणसिद्ध प्रसिद्ध गुरु। जेणें कथिला शास्त्राचारु। वीरशैवधर्माचा विस्तारु। सिद्धान्त दाखविला पैं ।।३६।। मरुळसिद्ध नामें साचार। प्रगटले माझे नामधार। तेणें केला उद्धार। भक्ति ज्ञान जाणे तो ।।३७।। एकोराम आणि पंडिताचार्य। हे तंव अवतारी भूवरीं गुरुवर्य। वीरशैवधर्माचें सर्व कार्य। जया आज्ञें घडतसें ।।३८।। विश्वाराध्य महागुरु। सर्वश्रेष्ठ अधिकारु। गुरुत्वाचा विचारु। प्रगट करी वेळोवेळीं ।।३९।।

प्रत्येकं च प्रवक्ष्यामि तेषां नामानि वै श्रुणु। अथ गोत्रं तथा सूत्रं प्रवराणि यथाक्रमम् ।।६।।

ही सांगितली संक्षिप्त कथा। आतां विस्तारें ऐक गोत्रगाथा। दंड कमंडलु सूत्र सर्वथा। निरोपितो वेगळाले ।।४०।।

सद्योजातमुखोत्पन्नो रेणुकः परिकीर्तितः। तन्नाम रेवणसिद्धः सूत्रं पडविडीत्यपि ।।७।।

जीं परशिवाचीं मुखें पांच। सद्योजात वामदेव अघोर साच। तत्पुरुष ईशान त्यांतच। उद्भवले आचार्यगण ।।४१।। सद्योजात पूर्वमुख। वामदेव दक्षिण देख। अघोर पश्चिम उत्तर तत्पुरुषमुख। ईशान

तें मध्य कीं ।।४२।। सद्योजात मुखापासाव। उद्भवला रेणुक गुरुराव। नामें रेवणसिद्ध देव। पडविडी सूत्रकर्ता।।४३।।

गुरोः रेवणसिद्धस्य कोल्लिपाकपुरोत्तमे। सोमेशलिंगजननमावासः कदलीपुरे।।८।।

वीरधर्मप्रतिपालक प्रसिद्ध। नामें श्रीगुरु रेवणसिद्ध। कोल्लिपाक नगराभीतरीं शुद्ध। सोमेशलिंगीं उद्भवले।।४४।। तेथून निघाले सत्वर वनां। गुरुत्व अधिकाराचें ज्ञानां। उपदेशावया मुनिजनां। वास केला आश्रमीं।।४५।। तेथें आपुलें सिंहासन। रंभापुरी येथें स्थापून। वीरशैवधर्मा प्रगटवोन। शिक्षा करी धर्मभ्रष्टां।।४६।। ऐसा कृतयुगीं रेवणसिद्ध। तो केवळ निबद्ध। षोडश मुद्रिका शोभला प्रसिद्ध। महंत तो।।४७।। तो चिद्रूप चिदाकार। साकारत्वेंचि निराकार। जैसी मेघमुखीची गार। पुनः विरे तत्क्षणीं।।४८।। शिवाचार अनादिसिद्ध। तोचि प्रकाशावया प्रसिद्ध। अवतरला रेवणसिद्ध। आदिगुरु शिवाचारासीं।।४९।। त्यासी सर्वांगीं विभूतिभूषण। मस्तकीं जटामुकुट शोभायमान। कंठीं हिरवी कंथा परिधान। मुनीश्वरासीं।।५०।।

अतिवर्णश्च वर्णः स्यात् प्रवरेकाक्षरो मतः। दण्डोऽश्वत्थ इति प्रोक्तः सौवर्णस्य कमंडलुः।।९।।
सौवर्णः कलशस्तस्य व्याघ्राजिनांबरस्तथा। तस्य कंथा हरिद्वर्णा लक्षणं वीरगोत्रिणाम्।।१०।।

करीं सुवर्णाची खापरी। व्याघ्राजिन खांद्यावरी। घेवोनि कमंडलु करीं। योगमुद्रा सदा ।।५१।। मस्तकीं सुवर्णाचे लिंग। पादुका चरणीं चांग। चंदन सुगंध सर्वांग। तयातळीं वास त्याचा ।।५२।। ऋग्वेदाचें उच्चारण करी। बैसे तरी वज्रासनावरी। चंद्रमौळेश्वराचें करी। अखंड ध्यान ।।५३।। तयासी सिंहाचें वाहन। इच्छाशक्तीनें वर्तन। दर्शनस्पर्शनें जीव शिवपण। तात्काळ देतुसे ।।५४।। ऐसा तो महासिद्ध। पूर्वदिशीं असे प्रसिद्ध। शिवाचारासीं अग्रगण्य निबद्ध। रेवणसिद्ध तो ।।५५।।

तद्वन्मरुळसिद्धस्य वटक्षेत्रे महत्तरे। सिद्धेशलिंगे जननं स्थानमुज्जयिनीपुरे ।।११।।

तैसेचि वटक्षेत्रीं अवतार होतां। चरणीं पावन झाली क्षिप्रा माता। उद्भव सिद्धेशलिंगीं तत्त्वतां। सिंहासन उज्जयिनी पुरी ।।५६।। ते मरुळाचार्य विख्यात। शिवादेशें करोनि मर्त्यलोकांत। वीरशैवधर्मा संरक्षित। महाज्ञानी जाण तो ।।५७।। त्याचा दक्षिण दिशीं मठ असतु। मरुळसिद्ध महामहंतु। ज्ञानसूर्य जैसा भासतु। चिद्गगनीचा ।।५८।। निर्विकल्प दशें असत। तया पिशाचवृत्ति आवडत। मन उन्मनीं सदोदित। संतुष्ट सदा ।।५९।। तो कोणाचे आश्रमां न जाय। कोणाचें शास्त्रां न पाहे। कोणाचे संगीं न राहे। क्षणभरी तो ।।६०।। कपिलेश्वराचें करी ध्यान। यजुर्वेदाचें उच्चारण। गोमेद लिंगाचें पूजन। वटाचे वृक्षीं वास करी ।।६१।।

वामदेवमुखोत्पन्नो दारुक: परिकीर्तित: । तन्नाम मरुळाराध्य: सूत्रं तस्य तु वृष्टिकम् ।।१२।।

वामदेवमुखापासून । झाले दारुकार्य उत्पन्न । वृष्टी सूत्राधिकारी पूर्ण । नामें मरुळाराध्य प्रसिद्ध ।।६२।।

तस्य दण्डश्च पालाशो तथा ताम्रकमंडलु: । मकारो बीजमंत्रश्च शाखा दारुक ईरिता ।।१३।।

कलशस्तस्य ताम्रश्च मृगाजिनविभूषण: । तस्य कंथा च मांजिष्ठा लक्षणं नंदिगोत्रिणाम् ।।१४।।

अमलाक्ष लिंग अवधारी । मृगाजिन खांद्यावरी । समीप तांब्याची खापरी । तया सत्यशरणासीं ।।६३।। रुद्राक्षमाळा कंठीं शोभती । व्याघ्र वाहन तयाप्रति । जप मयूरासनीं करिती । मरुळसिद्ध ते ।।६४।। क्रिया-ज्ञानशक्ति धरोन । भूचरी मुद्रा गुरूचें ध्यान । नेत्रवेधी ऐसी सिद्धि जाण । तयापासीं असे ।।६५।। मकार अक्षरीं समाधि । चर्चिली विभूति ब्रह्मावबोधी । मस्तकीं जटा योगसिद्धि । चरणां लागती तयाच्या ।।६६।। पळसाचा दंड हातीं । ताम्र कलशाची दिव्य दीप्ती । कंथा आरक्त स्थिति । असे जया गुरुवर्या ।।६७।। ऐसीं मरुळसिद्ध मुनीचीं । भूषणें निरोपिली तयाचीं । निराश निरभिमान अविद्येची । वार्ता तेहि तेथ नाहीं ।।६८।। अखंड निमग्नत्व असें । आनंदें डुल्लतु पिशाचदशें । भाग्योदयें जया भेटतसे । तया आपणाऐसे करी ।।६९।। तो जरी अदृष्टें पाहे कोणाकडे । तरी त्यास ब्रह्मांडभांडार उघडे । तात्काळ वस्तु होवोनि भिडे । वस्तुचि माजीं ।।७०।। गंगा सागरां शरण गेली । ती मिळोनि सागरुचि झाली ।

परतोनि नाहीं आली। ठेली सागरुचि ।।७१।। तेविं जे संतां शरण गेले। ते मिळणीं तद्रूपचि झाले। पुन: नरदेहां नाहीं आले। होवोनि ठेले परब्रह्म ।।७२।। म्हणोनि महंत मरुळसिद्ध। शरणागतां करी ब्रह्मबोध। शिवाचारासीं प्रसिद्ध। तारक कृपाळु ।।७३।।

एकोरामस्य जननं द्राक्षारामे प्रकीर्तितम्। रामनाथमहालिंगे तद्वासस्तु हिमालये ।।१५।।

आतां तिसरा आचार्य एकोराम। तो ज्ञानभानु परब्रह्म। निरक्षर निरामय नि:सीम। निष्काम तो ।।७४।। द्राक्षाराम क्षेत्र प्रसिद्ध। तेथें रामनाथलिंग असे सिद्ध। तेथ उद्‌भवला सुबुद्ध। एकोरामाराध्य तो ।।७५।। हिमालयीं क्षेत्र केदार। उषामठ असे अतिसुंदर। तेथें वास करी निरंतर। आचार्यगुरु ।।७६।। तो आचारासीं तरी अग्रगण। शिवाचारासीं तो संपन्न। जयासीं वंदिती वीरशैव गण। सातशें सत्तरी ।।७७।। बसवादि प्रमथ सकळ। नमिती जयाचें चरणकमळ। तो एकोराम आचारशील। शिवाचारी मुख्य ।।७८।।

मदघोरमुखोत्पन्न: शंकुकर्णेति नामत:। एकोरामेति तन्नाम तस्य सूत्रं तु लंबकम्।।१६।।

ब्रह्मो दण्डस्तथा लोहकलशश्च कमंडलु:। नीलकंथा तथाऽवास: पारिजातंतरोरध:।।१७।।

शिव म्हणे गिरिजासुंदरी। अघोरमुखाभीतरीं। शंकुकर्ण ते अवधारी। आचार्यवर अवतरले ।।७९।। तयाचें नांव एकोराम। सर्व जीवाचें विश्रामधाम। लंबक सूत्राधिकारी परम। गोत्र भृंगी जयाचें ।।८०।।

तो शिवाचा अवतार। मुखीं सामवेदाचा उच्चार। मणिमय लिंग निरंतर। पुजीतसे ।।८१।। तो द्वापरीं अवतरला। वैराग्यपीठिका मिळे त्याला। पश्चिमदिशीं मठ शोभला। वेणुदंड करीं धरी ।।८२।। सदा महेश्वरध्यानीं असत। पारिजातकीं वास निभ्रांत। बैसका गरुडासनीं शोभत। तया महासिद्धासीं ।।८३।। मस्तकीं जटा पांच शोभत। सर्वांगीं विभूति उधळत। श्रवणीं कुंडलें ढाळ देत। भानुप्रभा जैसी ।।८४।। लिंगमुद्रा कंठीं तत्त्वतां। रत्नकंबळाची मिरवे कंथा। रुद्राक्षमाळा पवित्रता। हृदयावरी शोभती ।।८५।। मंत्रशक्ति वसे जिव्हाग्रीं। नासाग्रीं ध्यान तो धरी। लोहखापरी धारण करी। कलश तोहि लोहमय ।।८६।।

शिकारो बीजमंत्रश्च अतिवर्णाश्रमे रत:। शाखा शंकुकर्णाख्या लक्षणं भृंगिगोत्रिणाम् ।।१८।।

शिकार मंत्र बीजाक्षर। अखंड ध्यानीं निरंतर। सदा तन्मय मुनीश्वर। एकोराम तो ।।८७।। अतिवर्णाश्रमीं वर्तत। शाखा शंकुकर्ण विख्यात। सामवेद विभागीं असत। तेचि उपदेशी स्वशिष्यां ।।८८।। अमृतसंजीवनीचें असे ध्यान। तयासीं गजाचें वाहन। शिवाचारीं असे संपन्न। महामहंत तो ।।८९।। सत्य तेंचि बोलणें। नि:संग निराश असणें। परि पंचक्रियेनें वर्तणें। काम नाहीं अंतरीं ।।९०।। ऐसा तो महामहंतु। शिवाचारयुक्त समर्थु। जयाच्या सत्तेनें चालतु। शिवाचार रत्न ।।९१।।

सुधाकुण्डाख्यसुक्षेत्रे लिंगे श्रीमल्लिकार्जुने। जननं पण्डितार्यस्य निवास: श्रीगिरौ शिवे ।।१९।।

सुधाकुंड नाम क्षेत्रीं जाण। मल्लिकार्जुन महालिंगांतून। प्रगटले आचार्य पूर्ण। पंडितार्य गुरुवर।।९२।। निवास केला तो अति निर्मळ। गिरिराज राज तो श्रीशैल। तयाचिया दर्शनें कलिमल। नष्ट होती सर्वथा।।९३।।

तत्पुरुषमुखोत्पन्नो धेनुकर्णेति नामतः। तन्नाम पंडिताराध्यो मुक्तागुच्छं तु सूत्रकम्।।२०।।

तत्पुरुष मुखापासून। धेनुकर्ण आचार्य उत्पन्न। शिवागमींची गूढ खूण। तुज निरोपिली वो देवी।।९४।। तो चौथा आचार्य महासिद्ध। जो शुद्ध स्वानुभवी स्वतःसिद्ध। नामें पावन प्रसिद्ध। पंडिताराध्य स्वामी।।९५।। मुक्तागुच्छ सूत्राचा अधिपति। महामुनी जयां वंदिती। उपसूत्रें द्वादश असती। तया आचार्यां जाणावें।।९६।।

सूर्यसिंहासनाधीशो दण्डो वंशमयः शुभः। रजतः कलशः प्रोक्तः तथैव च कमंडलुः।।२१।।

उत्तरदिशीं सूर्यपीठीं मठ। वास तरी वंशवृक्षीं सुभट। भोगलिंग तंव वरिष्ठ। सर्व लिंगांमाजीं।।९७।। आचार्य तो तारक अवतार। स्वानुभवी ज्ञानभास्कर। शिवाचार तारावया कलीभीतर। उदय झाला आराध्यभानु।।९८।। तो तद्रूप सदाशिव। शिवाचारां निःसंदेह देव। संदेह कल्पना सर्व वाव। केवळ चिद्रूप तो।।९९।। भोगेश्वराचें ध्यान करी। करी रुप्याची खापरी। आरूढे हंसवाहनावरी। आराध्य

तो ।।१००।। कंदमूलाचा प्रसाद करी। प्राक्तनानुसार अन्न स्वीकारी। अखंड ध्यान अंतरीं। गुरुलिंगाचें।।१०१।।

वकारो मंत्रबीजं च श्रुतिराथर्वणी शुभाः। श्वेतकंथा तु संप्रोक्ता लक्षणं वृषभगोत्रिणाम्।।२२।।

वकार बीज महातेजाळ। जैसा सहस्र विजूंचा मेळ। तो जपत असे सर्वकाळ। रावो सकळ सिद्धांचा।।१०२।। अथर्वण वेद उच्चारण। हृदयीं शिवलिंगधारण। कंथेलागीं पट्टवस्त्र पूर्ण। शोभलें शुभ्र।।१०३।। ऐसा कलियुगीं अवतार। पंडिताराध्य महामुनीश्वर। तेणें वाढविला शिवाचार। शिवभक्त तो।।१०४।। तया शिवावांचून दुसरे। आन देवोदेवी नसे साचारे। गुरुलिंगजंगमीं ऐक्यविचारें। वर्ते सदाचारी।।१०५।। शिवमुद्रा अलंकृत भूषण। शोभे जैसा प्रकाशला भान। भक्तिसुखास्तव निर्गुण। तो सगुण होवोनि अव-तरला।।१०६।। मस्तकीं जटा शोभती। सर्वांगीं मिरवे विभूति। कर्णीं कुंडलें ढाळ देती। निजतेजाकार।।१०७।। गुरुलिंगजंगम भजन। सांगे सकळां एक विधान। आसनीं श्वेत कंबळासन। पद्मासनीं बैसका तया।।१०८।। गुरु-लिंग-जंगम एकभावना। अभेदभावें धरी ध्याना। परकायप्रवेश याहि खुणा। जाणतु असे तो।।१०९।। परकायप्रवेश हें नवल काय। अष्ट महासिद्धि वंदिती पाय। चाऱ्ही मुक्ति आलिया न पाहे। मुक्तीचा साक्ष म्हणोनि।।११०।। शिवाचारी शिव-

भक्त। दीक्षा देवोनि तारिले बहुत। पंचकलश नेमस्त। स्थापोनिया ।।१११।। दीक्षावंत गुरुकरजात। करोनिया शुद्ध शिवभक्त। ऐक्य दावोनि गुरु-लिंग-जंगमांत। तीर्थप्रसाद सेवविती ।।११२।। ऐसा शिवागमीं विचार। तो विस्तारला अपार। कल्याणीं अवतरला बसवेश्वर। शिवाचार-संपन्न ।।११३।।

काश्यां विश्वेश्वरे लिंगे विश्वाराध्यस्य संभवः। स्थानं श्रीकाशिकाक्षेत्रे श्रुणु पार्वति सादरम् ।।२३।।

विश्वाराध्य विश्वगुरु। काशीक्षेत्र पीठाचारु। धरी विश्वेशलिंगीं अवतारु। अज्ञ जनाकारणें ।।११४।।

ईशानाख्यमुखोत्पन्नो विश्वकर्णेति विश्रुतः। विश्वाराध्यस्तु तन्नाम सूत्रं स्यात् पंचवर्णकम् ।।२४।।

माझें ईशानमुखापासोन। विश्वकर्णाचा अवतार जाण। विश्वाराध्य नाम पूर्ण। समर्थ गुरु ।।११५।। तयाचें सूत्र पंचवर्ण। पांचवा शिवगण अभिन्न। वीरशैव प्रवरोत्पन्न। असे जाण विश्वार्य तो ।।११६।।

दण्डो बिल्वजः प्रोक्तः सुवर्णस्य कमंडलुः। कलशस्तस्य सौवर्णः आसनं स्वर्णकंबलम् ।।२५।।

ज्ञानसिंहासनं दिव्यं मंत्रबीजं यकारकम्। कंथाऽपि पीतवर्णास्याल्लक्षणं स्कंदगोत्रिणाम् ।।२६।।

हा पांचवा आचार्य सुजाण। ऐके याचें स्वरूपगुण। दिशेमध्यें ऊर्ध्व जाण। श्रेष्ठ महिमान असें त्याचें ।।११७।। बिल्ववृक्षातळीं साचार। तोचि दंड धारण करी निरंतर। खापरी करी सादर। सोनियाची ।।११८।। कंथा तीहि स्वर्णकंबळ। व्याघ्रांबर धारण केलें तेजाळ। सुवर्ण सुखासन विशाळ।

वाहनीं असे ।।११९।। ज्ञानपीठीं जंगममठ। सर्व ज्ञानियांतें वरिष्ठ। उपदेशी शिवतत्त्व श्रेष्ठ। विश्वगुरु तो ।।१२०।। स्वच्छंदें वर्ते गुरुराज। जग तारावया निर्व्याज। मुनिरूप धरोनि सहज। शिवचि आला ।।१२१।। पूजन करी विश्वेश्वराचें। ध्यानीं मनीं तोचि नाचे। यकार अक्षर बीजाचे। उच्चारी मुखें ।।१२२।। चिन्मय तो गुरुमूर्ति। तुर्यातीत आहे वस्ती। तेंचि उपदेशी सहजस्थिति। परमहंस योगियां ।।१२३।। मस्तकीं शोभें जटामुकुट। हृदयावरी रुद्राक्षमाळा वरिष्ठ। भस्मोद्धूळित देह सुभट। तेजें जैसा गभस्ति ।।१२४।। आनंदवनीं असे वास। तोहि सदा आनंदमय सावकाश। शिवानंदामृतरस। श्रोतृद्वारें ओपी भक्तातें ।।१२५।। ईश्वर म्हणे पार्वतीप्रति। हे आचार्य अवतरले भूवरती। सूत्रें प्रगटली पूर्ण स्थिति। वीरशैवाकारणें ।।१२६।। ऐसी पंचाचार्यांचीं स्थानें। तुज निरोपिलीं वरानने। माहेश्वराची मूळ स्थानें। असती जाण पांच ती ।।१२७।। पांच आचार्य पांच मठ। हें कथिलें गुह्य स्पष्ट। जे वीरशैव शिवाचारनिष्ठ। ते हे जाणती खूण ।।१२८।। चहुयुगीं आचार्य जाहले। जनां शिवभक्तीसी लाविले। सातशें सत्तर गणीं निवडले। शिवाचार-मार्गीं ।।१२९।। बसवादि प्रमथगण। सातशें सत्तर असती नेमून। एऱ्हवीं असती जाणे कोण। गणांची संख्या ।।१३०।। शिवगण रुद्रगण अमरगण। शिवागमीं वर्णिले असंख्य जाण। गण गणितां वेद श्रुति पुराण। मौन धरोनि राहिले ।।१३१।। मा मी काय वर्णूं

महिमा तयाची। अगाध महिमा शक्ति खुंटली वाचेची। अनंत कोटी गणना गणांची। तेथ मी काय वर्णूं।।१३२।। एका चौकडियाचे गण। गणित केलें गणून। परि अनंत चौकडियांचे जाले ते कवण। गणीतसे।।१३३।। कृत त्रेता युग द्वापर। कलियुगासहित युगें चार। या चहुयुगांची चौकडी साचार। एक जाहली।।१३४।। ऐशा चौकड्या एक सहस्र होती। तंव अस्तमानां जाय गभस्ति। तैशा चौकड्या एक सहस्र होती। तंव एक दिवस होय ब्रह्मीयाचा।।१३५।। ऐसे तीस दिवस जाती। एक मास होय विधात्याप्रति। ऐसे द्वादश मास होती। तंव होय एक वरुष।।१३६।। ऐसें वरुषें जाती एक शत। तंव ब्रह्मीयास होय अंत। त्याच्या आयुष्याचें सरें गणित। तंव घटिका विष्णूची।।१३७।। ऐसिया घटिका साठ जाती। तंव एक दिवस विष्णूप्रति। ते हे तीस दिवस जाती। तैं एक मास विष्णूचा।।१३८।। ऐसे मास द्वादश होती। तरी एक वरुष होय विष्णूप्रति। ऐसें वरुषें शत जाती। तदा विष्णु एक पडे।।१३९।। ऐसे द्वादश विष्णु जाती। तंव अर्धपळ होय रुद्राप्रति। त्या रुद्राचे गण सांगावे किती। कोणी गणना करोनि।।१४०।। अनंत युगांचे महारुद्र। गणहि अनंत युगांचे अपार। जैसा देव तैसे भक्त साचार। जेविं देहीं आत्मा असे।।१४१।। ऐसे युगायुगीचे गण। सांगे ऐसा आहे कोण। म्हणोनि संक्षेपें याचें प्रमाण। सातशें सत्तर निरोपिलें।।१४२।। यावेगळे सप्तकोटी। ते असती कैलासकपाटीं। विचित्ररूपें

विकटी। बहुविध तयांची ।।१४३।। एऱ्हवीं असंख्यात गण। नाम घेतां उरे कोण। ते माझे पूज्यमान। मज पुजिती ते ।।१४४।। ते मज पूज्य मी पुजी तयासीं। अणुमात्र भेद नाहीं तया मजसीं। म्हणोनि पुजिजें सद्भावेसीं। तरी ते मीच होय ।।१४५।। शिव आणि शिवगण। कदापि भिन्न नोहे जाण। शिवाचारविचारी संपन्न। शिवगण सावध सदा ।।१४६।। ऐसी शिवाचारदीक्षा जाण। पंचाचार्य करिती संपन्न। शिवाचारातें स्थापून। जनां भक्ति लाविती ।।१४७।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। शिवगौरीसंवादीं वर्तत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृत्य मन्मथ ।।१४८।।

।। इति श्री परमरहस्ये शिवगौरीसंवादे आचार्यावतारमठलक्षणादि कथनं नाम षोडशोऽध्यायः ।।

श्लोक २६, ओव्या १४८.

❑

अध्याय सतरावा

।। श्रीगुरुवे नमः ।।

श्रीपरमरहस्य ग्रंथ सुंदर। वीरशैवधर्माचें तत्त्वमंदिर। चतुर्दश भुवनें आणि त्रिलोक परिकर। नांदती जयामाजीं ।।१।। कीं मूळ मातृका षोडश। पूर्ण झाल्या येथवर विशेष। अनक्षरा मातृका सावकाश। निरोपुं आतां ।।२।। शिवचंद्राच्या ह्या सोळा कळा। भवदुःखतप्त जीवां निववितील सकळां। ही सतरावी जीवनकळा। अक्षय असे निश्चयें ।।३।। येथीचें जें ज्ञान। सर्व सुखांसीं असें कारण। म्हणोनि ठेवावें चित्त पूर्ण। श्रवणाठायीं ।।४।। श्रवण-मनन-निजध्यासें। साक्षात् वस्तु भेटे विश्वासें। नातरी व्यर्थ आयासें। कां शिणवावें जीवातें ।।५।। असो आतां येथ विशेष विस्तार। करणें नलगे मजला फार। वीर श्रोते परम चतुर। तरी सुचनार्थी बोलिलो ।।६।। पुनः प्रश्न करी जगदंबा। सच्चिद्रूप शिवसांबा। शिवसंस्कार मूळस्तंभा। पुसेल ती ।।७।।

देव्युवाच-

भगवन् सर्वदेवेश रहस्यं परमं श्रुतम्। श्रोतुमीहे वीरशैवसंस्काराणामनुक्रमः ।।१।।

जन्माद्यंतेष्टीपर्यंत। वीरशैव संस्कार समस्त। ऐकूं म्हणे विश्वस्त। गिरिजा देवी शंकरासीं ।।८।। मूल संस्कार षोडश। त्यामाजीं असती मुख्य दश। त्यांहिमाजीं बहु विशेष। शिवदीक्षा जाणावी ।।९।। जगदंबा म्हणे सदाशिवा। माझिया प्रश्नाते देवाधिदेवा। अनुलक्षोनि देआवा। उपदेश मज ।।१०।।

शिव उवाच-

श्रुणु देवि प्रवक्ष्यामि संस्काराणामनुक्रम:। एतत् श्रुत्वा च कृत्वा च लभेत्सा भक्तिरुत्तमा ।।२।।

शिव म्हणे अंबेप्रति। तुझ्या प्रश्नें जडजीव उद्धरती। तेंचि मी तुजप्रति। सांगेन आतां ।।११।। गर्भाधानापासून आघवे। संस्कार सोळा जाणावें। सांगेन आतां त्यांचीं नांवे। त्यांत मुख्य दहाचि ।।१२।।

गर्भाधानं पुंसवनं सीमंतं जातकर्म च। तन्नामकरणं चापि बहिर्निष्क्रमणं तथा ।।३।।

चौलकर्म तथैवोक्तं वेदारंभो हि युक्तित:। शिवदीक्षाविवाहश्च संस्कारा दशमुख्यका: ।।४।।

गर्भाधान म्हणिजे ओटीभरण। तो पहिला संस्कार जाण। पिंड-उत्पत्तीस मूळ कारण। हेंचि असे ।।१३।। पुंसवन संस्कार दुसरा। डोहाळे सीमंत म्हणती तिसरा। चौथियाचा असे उजियारा। जातकर्म म्हणोनि ।।१४।। नामकरण पांचवा। बहिर्निष्क्रमण सहावा। चौलकर्म म्हणती सातवा। करावा संस्कार हा ।।१५।। वेदारंभ आठवा संस्कार। बटूसीं करणें असे अनिवार। तयाविण ज्ञानप्रसार। होईल केविं ।।१६।।

नववा संस्कार शिवदीक्षा। अत्यावश्यक असे वीरशैवपक्षां। त्याविण संतोष विरूपाक्षा। न होयचि सर्वथा ।।१७।। दीक्षा हा जातिसंस्कार। वीरशैवाचा मुख्य कुलाचार। त्याविण वर्ते जो पामर। भवि जाणावा निश्चयें ।।१८।। शिवदीक्षेचीं लक्षणें। कथिती श्रुति-आगम-पुराणें। सालसें निरोपीन तुजकारणें। शैलात्मजे सुंदरी ।।१९।।

दीयते ज्ञानसंबंध: क्षीयते पाशबंधनम्। दानक्षपणसंयुक्ता दीक्षा तेनेह कीर्तिता ।।५।।

निर्मल शिवैक्य ज्ञानेकुन। ज्या संस्कारें तुटे आशापाशबंधन। म्हणोनि दीक्षा म्हणती त्यालागून। दान क्षपण भावयोगें ।।२०।। ती दीक्षा असे त्रिविध। अंतरात्मा करावया शुद्ध। त्याचीं नांवें विविध। शास्त्रांतरीं पाहावी ।।२१।।

गर्भाष्टमे कृता दीक्षा मुख्या सा षोडशावधि:। गौणी तदूर्ध्वमधमा वीरशैवान्वयायिनाम् ।।६।।

गर्भापासून आठवें वरुष। मुख्य दीक्षाकाल विशेष। मध्यम जाण वरुष षोडश। तयापुढें गौण तें ।।२२।। जन्म झाल्यापासून। देहस्थ लिंगाची आठवण। तीच सुदृढ परिपूर्ण। येणें संस्कारें होये ।।२३।। दीक्षेलागीं आचार्य आवाहन। प्रथम करावें जाण। अग्रासनीं बैसवोन। पूजा करावी भक्तिबळें ।।२४।। ते आचार्य म्हणसी कोण। तयाची सांगेन मी निजखूण। ऐक तूं सावध होवोन। स्नेहभरें पार्वती ।।२५।।

षोडश अध्यायीं वर्णिले शिवगण। सातशें सत्तर असती नेमून। ते शिवाचारमार्गीं निपुण। रत असती एकनिष्ठें।।२६।। तया सकळ गणांमधीं। हे पांच आचार्य जाणते सुबुद्धि। तया पांचाविण दीक्षासिद्धि। करूं नये महामंत्रीं।।२७।। तेहिं चालविला शिवाचार। भूमंडळीं घेवोनि अवतार। हेचि असती मुख्य आधार। वीरशैवाकारणें।।२८।। त्याचे साक्षित्वाचे जे कलश। तीच त्याची प्रतिमा जाणिजेस। ते आचार्यचि असती हा विश्वास। धरिजे शिवगणीं।।२९।। चौघांचे चहु कलश जाणिजें। मध्यें श्रीगुरुरायाचा बोलिजें। ऐसी पंचकलश दीक्षा घेईजें। तंव गुरुकरजात जाहला।।३०।। जंववरी पंचकलश दीक्षा नाहीं। तंववरी भविच बोलिजें पाही। तया शिवभक्ताचे ठायीं। लेखूं नये सर्वथा।।३१।। तयासीं तीर्थप्रसाद तत्त्वतां। देऊं नये वो सर्वथा। आचार्यसाक्षीं दीक्षा नसतां। अनधिकारी तीर्थासीं।।३२।। जंववरी तीर्थप्रसाद नाहीं। तंववरी शिवभक्त नोहे पाही। कंठीचा लिंग तोहि। पाषाण जाणिजें।।३३।। कां म्हणसी तरी ऐक। तीर्थप्रसाद तें लिंगाचें जीवन सम्यक्। तेणेंविण लिंग निर्जीव देख। न मिळता तयासीं।।३४।। कोणी म्हणती जईं लिंग बांधिलें। तईंच तीर्थप्रसाद अर्पिलें। आतां प्रतिदिनीं अर्पावया काय घेतलें। लिंगाचें आम्ही।।३५।। त्यासीं दृष्टान्त असे एक। लक्ष देवोन ऐक सम्यक्। मग हा निमेल कुतर्क। मनाचा निश्चयें।।३६।। जईं वृक्ष उपवनीं लाविले। तईंच तया उदक घातिलें। आतां काय तया

वृक्षाचे घेतले। उदक घालावया ।।३७।। मनीं ऐसा विचार करोन। वृक्षां उदक न देतां जरी राहे उदासीन। तरी तया वृक्षाचें जीवन केविं वाढेल अनुदिन। याचा विवेक करावा ।।३८।। तो वृक्ष कैसा फळेल। कैसे अमृतफळ देईल। मग कैंची सुखसंपदा होईल। न देतां उदक वृक्षां ।।३९।। तेविं लिंगासीं तीर्थप्रसाद। न देतां होईल कैसा सुखानंद। न फळेचि शिवसुखबोध। क्रियाभ्रष्ट म्हणोनि ।।४०।। आणिक एक कवतुक। गुरु लिंग जंगम तिन्ही एक। तरी श्रीगुरु तोचि लिंग देख। साक्षत्वें जालें कीं ।।४१।। तरी लिंगां जें जें सुख देईजें। जें जें पत्र पुष्प वाहिजें। तें तें गुरूसीं अर्पण सहजें। कां आनाठायां जात ।।४२।। तें गुरूसींच अर्पे जाणोन। मग तीर्थप्रसादीं कां न करावा यत्न। प्रयत्नेंकरोनि जरी करी अर्पण। तरी श्रीगुरु संतोषे ।।४३।। म्हणोनि तीर्थप्रसादीं असावा नेम। नित्यनूतन धरावा प्रेम। परि आधी गुरु करावा हें वर्म। तेथेंचि जाणिजें ।।४४।। एऱ्हवीं घरोघरीं गुरु असती। स्वार्थार्थे बोधिती शिष्यांप्रति। परि स्वानुभवें तद्रूप करिती। त्या नांव सद्‌गुरु वो देवी ।।४५।। स्वार्थी जे कां असती गुरु। ते न होती भवसागर तारु। बोधिती अनेक मतांतरु। नानाविध ।।४६।। हे गुरु नाना मतें दाविती। एक ते तीर्थाटनां धाडिती। एक ते पाषाण पुजविती। नाना दैवतें ।।४७।। एक ते तपां धाडिती। एक ते करकमळीं घालविती। एक ते धूम्रपान साधविती। पंचाग्नितापं एक ।।४८।। एक लौकिक कर्में करविती। एक ते वायूसीं झुंझावे घेवविती।

एक ते आसनीं बैसविती। म्हणती कीं उठोचि नको।।४९।। एक ते मौन धरविती। एक ते नागवेचि पळविती। एक ते बळें सांडविती। स्त्रीबालक मातांपितां।।५०।। एक ते अन्न त्यागविती। एक ते कंदमुळे भक्षविती। एक ते कपाटीं बैसविती। एक ते ऊर्ध्वबाहू।।५१।। एक ते जटा वाढविती। एक ते बोडकेचि ठेविती। एक केश लुंच्छविती। नेणती कर्म पशुसम।।५२।। एक ते अजपांत गोवविती। एक ते चक्रें भेदून जा म्हणती। एक तिमिर दाविती। नेत्रापुढें जें चळतसे।।५३।। एक ते नासिकीं लक्ष लावविती। एक नेत्र विकासोनि पाहा म्हणती। एक ते नेत्र झांकविती। अंतरींच पाहा म्हणोनि।।५४।। एक ते यज्ञ होम करविती। स्वर्गीं अमृतपान करा म्हणती। इंद्रपद आणि रंभेची दाविती। लोलुपता।।५५।। एक ते आकाशीं चालविती। एक जळासनीं बैसविती। अमृतपान करविती। अर्धचंद्रां पैं जाऊनिया।।५६।। एक तो लिंगदेह साधवी। देवतांतरातें भेटवी। परि ते आघवीच गोवी। दुःखदायक साधनें।।५७।। परि एका आत्मज्ञानावांचून। तें सर्वहि अकारण। जंव नव्हे एक चैतन्यघन। तंव सर्व साधनें व्यर्थ तीं।।५८।। ऐसीं नाना साधनें साधविती। ते गुरु परि सद्गुरु न होती। जे स्वयें परब्रह्म करिती। ते सद्गुरु जाणावें।।५९।। ऐसिया सद्गुरूसीं जावे शरण। दीक्षा घ्यावी सद्भाव धरोन। नित्य तीर्थप्रसादी सेवन। करावे क्रियामार्गें।।६०।। तीर्थ ऐसा शब्द पडतां कानीं। न पाचारितां जावे लोटांगणीं। किंकरवृत्तीनें

शरण चरणीं। लहान थोर कीजें सर्वां ।।६१।। मग स्वामीसीं शरण रिघीजें। तीर्थां आज्ञा घेईजे। मंत्र युक्तीनें सेविजें। विश्वास धरोनि ।।६२।। ऐसा तीर्थप्रसादी जो शिवगण। स्वभावें होय तयाचें दर्शन। त्याचा भवबंध होय छेदन। पुण्यपावन होय तो ।।६३।। ऐसा जो सत्यशरण। केवळ शिवचि आपण। तो अनंत ब्रह्मांडें व्यापून। अलिप्त असे ।।६४।। तया त्रिभुवनींचें राज्य देतां। थुंकोन सांडी सर्वथा। इंद्रपदासीं हाणी लाथा। मा राज्याची आवडी धरील काय ।।६५।। तो समूळ क्रियेसीं अकर्ता। निष्कामबुद्धि निरहंता। अष्ट महासिद्धि पायां लागतां। श्लाघ्यता न घे ।।६६।। अमृतपान करीत असतां। कांजी अपेक्षा न करी सर्वथा। तेविं वस्तुसुख भोगीतां। इंद्रपदादिक इच्छील काय ।।६७।। म्हणोनि निराश निर्वासना। नि:संग आणि निष्कामना। निर्गुण अतीत त्रिगुणा। शुद्ध सत्त्वात्मक तो ।।६८।। निर्द्वंद्व निजानंद। भेद नाहीं ऐक्यबोध। जें जें दिसें तें तें सच्चिदानंद। आन पदार्थ दिसे ना भासे ।।६९।। तो सदाशिव सर्व पाहे। परि पाहतां हेतु न राहे। अनायासें होवोनि राहे। सर्वज्ञ ते ।।७०।। मी सर्वज्ञ ऐसा। आठवु न होय तया स्वयंप्रकाशां। आठव न आठव दोहींच्या विलासां। साक्षी तो जाहला ।।७१।। साक्ष जरी म्हणावा। तरी कांहीं पदार्थ असावा। मग साक्षी व्हावा। पदार्थाचा ।।७२।। जरी पदार्थचि नाहीं। मा साक्षित्व मिरवील कांहीं। यालागीं कांहीं न होवोनि पाही। पाहता पाहणारा तो ।।७३।। तोचि परब्रह्ममूर्ति।

शुद्ध जंगम बोलिजें तयाप्रति। तयाचें दर्शनमात्रें मुक्ति। ओळंगती वो देवी।।७४।। मुक्ति दास्य करिती हें नवल काय। तो कृपादृष्टीनें जरी पाहे। तरी आपुले देत आहे। स्वस्वरूप जें।।७५।। तो सद्भावाचा भोक्ता। सद्भावें शरण जातां। जन्मजन्मांतरीची व्यथा। सकळ हरितु असे।।७६।। ते कृपेचे सागर। त्यांची कृपा आम्हां निरंतर। ओळंगो त्याचें चरण सादर। स्वहितालागीं।।७७।। स्वहित जरी म्हणती कोण। तरी तयाचेनि शिवपण। मज शिव म्हणावया कारण। त्याचिया संयोगें।।७८।। ऐसे ते जे महामहंत। पुजितसे मी निभ्रांत। ते मजलागीं दैवत। मी भक्त तयांचा।।७९।। विचारितां मी तोचि जाण। बाहीर वेषाचें पालटण। ज्ञानिये जाणती खूण। भेदातें सांडोनिया।।८०।। शिव म्हणे गिरिजेसीं। तूं माझें स्वरूप अससी। शरीरभावें भेदासीं। रूप जाहलें वो देवी।।८१।। एकचि बहुरूपिया आपण। बहु रूपें आला घेवोन। परि तो बहुरूपियाचि आन। नाहीं दुसरा।।८२।। तैसाचि मी आपण। अनंत रूपें नटलो जाण। परि रूपां अरूपां साक्षी होवोन। निराळाचि असे कीं।।८३।। निराळा परि मी जाण। जाणतु असे आपण। जाणपणालागून। जाणता तो मी।।८४।। ऐसा जो मी मजलागीं। भेटी घेणें आहे निजांगीं। तरी या ग्रंथालागीं। विसंबू नये।।८५।। ऐसें पार्वतीनें ऐकोनि वचन। तद्रूप झाली आनंदघन। मनीं तन्मय होऊन। तटस्थ ठेली।।८६।। मग येवोनि देहावरी। उठोनि साष्टांग नमस्कार करी। म्हणे

मज भेटविले त्रिपुरारी। स्वामिनाथा करुणानिधे।।८७।। महापुरीं वाहात जातां। अवचित कृपाळु काढी दाता। तैसें तुम्ही स्वामी समर्था। तारियले मातें।।८८।। चरणां लागे वेळोवेळां। धन्य धन्य स्वामी जाश्वनिळा। बरवें निरोपिलें प्रांजळा। माझिये आवडीसारिखे।।८९।। हा परमरहस्य ग्रंथ जे पाहाती। ते शिवरूप स्वयें होती। ब्रह्मस्वरूप स्वयें पार्वती। निश्चयें जाण।।९०।। जे शिवाचे शिवभक्त। सदा आचारी दीक्षावंत। जे जाहाले गुरुकरजात। तिहीं हा ग्रंथ परिसावा।।९१।। भवीसीं श्रवण न करवावा। हा शिवाचारी शिवभक्तीं ऐकावा। ऐकोनि जीवीं धरावा। तैसाचि करावा आचारु।।९२।। हा ग्रंथ होतां श्रवण। इंद्रियें होती प्रवीण। मार्ग कळती आचरण। आचरावया।।९३।। आतां असो कथन फार। परमरहस्य ग्रंथ विस्तार। पार्वतीप्रति ईश्वर। वारंवार सांगतसे।।९४।। त्याचें सार या ग्रंथाचे ठायीं। वर्णिलें असे सतराध्यायीं। अज्ञ जनां आचाराविषयीं। आरसा जाण पाहावया।।९५।। हा ग्रंथ तरी ईश्वरमुखीचा। ईश्वर तोचि नागेश साचा। भिन्न भेद म्हणतां वाचा। दुखंड होय।।९६।। तोचि तो अवतरोन। नागेश नामाभिधान। मिरवे एवढीयानें म्हणून। भेद जाहला काई।।९७।। जैसें सुवर्ण सोनेपणें। क्षणभरी मिरवलें गेटाभिधानें। तरी वाळिजें काय सोनेपणें। नोहे म्हणोनिया।।९८।। यालागीं शिव तोचि नागेश्वरु। तोचि बसवराज श्रीगुरु। माणूरपट्टसिंहासनाधिकारु। असे जयासीं।।९९।। त्याचिया

कृपेंकरून। परमरहस्याची टीका विस्तारून। करविते जाहले आपण। श्रीबसवराज स्वामी ।।१००।। मन्मथशिवलिंग म्हणे। मज वदविले स्वामीनें। पावा वाजवितां तयातें ऐकून। वाजविता तो निराळा ।।१०१।। सूत्रधारियाचें बाहुले। तें चालें नाचें हालें सूत्रधारियाचेनि बोले। सूत्रधारी खेळें ज्या ज्या कळें। तें तें कळें खेळतुसे ।।१०२।। म्हणोनि सूत्रधारी गुरुगोसावी। टीका करविली बाहुलीकरवी। येथें मज मीपणाची पदवी। नुरेचि सर्वथा ।।१०३।। यालागीं ग्रंथकर्ता श्रीगुरुनाथ। तोचि वदला ग्रंथार्थ। शिवगणीं परिसावा प्रीत्यर्थ। म्हणे मन्मथ कर जोडोनि ।।१०४।। हा असे प्रसादी ग्रंथ जाण। याचें करी जो नित्य पारायण। तयाची भवव्याधि चुके मरण। अमर होय सत्य पैं ।।१०५।। ज्याचा लिंगीं नाहीं विश्वास। जे अन्य धर्माचे बनले दास। त्याचा स्पर्श न करावा ग्रंथास। अधर्मी जाण म्हणोनि ।।१०६।। जे विश्वासें भावें वाचिती। ते संसारसुख भोगोनि अंतीं। पावती सायुज्यमुक्ति। धन्य नर तेंचि पैं ।।१०७।। जे दुर्जन निंदक खळ। तया नावडे ग्रंथ रसाळ। रंभाफल त्यागूनि अर्की फळ। आवडी जाण वेचीतसे ।।१०८।। कीं दुग्ध सांडोनिया जाण। प्राशी मद्यातें जाऊन। कीं दुर्दैवी नेत्र बांधून। द्रव्यघटां ओलांडी ।।१०९।। विश्वासें जे श्रवण करिती। तयाच्या सर्व व्याधि नासती। पठण करितां धनाढ्य होती। कीर्ति वाढे अपार ।।११०।। पुत्र-इच्छा धरोनि मनीं। तत्पर होती पारायणीं। तयाचा वंशविस्तार

सुलक्षणी। होय जाण शिवकृपें ।।१११।। हा परमरहस्य ग्रंथ परिकर। वीरशैवधर्माचें बीजांकुर। भावें करितां रक्षण साचार। रक्षी शंकर तयातें ।।११२।। श्रोते शिवगण समस्त। तया विनवी किंकर मन्मथ। ग्रंथसमाप्तीस आज्ञा घेत। चित्तीं सद्गद होऊनिया ।।११३।। कपिलाधार पुण्यधाम। तेथेंचि जालो मी पूर्णकाम। टीका केली सुगम। परमरहस्याची ।।११४।। शके पंधराशें बावीस। विक्रमनाम संवत्सरास। वद्य त्रयोदशी माघ मास। ग्रंथ पूर्ण झालासे ।।११५।। इति श्रीपरमरहस्यसारामृत। शिवगौरी-संवादीं वर्तत। त्याची टीका करोनि प्राकृत। कृतकृत्य मन्मथ ।।११६।।

।। इति श्रीपरमरहस्ये हरगौरीसंवादे सर्वाचारविधिनिरूपणं नाम सप्तदशोऽध्याय: समाप्त: ।।

श्लोक ६, ओव्या ११६.

❑

एकूण श्लोकसंख्या ३२९ । एकूण ओवीसंख्या २१७३

॥ इति परमरहस्यग्रंथः समाप्तः ॥

प्रसाद

जे शब्दसृष्टीचे ईश्वर । सबराभरीत अगोचर । निर्लेप मंगल साचार । परमवंद्य जे ।।१।।
नमू तया परमेश्वरा । जगद्रूपा जगदाधारा । जगन्निर्मात्या महेश्वरा । सच्चिद्रूपा जी ।।२।।
जी मी वाग्यज्ञ आरंभिला । तो हा तुम्ही पूर्ण केला । कृपा करोनी पाहिजे दिधला । आशीर्वाद हा ।।३।।
जे दुष्ट दुर्जन अमंगळ । त्यांचे ह्रदये होवोत निर्मळ । कळीकाळ सकळ । निरसोनी जाय ।।४।।
जे जे दिसे दृष्टीपुढे । ते अवघे शिवरूप गाढे । ऐसिया संतांची हुडे । निर्भय हिंडो ।।५।।
सर्व सुखांचा हो सुकाळ । दु:ख दारिद्र्य छळ । नष्ट हो सकळ । मनोमालिन्यही ।।६।।
जे का शिवभक्त जन । त्यांच्या दर्शने पावन । सकळ सृष्टीचे जीवन । होतु आनंदे ।।७।।
या माझ्या जगती तळी । सर्वत्र संचरो भक्तमंडळी । शिवभक्तीची नव्हाळी । नित्य लाभो जगा ।।८।।
जेजे अमंगळ या भुवनी । ते ते लोपो शूळपाणी । सुमंगळ भाव या जनी । उपजो सदा ।।९।।
वाढो लोकी सदाचार । सद्विद्येचा भडिमार । होओ सर्वत्र साचार । हाचि प्रसाद आवडे ।।१०।।
आणिकही ऐसे करावे । सुखाचे मळे पिकवावे । आमूलाग्र नासून जावे । विघ्नबाधा ।।११।।
ही माझी वाक्पुष्पपूजा । समर्पण हो श्रीगुरुराजा । मन्मथशिवलिंग विनवी ओजा । श्रीगुरु नागेशास्री ।।१२।।

❖

श्रीविश्वाराध्यांची आरती

श्रीविश्वाराध्याय मंगलम् । शिव विश्वैकपालाय मंगलम् । विश्वेशजाताय विश्वादिबीजाय । श्रीविश्ववंद्याय मंगलम् ।।धृ.।।

चरवृंदवंद्याय मंगलम् । वरचरनीतिबोधाय मंगलम् । गुरुरूपधाराय गुरुराजिराजाय । परिपूतदेहाय मंगलम् ।।१।।

भवमूलभंगाय मंगलम् । शिव शिवलिंगसंगाय मंगलम् । भवमंगलांगाय शिवपिंग चूडाय । कवितुंगसेव्याय मंगलम् ।।२।।

काशीपुरेशाय मंगलम् । कवि काशीनाथेशाय मंगलम् । क्लेशापहाराय पाशप्रमोचाय । श्रीशादि मान्याय मंगलम् ।।३।।

श्रीमन्मथस्वामींची आरती

आरती शिवराजा । मन्मथस्वामी महाराजा । वेदान्ताचे सार, मुख्य पेरिले बीज ।।धृ.।।

समाधि महास्थळी, सर्पव्याघ्रांची जाळी । निर्वैर श्वापदे हो, समदृष्टीने न्याहाळी ।।१।।

शिवभक्ति लोप झाली, विश्व शिवमय केले । ग्रंथ हा परमरहस्य, गुह्य प्रकट केले ।।२।।

अभंगी निरूपण, अनुभविले ज्ञान । आनंद शिवदासा, सर्व शुभकल्याण ।।३।।

निवेदन

परमपूज्य श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर **श्री १००८ जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी** यांच्या दिव्य नेतृत्त्वाखाली 'श्रीकाशीजगद्गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्या वतीने वीरशैव धर्माचा इतिहास, साहित्य व तत्त्वज्ञान यासंबंधी धर्मतत्त्वजिज्ञासूंसाठी तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी तीन परीक्षा आयोजीत केल्या असून पहिली 'वीरशैव सिध्दान्त प्रबोध परीक्षा' १९९७ पासून घेतली जात आहे. या परीक्षेला महाराष्ट्रातून उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

उद्देश

वीरशैवधर्म अत्यंत प्राचीन आहे. वीरशैवधर्माचा व संस्कृतीचा ठसा प्राचीन काळापासून भारतातल्या विविध भागांतील लोकांवर उमटलेला आहे. याची प्रचिती इतिहास, ताडपत्रे, ताम्रपट व शिलालेखावरून येते. संस्कृत, कन्नड, मराठी, इंग्रजी इत्यादी भाषांतून विद्वानांनी, शिवशरणांनी व संतांनी आपल्या ग्रंथातून व साहित्यकृतीतून वीरशैव धर्मतत्त्वे निरूपीली आहेत. वीरशैवधर्म अत्यंत उदार, व्यापक व सर्वसमावेशक स्वरूपाचा आहे. अशा तत्त्वज्ञानाचा, ग्रंथकार व त्यांच्या ग्रंथांचा, शिवशरण व संत यांच्या जीवनाचा तसेच त्यांच्या साहित्यकृतींचा जिज्ञासूंना व विद्यार्थ्यांना सुलभ व योग्य पध्दतीने अभ्यास करता यावा व त्यांचे यथोचित उद्‌बोधन व्हावे हाच परीक्षा आयोजित करण्यासंबंधीचा उद्देश आहे.

परीक्षा

एकूण तीन परीक्षा आयोजित केल्या आहेत.

१. वीरशैव सिध्दान्त प्रबोध परीक्षा

२. वीरशैव सिध्दान्त प्रवीण परीक्षा

३. वीरशैव सिध्दान्त पंण्डित परीक्षा

'वीरशैव सिध्दान्त प्रबोध परीक्षे' ची तीन पाठ्यपुस्तके अतिशय सुबोध व सुगम अशा भाषेत मुद्रीत केलेली आहेत. 'वीरशैवधर्माचा स्थूल इतिहास' आणि 'अष्टावरण' या पुस्तकातील प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी प्रश्नावली दिली आहे. प्रश्नावलीवरून विद्यार्थ्यांना अभ्यासाची दिशा समजेल.

''**वीरशैव संतवाणी**'' या पाठ्यपुस्तकातील पहिल्या भागात अल्लमप्रभू, सिध्देश्वर, बसवेश्वर, अक्कमहादेवी, चन्नबसवेश्वर यांची प्रत्येक पाच वचने समाविष्ट केली आहेत. प्रस्तुत पुस्तकाच्या दुसऱ्या भागात मन्मथस्वामी, लिंगेश्वर, बसवलिंग, लक्ष्मण, शिवदास या संतांचे प्रत्येकी पाच अभंग समाविष्ट केले आहेत. मराठीभाषक विदयार्थ्यांच्या दृष्टीने सर्व वचने देवनागरि लिपीत मुद्रित केली आहेत. प्रत्येक वचनातील शब्दांचे अर्थ मराठीत दिले आहेत. शब्दार्थानंतर प्रत्येक वचनाचा भावार्थ मराठीत दिला आहे. भावार्थानंतर टिप दिलेली आहे. टीपांत काही संदर्भ आणि अभंगातील मध्यवर्ती कल्पना व अभंगाची वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. प्रत्येक अभंगकाराच्या अभंगांनंतर प्रश्नावली दिली आहे.

प्रत्येक पाठ्यपुस्तकाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी नमुना प्रश्नपत्रिका दिली आहे. त्यावरून विद्यार्थ्यांना प्रश्नाचे स्वरूप, प्रश्ननिहाय गुणविभागणी यांची स्पष्ट कल्पना येईल.

पंडित परीक्षेसाठी वीरशैव अभ्यासकांनी पी.एच.डी. साठी लिहीलेल्या आणि शैवभारती शोध प्रतिष्ठानने प्रकाशित केलेल्या शोध प्रबंधांचा समावेश केलेला आहे.

शैवभारती शोधप्रतिष्ठान जंगमवाडीमठ, वाराणसी प्रकाशने

१. लिङ्गधारणचन्द्रिका (संस्कृत-मराठी)	- नन्दिकेश्वर शिवाचार्य	१२५.००
२. ब्रह्मसूत्रश्रीकण्ठभाष्यम् (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी	१५०.००
३. वीरशैव अष्टावरण विज्ञान (संस्कृत-मराठी)	- डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी	५०.००
४. सिध्दान्तशिखामणिसमीक्षा (संस्कृत)	- डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी	२००.००
५. निगमागम संस्कृति (संस्कृत-हिन्दी)	- पं. व्रजवल्लभ द्विवेदी	१५०.००
६. सूक्ष्मागमः (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी	१२५.००
७. चन्द्रज्ञानागमः (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी	१७५.००
८. मकुटागमः (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी	१००.००
९. कारणागमः (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं.रामचंद्र पाण्डेय	१५०.००
१०. निगमागमीयसंस्कृतिदर्शनम् (संस्कृत-हिन्दी)	- पं. व्रजवल्लभ द्विवेदी	२००.००
११. पारमेश्वरागमः (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी	२००.००
१२.Chandrajnanagam (Sanskrit-English)	- Tr. by Dr. Rama Ghose	300.00
१३. ईशावास्योपनिषद् (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. जगन्नाथ शास्त्री तैलङ्ग	१००.००

१४. केनोपनिषद् (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. जगन्नाथ शास्त्री तैलङ्ग	१५०.००
१५. सिध्दान्तप्रकाशिका (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी	७५.००
१६. Makutagama	- Tr. by Dr. Rama Ghose	150.00
१७. शक्तिविशिष्टाद्वैततत्त्वत्रयविमर्शः (संस्कृत)	- डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी	२००.००
१८. अनुभवसूत्रम् (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा पं. जगन्नाथ शास्त्री मुसलगाँवकर	१२५.००
१९. सिध्दान्तशिखोपनिषद् (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. जगन्नाथ शास्त्री तैलङ्ग	२५०.००
२०. ब्रह्मसूत्रशाङ्करीवृत्तिः (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. केदारनाथ त्रिपाठी	१५०.००
२१. सिध्दान्तसारावलिः (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी	४००.००
२२. श्री गुरूगीता (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी	१२५.००
२३. शिवाद्वैतदर्पणः (संस्कृत-हिन्दी)	- शिवानुभव शिवाचार्य	१००.००
२४. सिध्दान्तशिखामणी मीमांसा (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी	२५०.००
२५. देवीकालोत्तरागमः (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी	१००.००
२६. Paramesvaragama	- Tr. by Dr. Rama Ghose	550.00
२७. संस्कृत वाङ्मय मे वीरशैव साहित्य (संस्कृत-हिन्दी)	- एस. अक्कूरमठ (सम्पा. पं. प्रभुनाथ द्विवेदी)	१५०.००

२८. ऋग्वेदस्यप्रथममण्डलस्य सयणवेंकटमाधव - भाष्ययोस्तुलनात्मकमध्ययनम् (संस्कृत-हिन्दी)	- डॉ. प्रमोदिनी पण्डा	४००.००
२९. तन्त्रागमीय धर्म-दर्शन (२ भाग) (संस्कृत-हिन्दी)	- पं. व्रजवल्लभ द्विवेदी	९००.००
३०. साम्ययोगमीमांसा (संस्कृत-हिन्दी)	- मुकुट बिहारी लाल	३००.००
३१. भारतीय संस्कृति का समग्र स्वरूप (हिन्दी)	- पं. व्रजवल्लभ द्विवेदी	३००.००
३२. संस्कृत वाङ्मय वल्लरी (संस्कृत-हिन्दी)	- डॉ. गंगाधर पण्डा एवं डॉ. प्रमोदिनी पण्डा	३००.००
३३. मुण्डकोपनिषद् (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा. पं. जगन्नाथ शास्त्री तैलङ्ग	४५०.००
३४. वातुलशुध्दाख्यतन्त्रम् (संस्कृत-हिन्दी)	- सम्पा पं. व्रजवल्लभ द्विवेदी	२००.००
३५. Transmigration (जन्मान्तरवादः) (इंग्लीश)	- पं. केदारनाथ त्रिपाठी	१५०.००
३६. सांस्कृतिक राष्ट्रवाद (हिन्दी)	- पं. व्रजवल्लभ द्विवेदी	३००.००
३७. पारमेश्वरागम (तेलगू)	- डॉ. के. प्रताप	६००.००
३८. पंचविंशतिलीलाशतकम् (संस्कृत-हिन्दी)	- पं. व्रजवल्लभ द्विवेदी	३००.००
३९. Siddhanta Prakasika (English)	- Translated by T. Ganeshan	150.00
४०. पंचवर्णसूत्रमहाभाष्यम् (संस्कृत-हिन्दी)	- पं. व्रजवल्लभ द्विवेदी	१५०.००

४१. **तन्त्रागम सार-सर्वस्व** (हिन्दी)	- पं. व्रजवल्लभ द्विवेदी	१५०.००
४२. **श्वेताश्वतरोपनिषद्** (संस्कृत-हिन्दी)	- पं. जगन्नाथ शास्त्री तैलङ्ग	३००.००
४३. **सिध्दान्तशिखामणि** (हिन्दी-व्याख्या)	- पं. राधेश्याम चतुर्वेदी	४५०.००
४४. **जन्म हा अखेरचा** (मराठी ग्रंथ)	- डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी	३५०.००
४५. **वीरशैव संतकवी बसवलिंग** : चरित्र व वाङ्मय (मराठी)	- डॉ. चंद्रशेखर कपाळे	१५०.००
४६. **लक्ष्मण महाराज : व्यक्ति आणि वाङ्मय** (मराठी)	- डॉ. भी. शी. स्वामी	१५०.००
४७. **श्रीमन्मथशिवलिंगकृत परमरहस्य** (मराठी)	- डॉ. शे.दे. पसारकर	२००.००
४८. **वीरशैवांचे मराठी-हिन्दी वाङ्मय : एक अभ्यास** (मराठी)	- डॉ. श्यामा घोणसे	१००.००
४९. **मन्मथस्वामी : व्यक्ती वाङ्मय** (मराठी)	- चंद्रकांत देऊळगांवकर	७५.००
५०. **वीरशैव मराठी अभंगकविता : एक चिकित्सक अभ्यास** (मराठी)	- डॉ. शोभा कराळे	१००.००
५१. **मराठी काव्यातील शिवदैवत - दर्शन** (मराठी)	- शिवशंकर उपासे	१२५.००
५२. **विदर्भातील वीरशैव संप्रदाय : ग्रंथकार व वाङ्मय** (मराठी)	- अशोक मेनकुदळे	१००.००
५३. **वीरशैव संतकवी शिवदास : एक अभ्यास** (मराठी)	- डॉ. वैजनाथ फास्के	१५०.००
५४. **सिध्दान्तशिखामणी** (इंग्लीश)	- डॉ. एम. शिवकुमार स्वामी	१४००.००

५५. वीरशैव पंचपीठे (मराठी)	- डॉ. चंद्रशेखर कपाळे	३०.००
५६. वीरशैव संतवाणी (मराठी)	- पं. शिवाप्पा खके	३०.००
५७. अष्टावरण (मराठी)	- डॉ. शे.दे. पसारकर	३०.००
५८. वीरशैवधर्माचा स्थूल इतिहास (मराठी)	- डॉ. चंद्रशेखर कपाळे	२०.००
५९. पंचाचार (मराठी)	- पं. शिवाप्पा खके	३०.००
६०. वीरशैवांची स्फुट कविता (मराठी)	- शांतितीर्थ स्वामी	३०.००
६१. मन्मथचरितामृत (मराठी)	- डॉ. शे.दे. पसारकर	२०.००
६२. संक्षिप्त शिवपूजाविधी (मराठी)	- डॉ. काशीजगद्‌गुरू महास्वामीजी	१५.००
६३. शिवपाठ (मराठी)	- डॉ. काशीजगद्‌गुरू महास्वामीजी	५.००
६४. वीरशैवरत्न (मराठी)	- पं. काशीनाथशास्त्री	५०.००
६५. सिध्दान्तशिखामणि प्रवचनप्रभे (कन्नड)	- डॉ. काशीजगद्‌गुरू महास्वामीजी	५००.००
६६. श्री सिध्दान्तशिखामणि तत्त्वामृत (पारायण ग्रंथ, ओवीबध्द मराठी)	- डॉ. शे.दे. पसारकर	२००.००
६७. श्री सिध्दान्तशिखामणि (रशियन भाषेत)	- कु. यूलिया (गौरी) क्रावचेन्को	५००.००
६८. परमरहस्य (मराठी)	- संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामी	१००.००

ग्रंथ मिळण्याचे ठिकाण

शैवभारती शोधप्रतिष्ठानम्

जंगमवाडी मठ, वाराणसी, फोन : (०५४२) २४५०५४६

श्रीमद् जगद्गुरू पंचाचार्य यांचे सेवक

श्रीधर श्रीराम पैलवान

१७०४, सोमवार पेठ, भवानी गल्ली, तासगांव

जि. सांगली, चरभाष : ९५२७८०६७५०, ९०२८२३५१३५, ९३७२१४८०९६

श्रीमद् जगद्गुरू पंचाचार्य बुक स्टॉल व कॅसेट सेंटर अँड नॉवेल्टी

शाहिर वस्ती, प्लॉट नं. ५५/४०, भवानीपेठ, सिध्देश्वर बालक मंदिर जवळ, सोलापुर

फोन : (०२१७) २७२७२२१, मोबाईल : ०९९६०२२२१५१, ९४२१०३३७०६, ९४०४३०४२२१